बच्चों की चंचलता और नटखट क्रीडाएं भी हमेशा से बालकवियों को आकर्षित करती रही है और हर दौर में अपने–अपने ढंग से उसका चित्रण किया है। बच्चों के रूठने–मनाने, तरह–तरह के मनोभावों को कवियोंने मजकर लिखा है। इसीतरह छुट्टियॉं भी हमेशासे बच्चों को आकर्षित करती रही है। आज का बच्चा भी छुट्टी लेना चाहता है। जल्दी जगने से लेकर, कलम–किताबों से मैडम–टीचर से भी छुट्टी लेनाा चाहता है। भगवती प्रसाद गौतम छुट्टी–छुट्टी कविता में लिखते है –

''बस में चढ़ने से छुट्टी
हरदम पढ़ने से छुट्टी
खूब झूमते–गाते हम
दिनभर धूम मचाते हम
मस्ती, घर–बाहर मस्ती
खिल उठती सारी बस्ती
सबके मन भाती छुट्टी
मौज–मजे लाती छुट्टी।''

एक महत्वपुर्ण बात यह है कि, आज के बालक ऊपर से देखने पर चाहे जितने भी लापरवाह लगे, आज के बालक से वे उतने ही जिम्मेदार भी है। वे मॉं–पिता की मुश्किलों और परेशानियों को भली–भॉंती समझते है। बेटी हो या बेटा घर के कामों में मॉं की मदद करते है। ऐसे नन्हें बच्चों को लेकर उनके नन्हें संकल्पों को लेकर भी कविताऍं लिखी गई है। इतना ही नहीं नई सदी की नई तकनिकें भी आज की बाल–कविता में दिखाई देती है। यह बिल्कुल सच्चाई है कि, आज के बालक नई–नई चीजों और उनसे जुडी तकनीकी जानकारी को झट से जान लेते है। वे उनका इस्तेमाल करना ही नहीं, बल्कि उनका आनंद लेनाा भी सीख जाते है। घर में कम्प्युटर आने पर पापा से पहले मुन्ना सीख गया –

''पापा लाए कम्प्युटर, अब तक सीख न पाए
पर चिंटू ने यों ही सीखा, सबकुछ बिना सिखाए
विंडो खोल बनाता है वह जब–तब चित्र
अपने बाबाजी को उसने बना लिया है मित्र।''

आज का बालकाव्य बच्चों के लिए कौतुक की तरह है। सहज शब्दों में बातचीत के लहजे में ही कविता रची जा रही है, जो बच्चों को सहज रू॰ से ग्राहय हो जाती है। इसमें बच्चों में नैतिक शिक्षा के साथ ही सत्य, निष्ठा, राष्ट्र–चेतना और श्रम के महत्ता का विकास भी होता है। रामगोपाल 'साही' की कविता 'बच्चों ने दी सीख बड़ों को ' का उदाहरण दृष्टव्य है –

''कर न सके जो लोग गॉंव में, बच्चों ने वह काम किया।
साफ–सफाई कर पनघट की, बच्चों ने श्रमदान किया।
आत्म–चेतना, राष्ट्र–चेतना, उन्नत देश बनाती है
बच्चों की प्रतिभा ही हरदम, राष्ट्र–भविष्य बनातीं है।''

## निष्कर्ष

इसतरह हिंदी बालकाव्य में बच्चों के बहुमुखी व्यक्तित्व के विकास का प्रयास किया जा रहा है। बच्चों का व्यक्तित्व व्यापक होता है। उसमें मानवीय मूल्यों का बीजारोपण, सद्‌गुणों का उद्रेक, बाल–अधिकारों की अनुभूति, खेल, विज्ञान, तकनिकी और समस्याओं के समाधान की क्षमता का संवर्धन समय में बाल–काव्य भी समय के अनुरूप अपने नए और अनुठे तेवर में लिखा जा रहा है। जिसमें नए प्रतीक, नए बिंब, नई शैली और अनुठी प्रस्तुती की नवीनता दिखाई देती है। बालमनोविज्ञान का भी पूरा ध्यान रखा जा रहा है। साथ ही भावपक्ष और कलापक्ष भी समृद्ध हो रहे है।

बच्चों के सर्वांगिन विकास में आज का बाल–काव्य निश्चित रूप से सहायक हो रहा है। बच्चों में जीवनमुल्यों का विकास कर रहा है। उनके चरित्र–निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभा सकता है।

हिन्दी बाल–काव्य व्यापक एवं समृद्ध है। इस दिशा में बाल साहित्यकारों के नवीन प्रयोग सार्थक कहे जा सकते है। बाल–काव्य का परिवेश गत वर्षों से निश्चित रूप से बदला है। वास्तविक जीवन से निकटता रखनेवाली बाल–कविता बच्चों को रूचिकर लगती है। परिणामस्वरूप बच्चों के मन में स्थाई रूप से प्रेम, दया, वीरता, करूणा, कर्तव्य आदि भावनाओं का विकास करने में सहायक होती है।

आज के समय में टी.वी. पर प्रसारित होने वाले कार्टून प्रोग्राम की ओर बच्चे बहुत आकर्षित हो रहा है। ये कार्यक्रम पूर्णतया कल्पना के धरातल पर ही होते है, इससे बच्चे दिशाहीन हो सकते है। इससे बचने के लिए हम सभी का उत्तरदायित्व है की बच्चों में पठनीयवृत्ति जगाये। इसके लिए यह बालसाहित्य उपयुक्त सिद्ध होगा।

❖❖❖

# 'विठ्ठला' नाटक में मानवी संवेदना

डॉ. वसंत माळी
आसारामजी भांडवलदार महाविद्यालय
देवगांव (रंगारी), ता. कन्नड, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र (India) ४३१ ११५
भ्रमणध्वनी ९८६०६७३७१२

'विठ्ठला' मराठी के आधुनिक नाटककार विजय तेंदुलकर का सशक्त नाटक है । वास्तव में यह लघु नाटक है । इसका प्रकाशन सन २००८ में राज कमल प्रकाशन नई दिल्ली से हुआ है । यह नाटक केवल ९१ पृष्ठों का है । यह सुप्रसिद्ध नाटककार विजय तेंदुलकर की ऐसी रोचक नाट्य–कृति है । जिसमे सामाजिक विसंगतियों, धर्मा डंबरो और चली आ रही पुराणी कुरीतियों पर सटीक रूप के माध्यम से तीखा प्रहार किया गया है । प्रस्तुत मराठी नाटक का सुषमा बक्षी ने हिंदी में सफल अनुवाद किया है । मराठी नाट्य साहित्य को तेंदुलकर ने एक नया आयाम प्रदान किया है । उनके जीवन पर पिता गहरा प्रभाव था । उनके पिता नाटक प्रेमी थे ।

विजय तेंदुलकर के लोकप्रिय नाटकों में 'खामोश अदालत जारी है', 'घासीराम कोतवाल', 'सखाराम बाइंडर', 'जाति ही पूछो साधु की', 'कन्यादान', 'गिद्ध' आदि है उन्होंने ५० से अधिक नाटकों का सृजन किया तथा अपने सशक्त कथ्य और शिल्प की नवीनता से पाठकों के अनुवाद अनेक भाषाओं में अत्यंत सफलता के साथ हुए है । कुलमिलाकर हिंदी में आपके बहुतसे नाटक रंगमंच पर खेले जा चुके है। कहा जाता है की पाठक हमेशा रंगमंच पर तेंदुलकर के नाटकों का इंतजार करते थे जब भी आपके नाटक रंगमंच पर खेले गये पाठकों ने हमेशा उन नाटकों का स्वागत किया, प्रशंसा की है । तेंदुलकर के नाटकों में मानव जीवन की विषमताओं, स्वाभाविक व् अस्वाभाविक यौन सम्बन्ध जातिगत भेदभाव और हिंसा का वास्तव चित्रण मिलता है।

वास्तव में विजय तेंदुलकर काल्पनिक विषय विस्तार में अधिक नहीं रमे उन्होंने जीवन में जो वास्तव चित्र देखा, जो प्रसंग देखे उन्हें अपने नाटकों के माध्यम से प्रस्तुत किया । इसलिए उनके नाटक वास्तववादी प्रतीत होते हैं । वास्तव में वे एक प्रगतिशील नाटककार थे उनके नाटकों में विद्रोह, नवीनता एव प्रयोग शीलता का सुन्दर समन्वय दिखाई देता हैं। विठ्ठला नामक नाटक में अतृप्त भटकती आत्मा से सामाजिक कुरीतियों, धर्म के नाम पर चलने वाला बाजार, मनुष्य का स्वार्थी रूप, ढोंग – बाह्याडंबर का पर्दाफाश किया हैं ।

नामा नाटक का नायक है । वह लोगो के कपडे शिलाकर अपना गुजारा करता है । वह विठ्ठल का भक्त है । उसका सारा समय विठ्ठल की भक्ति में लीन होता है । अपने व्यवसाय के प्रति वह प्रामाणिक नहीं है जिसके कारन कई बार कपडे सिलाने में उसकी भूल होती है ।

प्रस्तुत विठ्ठल नाटक में नामा नमक दर्जी का व्यवसाय करनेवाले व्यक्ति के जीवन का संघर्ष चित्रित हैं। नामा की आर्थिक स्थिति सामान्य हैं । वह दर्जी का व्यवसाय करके अपने परिवार का बोज उठता हैं। वह विठ्ठल भक्ति में निरंतर लगा रहता हैं । वास्तव में विठ्ठल पर उसकी असीम श्रद्धा हैं । अपने व्यवसाय में नामा अधिक रम नहीं पाता जिसके कारण समय पर कपडे न दे पाने के कारण उसे गालियाँ भी सूननी पड़ती हैं। अपने काम के प्रति गंभीर न होने के कारण उसे लोगों का कोपभोजन बनना पड़ता हैं । नामा की पत्नी भी उसके स्वभाव के कारण दु:खी हैं ।

भक्तिकी तरह नामा का स्वभाव भी सरल है उसे किसी के प्रति इर्षा, द्वेष नहीं है उसकी किसी सहजता के कारण उस गांव में रहनेवाला विठ्ठल जोशी का बहुत भी उसपर रीझ जाता है ।

नामा के गाँव में पीपल के पेड़ पर एक भुत रहता हैं । वैसे यह भुत इसी गाँव में रहनेवाले विठ्ठल जोशी का हैं । विठ्ठल जोशी एक शिक्षित परिवार में जन्मा था जैसे–जैसे वह बड़ा होने लगा वैसे उसकी महत्वकांक्षाएँ भी बढ़ने लगी उसी दौरान एक बड़े घर की अल्पायु में ही विधवा बनी सुन्दर स्त्री अपने पति के जायदाद की अकेली वारिस थी विठ्ठल जोशी के मन में उस सुन्दर स्त्री तथा जायदाद के प्रति लालच निर्माण हो जाता हैं । उस विधवा स्त्री को प्राप्त करने की लालसा विठ्ठल जोशी के मन में जाग्रत होती हैं ।

विठ्ठला नाटक में लिखा हैं 'जिन्दगी बड़ी सहज होती हैं हाय–हाय, भाग दौड़ से वह सहजता नहीं रह पाती कभी–कभी अति महत्वकांक्षाएँ ऐसी अँधेरी गुफा में ला छोड़ती हैं, की हाथ मलता ही शेष रह जाता हैं, जिन्दगी एक छलावा बनकर रह जाती हैं ।'

विठ्ठला भी बड़ा महत्वकांक्षी था गरीब परिवार की मर्यादा भूलकर, ऐश आराम का जीवन जीना चाहता था, लेकिन क्या हुआ ऊँचे परिवार की विधवा से क्या दिल लगा बैठा की अकाल मृत्यु का ग्रास बन जाता हैं ।[१]

वास्तव में विठ्ठल उस विधवा स्त्री के साथ–साथ उसकी जायदाद भी पाना चाहता था। लेकिन विधवा स्त्री के देवर को दोनों का रिश्ता मंजूर नहीं था । विठ्ठल इस स्त्री के देवर की हत्या का षडयंत्र रचता हैं । लेकिन भाग्य विठ्ठल का साथ नहीं देता उस स्त्री का देवर विठ्ठल को उसकी प्रियतमा के सामने ही मौत के घाट उतार देता हैं। प्रस्तुत नाटक में विठ्ठल कहता हैं, 'जानवर की तरह चिल्लाता है, सर पीटता हैं, तड़पता हैं, जमीं पर लोट–पोट होता हैं, फिर धीरे–धीरे थक जाता हैं विरासत से मिली शिक्षुकी से बड़ी महत्वकांक्षा रखने की जुर्रत की सजा थी वो भगवान ने जैसा रखा हैं, वैसा ही रहना चाहिए, इस दैवी वन्दना को मैंने भांग किया था उसका सिला मिला – सपना देखने का सिला उड़ान भरने का सिला ।[२] तभी से विठठल की अतृप्त आत्मा भुत बनकर पीपल के पेड़ पर रह रही हैं ।

विठ्ठल जोशी का भुत नामा की दुर्दशा को प्रतिदिन देखता हैं। ईश्वर भक्ति की तरह नामा का स्वभाव भी सरल हैं उसे किसी के प्रति ईर्षा, द्वेष नहीं हैं उसकी इसी सहजता, प्रमाणिकता के कारण विठ्ठल का भुत उसकी अनायास सहायता करने लगता हैं। वह नामा से कहता हैं, ''इन्सान चालाक होते हैं, हिसाबी होते हैं, क्रूर और चालबाज होते हैं लेकिन तू वैसा नहीं लगा तू भरोसे का लगा, तभी तो मैंने तुझसे नाता जोड़ा ।'

प्रस्तुत विठ्ठला नाटक में धीरे–धीरे भुत चमत्कार करने लगता हैं जो लोग नामा को बदनाम करते हैं, उसे पीटने की कोशिश करते हैं वे नामा की प्रशंसा करने लगते हैं । एक स्त्री का बच्चा जो बीमार पड़ा था वह ठीक हो गया हैं । सभी लोग नामा से क्षमा माँगने लगते हैं । नामा को साक्षात्कारी पुरुष समझने लगते हैं । उसकी पूजा भी करने लगते हैं । नामा इन सब बातों को देखकर चकित हो जाता हैं । परेशान होकर वह विठ्ठल विठ्ठल कहने लगता हैं । जैसे ही नामा विठ्ठल कहता हैं .. तो विठ्ठल नाम का भुत सामने आकर बातें करने लगता हैं । वह कहता है की सारे चमत्कार मैनेही किए है ।

विठ्ठल जोशी का भुत नामा से कहता हैं । की अब तक जितने भी चमत्कार हुए हैं वे सब मैंने ही किए हैं । आगे भी इस प्रकार के चमत्कार तुम्हारे लिए करना चाहता हूँ ।

प्रस्तुत नाटक में तुंबाजी नाम का पाखंडी साधु स्वार्थी प्रवृत्ति का हैं । वह गाँव में कीर्तन करता रहता हैं परंतु उसके कीर्तन करने का उददेश्य समाज को भक्ति की ओर आकर्षित करना नहीं हैं । बल्कि लोगों को लूटना हैं । वह कीर्तन के नाम पर पैसे कामना चाहता हैं । इस कार्य में जटायु नाम का शिष्य उसकी सहायता करता हैं । धीरे–धीरे लोग नामा के कीर्तन को सुनना पसंद करने लगते हैं जिसके कारण तुंबाजी तथा जटायु परेशान हो जाता हैं ।

तुंबाजी को सब सत्य का पता चलता हैं की यह कीर्तन विठ्ठल का भुत कर रहा हैं नामा के कीर्तन में चमत्कार विठ्ठल का भुत करता हैं । वह इसका उपयोग अपने स्वार्थ सिद्धि के लिए करना चाहता है । वह जटायु से कहता हैं अध्यात्म का व्यापार ऐसा होना चाहिए जिससे सामने वाले का नुकसान भी न हो पर अपना फायदा जरूर हो । अध्यात्म के बाजार को तुंबाजी ने प्रभावित किया हैं । नामा के कीर्तन में ही वह अपना गुरु मनाता हैं । नामा के कीर्तन की प्रशंसा भी करता हैं । नामा की विद्ववत्ता की उनके विनयशीलता ईश्वर के साक्षात्कार की बातें करता हैं । वह नामा को अपने जाल में फाँसकर उसके चमत्कार का फायदा उठाना चाहता हैं। नाम भी उसकी चाल में फंस जाता हैं लेकिन विठ्ठल का भुत तुंबाजी की कुटिल चाल से पूरी तरह परिचित हैं। नामा को भुत सतर्क भी करता हैं परंतु नामा भुत की एक भी नहीं सुनता ।

तुंबाजी को लेकर नामा और भुत में विवाद भी होता हैं जब अगले गाँव में कीर्तन होता हैं तब लोग केवल चमत्कार देखना चाहते हैं । उस कीर्तन में तुंबाजी तथा जटायु का सत्य सामने आता हैं वहाँ पर जनता तुंबाजी और जटायु की अच्छी तरह धुलाई करती हैं । उसके बाद लोग नामा की पिटाई करना चाहते हैं। परंतु नामा निडर होकर सबके सामने खड़ा रहता हैं उसके बाद भुत भी नामा के शरीर में प्रवेश करके दहाड़ता हैं फिर कोई भी व्यक्ति नामा पर हाँथ उठाने की हिम्मत नहीं करता । नामा की पत्नी इस अभूतपूर्व रूप को देखकर डर–सी जाती हैं। वह अपने पति को भुत, माया से मुक्त करना चाहती हैं ।

नामा के भयंकर रूप को देखकर सभी भयभीत होते है नाटक के अन्त में भुत नामा के शरीर का त्याग देता है । नामा की पत्नी उसे अपने घर लेकर जाती है । नाटक में नामा की पत्नी स्वार्थी नारी के रूप में चित्रित है लेकिन नाटक के अंत में अपने पति की अवस्था देखकर उसमें परिवर्तन होता है ।

वह कहती है, ''मेरा सौभाग्य', मुझे वापस मिल गया बाबा ! देखिए, हमें नहीं चाहिए, पैसा नहीं चाहिए घोड़ागाड़ी, बँगला ! हमें जेवर नहीं चाहिए, नौकर – चाकर नहीं चाहिए कुछ भी नहीं चाहिए सुना ? माया एकदम खराब जो है उसी में सुख मानकर जीना चाहिए ।''[३]

## निष्कर्ष

विजय तेंदुलकर का 'विठ्ठला' नाटक शिल्प की दृष्टि से सफल रचना है । नाटक मनोरंजन की दृष्टि से अत्यंत सफल है । नाटक में आदि से अन्त तक कुतूहल, जिज्ञासा, दिखाई देती है । यह प्रयोगशील नाटक है । मंचन की दृष्टी से विठ्ठला एक सफल रचना बन पड़ी है। भाषा, संवाद की दृष्टी से भी यह नाटक अपना अलग अस्तित्व रखता है । कुल मिलकर हम कह सकते हैं की विठ्ठला नाटक में संदेश मिलता हैं की मनुष्य ने अपना व्यवसाय प्रमाणिकता से ही करना चाहिए । काम छोटा हो या बड़ा वह ईमानदारी से करना चाहिए जिससे हमें आनंद की अनुभूति होती है । यह नाटक मनुष्यकी ऑखें खोलने का कार्य करता है मनुष्यने ईमानदारी से अपना काम करना चाहिए स्वार्थ से किया गया काम कभी सफल नहीं होता ।

## संदर्भ

१) विठ्ठला – विजय तेंदुलकर, पृ. १
२) वही – पृ ५५
३) वही – पृ ९१

❖❖❖

# हिन्दी साहित्य में हास्य व्यंग्य की यात्रा

डॉ. निभा उपाध्याय
हिन्दी विभाग
श्रीमती रा.दे.गो.म. महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
nibhaupadhyay1@gmail.com भ्रमणध्वनी ८१४९७७२५७९

## प्रस्तावना :

आखेट युग से गुजरता हुआ मनुष्य आज विज्ञान युग की देहली पर खडा है। नित नये आविष्कार हो रहे है। भौतिक संसाधनो की भिड लगी हुई और इन्ही भौतिक साधनो के बीच मनुष्य आज खोता जा रहा है और इन्ही साधनों के बीच कही खुशी के पल तलाश रहा है । पर खुशियॉं दुर जाती हुई महसुस हो रही है। साधन तो मिल रहे है पर सुख नही । केवल सुविधाओं से जीवन का हर सुख नही मिल पाता । केवल सुविधाओं को इकठ्ठा करने के चक्रव्युह में मनुष्य कही खोता जा रहा है और तान तनाव से युक्त जीवन होने लगा है। ऐसे मे जरुरत महसुस होती है हास्य के कुछ पल की जो क्षण भर के लिए ही क्यो न हो पर हसीं के फुवारे दे सके। आज जिसे देखो चिंता और मानसिक तनाव मे डुबा है। मुस्काहट और खिलखिलाहट दुर्लभ हो गई है। जब कभी मनुष्य हॅंसने की कोशीश करता है कही न कही चिंता व्यथा की रेखा झलक ही जाती है। ऐसे में हास्य रचनाओं का कितना महत्व है यह कहने की आवश्यकता नही । वही समाज में नीतिगत मुल्यो की कमी को देखकर साहित्यकार को यथार्थ की अभिव्यक्ति के लिए व्यंग्य का सहारा लेना पडता है और हिन्दी साहित्य में हास्य व्यंग्य की महत्वपुर्ण भुमिका रही है । साहित्य में हास्य व्यंग्य ने एक लंबी यात्रा तय की है ।

वैसे तो हास्य व्यंग्य का इतिहास बडा पुराना है। पौराणीक काल के अनेक नाटक जब हम देखते है तो, पाते है की, नारदमुनि की भुमिका कुछ ऐसी ही है जो कभी हसॉती है तो कभी व्यंग्य के तिखे बाण छोड जाती है, कभी देवों के बीच तो कभी दानवों के बीच सभी लोकों में भ्रमण करनेवाले एक हास्य व्यंग्यकार है । वही अकबर–बिरबल के आपसी संवाद के कुछ किस्से जब हम पढते है तो वहॉं भी पाते है की, बिरबल बडी चतुराई से हास्य व्यंग्यकार की भुमिका अदा करते है, वही तेनालीराम के किस्से जब हम पढते है तब वहॉं भी हास्य व्यंग्य के पुट नजर आते है । इसी प्रकार हम पाते है की, हास्य व्यंग्य का इतिहास काफी पुराना है ।

हास्य और व्यंग्य को कुछ साहित्यकार अलग अलग मानते है परंतु यदी गंभीरता से विचार किया जाये तो हम पाते है की, हास्य और व्यंग्य एक ही सिक्के के दो पहलू के समान है । जहॉं एक के बिना दुसरा अधुरा है। बिना हास्य के व्यंग्य तो दुसरे को तिलमिला देने का काम करता है । ऐसे में सामनेवाले अपना अपमान भी समझ सकता है। आपसी विवाद से स्थिती भी बिगड सकती है । हिन्दी साहित्य मे विधा के रूप मे व्यंग्य को प्रतिष्ठा स्वतंत्रता के बाद मिली। हिन्दी साहित्य में हास्य व्यंग्य की यात्रा पर चलने से पुर्व हास्य व्यंग्य की परिभाषाओं पर संक्षिप्त प्रकाश डालना आवश्यक होगा। अत: हास्य एवं व्यंग्य की कुछ प्रमुख परिभाषा इस प्रकार है

१. श्री. श्रीनारायण दीक्षित व श्री. त्रिलोकीनारायण दीक्षित के अनुसार बाह्य वातावरण एवं कोई भुली भटकी स्मृति द्वारा मस्तिकगत विशिष्ट केंद्र की हलचल का परिणाम जो ओंठो एवं मन तथा मुख की भाव भंगीमा पर लौटकर प्रतित होता है उसे हास्य कहते है ।

२. डॉ. उषा शर्मा का मत है कि, हास्य अस्थायी भाव है । यह उस विद्युत छटा के समान है जो क्षण भर में चकाचौंध कर गति पकडती है । उत्कर्ष पर आकर दूसरे ही क्षण विलीन हो जाती है ।

इस प्रकार हम देखते है की, हास्य क्षणीक होता है और अस्थायी होता है फिर भी मानवजीवन मे अहम भुमिका रखता है ।

## व्यंग्य :

हिन्दी भाषा मे प्रचलित व्यंग्य शब्द संस्कृत भाषा का शब्द है, जो वि उपसर्ग एवं व्यत् प्रत्यय से अज्ज योग से बनता है। व्यंग्य समकालीन समाज और राजनीति का दर्पण होता है । व्यंग्कार तटस्थ होता है ।

तिरस्कार, उपेक्षा और भर्त्सना आदि भाव व्यंग्य लेखन के अस्त्र होते है। व्यंग्यकार की दृष्टि में व्यापकता होती है और वह संवेदनशील होता है।

१. श्री.गोपाल प्रसाद व्यास :— विनोद कालिन्दी की आनंद लहर है और व्यंग्य बरसाती गंगा की उफनती धारा का कालग्रासी भंवर । विनोद साहित्य का कान्तासमित रस है और व्यंग्य गुलाब के निचे का काटा ।

२. डॉ.शांतारानी का विचार है कि :— जिस हास्य मे सहानुभूती की मात्रा नही होती और घृणा आदि सहानुभूति विरोधी भावों की छाया पडती है उसे व्यंग्य कहते है। व्यंग्य विरोध अथवा घृणा प्रदर्शित करने का एक अस्त्र है । हास्य का ध्येय होता है केवल हसाना किंतू व्यंग्य का लक्ष किसी वस्तुविशेष का विरोध करना भी ।

३. श्री.प्रेम नारायण दीक्षित :— दीक्षितजी हास्य व्यंग्य की वकालत करते हुए लिखते है की, हास्य के पुट से व्यंग्य मनभावन रूचिकर और सहज बन जाता है और बुराईयों से संसार का त्राण करता है ।

काका हाथरसी व सुरेंद्र शर्मा कहते है की, हास्य भी हसते हसॉते झटके से धोबी पाट लगा जाता है और कभी परसाई या लाल शुक्ल भी व्यंग्य के कोडे उठाये हुये पर मिठी चिकोटी से मर्म हाथ कर डालते है। हिन्दी गद्य मे हास्य व्यंग्य — समाज एवं जीवन की विषमता ही व्यंग्य का आाधार है ।

## हिन्दी गद्य मे हास्य व्यंग्य की यात्रा
## भारतेंदु हरिश्चंद्र से प्रेमचंद तक

यद्यपि व्यंग्य के तत्व उतना ही प्राचीन है जितना की, मनुष्य पर हिन्दी साहित्य में व्यंग्य की एक विशिष्ट पहचान है। भारतेंदु हरिश्चंद्र के युग से ही हुई यद्यपि इसके पुर्व कबीर का व्यंग्य एक विशिष्ट पैनेपन को लिए हुए है। वही सुर की गोपीयॉ भी श्रीकृष्ण को कुछ ऐसे ही व्यंग्यभरे उल्हाने देती है। वही तुलसी साहित्य में भी व्यंग्य के अनेक प्रसंग दिखाई देते है।

## भारतेंदु—युग

भारतेंदु हरिश्चंद्र ने हिन्दी व्यंग्य का श्रृंगार किया है। उन्होने व्यंग्य को फूहडता के दायरे से बाहर निकालकर तात्कालीन परिस्थितीयों के साथ जोडा। अपनी रचनाओ मे सामाजिक कुरीतियों, रूढीगत संस्कारो, धर्माडम्बरों, मिथ्या—विश्वासों, आपसी कलह और राजतंत्र की निरंकुशता पर तीखा व्यंग्य करते है । इस युग के व्यंग्यकारो नें इनके अतिरिक्त बाळकृष्ण भट्ट, प्रताप नारायण मिश्र, राधाकृष्ण गोस्वामी, बद्रीनरायण चौधरी, प्रेमघन, बालमुकुंद गुप्त, आदि नाम उल्लेखनीय है । भारतेंदुजी का पॉचवा पैगंबर, स्वर्ग मे विचार सभा का अधिवेशन, भॉति—भॉति का जानवर आदि निबंधो के अतिरिक्त मुकरियों द्वारा भी व्यंग्य की धारा को तेज किया। अंधेर नगरी आपकी प्रसिध्द रचना है । इस युग का हास्य व्यंग्य साहित्य बहु आयामी रहा ।

## द्विवेदी—युग

आधुनिक हिन्दी गद्यकार के रूप में विख्यात आचार्य महावीरप्रसाद व्दिवेदी ने हिन्दी गद्य को एक नई ताजगी देकर व्यंग्य साहित्य को एक नई ठोस भुमिका प्रदान की। विविध विषयों पर २५० से अधिक निबंधो का सृजन करनेवाले व्दिवेदीजी श्रेष्ठ व्यंग्यकार है । उनके दंडदेव का आत्मनिवेदन या मुंन्सिपाल्टी के कारनामें आदि निबंधो में व्यंग्य की पैनी धार दिखाई देती है। इस युग के अन्य रचनाकारों मे पंडीत माधवप्रसाद मिश्र, अध्यापक पूर्णसिंह, पं.चंद्रधर शर्मा गुलेरी और बाबु गुलाबराय के नाम उल्लेखनीय है । इन निबंधकारो की रचनाओं का मुल स्वर व्यंग्य नही है फिर भी व्यंग्य की मनोहरी छटा दिखाई पडती है ।

## शुक्ल युग

द्विवेदी युग के साहित्यकारों का मुल उद्देश यदि सुधारवाद रहा हो तो शुक्ल युगीन साहित्य में चिंतन की प्रधानता थी । आचार्य रामचंद्र शुक्ल के पांडित्यपुर्ण एवं चिंतन प्रधान निबंधो ने अपनी युग की सहित्यधारा को एक नई दिशा दी । इनकी आलोचना पध्दती में व्यंग्य की प्रधानता है इस युग मे इनके साथ श्री.माखनलाल चतुर्वेदी, श्री पद्मलाल पुन्नालाल बक्षी, श्री सियारामशरण गुप्त, श्री हरिशंकर शर्मा, श्री बेढब बनारसी आदि रचनाकारो के नाम प्रमुख है ।

## प्रेमचंद और उसके बाद

प्रेमचंदजी का नाम हिन्दी साहित्य जगत में न केवल श्रेष्ठ गद्यकार के रूप में बल्कि व्यंग्यकार के रूप मे भी उल्लेखनिय है । बडेघर की बेटी, पंचपरमेश्वर आदि रचनाओं में सामाजिक विडंबनाओं के प्रतित तो कफन और पूस की रात कहॉनियों मे भी व्यंग्य के प्रहार है । मोटर के छीटें, हास्य मिश्रीत व्यंग्य का उदाहरण है। प्रेमचंद के अतिरिक्त समकालीन अन्य रचनाकारो में भी व्यंग्य की पध्दती दिखाई देती है । पं.सुर्यकांत त्रिपाठी निराला का नाम इस परंपरा में आदरणीय है। इस युग मे हास्य व्यंग्य का नेतृत्व निराला ने ही किया है । इन्होने गद्य और पद्य दोनो ओर अपनी लेखनी चलाई । जैसे चरखा चला, कुकुरमुत्ता, महंगू–महंगा, रानी और कानी, डिप्टी साहब आये आदि प्रमुख व्यंग्य रचना है। आज हिंदी गद्य में उपन्यास नाटक कहानी के अतिरिक्त हास्य व्यंग्य संस्मरण, रिपोर्ताज डायरी, रेखाचित्र आदि अनेक विधाओ में विद्यमान है । इस साहित्य जगत को समृध्द बनाने में उपरोक्त लेखको के अतिरिक्त कुछ अन्य लेखको ने भी अपना विशेष योगदान दिया है । जैसे अमृतलाल नागर, श्री.अमृतराव, श्री.प्रभाकर माचवे, श्री.राधाकृष्ण, श्री.हरिशंकर परसाई इनके बिना जैसे व्यंग्य साहित्य अपुर्ण है। परसाईजी का व्यंग्य फलक जितना बडा है, उतना ही विविधताओं से परिपुर्ण है । श्री.शरद जोशी, श्री.रविंद्रनाथ त्यागी, श्री.बालेंदु शेखर तिवारी, डॉ.शंकर पुणतांबेकर, श्री.के.पी.सक्सेना, श्री मनोहर श्याम जोशी, श्री गोपाल चतुर्वेदी जैसे अनेक लेखको ने अपना योगदान दिया है। वही महिला रचनाकारों में डॉ. सरजिनी प्रितम, डॉ.शांती मेहरोत्रा, विमला रैना, उषा बाला, मृणाल पांडे, डॉ.कुसुम कुमारी, स्नेहलता पाठक, साधना उपाध्याय जैसे महिला लेखिकाओं ने भी अपना योगदान दिया है । निष्कर्ष के तौर पर हम यही कहना चाहते है की, हिन्दी साहित्य जगत को समृध्द बनाने में हास्य व्यंग्यकारो की एक अहम भूमिका रही है ।

## निष्कर्ष :–

हिन्दी साहित्य मे हास्य व्यंग्य की यात्रा बडी लंबी रही है । हास्य व्यंगकारो ने साहित्य को समृध्द करने में कोई कसर नही छोडी है। हास्य व्यंग्य साहित्य का अपना विशिष्ट स्थान है। वर्तमान समय में हास्य व्यंग्य साहित्य के प्रति लोगो का झुकाव बडता जा रहा है । आज के इस भाग–दौड भरी जिंदगी में चंद लम्हे खुशीयों के देने में इस प्रकार के साहित्य की विशेष भूमिका है और रहेगी ।

## संदर्भ ग्रंथ सुची

१. स्वातंत्रयोत्तर हिन्दी गद्य में व्यंग्य लेखक – हरिशंकर दुबे
२. मेरी श्रेष्ठ रचनाऍं – हरिशंकर परसाई

❖❖❖

# लोकसंस्कृतीचे उपासक

डॉ.सौ. वीरा मांडवकर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India) ४४५ ४०१
veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## सारांश :

लोकसाहित्य आणि लोककला ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. 'लोक' म्हणजे विवक्षित समाजातील जन. परंतु प्राचीन भारतीय वाङ्मयात 'लोक' हा शब्द अनेकवार वेदांच्या सापेक्षतेने वापरला जातो. भारतात प्रविष्ट झालेल्या आर्यांच्या आगमनापूर्वी जे आर्येतर जन राहत होते, त्यांच्या परंपरेचा प्रवाह 'लोक' या संज्ञेत प्रतीत होतो. वासुदेव, मुरळी, गोंधळी, वाघ्या–मुरळी, भराडी, जोगती–जोगतीण, पोतराज असे अनेक लोकसंस्कृतीचे उपासक या संस्कृतीत आढळतात. पहाटेच्या प्रसन्न वेळी रामकृष्णाच्या नावाचे उच्चारण करीत वासुदेव दारात येतो. वासुदेवाची चाहूल लागताच लहान–थोर त्याच्याभोवती गर्दी करतात. तो विशिष्ट तालावर देवाची गाणी म्हणतो. कृष्णाचा प्रतिनिधी असल्यामुळे कृष्णकथा गाताना त्याला विशेष उल्हास वाटतो. महाराष्ट्राच्या कुळाचारात ज्यांची प्रामुख्याने आठवण केली जाते ते म्हणजे गोंधळी. लग्न–मुंजीनंतर कुलदेवीच्या नावाने 'गोंधळ' घालण्याचा कुळाचार देशस्थ ब्राम्हणांत आणि बहुतेक सर्व मराठ्यांत प्रचलित आहे. खांद्यावर घोंगडी घेतलेला, गळ्यात व्याघ्रचर्म आणि भंडाऱ्याची पिशवी अडकवलेला आणि हातात घोळ असलेला वाघ्या खंडोबाची गाणी म्हणत म्हणत मल्हारीची वारी मागत हिंडताना अनेकदा दिसतो. अपत्यप्राप्तीसाठी देवाला नवस करणारे लोक दोन मुले होताच पहिले मूल देवास खंडोबास अर्पण करतात. त्यातील मुलगे वाघ्ये बनतात तर मुली मुरळी बनतात. आज मात्र ग्रामीण संस्कृतीच लोप पावत असल्यामुळे या ग्रामीण लोककलांचा, पर्यायाने लोकसंस्कृतीच्या उपासकांचा झपाट्याने ऱ्हास होतो आहे.

## प्रस्तावना :

लोकसाहित्य ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. या लोकसाहित्यातून भारताच्या प्राचीन इतिहासाच्या असंख्य पाऊलखुणा पाहता येतात. केवळ लोकांच्या तोंडी राहून अजरामर झालेल्या या कलाकृती कालातीत आहेत, यात शंका नाही. या लोकसाहित्याचे जतन करण्याचे काम विविध लोकसंस्कृतीच्या उपासकांनी केलेले आहे. यात वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, तमाशा असे अनेक लोककलाकार आपापल्या परीने हातभार लावत आहेत. आज लोकसंस्कृतीचे महत्त्व केवळ ग्रामीण भागापुरतेच मर्यादित राहिले असले तरी अनेक अभ्यासक या सर्व लोकसंस्कृतीच्या उपासकांचा शोध घेताना दिसून येतात. त्यांच्या अभ्यासातून बदलत्या मानवी जीवनाचा धांडोळा घेत राहतात. लोकसाहित्य ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. भौगोलिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि सांस्कृतिक वारसा अशा सगळ्याच गोष्टी मानवाच्या जीवनावर प्रभाव टाकतात आणि विकासासाठी हातभार लावतात. त्यामुळे मानवावर अशा या विविध घटकांचा कसा परिणाम होतो, त्याअनुषंगाने लोकसाहित्याचाच एक भाग असलेल्या लोकसंस्कृतीच्या उपासकांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

बीजशब्द : विकास, उपासक, भक्ती, ग्रामीण संस्कृती, कला, रंजन, देवता, दान, उत्पत्ती

## लोकसंस्कृतीची ओळख :

लोकशाहीत 'लोक' या संज्ञेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भाषेतही 'लोक' हे पूर्वपद असलेले शब्द उत्तरोत्तर वाढताना दिसून येत आहेत. उदा. लोकसाहित्य, लोककला, लोकमत, लोकसेवा, लोकसंगीत, लोकनृत्य, लोकनाट्य. मराठीतील लोक हा शब्द इंग्रजी 'Folk' या शब्दापेक्षा अधिक व्यापक आहे. 'लोक' म्हणजे विवक्षित समाजातील जन. परंतु प्राचीन भारतीय वाङ्मयात 'लोक' हा शब्द अनेकवार वेदांच्या सापेक्षतेने वापरला जातो. भारतात प्रविष्ट झालेल्या आर्यांच्या आगमनापूर्वी जे आर्येतर जन राहत होते, त्यांच्या परंपरेचा प्रवाह 'लोक' या संज्ञेत प्रतीत होतो. प्रारंभी आर्य आणि आर्येतर जन यांच्यात संघर्ष झडत राहिले असले तरी,

पुढे परस्पर समन्वयाची प्रक्रिया सुरू झाली. आर्यांनी वेदविद्या आणि लोकविद्या यांच्या संगमाचे कार्य सुरू केले. आर्य ऋषींनी स्थानिक स्त्रियांशी विवाह करावयास सुरुवात केल्यामुळे आर्येतर जनांचे संस्कार आर्य संस्कृतीच्या अंतरंगात सहज प्रवेश करू लागले. भारतात 'लोक' या शब्दाला अशी पूर्वप्रतिष्ठा आहे. लोकसंस्कृती ही नागर संस्कृतीची प्रयोगशाळा आहे. लोकसंस्कृतीमध्ये नागर संस्कृतीतल्या प्रगत कल्पना अपभ्रष्ट स्वरूपात मिसळत राहतात.

लोकसंस्कृतीत ऋतुचक्रानुसार रंगरूपे बदलणाऱ्या निसर्गाच्या स्वागतासाठी वर्षभर काही ना काही सणाव्रतांची योजना असते. आपला देश कृषिप्रधान असल्यामुळे आणि ही कृषी निसर्गाच्या कृपेवरच अवलंबून असल्यामुळे निसर्गाशी नाते जोडणाऱ्या सणोत्सवांचे प्रस्थ आपल्याकडे विशेष असणे स्वाभाविक आहे. या सर्वच सणोत्सवात ग्रामीण समाज विशेष रस घेतो. ऋण काढून सण साजरा करतो. या सण—उत्सवांत लोकमानसाची अभिव्यक्ती अनेक प्रकारे होत असते. लोकसंस्कृतीचे हे विशेष आपणांस तिच्या उपासकांनी जोपासलेल्या प्रथा—परंपरांमध्ये आणि तत्संबद्ध वाङ्मयात आढळते. वासुदेव, मुरळी, गोंधळी, वाघ्या—मुरळी, भराडी, जोगती—जोगतीण, पोतराज इ. लोकधर्माच्या क्षेत्रातील संस्थांचे आपण निरीक्षण केले, तर आपणास त्यातून इतिहासातील बरीच गुढे उकलण्यासही मदत होते. अशाच काही लोकसंस्कृतीच्या उपासकांचा येथे आढावा घेण्यात आला आहे.

## वासुदेव :

पहाटेच्या प्रसन्न वेळी झाडाझाडावर पक्ष्यांचा किलबिलाट चालू असताना रामप्रहरी रामकृष्णाच्या नावाचे उच्चारण करीत वासुदेव दारात येतो. देवाची नावे मोठ्याने गात येणाऱ्या वासुदेवाची चाहूल लागताच बाळगोपाळ साखरझोपेतून जागे होतात. अंगणात येऊन वासुदेवाभोवती गर्दी करतात. त्याचा वेशही लहान—थोरांना आवडेल असाच असतो. पायात सुरवार, अंगात घोळदार अंगरखा, गळ्यातून पुढे दोन्ही बाजूंनी सोडलेला तांबडा शेला, डोक्यावरची शंकूच्या आकाराची मोरपिसांची टोपी, काखेतली झोळी, पायातले घुंगरांचे चाळ आणि कंबरेला बांधलेल्या शेल्यात खोचलेली बासरी हे सगळे पाहून लहान मुले त्याच्याकडे आकर्षित न झाली तरच नवल! विशेष म्हणजे त्याच्या तोंडची गोड भक्तिगीते ऐकण्यासाठी कामात गुंतलेल्या गृहिणीही आपले काम थांबवून प्रसन्न मुद्रेने त्याच्याकडे पाहत उभ्या राहतात. वासुदेव मुखाने विशिष्ट तालावर गाणी म्हणतो. गाण्याला साथ देण्यासाठी उजव्या हाताने चिपळ्या आणि डाव्या हाताने टाळ वाजवतो. जागच्या जागी पाय नाचवून पायांतील घुगरांचा ध्वनी त्यात मिसळवितो. शेवटी गृहिणीकडून पसाभर धान्य आणि बाळगोपाळांकडून पै—पैसा दान मिळाले की, सर्व देवदेवतांना 'दान पावल्याची' मुखाने पावती देऊन अंगाभोवती लयीने गिरक्या घेतो. शेवटी पाव्याचा मंजूळ आवाज काढीत निरोप घेतो. गेल्यानंतरही त्याच्या त्या वेशाचे, त्याच्या लयबद्ध गाण्याचे आणि अखेरीस त्याच्या मंजूळ पाव्याचे पडसाद वातावरणात उमटत राहतात. ग्रामीण भागात हे दृष्य सर्रास पहावयास मिळते. ग्रामसंस्कृतीत वासुदेवाला एक वेगळे महत्त्व आहे. रा.चिं. ढेरे यांच्या मते, 'वासुदेव ही संस्था म्हणजे लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातील भागवत संप्रदायच आहे.'[१] वासुदेवाकडे येथे अत्यंत आदराने पाहिले जाते. लोक त्याच्याकडे भिकारी म्हणून पाहत नाहीत, तर त्याला भिक्षा वाढणे हे आपले कर्तव्य समजले जाते. त्यात उपकाराचा, तुच्छतेचा, अवहेलनेचा भाव चुकूनही नसतो.

वासुदेव हे जातीने मराठा श्रेणीतलेच आहेत; परंतु त्यांच्या या विशेष कामामुळे किंवा त्यांच्या वेगळ्या वृत्तीमुळे त्यांची स्वतंत्र जात गणल्या जाऊ लागली असावी. काही अभ्यासकांच्या मते, ही एक धार्मिक भिक्षेकऱ्यांची जात असावी. गावोगाव भटकून ते आपला उदरनिर्वाह करत असावेत. त्यांचा वावर मुख्यत: दक्षिण भारतात आहे. त्यांच्या उगमाविषयीची कथा सांगितली जाते की, एका ब्राम्हण ज्योतिषास एका कुणबी स्त्रीपासून झालेल्या सहदेव नावाच्या मुलापासून त्यांची उत्पत्ती झाली आहे. त्यांची शारीरिक रचना पाहिली तर ते मराठा—कुणब्यांसारखे दिसतात. त्यांचे बरेचसे रीतिरिवाजही तसेच आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन मुख्यत: भिक्षा मागणे हेच आहे. मुलगा भिक्षा मागण्याजोगा झाला म्हणजे त्याला भिक्षा मागण्याची दीक्षा देण्याचा समारंभ करतात. तसे तर वाडवडिलांपासून चालत आलेली ही कला मुले पाहून पाहून शिकतात. पंधरा वर्षे वय होण्यापूर्वी दीक्षा देण्याचा समारंभ पार पाडल्या जातो. त्यासाठी एखाद्या शुभ दिवशी उपाध्यायाला घरी बोलावले जाते. मग उपाध्याय मुलाला वासुदेवाचा वेश परिधान करावयास सांगतो आणि मंत्रोच्चारासह त्याच्या कपाळावर चंदनाचा टिळा लावतो. एवढे झाले की या दीक्षाविधीची सांगता होते. नंतर ब्राम्हणास दान व दक्षिणा देऊन निरोप देतात आणि सर्व ज्ञातीबांधवांसह भोजन करतात.

वासुदेवाला जेव्हा दान प्राप्त होते तेव्हा तो हे दान महाराष्ट्रातील आणि भारतातील देवदेवतांना भक्तीभावनेने पावते करतो. त्याचप्रमाणे दान देणाराही ते आपल्या वाडवडिलांच्या नावाने देतो. याविषयी रा.चिं. ढेरे म्हणतात, 'पुण्य रुजू व्हावे ते पितरांच्या नावाने—आपण त्यांच्या उदरी येऊन त्यांच्या सात्विक वारशाला जपावे, शक्य झाल्यास तो वारसा समृद्ध करावा, परंतु गौरव मात्र त्यांचा व्हावा, या भूमिकेत अहंकारशून्य त्यागाचे बीज आहे. श्रेष्ठ मूल्ये जीवनात रुजवावी, परंतु त्यांची जाणीवही वर्तनातून प्रकट होऊ नये, एवढी ऋजुता अंगी मुरावी, अशी यामागची बैठक आहे.'[२]

वासुदेवाच्या मुखी रंगणारी गाणी विविध प्रकारची आहेत. त्या गाण्यांत काही बालकृष्णाचे चरित्र रंगविणारी आहेत. काही भक्तीचा महिमा आळवणारी आहेत. काही प्रपंचाचे स्वरूप रेखाटून तो नेटका करण्याची नीती सांगणारी आहेत. काही कौटुंबिक भावबंध उलगडणारी आहेत आणि काही गाणी सरळ सुबोध भाषेत वेदान्त स्पष्ट करणारी आहेत. तरीही त्यातल्या त्यात वासुदेव हा कृष्णाचा प्रतिनिधी असल्यामुळे कृष्णकथा गाताना त्याला विशेष उल्हास वाटतो आणि हे स्वाभाविकही आहे. वासुदेवाचे तत्त्वज्ञान दैववादी आहे. आपण सन्मार्गाने चालावे आणि भल्याबुऱ्या फळाची जबाबदारी देवावर वा दैवावर टाकावी, अशी त्यांची जीवनदृष्टी आहे.'रंजनाच्या शर्करावगुंष्ठनात तो भक्ती आणि धर्मोपदेशाचे अर्क—औषध देतो. भक्ती, व्यवहारज्ञान आणि नीतीची शिकवण हा वासुदेवगीतांचा महत्त्वाचा विशेष होय.'[३]

असा हा बाळगोपाळांचा सखा आणि थोरामोठ्यांचा लाडका वासुदेव आपल्या रूपाने आणि वाणीने गेली कित्येक शतके मराठी लोकमानसाला वेड लावत आला आहे.

## गोंधळी :

महाराष्ट्राच्या कुळाचारात ज्यांची प्रामुख्याने आठवण केली जाते ते म्हणजे गोंधळी. लग्न—मुंजीनंतर कुलदेवीच्या नावाने 'गोंधळ' घालण्याचा कुळाचार देशस्थ ब्राम्हणांत आणि बहुतेक सर्व मराठ्यांत प्रचलित आहे. 'गोंधळ' हे देवीच्या उपासनेचा लौकिक पातळीवरचा नाट्यात्मक विधी आहे. अंगात अंगरखा घालून, गळ्यांत कवड्यांच्या माळा घालून, डोक्यावर कंगणीदार पगडी चढवून गोंधळी अंगणात किंवा ओसरीवर उपस्थित होतो. त्याच्याबरोबर संबळ तुणतुण्यासह त्याचे साथीदार असतात. समोर चौरंगावर चोळखण पसरून त्यावर चौक घातला जातो. त्यावरील घटावर देवीची स्थापना केली जाते. चौकाभोवती शाळूच्या ताटांचे किंवा उसाच्या चिपाडांचे मखर उभे केले जाते. देवीच्या पूजेनंतर यजमान दिवटी प्रज्ज्वलित करतो. यजमान जोपर्यंत दिवटीत तेल ओतत राहतो, तोपर्यंत गोंधळाचा कार्यक्रम चालू ठेवण्यात येतो. बरेचदा रात्री सुरू झालेला हा गोंधळ तांबडे फुटेपर्यत चालू राहतो आणि गोंधळ ऐकण्यासाठी आबालवृद्ध श्रोते उत्सुक झालेले असतात. हे दृश्य आता विरळ होत चाललेले असले तरी महाराष्ट्रीय लोकजीवनात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणत्याही मंगलकार्यप्रसंगी किंवा मुख्यत्वे विवाहप्रसंगी गोंधळ घालण्याची प्रथा आजही बहुतांश भागात दिसून येते. पूर्वी गाण्यात गुंफलेल्या पुराणकथा आणि वीरगाथा अधूनमधून गद्य संपादणीसह गोंधळी सांगू लागला की सर्व स्तरांतील श्रोते जिवाचा कान करून ऐकत आणि त्या कथाकथनातील विविध रसांच्या कल्लोळात त्यांची मने डुंबून जात. गीतमाध्यमात गुंतलेली कथा, गद्य, संपादणीतील वक्तृत्वाचे आणि कथनकौशल्याचे नानाविध ढंग, कथनाला अभिनयाची जोड आणि संबळ तुणतुण्याची साथ यांमुळे 'गोंधळ' उपस्थितांच्या मनाची पकड घेत असे. रंजकता आणि क्रीडात्मकता हे लोकधर्मीय संस्थांचे वैशिष्ट्य गोंधळात उत्कटपणे जाणवते.

गोंधळी हे रेणुकामातेचे आणि तुळजाभवानीचे उपासक आहेत. आपली उत्पत्ती जमदग्नी आणि रेणुका यांच्यापासून झाल्याचे सांगतात. त्यांची धारणा आहे की, माहूर हे त्यांचे मूलस्थान आहे. त्यासाठी ते 'रेणुकामाहात्म्य' मधील कथेचा आधार घेतात. या कथेत सांगितले आहे की, परशुरामाने बेटासुर नावाच्या राक्षसाचा वध केला. त्यानंतर त्याचे शिर तोडले. त्या शिराच्या ब्रम्हरंध्रात त्याच्याच शिरांचे तंतू ओवले आणि ते खांद्यावर घेऊन 'तिंतृण तिंतृण' असा आवाज करीत तो मातेजवळ आला. बेटासुराच्या धडाचे आणि शिराचे त्याने चोंडके बनवले. ते वाजवून जे पहिले मातृवंदन केले त्यातून गोंधळाची प्रथा उगम पावली.

रेणुकामातेप्रमाणे तुळजाभवानीही गोंधळ्यांची देवता आहे. रेणुकराई आणि कदमराई हे गोंधळ्यांचे मुख्य पोटभेद आहेत. यातील रेणुकराई हे रेणुकामातेचे तर कदमराई हे तुळजाभवानीचे मानले जातात. कदम हे तुळजाभवानीच्या उपासनेतील हक्कदार आहेत. त्यांच्यावरून कदमराई हे नाव रूढ झालेले आहे. तुळजाभवानीची प्राचीनता इ.स. १००० पूर्वीची सांगितली जाते. रेणुका तर त्यापेक्षाही प्राचीन आहे. रेणुकेच्या प्राचीनतेवरून गोंधळ परंपरेची प्राचीनता निदर्शनास येते. आद्य महानुभाव ग्रंथात दृष्टांताच्या रूपाने गोंधळाचे जे उल्लेख आलेले आहेत

त्यात सर्व शक्तींचा मेळ, योगिनीचक्राचा गोंदळ, चक्रागोंदळ असे शब्द आलेले आहेत. तसेच प्रेतापुढे वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांचा गोंगाट गोंधळाशी संबंधित म्हणून उल्लेखिला आहे. यावरून असे नक्कीच म्हणता येते की, गोंधळ ही संस्था मूलतः भूतमातेशी संबद्व असून गोंधळ हे भूतमातेच्या सहचरांचे भूतगणांचे एक उपासनानृत्य आहे. आदिवासींच्या नृत्यात किंवा इतर अनेक लोकनृत्यात प्राण्यांचे आणि अतिमानुष योनींचे मुखवटे चढवून गाण्यानाचण्याची जशी पद्वती आढळते, त्याचप्रमाणे भूतवेश परिधान करून भूतचेष्टांचे अनुकरण करणारे नृत्य गोंधळ संस्थेत चालू असावे असे ग्रांथिक उल्लेखांवरून आणि गोंधळाच्या आजच्या स्वरूपातील काही अंगांवरून दिसून येते. यादवकाळात संगीत नृत्य विषयांवर ग्रंथरचना करणाऱ्या पंडितांनी अनेक लोकप्रचलित देशी संगीतपद्वती आणि नृत्यपद्वती आपल्या ग्रंथात समाविष्ट केल्या. संगीत रत्नाकर, संगीतसमयसार, नृत्यरत्नावली, औपापतम, भरतार्णव इ. संगीत नृत्यविषयक ग्रंथांत गोंधळाचा समावेश 'गौंडलीनृत्य' या नावाने झालेला आहे. गौंडली, गुंडली, गोंडली, कुंडली असे त्याचे अनेक नामपर्याय आढळतात.

गौंडली नृत्याचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे तीन भेद कल्पून उत्तमवृंदात ४ मुख्य गायक, ८ समगायक, ८ नर्तक, ४ वांशिक, ४ मार्दंगिक आणि ४ तालधारी अशी ३२ माणसे असतात. मध्यम वृंदात त्याच्या निम्मी म्हणजे एकंदर १६ व कनिष्ठ वृंदात त्याच्याही निम्मी म्हणजे एकंदर ८ माणसे असावीत. यापेक्षा कमी मात्र असू नयेत. यातील नृत्य कसे करावे, कोणी करावे, कोणी कोठे उभे रहावे, दिवट्या कोणी घ्याव्यात, वाद्ये कोणकोणती घ्यावीत, गोंधळास युक्त वेळ कोणती याबद्दल निश्चित संकेत आहेत.

गोंधळी हे एकाचवेळी भाट आणि पुरोहित आहेत. यज्ञसंस्थेच्या अनुषंगाने इतिहास पुराणांचे सत्र जसे चालू राहत असे, त्याचप्रमाणे मराठी लोकधर्माच्या क्षेत्रात देवीच्या कुलाचाराच्या निमित्ताने इतिहास पुराणकथांचे सत्र झडत असे. पौराणिकांच्या संस्थेशी गोंधळ्यांचे निकटचे साम्य आहे. गोधळ्यांचा अभ्यास किंवा त्यांच्या गीतांचा किंवा कथांचा अभ्यास केवळ लोकसाहित्याच्याच दृष्टीने उपकारक ठरणारा नसून मराठी लोकधर्माची जडणघडण कशी झाली ते समजून घेण्याच्याही दृष्टीने त्याचा उपयोग आहे.

अशी ही मराठी मनावर एके काळी प्रभाव टाकणारी संस्था आहे. या संस्थेला हजार—बाराशे वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या दक्षिणेकडील बऱ्याच मोठ्या प्रदेशात या संस्थेचा प्राचीन काळापासून संचार आहे. आधुनिक काळात या संस्थेचा काही प्रमाणात ऱ्हास होत असला तरीही ती नामशेष होण्यापूर्वी तिचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

## वाघ्या—मुरळी :

गोंधळी व भुत्या ज्याप्रमाणे देवीचे उपासक त्याचप्रमाणे वाघ्या—मुरळी हे खंडोबाचें उपासक होत. वाघ्या—मुरळ्यांचा उल्लेख झाला की आपल्यापुढे खंडोबा हे दैवत उभे राहते. खांद्यावर घोंगडी घेतलेला, गळ्यात व्याघ्रचर्म आणि भंडाऱ्याची पिशवी अडकवलेला आणि हातात घोळ असलेला वाघ्या खंडोबाची गाणी म्हणत म्हणत मल्हारीची वारी मागत हिंडताना अनेकदा दिसतो. खंडोबाच्या यात्रेत तर जागोजाग वाघ्या आणि मुरळी यांचे कार्यक्रम चाललेले दिसतात. अशा कार्यक्रमात 'घोळ' मुरळीच्या हाती असते. तिने ओचे न सोडता नऊवारी लुगडे नेसलेले असते. तिच्या कपाळी भंडार फासलेला असतो. आणि एका हाताने घोळ वाजवित ती नृत्य करीत असते. वाघ्या मुरळीचे हे जागरणाचे कार्यक्रम गोंधळ्यांच्या गोंधळासारखेच असतात. अनेकांच्या घरी जागरण कुलाचार साजरा केला जातो.

हे वाघ्या—मुरळी म्हणजे नक्की कोण असतात तर अपत्यप्राप्तीसाठी देवाला नवस करणारे लोक दोन मुले होताच पहिले मूल देवास खंडोबास अर्पण करतात. त्यातील मुलगे वाघ्ये बनतात तर मुली मुरळी बनतात. मुली या वेश्यावृत्तीने किंवा भीक मागून उदरनिर्वाह करतात. त्यांचा पोशाख कुणब्यांच्या बायकांप्रमाणेच असतो. पण त्या कपाळाला हळद माखतात. व गळ्यात कवड्यांच्या माळा घालतात. काही महाराष्ट्रात गाणी गात व भिक्षा मागत गावोगाव भटकत असतात. वाघ्यास खंडोबाचे चेले समजतात. मराठे आणि खालच्या जातीचे लोक त्यांना नमस्कार करतात. त्यांना दर तिसऱ्या वर्षी जेजुरीस जावे लागते. वाघ्यांच्या चालीरीती व धार्मिक समजुती मराठा कुणब्यांप्रमाणे आहेत.

महाराष्ट्रात वाघ्याचा विवक्षित वेश नाही परंतु कर्नाटकात वाघ्या घोंगडीची कफनी वापरतो. भंडार ठेवण्यासाठी वाघाच्या कातड्याची पिशवी गळ्यात अडकवलेली, कोटंबा किंवा दोणी, गाठा, दिवटी, बुधली, ध्वज, पोवते, शंख किंवा डमरू, शूल त्रिशूल इ. वस्तू प्रादेशिक परिस्थितीनुसार कमीअधिक प्रमाणात वाघ्याजवळ असतात.

वाघ्ये बनण्याची पद्वत अजूनही रूढ आहे. परंतु मुरळी बनण्यावर कायद्याने बंदी आली आहे. वाघ्ये दोन प्रकारचे असतात – एक घरवाघ्ये आणि दुसरे दारवाघ्ये. घरवाघ्ये म्हणजे नवसाच्या फेडीसाठी काही वेळ वाघ्याचा वेश परिधान करून 'वारी' किंवा 'भिक्षा' मागणारे. हे केवळ खंडोबाविषयी श्रद्धा व्यक्त करतात. दरवाघ्ये म्हणजे कायमची वाघ्याची दीक्षा घेतलेले, भिक्षेवर जगणारे व भक्तांची क्षेत्रातील धार्मिक कृत्ये पार पाडणारे वाघ्ये. भक्तांच्या वतीने जागरण करणे व लंगर तोडणे ही त्यांची विशेष कामे होत. वाघ्ये हे स्वत:ला खंडोबाचे कुत्रे समजून भुंकतात, गुर्रगुर्र आवाज काढतात.

आज ग्रामीण संस्कृतीच लोप पावत चाललेली असल्यामुळे या ग्रामीण लोककलांचा, पर्यायाने लोकसंस्कृतीच्या उपासकांचा झपाट्याने ऱ्हास होतो आहे. वासुदेव, गोंधळी, वाघ्या–मुरळी यांच्याविषयी लोकांचे आकर्षण कमी होत चालले असले तरी एके काळी यांनी आबालवृद्धांना वेड लावले होते, हे मान्य करावेच लागते.

## निष्कर्ष :

१. लोकसाहित्याचे जतन करण्याचे काम वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, तमाशा अशा विविध लोकसंस्कृतीच्या उपासकांनी केले आहे.
२. लोकसंस्कृतीमध्ये नागर संस्कृतीतल्या प्रगत कल्पना अपभ्रष्ट स्वरूपात मिसळत राहतात.
३. ग्रामसंस्कृतीत वासुदेवाला एक वेगळे महत्त्व आहे.
४. महाराष्ट्राच्या कुळाचारात ज्यांची प्रामुख्याने आठवण केली जाते ते म्हणजे गोंधळी.
५. रंजकता आणि क्रीडात्मकता हे लोकधर्मीय संस्थांचे वैशिष्ट्य गोंधळात उत्कटपणे जाणवते.
६. गोंधळी देवीचे उपासक आणि वाघ्या–मुरळी हे खंडोबाचें उपासक होत.

## संदर्भ :

१. ढेरे, रा.चिं., मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, पुणे, प्रथमावृत्ती, १९६४, पृ. अनुपलब्ध
२. ढेरे. रा.चि., 'वासुदेव', लोकसंस्कृतीचं उपासक पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१५ पृ. १३
३. पुजारी, डॉ. सुहास, 'भक्तिप्रधान लोकाविष्कारांचे स्वरूप आणि साहित्य', अक्षर वाङ्मय, संपा. डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, वर्ष तिसरे, अंक चौथा, एप्रिल–मे–जून २०१३, पृ. ८०

## संदर्भग्रंथ :

१. रेगे, मे.पुं., (प्रमुख संपादक), वासुदेव, मराठी विश्वकोश, खंड १६, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. ११४
२. जोशी, वि.कृ., लोकनाट्य परंपरा, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६१
३. गणोरकर, प्रभा, डहाके, वसंत आबाजी व इतर (संपादक), दशावतारी नाटक, वाङ्मयीन संकल्पना कोश, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २००१

❖❖❖

# संशोधनाची नवी वाट

प्रा. रेखा दि. अढाव
श्री धाबेकर कला महाविद्यालय
खडकी, अकोला, महाराष्ट्र (India)
rekhadadhav@gmail.com भ्रमणध्वनी 9850156255

## प्रस्तावना :

मानव हा ज्ञानावस्थेचे एकक आहे. मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करतांना षरीर आणि मन यांच्या संयुक्त अभिव्यक्तीतून मानवरूप आकारास येते असे दिसते. मानवाच्या षरीराच्या गरजा (अन्न, वस्त्र, निवारा) तसेच मनाच्या गरजा आहेत किंबहूना त्या श्रेष्ठतम आहेत. मानव आपल्या शरीर पोषणासाठी जेवढे किंवा जेवढ्या प्रमाणात प्रयत्न करतो तेवढे किंवा त्याहून अधिकचे प्रयत्न मनाच्या पोषणानासाठी करत असतो. याचा प्रत्ययही आपणास येतो. मनाचे पोषण, ज्ञान, माहिती, तर्क, मूल्य या सर्वांच्या आधारे होत असते. मानवाने शिक्षणाच्या माध्यमातून स्वःला जाणण्याचा प्रयत्न केला आहे. मनाच्या पोषणासंदर्भातील जेवढ्या म्हणून ज्ञानशाखा आहेत त्या ज्ञानशाखांचा अभ्यास मानवाने चालविला आहे.

शिक्षण हे मानवाच्या मानव म्हणून जगण्यासाठीचे मोठे साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सर्वागिण विकास साधणे हा प्रमुख हेतू आहे. शिक्षणामध लेखन व वाचन ते संशोधन असा जो प्रवास आहे तो डोळसपणे अभ्यासण्याचा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात मुक्तपणे अभ्यासपूर्ण नि जबाबदारीने मुशाफिरी करून आपली निरीक्षणे नोंदविणे हाही शिक्षणाचाच भाग आहे.

आज उच्चशिक्षणामधे अतिशय वेगाने बदल होतांना दिसत आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठ येथे कार्यरत गुरूजन वर्गांनी संशोधनाच्या क्षेत्रात अभ्यासपूर्ण कामगिरी करून दुर्लक्षित किंवा उपेक्षित राहिलेल्या वाङ्मयप्रकारांचा, व्यक्तींचा अभ्यास करून आपापली मते नोंदवावीत करिता संशोधनास अजाघडीला प्राधान्य देण्यात आले आहे. महाविद्यालयीन प्राध्यापकाने आपल्या ज्ञानाचा, माहितीचा नि अनुभवाचा विचारांचा खजिना पुढच्या पिढीला द्यावा नि त्यातून सकस समृदध विचारांची नवी पिढी तयार व्हावी करिता चार्चसत्रे, परिसंवाद कार्यशाळा, अभ्यासवर्ग यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यास महत्त्व देण्यात आले आहे. संशोधन क्षेत्रात अनेक नवनवीन संधी उपलबध असल्याचे आपल्या ध्यानी येते.

मराठी, इंग्रजी आणि हिंदी वाङ्मयामधे संशोधन करताना बरेचदा एकसुरीपणाचा प्रत्यय येतो. जेवढे म्हणून वाङ्मयप्रकार साहित्यामधे आहेत त्या सर्वच साहित्यप्रकारांमधे विपूल प्रमाणात संशोधनाचे काम झाले आहे नि होऊ घातले आहे. वाङ्.मयाशी समांतर असलेल्या किंबहुना वाङ्.मयावरच पोसलेल्या चित्रपटसृष्टीतल्या अनेक प्रवाहांवर संशोधन होऊन नवीन संशोधनक्षेत्र खुले होणे आवश्यक आहे.

सदर शोधनिबंधात मराठी वाङ्मयीन कलाकृतीव्यतिरिक्त वाङ्.मय प्रकारांवर आधारित चित्रपटांच्या कथेचा, गीतांचा, संवादांचा नि जाहिरातीचा संशोधनात्मक अभ्यास करण्याविषयीची चर्चा किंवा मत मांडण्याची भूमिका आहे. मराठी साहित्य हे कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, कविता, निबंध इत्यादी प्रकारांनी समृदध असल्याचे आपणास ज्ञात आहे. हा एक साहित्यप्रकारच जणू असावा. चित्रपटसृष्टीमधे जेवढे म्हणून गाजलेले, न जागलेले चित्रपट तयार झाले आहेत त्या सर्वांच्या तळाशी कथानकाचा आत्मा दृढपणे आपल्याला दिसून येतो. कथानकाचा आत्मा म्हणजे कथा अथवा कादंबरी होय. कथा, कादंबरीचा विषय जेवढा अधिक समृद्ध तेवढा चित्रपटाचा विषय महत्वाचा असतो.

चित्रपटामधे कथानकाचा विषय अनेकार्थांनी मांडला जातो. मराठी चित्रपटसृष्टीमधे निखळ मनोरंजन हा प्रमुख भाग नसतोच मूळी. अनेकदा चित्रपटाच्या माध्यमातून दिगदर्शकाला सामाजिक विषमतेवर, अन्यायावर काही ठोस असा संदेश द्यावयाचा असतो. चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम असल्यामुळे त्यामध्यमातून दिलेला संदेश अधिक परिणामकारकपणे समाजामधे पोहोचत असतो. चित्रपट गीतामधील गेयता त्या गीतांचा आशय अधिक स्पष्टपणे स्पष्ट करण्यास यशस्वी होतांना आपण बघतो. कथा, कादंबरी वाचणे आणि त्यावर आधारित चित्रपट बघणे यामधे महदअंतर आहे. मराठी चित्रपटांच सामाजिक योगदानाविषयी बोलायचे झाल्यास परिवर्तनवादी विचारांच्या चित्रपट विषयांनी भारलेले अनेक चित्रपट आपल्याकडे येऊन गेले आहेत.

'दुनियादारी' हा सुहास शिरवाळकरांच्या कादंबरीवर अधारीत चित्रपट किंवा 'जैतरे जैत' सारखा सिनेमा विविध विषयांवर भाष्य करणारे आहेत. डॉ. अमृता प्रितम यांच्या पुस्तकावर आधारीत 'पिंजर' सिनेमा. अशोक सराफ यांची मुख्य भूमिका असलेला 'निशाणी डावा अंगठा' हा सिनेमा मिलिंद बोकील यांच्या 'शाळा' कादंबरीवर आलेला 'शाळा' हा नावाजलेला सिनेमा आहे. यासोबतच नटरंग हा चित्रपटही डॉ. आनंद यादव यांच्या नटरंग कादंबरीवर आधारित सिनेमा आहे. जेष्ठ लेखक व.पु.काळे यांच्या 'पार्टरन' कादंबरीवर प्रदर्शित झालेला 'श्री पार्टनर' हा सिनेमाही चांगला आहे. राजन खान हयांच्या 'युद्ध' कादंबरीवर आधारीत 'धुडगूस' हा चित्रपट, राजन खान यांच्या कादंबरीवर 'संत ना गत' हा सिनेमा येऊ घातला आहे.

'माचीवरला बुधा' हा चित्रपट प्रख्यात कादंबरीकार गो.नी.दांडेकर यांच्या माचीवरला बुधा कादंबरीवर आधारित आहे. मराठी चित्रपटसृष्टीमधील एक मैलाचा दगड म्हणून गो.नि. दांडेकर यांच्या जैत रे जैत या कादंबरीकडे अभ्यासपूर्ण दृष्टीने बघावे लागेल. या चित्रपटाची गीते अजरामर आहेत. डॉ. अरूण साधू यांच्या सिंहासन कादंबरीवर 'सिंहासन' नावाचा सिनेमा येऊन गेला आहे. साने गुरूजींच्या 'शामची आई' पुस्तकाचा विषय प्र.के. अत्रे यांनी 'शामची आई' चित्रपट बनवण्यासाठी निवडला होता. या चित्रपटाला पहिला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळालेला आहे.

मराठी साहित्यातील याशिवायही अनेक कथा कादंबरीचे विषय हे अनेक चित्रपट कथा, पटकथांचे विषय झालेले आहेत. साहित्य हा समाज्जीवनाचा आरसा आहे. समाजामधे घडणाऱ्या अनेक घटना, घडामोडींचा प्रभाव हा चित्रपटांच्या कथानकांवर होत असतोच चित्रपटांमधे समाजाचेच प्रतिबिंब आहे. साहित्य विषय हे प्रामुख्याने चित्रपटांना पोषक खाद्यय पुरवित असतात साहित्य, चित्रपट, समाज, लेख, कवी, गीतकार हे असे सर्व घटक परस्परपूरकच आहेत. परस्परावलंबी आहेत नि परस्परांना आपल्या आशय अभिव्यक्तीनी समृदध करणारेही आहेत.

चित्रपटांचे कथानक हा खूप गहिरा नि संशोधनाचा विषय आहे असावा. चित्रपट कथानकासोबतच चित्रपटगीते, चित्रपट संवाद हयाही उपशाखा संशोधनाच्याच आहेत. चित्रपट निर्मितीमधे चित्रपटगीते, चित्रपटाचे संवाद हेही तितकेच महत्वाचे आहेत. किंबहुना अधिकच आहेत. त्यामुळे चित्रपट आणि त्याच्याशी संबंधीत गीत, संवाद यांनाही चित्रपट आणि त्याच्याशी संबंधीत गीत, संवाद यांनाही संशोधनाच्या कक्षेत घेऊन त्यातील सौंदर्य, भावमयता, वाङ्.मयीन मूल्य या अर्थानी त्यांचा विचार होणे आवश्यक आहे. आज आपण आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमाला किंवा तशाप्रकारच्या विचारधारेला समाजामधे शिक्षणामधे, अभ्यासक्रमामधे रूढ करू बघत आहोत त्यामुळे ही अनिवार्यता समजणे गरजेचे आहे.

चित्रपट हे संशोधनाचे क्षेत्र असून संशोधकांना त्यात असणाऱ्या संशोधनाच्या विविध छटांकरिता थोडा बारकाईने अभ्यास असणे आवश्यक आहे. कारण चित्रपट हे मानवाच्या जगण्यावर प्रत्यक्ष – अपत्यक्ष प्रभाव टाकणारे माध्यम आहे आणि ते प्रभावी आहे. चित्रपटसृष्टीच्या जीवावर अनेकांची रोजी रोटी चालते नि अनेकांना आपले अस्तित्व निर्माण करण्यास तेथे संधी पण मिळते.

आताचा काळ हा माध्यमांच्या प्रभावाखाली असलेला काळ आहे. प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया आज आमच्या जगण्याचा अविभाज्य भाग झालेला आहे. या अर्थाने हे चित्रपट आणि त्याच्याशी संबंधीत अनेक विषय संशोधनाच्या कक्षेत येऊन त्यातली सत्यता, असत्यता नि अनिवार्यता, वास्तविकता तुम्हा आम्हा सर्वांना आकलन होईल. कथा – पटकथा, संवाद – गाणी, जाहिराती असे कितीतरी विषय नव्या संशोधकांसाठी अभ्यासपूर्ण लेखन करण्यासाठी खुले आहेत. समाजातातील साहित्याशी संबंधीत नानाविध विषयांवर वाचन, चिंतन करून अशा विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन होणे काळाची गरज आहे. चित्रपट हा समाजाचा आरसा असल्याचे आपण मानतो करिता अशा विषयांवर संशोधन करून लेखन केल्यास तो एतेहासिक दस्तऐवज म्हणून आपल्या उपयोगाचा आहे.

## निष्कर्ष :

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ध्येयधोरणानुसार संशोधनाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्यामुळे आंतरविद्याशाखीय संशोधनाप्रमाणे चित्रपट क्षेत्राशी संबंधित संशोधनास महत्त्व मिळणे आवश्यक आहे.

२. चित्रपट हे समाजजीवनावर खास करून युवापिढीवर कमालीचा प्रभाव करणारे माध्यम असल्यामुळे चित्रपटाशी संबंधीत वाङ्मयीन घटकांवर संशोधनास प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे.

३. साहित्य प्रकार आणि चित्रपटक्षेत्र यांचा अन्योन्य प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध आहेच. अशा प्रकारच्या संबंधावर प्रकाश टाकून संशोधन व्हावे.

## संदर्भ :

१. महाराष्ट्र टाईम्स मधील 'कादंबरी ते सिनेमा' लेख दि. २९.०६.२०१३.
२. लोकसत्ता वृत्तपत्रातील 'आम्ही दोघी' वरील लेख १८.०२.२०१८

❖❖❖

# आंबेडकरी कवितेतील आंबेडकर

डॉ. भूमिका गो. वानखडे
जगदंब महाविद्यालय, अचलपूर, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
ptgaikwad73@yahoo.in gaikwadbhumika.bg@gmail.com Mobile: 9561131666

## प्रस्तावना

मराठी साहित्यात १९६० नंतर अनेक नवनवीन वाङ्मयीन प्रवाह आणि प्रवृत्ती उदयाला आल्या. आंबेडकरी साहित्य हा त्यातीलच एक प्रवाह होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षे अज्ञान आणि दारिद्र्याच्या गर्तत जिणं जगणाऱ्या समाजाला स्वतची स्वतंत्र ओळख दिली. त्यांनी समातपरिवर्तनाकरिता चळवळी निर्माण केला. अनेक स्तरावरून लढा दिला. डॉ. आंबेडकरांच्या कार्याने आणि विचाराने भारावलेल्या दलित समाजाला प्रथमच स्वातंत्र्याचा अनुभव यायला लागला. जुना मृतप्राय असलेला दलित समाज जागा होऊन आपल्या नैसर्गिक उर्मी व्यक्त करायला लागला. कविता हा वाङ्मयप्रकार आंबेडकरवादी साहित्यातील पहिला जोरकस प्रकार होय. खरं तर कविता हा उलट भावनेचा शब्दरूपाने झालेला अविष्कार असतो. संपूर्ण मराठी साहित्यातील साचलेपण नष्ट करणारा खऱ्या अर्थाने उत्स्फूर्त, उद्रेकी, भावनाविष्कार प्रथम आंबेडकरी कवितेत झाला. बहिष्कृत समाजातील प्रतिमा प्रथमच काव्यरूप होऊन कागदावर उतरत होती. हजारो वर्षाचे निर्बंध हटल्याने बहिष्कृत मनातील प्रतिमांना पंख फुटणे स्वाभाविकच होते. आपल्या भावना आणि अभिव्यक्तीला फुटलेल्या पंखांनी त्यांनी विद्रोही अभिव्यक्तीने उड्डान घेतले व माणुसकीचा स्वर त्यांच्या कवितेतून अविष्कृत व्हायला लागला. ''त्यांना लोकगोळा करणाऱ्या त्यांचे पंख जाळणाऱ्या आणि मनांना ठेचून काढणाऱ्या अमानुष धर्माविरूद्ध परंपरांच्या आणि रूढींच्या विरूद्ध, तत्त्वज्ञान आणि संस्था यांच्याविरूद्ध अशा सर्वच मानवताविरोधी संचिताविरूद्ध या प्रतिमा बोलू लागल्या. जळजळते नकार त्या पाशवी संचितावर उधळू लागल्या''[१] प्रस्थापित व्यवस्थेने, धर्मशास्त्राच्या मदतीने या देशातील बहुजनांचे, शूद्रअतिशूद्रांचे शोषण केले. धर्मशास्त्राने या शोषणालो न्याय्य ठरविण्याकरिता धर्मग्रंथ आणि तत्त्वज्ञाने आणि साहित्य निर्माण केले. ही व्यवस्था धर्ममान्य ठरवण्यात आली. बहुजनांना या शोषणातून मुक्त करण्याचे कार्य चार्वाक, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांनी केले. त्यातल्यात्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले बहुजनांच्या स्वातंत्र्याचे मानवमुक्तीचे आंदोलन अत्यंत मूलगामी स्वरूपाचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील शोषक आणि विषमतावादी संस्कृतीच्या विरूद्ध सुसंगत आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करणाऱ्या नवीन संस्कृतीची मांडणी केली. या मांडणीचे स्वरुप दुहेरी अशा प्रकारचे होते. एकीकडे माणुसकीची विटंबना करणाऱ्या, भेदाभेद करणाऱ्या मूल्यांना, परंपरांना, श्रद्धेला, संस्कृतीला, संस्कारांना, प्रथांना ग्रंथांना, पंथांना नकार देत होते तर दुसरीकडे भेदाभेदरहीत शोषणरहीत नवीन मानवी संस्कृती निर्माण करण्याचे प्रयत्न करत होते. जुन्याला नकार आणि नवीन मानवतावादी मूल्यांचा स्वीकार, विध्वंसक विचार आणि मूल्यांना नकार तर विधायक मूल्यांचा स्वीकार. आंबेडकरवादी कवितेने आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि चळवळीतील ही मूल्ये जोरकसपणे जोपासली. आपल्या कवितेतून शोषित पिडीत माणसाचं दुख मांडतानाच नव्या मानवतावादी संस्कृतीची प्रतिष्ठापना करण्याचा सर्जनशील विचार दिला. मानवाचे जे दुख प्रस्थापित सर्जनशील साहित्यिकाला दिसले नाही ते सर्व आंबेडकरवादी साहित्यिकाला दिसले. बुद्धाच्या अफाट करुणेने त्या दुखाची आणि दुख देणाऱ्याची मीमांसा केली. शोषणाची आणि विषमतेची विविध रूपे त्यांना समाजात पहायला मिळाली. ही दृष्टी त्यांना आंबेडकरी विचाराने आणि तत्त्वज्ञानाने दिली. विद्रोहाच्या टोकदार मांडणीसोबतच विधायकताही तेवढ्यच उत्कट पातळीवर कवितेतून व्यक्त झाली. त्यामुळेच आंबेडकरी कवींच्या या नवीन मूल्यांना कारणीभूत असणाऱ्या आंबेडकरी विचारांविषयी आणि आंबेडकर नावाच्या माणसाविषयी कृतज्ञता व्यक्त होणे अपरिहार्य होते. संपूर्ण मराठी साहित्यात अशी कृतज्ञता इतर कोणत्याही व्यक्तिविषयी इतक्या मोठ्य प्रमाणात व्यक्त झालेली आपल्याला दिसत नाही.

आंबेडकरवादी कवींनी बाबासाहेबांना संघर्षाची वाट चालणाऱ्या महामानवाच्या रूपात पाहिले. दलित कवींनी आपल्या प्रेरणास्त्रोताला नेहमीच अभिवादन केले आहे. डॉ. आंबेडकर कुणाला सूर्य वाटले, कुणाला फकीर, कुणाला युगायुगाचा निर्माता, तर कुणाला माऊली, मुक्याला वाचा देणारे बाबासाहेब दलितांच्या रचनासृष्टीचे शिल्पकार होते आणि वामन कर्डक असो की दामोदर मोरे, नामदेव ढसाळ असोत की सुरेखा भगत, त्र्यंबक सपकाळे असो की लोकनाथ यशवंत असोत या साऱ्यांनी आपल्या प्रेरणास्त्रोताला अभिवादन करताना

कृतार्थता व्यक्त केली आहे. ही कृतार्थता संत कवीच्या उर्मीची नाही. कारण संतांनी ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करताना आपले डोकं आणि शरीर दोन्ही गहाण ठेवली आहेत. दलित कवी अभिवादन करतात ते परिवर्तनाच्या प्रतिकाला, मानसिकता बदलणाऱ्या तेजस्वीतेला, नवमूल्य देणाऱ्या विचारशक्तीला, दास्य आणि शोषण नाकारणाऱ्या आणि मानवी 'ओझी झुगारून स्वातंत्र्य आणि समता निर्माण करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या ध्येयवादाला संघर्षाला आणि क्रांतीला. ही क्रांती रक्तरंजित नाही. मानवी सत्याला आणि संवादाला सामोरी जाणारी आहे.'[२]

आंबेडकरी विचारसूत्राला प्रमाण मानणारी कविता १९६० नंतर मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेली. सर्वच दलित कवितेतून आंबेडकरवादी विचार आलेला आहे. त्यामुळे आपले विचारसूत्र ज्या महामानवाच्या क्रांतिकारी विचारधारेवर तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. त्यांच्याविषयीची कृतज्ञता प्रत्येकच आंबेडकरवादी कवींच्या कवितेत आढळते.

आंबेडकरवादी कवितेत कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडर यांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव करताना 'सूर्य' या प्रतिमेचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला आहे. काळोख, तम, अंधार, मृत्य, शेवट, अस्त या अर्थाने काळोखाला दूर करणारा प्रकाश, उजेड, जीवन होय. उजेडाचा सर्वात मोठा स्त्रोत हा दररोज रात्रीच्या अंधकाराला आपल्या प्रकाशाने, तेजाने आणि उर्जेने प्रकाशमान करणारा सूर्य होय. हा सूर्य अंधार दूर करतो. जीवन प्रकाशमय करतो. जीवनाला नवी दिशा देतो. त्यामुळे आंबेडकरवादी कवींनी बाबासाहेबांनी वेळोवेळी सूर्य, क्रांतिसूर्य म्हटले आहे.

''डॉ. बाबासाहेबांनी आंबेडकर हा सूर्य तारा उगवला नसता तर दीन–दलितांच्या जीवनातील दुखाचा, वेदनेचा, अस्पृश्यतेचा, काळोख संपला नसता म्हणूनच विद्रोही कविता लिहिणाऱ्या कवींनी बाबासाहेब आंबेडकरांना प्रज्ञासूर्य, ज्ञानसूर्य, तेजाचा गोळा असे म्हटले आहे.''[३]

नामदेव ढसाळ –

१) सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर हजारो वर्षांनी लाभला.
आता सूर्यफुलासारखे सुर्योन्मुख झालेच पाहिजे.

२) अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यत किती दिवस राहायचे आम्ही?

भगवान भोईर – उन्हातलं झाड

क्रांतिसूर्या
चवदार तळ्याच्या ओठाला स्पर्श केलास
नि जगातील सर्व जलाशयात
तुझे रूपेरी प्रतिबिंब पडले.
जलाक्षरांनी तुझे नाव
लाटांच्या मखमली क्रांतीवर गोंदले.

विश्व लदन कालेकर –

हे क्रांतीच्या सूर्या
तुला हातात घेऊन मी
गाववेस पालथी घालतोय.
पावलापावलावरचे सुरंग पेटवत
निघालोय गावकुसात
हे क्रांतीच्या सूर्या

गोकुळदास मेश्राम –

बाबा / तुम्ही आलात
एक सूर्य होऊन
लोपविलेस काळोख्या रात्रीला
आम्हा नवा प्रकाश घेऊन

दु. मो. लोगे –

हजारो वर्षे

आले अन् गेले
अनंतकाळ येथे सूर्य उगवलाच नव्हता
नवल वाटले
१४ एप्रिल एक्याण्णव साली
एक सूर्य उगवला
अरे सूर्या!
रात्र अन् दिवस
दिवस अन् रात्र
या फेऱ्यात येतोस अन् जातोस्
पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा सूर्य
मावळूच शकत नाही
कारण
मानवी जीवनातील
काळरात्रच
त्यानं मावळून टाकली.

अरूण काळे –

सूर्यानेही स्वतला
भिमराव म्हणवून घ्यावं
एवढं तुझं मोठेपण

डी. बी. जगत्पुरीया–

हे युगपुरूषा
मी तुझ्या प्रगल्भ
व्यक्तिमत्वात
वादळांचा सूर्य पाहतो.

चवदार तव्याला स्पर्श करून मानवी हक्काची सनद लिहिणारे, काळाराम मंदिर सत्याग्रह करून नवी क्रांती करणारे बाबासाहेब युगनिर्मातेच होते. चार्वाक, बुद्ध, फुले डॉ. बाबासाहेब ही सूर्यफुले आहेत. रक्तांचा एकही थेंब न सांडता झालेली सामाजिक, आर्थिक क्रांती म्हणजेच आंबेडकरवाद. ''सूर्यानेही स्वतला भीमराव म्हणवून घ्यावं एवढं तुझं मोठेपण अरूण काळे यांच्या या साध्या शब्दाने डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा आलेख मांडली आहे. शब्द साधेच पण कवीच्या प्रतिमेने अंतराळ विस्तार थिटा पडावा एवढी सुरेख झेप वरील ओळीतून घेतली आहे''[४]

आंबेडकरवाद मानसिक वैचारिक प्रबोधनाला मानते. कारण विषमतेच्या विचारांना, संस्कारांना आणि समाज व्यवस्थेला केवळ मनपरिवर्तनानेच नष्ट करता येते असे आंबेडकरवाद मानतो. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अंधाराला उजेडाचे पडलेले स्वप्न होय. बाबासाहेबांच्या विचाराने घराघरात ज्ञानाचा प्रकाश खेळू लागला. ''आंबेडकर म्हणजे समता, बंधुता, उजेड म्हणजे समता, बंधुता म्हणून आंबेडकर या शब्दाचा अर्थच आंबेडकर हाच आहे. अंधारल्या युगाला पडलेले आंबेडकर हे उजेडाचे स्वप्न आहे. आंबेडकर नावाच्या उजेडाला क्रांतीदर्शनाच्या कुशीतून उजेड जन्माला येऊ लागला. आंबेडकर हा शब्द उजेडाचा पर्यायी शब्द आहे.''[५]

आपल्याला समाजात जे स्थान आहे. ते केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच! खऱ्या अर्थाने जीवनाला भिडण्याची ताकद, जीवनाचा शोध घेण्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांच्यात आहे. त्यांच्या बळावर नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न आंबेडकरवादी कवी पाहतो. जगातलं सर्वोत्तम साहित्य करूणेनं भरलेलं आहे. ही करूणा माणसाचं माणुसपण जागवणारी आहे. दुख, दैन्य, दारिद्र्य, दैववाद, अंधश्रद्धा, शोषण यांना मातीत गाडणारी आहे. विज्ञाननिष्ठतेला, विवेकवादाला महत्त्व देऊन माणसाला 'अत्त दीप भव', 'स्वयंप्रकाशी व्हा' असा मंत्र देणारी आहे.

अण्णाभाऊ साठे –

अण्णाभाऊ साठे यांनी १९५९ साली प्रकाशित झालेली 'फकीरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंझार लेखणीला अर्पण केली आहे. पृथ्वी ही शोषणकाच्या मस्तकावर तरली नसून कवितांच्या

हातावर तरली आहे असे त्यांनी म्हटलेले आहे. समाजातील सामाजिक आणि आर्थिक शोषण अण्णाभाऊ साठे यांना अस्वस्थ करीत होते. आंबेडकरी तत्त्वज्ञान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारच या शोषणाचा नाश करू शकतो असा विश्वास अण्णाभाऊंना होता त्यामुळेच ते म्हणतात,

''जग बदल घालून घाव,
सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात रूतून बसला का ऐरावत अंग झाडुनी नघ बाहेरी,
घे बितीवरती घाव.

या अविष्कारात निर्धार आहे. निश्चिती आहे. हा अविष्कार धगधगतो आहे. ही कविता जग बदलण्याचे सुंदर धारदार हत्यार आहे.''[६]

दया पवार –

दया पवारांच्या 'पाणी कुठवर' या काव्यसंग्रहातील 'बाबा, काल परवाची गोष्ट', या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांसोबतच, त्यांचा जीवन संघर्ष यांचे चित्रण आलेले आहे. भारतातील शोषित पिडीत, समाजाला, त्यांच्यातील स्वाभिमानाला बाबासाहेबांनी जागे केले.

ह्याच शहरात
बहिष्कृत भारतातील
मूक नायकाला
तुम्ही बुलंद आवाज दिला
धमणी धमणीत स्वाभिमान चेतवला.

अशा शब्दात बहिष्कृत भारतातील मूकनायकाच्या रक्तात जागवलेल्या स्वाभिमानाविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. पण या पेटवलेल्या स्वाभिमानी माणसाने पुन्हा मानवताधर्माला बाजुला सारून धर्मांधतेचा वेश परिधान केला आहे. पुन्हा एकदा नव्याने सिंह होऊन जगण्याची गरज आहे. कारण जो भेकड असतो तो नाममात्र जगत असतो.

अरे तू तर क्रांतीचा महान अग्रदूत
तुझ्या स्वागता
मुठी उंचावित जयघोष निनादले

बाबासाहेबांनी इथल्या जातिव्यवस्थेच्या अभेद्य भिंतीला प्रचंड धक्का दिला. त्यामुळेच बाबासाहेबांच्या नावाचा ध्यास घेऊन जगणे म्हणजे मूर्तिपूजा नाही तर या देशातल्या अमेघ अशा भेदाभेदाच्या पायरीला लागणारा तो सुरुंग होता असे दया पवार म्हणतात,

बाबा, तुमच्या नावाचा ध्यास
म्हणजे केवळ देवपूजा नव्हती
माणसामाणसात रचलेल्या पायरीला
तो सुरूंग होता

''बाबासाहेब येईपर्यंत अस्पृश्य समाज गुलामगिरी ही जमातीवर आणि धार्मिक, सांस्कृतिक आणि दंडसत्ता ज्यांच्या हाती आहे त्यांनी निर्माण केलेली आहे. असे त्यांना कधी कळलेच नव्हते. तर ते स्वर्गातील फौजदारांनी त्यांना बहाल केलेली असेच ते मानीत होते आणि पुढला जन्म आहे असेच ते मानीत होते. गतजन्मी पाप केले आहे म्हणून हा जन्म आहे. असेच त्यांचे अज्ञान त्यांना पटवून देत होते. आणि पुढचा जन्म चांगला मिळावा म्हणून सारे बिनतक्रार सहन करीत होते.''[७] पण आंबेडकरी विचाराने आंबेडकर नावाच्या माणसाने ही जिर्ण व्यवस्था नाकारली, स्थितीशीलता झुगारून दिली. पोथीनिष्ठता चिरून टाकून वास्तव जगण्याला महत्त्व दिले. म्हणूनच प्रभा निकुंभे 'प्रहार' या कवितासंग्रातील कवितेत म्हणतात,

माझ्या भीमाची पुण्याई
काय वानू सईबाई
मेलेल्या मनाला त्यानं
जितं केलं बाई... (१)
पांगुळलं मन त्यानं
ताठ उभं केलं बाई... (२)

मुक्या जिवाला धडाधडा
त्यानं वाचा दिली बाई...      (३)

खऱ्या अर्थाने भीमामुळेच मन जितं झालं, ताठ उभं झालं आणि मुक्या जिवाला धडाधड वाचा मिळाली.

अंध त्या झोपडीत
ज्ञानदीप पेटला
इंद्रधनू चैतन्य
मार्ग नवा भेटला.

बाबासाहेब शोषित पिडीत समाजासाठी ज्ञानदीप होते. ज्या महामानवाने हा विचार प्रकाश दिला. त्या महामानवाविषयी कवी जगन्नाथ गवळे म्हणतात,

प्रेरणावादी महामानवानं मान पकडून
प्रकाश माझ्या खोपटापर्यंत आणला
म्हणून माझ्या आरी–पारींना धार चढलीय
शब्दांनी जळजळीत डोळे कुटले

गुरदत्त जनबंधु 'कळप' या कवितांसग्रहात म्हणतात,

तू झालास युगायुगाचे एक प्रलंयकारी वादळ
असा कसा कोट्यवधी काळजात सामावून गेलास.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या प्रलयंकारी वादळाने युगायुगाच्या मुक्यांना वाचा दिली. या वादळामुळेच कवींच्या शब्दांना सामर्थ्य प्राप्त झाले. शोषित वंचितांना दिलासा मिळाला. त्यामुळे या वादळाला कोट्यवधी माणसाच्या मनात स्थान मिळाले. कवी उद्धव नारनावरे यांनी या वादळी महापुरुषाला शब्दात साकरले,

तू उद्धस्तलेस महाकाटे
वर्णजातीचे बांधलेले
तू उखडलेस महावृक्ष
हुंकार उठले गर्जत
भेदाभेदांनी पोसलेले
तू उडवलेस केरकचरे
अंधश्रद्धांचे साचलले
तू चेतवलेस जाळ विद्रोही
राख झाले, तन माजले!

बाबासाहेब नावाच्या महावादळाने जीर्णमूल्यांना हादरे दिले आणि नवमूल्यांची पेरणी केली. 'महावादळ' ही प्रतिमा अर्थपूर्ण आहे. ह्या महावादळाने परिवर्तन घडविले. या परिवर्तनाने मने सजग झाली.

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनाला दिव्य मराठी या वर्तमानपत्रातील रसिक या पुरवणीत प्रसिद्ध झालेल्या कवितेत कवी सुदाम राठोड म्हणतात,

मेंदूला डोळे फुटायला
तसा उशीरच झाला तुझ्या सावलीत यायला............
अशा वेळी तुझ्याकडूनच शिकतो
आम्ही विवेकाची कसोटी
तुझ्याकडूनच शिकतो आम्ही प्रतिकाराचा मार्ग
तुला वगळून नाही उभारू शकत
कुठलाही सामाजिक न्यायाचा लढा
तू आमचा कॉम्रेड
कष्टकर्त्यांचा हात आहेस तूच मार्क्स
माओ आणि लेनीन
व्यवस्थेच्या छाताडावरची संगीन आहेस
तू भुकेल्याची भाकरी
बेकारांची चाकरी तू आमचा ऑक्सीजन

अॅन्टीबायोटिकही तुच आहेस
तू आमची सुरुवात अन शेवट
आमच्या मागेपुढे तुच आहेस.
तू वर्तमान आणि भविष्य
आश्रय आण महाधाम
प्रकृती पुरुषाच्याही आधी तू
तू अमर्यादित अखंड आहेस
प्रकाशाचा सागर अन् अनंताचा मार्ग तू
तुच आहेस परम परम्यात्म्याचा बाप पण
तुझा आम्ही देव करणार नाही
आम्ही पुजत नाही तुला आशीर्वादासाठी
आम्ही पुजन नाही तुला पुण्य कमविण्यासाठी
तुझ्या अफाट कार्यापुढे फक्त होतो नतमस्तक
करतो तुझ्याप्रतीची कृतज्ञता व्यक्त
तुच आमचा बाप आणि तुच आमची आई

आंबेडकरवादी कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडरांविषयी कृतज्ञता जरूर व्यक्त केली आहे. पण त्याचबरोबर कवी सुदाम राहाडे म्हणतात त्याप्रमाणे आशीर्वादासाठी पुण्य कमविण्यासाठी पूजन केलेले नाही. डॉ. आंबेडकर नावाच्या महामानवाने केलेल्या अफाट कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. आंबेडकरवादी कवींनी बाबासाहेबांना पाहिले ते संघर्षाची वाट चालणाऱ्या महामानवाच्या रुपात. या महामानवानेच मानवी स्वातंत्र्याचा विचार दिला. आंबेडकरी कवितेने आणि कवीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची देवरूपाने पूजा केली नाही तर अज्ञान, पिळवणूक, दारिद्र्य, शोषण, असमानता यापासून मानवाच्या मुक्तीचा मार्ग दाखविला; त्या मार्गाने पुढे जाण्याकरिता आपल्या कार्याच्या, संविधानाच्या आणि आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रेरणा दिली. त्यामुळेच या महासूर्याला शब्दाची भेट अंतरीच्या कळवल्याने दिलेली आहे. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी तत्वज्ञानाचे वहन आंबेडकरी कवींनी केले आहे.

## संदर्भसूची

१.आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रका. नागपूर, द्वितीय आवृत्ती, २०१२, पृ.क्र. १७९
२.आंबेडकरी जाणीवांची आत्मप्रत्ययी कविता, डॉ. गंगाधर पाणतावणे, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी,२०१०, पृ.क्र.६४
३.साहित्य आणि विद्रोह, संपा. पृथ्वीराज तौर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००८, पृ.क्र.१३८
४.आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रका. नागपूर, द्वितीय आवृत्ती, २०१२, पृ.क्र. २२८
५.आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रका. नागपूर, द्वितीय आवृत्ती, २०१२, पृ.क्र. १३६
६.आंबेडकरवादी मराठी साहित्य, डॉ. यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रका. नागपूर, द्वितीय आवृत्ती, २०१२, पृ.क्र. १८३
७.शतकातील दलित विचार, दिलीपराज प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००७, पृ.क्र.१४१

❖❖❖

# २००० नंतरच्या मराठी कादंबरीचे वेगळेपण

डॉ. सुषमा शंकरराव प्रधान–घेवंदे
मराठी विभाग प्रमुख
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड, ता.अंबड, जि.जालना
निवास – राम नगर पोलीस कॉलनी, जुने पोलीस स्टेशन जवळ
घर नं. २५६, जालना, महाराष्ट्र (India)
balughewande@gmail.com भ्रमणध्वनी ९७६३००९३२१

मराठी साहित्याचे कथा, कादंबरी, काव्य, नाटय, निबंध, ललित इत्यादी विविध वाङ्मय प्रकार दिसतात. त्यातीलच कादंबरी हा वाङ्मय प्रकार विस्ताराने मोठा, आशय, विषयाची व्यापकता, चित्रणातील विविधता या वाङ्मय प्रकारात दिसून येते.स्वातंत्र्योत्तर पहिल्या दशकाच्या कादंबरीचा विचार करतांना या कालखंडातील कादंबरी वास्तवाशी निगडीत ,ग्रामीन जीवनाचा सुक्ष्म पध्दतीने वेध घेणारी, खेडयातील अस्सल जीवन दर्शन घडविणारी इ. विशयाची व्यापकता दिसुन येते.मराठी साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मय प्राचीन असून इंग्रजी साम्राज्याच्या अधिपत्याखाली अधिक विस्तारीत होत गेला, पण या कालखंडातील कादंबरी लेखनाचे स्वरुप अनुवादीत आणि भाषांतरीत स्वरुपाचे होते.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर प्रत्येक दशकाचा विचार केला तर तत्कालीन सामाजिक परस्थितीचा प्रभाव त्यांच्या कादंबऱ्यातून पहावयास मिळतो ''या कालखंडातील कादंबरी लेखनावर भातीय स्वातंत्र्ययुध्द स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती भारतीय राजवटीचा गांधीजीचा वध पोलीस ॲक्शन निजामी राजवटीची क्रूरता अस्पृश निर्मुलनाचे प्रयत्न प्रादेशिकता वाद कमाल जमीन धारण कायदा अंधश्रध्दा आर्थिक मंदीची लाट लोकांची शहराकडे होणारी धाव इ. घटनांचे चिंतन मनन करुन लेखकांनी आजूबाजूची परिस्थिती त्याच्या कादंबरीतून अविष्कृत केली.''[१]

भारत स्वातंत्र्य झाल्यावर लेखकांचा लेखनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला प्रत्येक लेखकाचे स्वभान जागृत होउन भारतीय समस्याकडे बघण्याचा दृष्टीकोन वास्तववादी आणि सर्वसामान्याचा विचार करणारे ठरले.

१९५० ते १९६० च्या दशकातील कादंबऱ्यांच्या अवतीभोवती च्या परिसराचे सुक्ष्म चित्रण, भयावह वास्तव प्रादेशिकता, ग्रामीन जीवन वर्णन तसेच पांढरपेशा संस्कृती जोपासतांना दिसते. अन्यायाविरुध्द लढा देणाऱ्या आण्णाभाऊ साठे च्या कादंबऱ्या सोबतच स्त्रीसुलभ भावनांना स्त्री जीवन, स्त्रीयांच्या मनोवस्था या सर्वाचा विचाार या दशकात होतांना दिसतो. पण या कालखंडातील कादंबऱ्याचा विशय हा सुखलेाुप ऐश आरामाचे जीवन जगणारे त्यांच्य भरजरी प्रेमाचे चित्रण करणरे होते.

वास्तव ग्रामीण जीवन चित्रण करणारे आणि ग्रामीण साहित्याचे उदयाचे दशक म्हणजे १९६० चे दशक होय. १९६० ते १९७० या कालखंडातील कादंबऱ्याचे स्वरुप वेगाने बदलताना दिसते. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी चा प्रवाह मोठया प्रमाणात याच कालखंडात उदयास आला. वेदना, विद्रोह, नकार ही दलित साहित्याची मुख्य बलस्थने साहित्य विर्विात वेगळे पण निर्मान करतात. ग्रामीन कादंबरीतून ग्रामीन जीवन ग्रामीनबोलीभाषा ग्रामीन आचार, विचार, राकटपणा, बेरकीपणा तर स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीमनाची अथांगता, स्त्रीयांची स्वतंत्र विचार सरणी, तिचे स्त्रीवादीमन तिची सोशिकता इ. विविध जाणिवांचा विषय विविध वाङ्मय प्रकारातून दिसून यतो.

अवतीभोवती घडणाऱ्या घटणा प्रसंगाचे चित्रण साहित्यातून अभिव्यक्त होते.साहित्य हे जगलेल्या जाणीवेतून व्यक्त होते. हा विचार १९६० नंतरच्या दशकातून अभिव्यक्त होतो. १९७१ मध्ये रा.रं.'बोराडे यांची 'पाचोळा', १९७२ मध्ये अरुण साधूंची 'मंबई दिनांक' अशा कितीतरी कादंबऱ्या जगलेल्या जीवनातून अभिव्यक्त होतांना दिसतात. ''असे हे १९७१ ते १९८० या कालखंडात वर्ष निहाय आलेल्या काही कादंबऱ्यात पडलेल्या आजूबाजूच्या घटनांचे ठळक प्रतिबींब असून, १९७१ सालच्या 'ऊन येईना माहेरा', 'त्याची व्याली पोरे', 'गोतावळा', 'कुर्वारणी', 'प्रतिनिधी' व 'पाचोळा' या कादंबऱ्यांतून दिसणारे आजूबाजूच्या घटनांचे प्रतिबिंब ठळक स्वरुपाचे आहे''[२] चित्रण व्यक्त होते.

१९८० ते १९९० च्या दशकातील कादंबरी ही विविध स्तरावरील जीवनाचे दर्शन घडविताना दिसते. 'कातळ' मधू मंगेश कर्णिक, 'चित्रकथी' व्यंकटेश मांडगुळकर, रा.रं. बोराडे 'सावट', राजन गवस 'भंडार भोग' या कादंबरीकारांनी तत्कालीन काळातील समस्या शिक्षण, जातीयता, राजकारण, भ्रष्टाचार, करुणमय जीवनगाथा

व्यक्त करताना दिसतात. विज्ञान आणि संगणक युग म्हणून १९९० च्या नंतरचे युग ओळखले जाते .म्हणून १९९० ते २००० पर्यतच्या कादंबऱ्या हया आधुनिक विचार मांडणाऱ्या होत्या. विविध विषय अतिशय सजगपणे मनाला स्पर्शून जाणाऱ्या होत्या. 'रमाई' डॉ. यशवंत मनोहर, 'झाडाझडती' विश्वास पाटील, 'मनस्विनी' आशा बगे, 'स्थलांतर' सानिया, 'दशक्रिया' बाबा भांड अशा वेगवेगळया कादंबऱ्यातून नानाविविध विषय घेऊन तितक्याच सकसतेने प्रत्येक कादंबरीकार मांडताना दिसतात.

मराठी साहित्यामध्ये आशय आणि विषयाच्या कक्षा २००० मध्ये मोठया प्रमाणात विस्तारीत व्यापक प्रमाणात पहावयास मिळतात. ''मराठी ग्रामीण कादंबरीने कथावस्तूची गरज प्रसंग वर्णन सणावाराचे संदर्भ व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या निमित्ताने मौखिक गीतांचा कादंबरीमध्ये समायोजित वापर करुन ग्रमीण स्त्रियांच्या काव्यात्मक मनोवृत्तीचे दर्शन घडविले आहे''[3] ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होणारे स्त्रीमन त्याांची भाषा शैली, निवेदन पध्दती, त्यांची अभिरुची, आचार ,विचार इ. विशेषणे या काळातील कादंबरीत पहावयास मिळतात.

प्रादेशिक कादंबरीतून निवेदन पध्दती, भाषेची चित्रमयता दिसून येते. व्यंकटेश मांडगूळकरांच्या कादंबऱ्यातून भाषेची आणि पात्रांची चित्रमयता व्यक्त होते.अतिशय सुंदर, नितळ, पारदर्शी भाषा ते वापरतात. बनगरवाडी मधील एक प्रसंग ''एकदम त्याने का ग? म्हणताच अंजी शहारली तो टपाटपा बाभळीची फुले तीच्या अंगावर पडली आणि मागोमाग मेंढक्याने खाली उडी घेतली रंगानेकाळाभोर असा तो जवान नाकेला मेंढका अंजीच्या तोऱ्यात उभा राहिला''[४] कादंबरीतून येत जाणारा नाजूक भाव छटा संवाद चातुर्य स्त्रीसौदर्याची भडक वर्णने प्रेमाची वैविध्य पातळी २००० नंतरच्या येणाऱ्या कादंबरीचे वेगळेपण जाणवते.

या कालखंडातील येत जाणाऱ्या विविध जीवणानुभवाच्या समाज जीवनाचे चित्रण दिसून येते.सार्थपणे अभिव्यक्त करण्यास कादंबरीकाराची निवेदन पध्दती वैशिष्टपूर्ण ठरली आहे.ग्रमीन कादंबरीमध्ये आढळणारी नागर आणि ग्रामीन अभिरुची संदर्भात अनेक साहित्यिकांनी आपली मते व्यक्त केली आहेत.अभिरुची म्हणजे आवडनिवड व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात त्या नुसार त्याची अभिरुची व्यक्त होते.''रसिकता जन्मजात असली तरी अभ्यासाने म्हणजेच कला वाङ्मयाच्या चोखंदळ परिशिलनाने विकसीत करावी लागते म्हणून लौकिक सदभिरुचीतील शिस्तप्रियता, कर्तव्यनिष्ठा, परिश्रमशीलता याच्या आधारे वाङ्मयीन रसिकता संपादन करता येते.''[५]अभिरुची संपन्न साहित्याची निर्मिती या काळात झाली.

नवीन आशय आणि विषय घेऊन २००१ मध्ये 'थेंबथेंब' ही कादंबरी एड्स संबधीचा नाविन्यपूर्ण विषय घेऊन प्रकाशित झाली. 'वर्तमान' नावाची कादंबरी राजकारणासाठी जातीधर्मपंथाचे झेंडे याचा वापर करावा लागतो. हा विचार घेऊन २००२ प्रकाशित झाली. मानवी मनात दडलेले हिंस्त्रपणाचे विंपद सदानंद देशमुख यानी 'बारोमास' कादंबरीत व्यक्त केले आहे. २००२ मध्ये प्रकाशित झालेली 'गाथा सप्तशती 'ही मालोशेची कादंबरी अन्यायाला प्रतिकार करणारी न ठरता अन्यायाला घाबरणारी आत्याचार सहण करणारी मानसिकता व्यक्त करते.तत्कालीन काळातील विविध अनुभव विर्विं लाचलुचपत घेणाऱ्या न्यायधिशाची कथा' प्रताप'कादंबरीतून व्यक्त होते.२००६ रोजी बाबा कदम याच्या कादंबरीतून नावीन्यपूर्ण विशय दिसून येतात.

जातीपातीचे राजकारण राजकारणाती ल बेरकी व्यक्ती चित्रणे वर्तमान कादंबरीतून सुरेश द्वादशीवार यानीं मांडले.सदानंद देशमुखांनी शेतकरी अवस्था दारिद्रयाचे चित्रण कर्जबाजारी अवस्था बारोमास लिहिलेल्या कादंबरीतून व्यक्त करतात.सामाजिक समानतेबददल आग्रही भुमिका मांडण्याचा दृष्टीकोन आपल्याघरापासून बदलेल कास्त्री मग ग्रामीन असो किंवा शहरी अन्याची शोषणाची आत्मपिडे विषयी जाणिवपूर्वक लेखन करणारे लेखक स्त्री लेखिकेच्या तुलणेत कमीच पहावयास मिळतात. अशा स्त्रियांचे दुख 'पार्टटाईम 'मधून प्रतिमा इंगोले यांच्या कादंबरीतून व्यक्त कारतात. स्त्रियाकडे पाहण्याची पुरुषांची विकृत दृष्टी त्यातून होणारा शारिरीक मानसिक छळ सहन करुन एक स्त्री समाजात जगत असतांना स्वत:ला सुरक्षित ठेवते आपली चारीत्र्यशीलता जपते.

आजच्या भयावह जगाचा वास्तव चेहरा हिस्त्रश्वापद 'खूप लोक आहेत 'या कादंबरीतून श्याम मनोहर यांनी केले. मानवी जीवनाचा नेमका आधार काय त्याचे कोडे उलगडणारी 'रेवती' त्याचा असा अर्थ लावतेकी ''काम क्रोध मद सत्ता स्पर्धा लोकशाही मोह भांडवलदार लोभ व्यापार मत्सर आजच्या मानवी जीवनाचे वास्तव रेवतीच्या बुध्दीला जाणवले व अशी विभागणी केली''[६] अशाप्रकारे चालुघडामोडीचे वास्तव जीवन चित्रण जीवनाची दाहकता वेगळेपणाने व्यक्त होते.

स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार त्यांच्यावर लादलेले संस्कार कायदा जरी स्त्रीयांच्या बाजूने असला तरी कुटुंबाकडून झालेला शारिरीक आणि मानाकि छळ, मानहानीकरक जीणे ,भारतीय पुरुष प्रधान समाजाचे कालचे आजचे वास्तव आणि भयावह वर्चस्व या सर्वचे वर्णन' गाथ सप्तशती'राजेंद्र मालोसे यांनी या कादंबरीत

केले आहे.सत्तांधतेचा माज चढलेले कामांधाने अंधळा झालेला गोपाळराव पर्चितापाच्या आगीत होरपळतो आणि स्व:ताला तलावात जीव देतो.असे वर्णन‘ अंतपुरुषा’मध्ये बाबू बिराजदार करतात.

२००३ नंतर ‘कोऽहम’ सुरेश द्वादशीवार,‘ सिलीपशेरा ’— मधुकर वाकोडे, ‘वारुळ’ बाबाराव मुसळे, ‘संभाजी ’— विश्वास पाटील, बाबा कदम यांची‘ निष्कलंक’ या सगळयाच कादंबऱ्या अवतीभोवतीच्या समाजाचे चित्रण करत मानवी मनाचे हिंस्त्र रुपही व्यक्त करताना दिसतात. ‘ब्र’नावाच्या कादंबरीत एका स्त्रीचा यशस्वीतेकडे जाणारा जीवन प्रवास कविता महाजन रेखटतात.अस्पृश समजल्या जाणाऱ्या समाजाच्या वेदना, आक्रोश ‘पारधी’ या कादंबरीतून गिरीष प्रभुणे मांडतात. तर‘ पाडा’ या प्रादेशिक कादंबरीतून अशोक कौतिक कोळी यानीं संघर्ष, साहस सुटका यानुसार आजूबाजूची परिस्थिती रेखाटून जीवनाची फसवेगिरी कसे हाते हे ते या कादंबरीतून व्यक्त करतात. या सर्वच कादंबऱ्या एकाच कालखंडातील असल्यातरी प्रत्येक कादंबरीतून वेगळा आशय आणि विषय जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो त्याच बरोबर जीवनाकडे आणि समाजाकडे वास्तवतेने बघण्याचा दृष्टिकोन सर्वच कादंबरीकारांमध्ये दिसून यंतो.

## समारोप

प्रत्येक कादंबरीकार आपल्या साहित्यातून विषयाची मांडणी करताना तिचे वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करतो.म्हणून काही कादंबऱ्यांचा विषय जरी सारखा असला तरी प्रत्येकाची अभिव्यक्ती क्षमता ही वेगळया स्वरूपाची असते. जीवनानुभवाचे दर्शन घडविताना आजूबाजूच्या घटना प्रसंगांचे जीवन चित्रणातील वेगळेपण जानवते. २००० नंतरच्या कादंबरीकारांनी वास्तव जीवन व्यक्त करताना वेगवेगळा आशय विषय घेऊन येणाऱ्या कादंबऱ्या मनाला जशी भुरळ पाडतात तसेच समाजातील भयावह वास्तवतेचे रुप पाहता वाचकाचे मन अंर्तमुख ही होतांना दिसते.कादंबरीमधून अभिव्यक्त होत जाणारे सर्वच कादंबरीकाराचे असाधारन लेखन कौशल्य वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

## संदर्भ ग्रंथ

१) विभुते शंकर : ‘स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचीवाटचाल’, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद २०१०, पृ.क्र. १०
२) तत्रैव : पृ.क्र. १५२
३) पाटील मोहन : ‘ग्रामीण कादंबरीतील स्त्री ’,स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद २०१० पृ.क्र. १६३
४) माडगुळकर व्यंकटेश : ‘बनगरवाडी’, मौज प्रकाशन, मुंबई १९८३, पृ.क्र. ८९
५) जाधव रा.ग. : ‘वाङ्मयीन निबंध लेखन’,पूवोक्त प्रकाशन पृ.क्र. ७२
६) मनोहर शाम :‘खूप लोक आहेत’, पॉप्युलर प्रकाशन, औरंगाबाद २००२, पृ.क्र. ३०

❖❖❖

# महानुभाव नियतकालिकात 'विचारशास्त्र' त्रैमासिकाचे योगदान

डॉ. अण्णा वैद्य
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
किरणनगर, अमरावती, महाराष्ट्र (India), भ्रमणध्वनी ९४२०१२५६८१

## प्रस्तावना:

महानुभाव वाङ्मय संचीत हे मराठी भाषेचे आद्य उपलब्ध असा मौल्यवान ठेवा आहे. मध्ययुगीन काळातील मराठी भाषेचे अस्सल रुप महानुभावीय गद्य—पद्य वाङ्मयात बघायला मिळते. मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ हा लीळाचरित्र असून तो इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट्ट यांनी परिश्रमपूर्वक लिहिला. लीळाचरित्रात सर्वज्ञ श्री चक्रधराच्या आठवणींचे संकलन केले आहे. मराठीतली पहिली पद्य रचना ही सुध्दा महानुभावीय थोर विदूषी महदंबा उर्फ महदाईसा हीने रचली असून तो काळ इ.स. १२८८ असा आहे. महानुभाव पंथाच्या संपादक लेखक मंडळींनी संस्कृतला समांतर अशा साहित्य परंपरेची निर्मिती मागील ७०० वर्षापासून केली. आज सात हजाराच्यावर, भाषा सौदर्यांनी नटलेले ग्रंथ महानुभावीय कवी, लेखक व संशोधकांनी लिहीले आहे. ईश्वर अवतार घेवून कार्य करणाऱ्या श्रीचक्रधर व श्रीगोविंदप्रभुंच्या कार्याचा परिघ हा मर्यादित नव्हता. त्यांनी समाजसेवेचे व्रत उचलले होते, शिवाय आपल्या रसाळवाणीतून सामान्यजनांना पंथीय तत्वविचार सोप्या भाषेत समजावून सांगितले आहे. आज तीच परंपरा पंथीय मंडळीच्या भरीव साहित्य निर्मिती व संशोधनातील योगदानातून सुरु आहे.

## १) महानुभावीय वाङ्मयाची व्याप्ती :

सहा हजाराच्यावर वेगवेगळे वाङ्मय प्रकार हाताळून मागील आठशे वर्षापासून महानुभाव लेखक मंडळीं आपल्या प्रतिभाशक्तीच्या सहाय्याने काव्य व गद्य वाङ्मयाची निर्मिती करीत आहेत. या सर्व लेखक मंडळींना पंथीय तत्व विचार सामान्य लोकांपर्यंत पोहचावयाचा आहे. सर्वज्ञ, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभु, श्रीदत्त व श्रीकृष्ण या पाचही ईश्वर अवतारांच्या कार्याना समर्पित व विचारधारेला सामावून घेणारी ही वाङ्मय संपदा अफाट आहे. स्फुट ग्रंथ, तत्व भाष्य ग्रंथ, सूत्रभाष्य, महाभाष्य ग्रंथ, काव्य, महाकाव्य, धवळे, विराण्या, आरत्या, कोष वाङ्मय, चरित्र, आख्यान काव्य, कथा, पारायणे, अभंग, धावे, भूगोल, स्थानवर्णनपर ग्रंथ, प्रसादसेवा, मूर्तीवर्णन, लीळावर्णन असे अनेक वाङ्मयप्रकार पंथीय लेखकांनी लीलया हाताळले आहे. अस्सल मराठीतून ही संपदा लिहिली आविष्कृत झाली आहे. काही मंडळींनी प्रत्यक्ष परमेश्वरांच्या सानिध्यात राहून तर काहींनी परमेश्वरांच्या विरहात स्मरण म्हणून साहित्यनिर्मितीचे कार्य केले आहे. ''महानुभाव पंथ, साहित्य यांचा मुलारंभ श्री चक्रधर स्वामीपासून होतो आणि साहित्यातील केंद्रीय विचारही प्रामुख्याने श्रीचक्रधर स्वामींशी निगडीत आहेत.''[१] श्रीचक्रधरांच्या विचारांची प्रेरणा घेवूनच काळाच्या प्रवाहात महानुभाव वाङ्मयाचे स्वरुप बदलत गेले. आजघडीला कादंबरी, नाटक, कथा, कविता, आत्मचरित्र अशा स्वरुपाच्या साहित्य प्रकारातही महानुभाव वाङ्मय निर्माण होत आहे. आज हया सर्वच वाङ्मयीन प्रकारामध्ये लेखन कार्य सुरु असून अलिकडच्या काळात नियतकालिकाचे महत्व लक्षात घेवून पंथीय मंडळींनी नियतकालिकाच्या प्रकाशनाला सुरुवात केली आहे. त्याला आज शंभर वर्ष होत आहे. आजच्या घडीला महत्वाचे पंचवीस नियतकालीके पंथीय विचारधारेतून प्रकाशित होत आहेत.

## २) महानुभावीय नियतकालिक प्रकाशनाच्या प्रेरणा व प्रयोजन :

महानुभाव पंथाची स्थापना मूळातच जीवाने खऱ्या ईश्वराची ओळख करुन घेत स्वत:ला मोक्षाच्या दिशेने मार्गक्रमण करावयासाठी केल्या गेली आहे. सर्वज्ञ चक्रधरांनी वेळोवेळी आपल्या सूत्रांच्या स्पष्टीकरणामधून जीवाच्या अंतीम ध्येयाबद्दल निरुपण केले आहे. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी निरुपलेली सूत्रे, ब्रह्मविद्याशास्त्र, तत्वज्ञान हे जिज्ञासूंना कळावे व त्याने ईश्वराचे स्मरण करुन स्वत:चा उध्दार करुन घ्यावा. या तळमळीतून

महानुभाव साहित्याची निर्मिती झाली आहे. जीवाच्या उध्दरणासाठीच ईश्वर अवतार असून वेळोवेळी ईश्वराच्या अवतारकार्यात प्रत्यक्ष ईश्वराने निरुपण केलेल्या शास्त्राचा अभ्यास करुन, ते आत्मसात करुन, नव्या स्वरुपात ते मांडून, सेवादास्य करीत, आपण मोक्षाच्या दिशेने प्रवास करु शकतो. हे सत्य ओळखून महानुभावीय लेखक मंडळी या वाङ्मयाकडे वळली आहे कारण सर्वज्ञ म्हणाले होते, '' सकळ शास्त्र या शास्त्राशी मिळती परी हे कव्हणालाही न मिळे''[२] चक्रधरांनी जी सूत्रे व तत्वे सर्वसामान्यांना उद्देशून निरुपिली त्यालाच प्रमाण मानून पंथीय तत्वज्ञान निर्माण झाले. सर्वज्ञाच्या सहवासात व नंतर ज्यांना साहित्याचा गंध होता त्यांनी महानुभावीय वाङ्मयाचा अभ्यास केला, संशोधन केले, स्वत: त्यात भर घातली; काहींनी संपादने प्रकाशित करावयाचा सपाटा सुरु केला. या सर्वांच्या प्रेरणा समान आहेत. ईश्वरी तत्व, विचार, लीळांचे स्मरण जीवांना होत रहावे व त्यातून ईश्वर प्राप्तीच्या दिशा गवसाव्यात, स्वत:लाही अशा निर्मितीमधून ईश्वराची सतत आठवण होत राहील ही भावना ठेऊन संपादक मंडळी नियतकालिकांच्या प्रकाशनाची जबाबदारी पेलत आहेत. पैसा मिळविणे हा शुद्र हेतू महानुभावीय नियतकालिकांच्या प्रकाशनाच्या मागे नसून केवळ ईश्वरस्मरण, ईश्वर कार्याचे गुणवर्णन आणि सेवाधर्म हा एकमेव हेतू आहे.

## ३) महानुभावीय आद्य नियतकालिक :

महानुभाव पंथाचे थोर सुधारक म. गोविंदराज दादा पुणेकर यांनी इ.स. १९२६ मध्ये पुण्याहून 'ज्ञानसिंह' हे मासिक सुरु केले. हेच महानुभाव पंथाचे पहिले नियतकालीक होय. कालांतराने इतर विद्वान लेखक मंडळींनी वेगवेगळया प्रकाशनाच्या सहाय्याने व आश्रमाच्या दातृत्वातून महानुभावीय नियतकालीके संपादनाची जबाबदारी स्वीकारली. मुकुंदराज दादा आराध्ये यांनी अमृतसर येथून 'महात्मा' हे हिंदी भाषेतून नियतकालीक सुरु केले. त्यानंतर १९४९ मध्ये अमरावती येथील राजापेठ आश्रमातून कृष्णदास महानुभाव यांनी 'महानुभाव' नावाचे मासिक सुरु केले. हा प्रवास अखंड सुरु राहीला. आज भारतातील वेगवेगळया प्रांतातून महानुभाव पंथाचे पंचवीस नियतकालिके प्रकाशित होत आहेत. 'विचारशास्त्र' हे नियतकालिक त्यापैकीच एक आहे.

## ४) म. श्री. न्यायंबासबाबा यांची वाङ्मय निर्मिती :

मकरधोकडा, जि. नागपूर येथील श्रीदत्त मंदिर व आश्रमाचे संचालक आचार्य प्रवर प.पू.प.म. श्री. न्यायंबास बाबा उपाख्य प.पू.प. महंत सैगंराजबाबा शास्त्री महानुभाव यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहे. मकरधोकडा व नागपूर या दोनही ठिकाणी असलेल्या महानुभाव आश्रमाचे ते संचालन आहेत. जम्मू येथे आयोजित ५ व्या अखिल भारतीय महानुभाव साहित्य सम्मेलनाचे ते अध्यक्ष होते. विराट प्रकाशनाचे संचालक असून 'विचारशास्त्र' या पंथीय नियतकालिकाचे १९९६ पासून संपादन करून त्यांनी आजपर्यंत ६० च्यावर अंक प्रकाशित केले आहे. पंथाचा वैभवशाली असा वाङ्मयीन वारसा त्यांनी दीर्घकाळ चालविला. 'आत्मशांती ज्ञान यज्ञ' हे प्रबोधन सत्र सुरु करून त्यांनी ८० च्यावर कार्यक्रम घेतले. त्यांनी महानुभाव साहित्यामध्ये मौलिक सेवा दिली आहे. 'श्रीचक्रपाणी दर्शन' (१९८९) मधे श्रीचक्रपाणी अवताराचे कार्य, चरित्र व लीळा समाविष्ठ आहेत. 'श्रीदत्तदर्शन' मध्ये श्रीदत्त अवताराच्या महत्वाच्या लीळा, श्रीदत्तात्रेय कवच, त्याचा मराठीतील अर्थ, आरती व स्तवन यांचा समावेश आहे. 'पूर्वी' हे पॉकेट साईज पुस्तक असून त्यात पूर्वी प्रकरणावर केलेल्या निरुपणाचा समावेश आहे. 'श्रीपंचवतार महापूजा' यामध्ये पाचही ईश्वर अवतारांचे महात्म्य काव्यात गुंफण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. रसाळ भाषा, नादमयी शब्द मांडणी व अंगभूत गेयरचनांमुळे ह्या पारायणातून अविट गोडवा निर्माण झाला आहे.

'अभंग पासष्टी' या पॉकेट साईज पुस्तकामध्ये त्यांनी एकूण ६५ अभंगांची गुंफण केली आहे. साधकाला तत्वबोध देतांना विषयात गोडी वाढावी म्हणून ही उत्स्फूर्त अभंगरचना त्यांनी केली आहे. वेगवेगळ्या ६५ शीर्षकाखाली ह्या रचनांची मांडणी केली आहे. त्यामध्ये सुसंगतपणा आहे. पंचवतार कार्य व संदेश हे या अभंगाचे केंद्र आहे.

धर्मदक्षता, अवतारकार्य, संसार, मन, सप्तव्यसन, त्याग, संस्कार, मुक्ती, शिक्षण, सत्संग, ज्ञानप्राप्ती, पुरुषार्थ, सदगुरु, वंदन, संसाराची दु:खरुपता असे विविध विषय त्यांनी लिलया अभंग छंदात बसविले आहे. याशिवाय विराट प्रकाशनाद्वारे आचार्य बाभुळगावकर यांचे 'सभाशास्त्र', 'सूत्रपाठ', इ. पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'आचार–परमो धर्म:।।' हे आक्षेपांचे खंडण करणारे पुस्तक आणि 'असतीपरी' हे बाबांचे 'असतीपरी'

प्रकरणावरील विवेचन असलेले पुस्तक प्रकाशित केले आहे. याशिवाय 'आधारवड अधिकरण' हा बाबांच्या एकसष्ठी निमित्त प्रकाशित गौरवग्रंथ विराट प्रकाशनाद्वारे प्रकाशित केला असून त्यात बाबांच्या कार्याची नोंद आहे, मान्यवरांची बाबाविषयीचे शुभसंदेश, इतर पंथीय साहित्य व छायाचित्रे असा हा ४९० पृष्ठाचा बृहद ग्रंथ डॉ. तं. चंदाइसा पैठणकर यांनी संपादित केला आहे. काही नियतकालिकात बाबांचे लेख प्रकाशित झाले आहेत. 'ज्ञानांजन', दिवाळी अंक २००९, लीळाचरित्र सर्वांगीण स्वरूप, 'परमार्ग', जानेवारी २००७, गीता मृतबोध, 'महानुभाव दर्शन', मार्च २०१८ च्या अंकात महावाक्य सिद्धांत दर्शन इ. लेख प्रकाशित झाले आहेत. एकूणच आचार्य न्यायंबास बाबांचे महानुभाव पंथाच्या धर्मप्रचार व वाङ्मयीन चळवळीला महत्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या आश्रमातील विराट परिवारातील अनेक तपस्वी महिलांचे अनेक लेख विचारशास्त्रात प्रकाशित झाले आहेत व काही काव्य रचनाही प्रकाशित झाल्या आहेत.

## ५) 'विचारशास्त्र' – महानुभाव नियतकालिकातील आशय विचार :

म. सैंगराजबाबा शास्त्री, संचालक, महानुभाव आश्रम, श्री दत्त मंदिर, मकरधोकडा, ता. उमरेड, जि. नागपूर हे या त्रैमासिकाचे मुख्य संपादक आहेत. १९९६ पासून त्यांच्या संपादन मार्गदर्शनाखाली हे त्रैमासिक प्रकाशित होत आहे. २०११ पर्यंतचे अंक शोधकार्यामधे हाताशी प्राप्त झाले. संपादक महंत स्वतः ज्ञानसंपन्न अधिकरण असल्यामुळे संपादकाच्या दृष्टीने त्यांनी प्रत्येक अंकाचा दर्जा राखण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अंकातील अंतर्गत सजावट, लेखांमधील वैविध्यपूर्णतः, प्रसंग उचीत असे संपादकीय, पंथीय समाचार, रेखाचित्रे, सकळा सुंदरा लिपीतील मूळ अक्षरातील मूळ पोथींचे नमूने, वाचकांचे मनोगत असे सर्वसाधारण अंकाचे स्वरूप आहे. पंथातील अनुयायी अभ्यासू तत्वचिंतक बनावेत या भूमिकेतून हे मासिक सुरु झाले आहे. संपादकांनी या आधी अनेक मासिकातून, वृत्तपत्रातून, आकाशवाणी व दूरदर्शन वरून पंथीय विचारधारेची मांडणी केली आहे. नागपूर विद्यापीठाची 'शास्त्री' ही संस्कृत साहित्याची पदवी त्यांनी प्राप्त करून संस्कृतमध्ये 'दर्शनशास्त्र' या विषयात एम.ए. ची पदवी प्राप्त केली आहे. या त्रैमासिकामधून अनेक मान्यवर मंडळींचे महत्वपूर्ण असे शोधनिबंध व लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांची नावे अशी, सुरेश वाइन्देशकर, म. संजयराजशास्त्री ज. दर्यापूरकर चंद्रपूर, तं. नंदा गुरु पंजाबी, उमेश आकरे, डॉ. कुंदा केळापुरे, पंढरीनाथ कुकडे, म. श्री. वसंतराज ज. दर्यापूरकर शास्त्री इ. चे लेख तसेच गौतम सुत्रावे यांच्या अनेक काव्यरचना व गीते, महेंद्रमुनि विराट यांच्या काव्यरचना व गीते, कु. मोनालिसा कुकडे यांच्या लघुकथा प्रकाशित झाल्या आहेत.

सौ. मालती साखळे, प्रल्हाद करकीकर, डॉ. चंद्रकांत निंभोरकर, म. श्री. बाभुळगावकर शास्त्री, तं. इंदु दिवाकर महानुभाव, प्राचार्य दि. बी. बिडकर शास्त्री, दा. गी. शेवलीकर, म. राजधरबुवा शास्त्री मराठे, सौ. कोकीळा चौधरी, नलिनी आठवले, कु. मोनालिसा कुकडे, त. पुष्पाताई विराट, मकरधोकडा, सौ. पुष्पा नारखेडे, म. षिराज येळमकर, म. कृष्णदास महानुभाव, कै. आचार्य श्री. म. आराध्य मुरलीधर शास्त्री, कै. श्री प्रेमदास लोणकर, नरेंद्रशास्त्री शेवलीकर, महानुभाव, म. वसंतराज शास्त्री दर्यापूरकर, त. बेबीताई विराट, म. मराठेबाबा महानुभाव प.म. श्री. तेजराज महंत पोटोदेकर, शिवाजी पडोळे, सुरेश वाइंदेशकर, डॉ. स्मिता ठाकरे, प्रा. पुरुषोत्तम नागपुरे, डॉ. चंद्रकांत निंभोरकर, प्राचार्य म. श्री. दि. बिडकर, म. राजधरदादा बिडकर, सौ. अपर्णा केकतपुरे, म. वसंतराज शास्त्री दर्यापूरकर, डॉ. रा. बो. मेश्राम, प्रा. अनिता नाईक, डॉ. बापूजी संकपाळ, प्रा. बा. द. महात्मे, म. आवेराजबाबा कोठी, म. गोविंदराव सेवातकर, म. राजधर आराध्य, डॉ. उषा यशवंत मनोहर, बी.जी. जाधव, पू. श्री. पंकजराज राहेरकर, प्रा. उमेश आकरे, प्रा. प्रशांत भुजबळ, राज नागापूरकर इ. अनेक मान्यवरांचे विचारशास्त्रामधून लेख प्रकाशित झाले आहेत.

## ६) विचारशास्त्राच्या विशेषांकाचे स्वरूप :

विचारशास्त्राचा अंक ३७ हा श्री. नागराजबाबा महानुभाव यांना समर्पित श्रद्धांजली विशेषांक म्हणून प्रकाशित झाला आहे. या अंकातून आचार्यांच्या कार्याला अक्षरबद्ध केल्या गेले आहे. आचार्य कै. नागराजबाबांच्या कार्याला समर्पित असे विद्वान मंडळीचे लेख याअंकात प्रकाशित झाले आहे. त्यामध्ये डॉ. यु.म. पठाण, प्रा. राम शेवाळकर, केशरताई मेश्राम, प्रा. बाळकृष्ण अंजनगावकर, म. खंदारकर, महंत सिन्नरकरबाबा, म. कृष्णराजबाबा शास्त्री, म. श्री. बाभुळगावकर शास्त्री, पू. म. श्री. राजधर आराध्य, साहित्याचार्य संतोषमुनी शास्त्री कपाटे, फ. मु. शिंदे, डॉ. वि. भि. कोलते, नलिनी आठवले, प.पू.श्री. मनोहरशास्त्री सुकेणेकर, प.पू.प.म. श्री

चिरडेबाबा निफाड, प.पू.प.म.श्री दत्तराजबाबा शास्त्री या सोबतच जाळीचा देव येथील कैवल्यपथिक आश्रमातील बहुतेक भिक्षूक, साधू यांनीही म. आंबेकर बाबाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले आहे.

ऑक्टोबर २००३ चा अंक 'श्रीदत्त दर्शन बद्रिकाश्रम यात्रा विशेषांक' आहे, यामध्ये श्रीदत्त अवतार कार्याच्या अनुषंगाने विविध मान्यवर संशोधकांचे लेख समाविष्ठ आहेत. त्यामध्ये महंत गोपीराज बाबा शास्त्री, म. श्री. आसेगावकर, प्रकाशमुनि, आचार्य महंत पुजदेकरबाबा ई. श्री. सुरेश कापुसतळणीकर इ. मंडळींचे महत्वपूर्ण लेख प्रकाशित झाले आहेत. हे लेख संशोधकीय भूमिकेतून लिहिले आहेत.

जानेवारी २००८ अंक श्रीमद्‌भगवद्‌गीता सप्ताह बडोदा (आत्मशांती ज्ञानयज्ञ ३३) पंचवार्षिक विशेषांक म्हणून प्रकाशित झाला आहे. बडोदा ग्रामातील पंथीय सदभक्तांनी आयोजित केलेल्या या सप्ताहातील उपक्रमाचा व त्या अनुषंगाने जन्माने या गावातील परंतु कर्माने पंथीय कार्य पूर्ण महाराभर गाजवणाऱ्या महंताविषयीचे लेख या अंकात समाविष्ठ आहेत.

एप्रिल २०१० अंक ५७ हा कै. कवीश्वर कुळाचार्य प.पू. प. म. श्री. बाळकृष्ण कारंजेकरबाबा स्मृति विशेषांक आहे. यात महंत पुजदेकरबाबा घोटी, केशरताई मेश्राम, यांचे लेख आहेत. हा अंकही कारंजेकरबाबांच्या कार्यांची महती वर्णन करणारा अंक आहे.

ऑक्टोबर २०१० अंक क्र. ५९ हा मातोश्री श्रद्धांजली विशेषांक असून डॉ. कन्हैया कुदंप, केशव मेश्राम, डॉ. भाऊराव ढगे, त. बेबीताई विराट, तं. पुष्पा विराट, तं. प्रभा विराट तं. निलम विराट, कु. प्राची इ. लेख प्रकाशित झाले आहेत.

'विचारशास्त्र' त्रैमासिकाची भूमिका म. सैंगराजबाबांनी एका अंकातील संपादकीय मध्ये व्यक्त केली आहे. ''विचारशास्त्र तीन वर्षापासून आम्ही चालवित आहोत हे म्हणणे योग्य होणार नाही. आम्ही उभे झालो आहोत. निमित्त झालो आहोत. पंथाचे वैभव, वाङ्‌मय, तत्त्वज्ञान, संस्कृती आदिंचा परिचय सर्व सामान्यजनास व्हावा. नवयुवकांना तसेच जिज्ञासू अभ्यासकांना पंथीय साहित्य वाचण्याची गोडी लागावी हाच शुद्ध सात्विक हेतु या पाठीमागे आहे.''३ विचारशास्त्राच्या अंकामधे वैविध्यता आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या भाषणाची नोंद, छायाचित्रे, कार्यक्रमाची सविस्तर माहिती, इ. परिसंवाद विषय, वक्ते, अध्यक्ष, सांस्कृतिक कार्यक्रम, साथसंगत करणाऱ्यांच्या नावाची नोंद विस्तारपूर्वक अशी माहिती संमेलन विशेषांकामधून प्रकाशित झाली आहे. वेळोवेळी जे विशेषांक प्रकाशित झाले आहेत त्यातील लेख व माहिती मौलिक असून हे अंक संग्रही ठेवावे असे आहेत. विचारशास्त्राच्या संपादकीयमधून म. सैंगराजबाबा यांनी व्यक्त केलेले विचार हे महानुभाव पंथीयासाठी व अन्य आध्यात्मिक प्रवाहातील सदभक्तांसाठी मौलिक विचार धन आहे. बाबांची मांडणी सहज सुलभ असून तिला अनुभवाची, अनुभूतीची जोड आहे. अखंड भ्रमंती, हजारो माणसांशी जोडलेला संपर्क, संवाद, पंथ प्रचार व प्रसाराची घेतलेली शपथ, अखंड काम करण्याची बुलंद मनिषा हेच बाबांच्या कार्याचं गुपित आहे. त्याचा प्रत्यय विचारशास्त्राच्या पानापानातून येतो. सर्वच अंक शोध कार्य करतांना प्राप्त होऊ शकले नाही. मुखपृष्ठ हे प्रतिकात्मक, तर कधी पंच अवताराच्या लीळा दर्शविणारे रेखाटणे, तर कधी छायाचित्रे असा संगम असणारे, आकर्षक असे आहे. महत्वपूर्ण कार्यक्रमाची छायाचित्रे, अंतर्गत सजावट आकर्षित करणारी पानाची बार्डर यातून संपादकाची उत्तम दृष्टी दिसून येते. महानुभाव पंथातील महत्वाचे लेखक म. बा. भो. शास्त्रीजींनी म. सैंगराजबाबांच्या संदर्भात अभिप्राय देतांना म्हटले आहे. " महानुभाव साहित्याच्या वैभवात आपण सकस भर घातली, विचारशास्त्रातून येणारं सूत्रांच विश्लेषण व गीतार्थ वाचकांना आवडला."[४] विचारशास्त्रामध्ये संपादकाच्या सकस वाङ्‌मयीन जाणिवेचा प्रत्यय पानोपानी येतो.

'विचारशास्त्र' या त्रैमासिकाने १९९६ पासून २०११ पर्यंत वीस वर्ष महानुभाव पंथाच्या कार्यांची नोंद घेऊन या कार्याला अक्षरबद्ध केले आहे. वीस वर्षामध्ये ज्यांनी ज्यांनी पंथीय कार्याला वाहून घेतले, ज्यांनी संशोधन केले, ज्यांनी सभा संमेलने आयोजित केली, ज्यांनी उठलेल्या धार्मिक कलहपूर्ण वातावरणात लेखणीने उत्तरे दिलीत त्या सर्वांच्या नोंदी विचारशास्त्राने घेतल्या आहे महानुभाव पंथाचे हे त्रैमासिक 'महानुभाव' मासिकानंतर महत्वाचे नियतकालिक आहे.

## निष्कर्ष :

१) महानुभावीय वाङ्‌मय हे मध्ययुगीन काळात मराठीत लिहिल्या गेलेले आद्य गद्य–पद्य वाङ्‌मय आहे.

२) सर्वज्ञ श्रीचक्रधर यांचे विचार, कार्य व त्यांचे तत्वज्ञान हीच महानुभाव वाङ्मय निर्मितीची प्रेरणा असून ईश्वर गुणवर्णनातून स्मरणशक्ती हा या वाङ्मय निर्मितीचा हेतू आहे.

३) महानुभावीय नियतकालीकाची सुरुवात 'ज्ञानसिंह' या मासिकापासून झाली असून ते पुणे येथून प्रकाशित झाले होते.

४) म. सैंगराजबाबा शास्त्री यांनी विपूल ग्रंथसंपदा निर्माण केली असून त्यांच्या कुशल संपादन व मार्गदर्शनाखाली विचारशास्त्र हे त्रैमासिक प्रकाशित होत आहे.

५) महानुभाव पंथाचे वैभव, वाङ्मय, तत्त्वज्ञान, संस्कृती आदिंचा परिचय सर्व सामान्यजनास व्हावा. नवयुवकांना तसेच जिज्ञासू अभ्यासकांना पंथीय साहित्य वाचण्याची गोडी लागावी हाच शुद्ध सात्विक हेतु विचारशास्त्र नियतकालिक प्रकाशनाच्या मागे आहे असे म्हणता येईल.

६) विचारशास्त्र त्रैमासिकामधून महानुभावीय वाङ्मय परंपरेतील संशोधन लीळावर्णन, ललित साहित्य निर्मितीचा परिचय, नवलेखकांच्या साहित्य प्रकाशन, चर्चा, धार्मिक कार्यक्रमाच्या नोंदी, विशेषांक असे विविधांगी साहित्य प्रकाशित केले जात आहे.

७) विचारशास्त्र आजचे महत्वाचे महानुभावपंथीय नियतकालिक असून त्यांचे महानुभावीय वाङ्मयात मौलिक योगदान आहे.

## संदर्भ :

१) डॉ. उषा देशमुख – 'महानुभाव–साहित्य दर्शन' – माया प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १

२) लीळाचरित्र – संपादक पुरुषोत्तम नागपुरे, ओंकार प्रकाशन, अमरावती, अज्ञात लीळा, क्र २५, पृ. ७६

३) म. सैंगराजबाबा शास्त्री – 'विचारशास्त्र' विराट प्रकाशन, मकरधोकडा, जि. नागपूर, जानेवारी १९९९, पृ. २०

४) म. बा. भो. शास्त्री – 'एका नळाचे पाणी' लेख आधारवड अधिकरण, संपादक डॉ. चंदाईसा पैठणकर, विराट प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०१७, पृ. ६९, ७०.

❖❖❖

# वाटा—पळवाटा या नाटकाचे वाङ्‌मयीन मूल्यमापन

डॉ. राकेश दे. कभे
महात्मा गांधी महाविद्यालय
पारशिवनी, जि. नागपूर, महाराष्ट्र (India), भ्रमणध्वनी ९८२३७०७४२६

प्रा. दत्ता भगत यांचे 'वाटा—पळवाटा' हे समस्याप्रधान हे समस्याप्रधान नाटक एकंदर मराठी नाटकातच आपल्या वेगळया वैशिष्ट्याने, कथानकाने उठुन दिसते. प्रा. दत्ता भगत हे दलित नाटककार आहेत. एकांकिकेपासून त्यांनी आपल्या नाट्यलेखनाचा प्रारंभ केला. आज ते एक यशस्वी नाटककार म्हणून प्रसिद्ध पावले आहेत. प्रा. दत्ता भगत यांच्या नाटकातील त्यांची दृष्टी दलितांच्या परिस्थितीकरवी आणि दु:ख—दैन्यापुरती मर्यादित नाही. ती आपल्या समाजातील दलित्वाच्या मुळापर्यंत जाते. डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेल्या तीन पिढयांचे दर्शन नाटककारांनी घडविले आहे. समाजातील परिवर्तनाची गती आणि अपेक्षा ह्यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेल्या युवा पिढीचे दर्शन दत्ता भगत यांनी दाखविले आहे. पूरग्रस्तांच्या वसाहतीचे प्रकरण दत्ता भगत यांनी संदर्भासाठी निवडले आहे. 'नवनाटककार नाट्य महोत्सव' अंर्तगत २७ डिसेंबर १९८७ ला थिएटर ॲकॅडमीतर्फे टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे या नाटकाचे प्रयोग सादर करण्यात आले. या नाटकाला अपार लोकप्रियता मिळाली आहे. या नाटकाची वैशिष्ट्ये सविस्तर विशद करूया.

## १) नाट्यविषयाची नावीन्यता :

'वाटा—पळवाटा' या नाटकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे पूरग्रस्तांची समस्या ही होय. विषयाचे नावीन्य हा या नाटकाचा तजेलापणा प्रकट करणारा आहे. वाचक—प्रेक्षकांना एका वेगळी मेजवानी या विषयाने मिळालेली आहे. नाटककारांच्या संशोधक वृत्तीची आणि प्रयत्नाची फलनिष्पत्ती या नाटकातुन प्रकट होते. दलितांना स्वाभिमानाने जीवन जगत यावे, पूरग्रस्तांना आपले हक्क प्राप्त व्हावे, जातीय दंगली निर्माण झाल्यावर समाजाची कशी दैन्यवस्था होते याचे भेदक व वास्तववादी चित्रण नाटककारांनी आपल्या कौशल्याने रेखाटले आहे. पूरग्रस्तांची समस्या मांडून दत्ता भगत यांनी ज्वलंत सामाजिक प्रश्नाची उकल केली आहे. कादंबरी लेखनाचा विषय असूनही तो नाटकासाठी भगतांनी निवडला आहे. याकरिता त्यांना पात्राची रचना प्रातिनिधिक स्वरूपाची करावी लागली. पूरग्रस्तांच्या व दलितांच्या सामाजिक ज्वलंत प्रश्नाकडे एकाही उच्चवर्णीय लेखकाने लक्ष दिले नाही याचे आश्चर्य वाटते. या ज्वलंत समस्येला वाचा फोडून दत्ता भगत यांनी हा विषय नाटकातून मांडला आहे. विषयाच्या नाविन्यामूळे रसिक—प्रेक्षकांना उत्सूकता निर्माण होते. समस्याप्रधान नाटकात हे नाटक विषयाच्या नावीन्याने उठून दिसते यात शंकाच नाही.

## २) भाषाषौली :

'वाट—पळवाटा' या समस्याप्रधान नाटकात जे संवाद आहेत त्यात भाषाशैली महत्त्वाची आहे. प्रा. दत्ता भगत यांना नाटकाची उत्तम जाण आहे. भाषेकडेही त्यांनी महत्त्वपूर्ण लक्ष दिले आहे. या नाटकात वास्तव कल्पनाशक्तीचा वापर लेखकाने योग्यतऱ्हेने करून घेतला आहे. या नाटकाची भाषा कृत्रिम वाटत नाही. आक्रस्ताळेपणापासून लेखकाने स्वत:ला दूर ठेवले आहे. दत्ता भगत यांच्या शब्दरूपाला एक आंतरिक लय आहे. ज्वलंत समस्या व आशयाची आवर्तने ध्वनित करणारी लय असते म्हणून ती आशयापासून वेगळी काढता येत नाही. अशिक्षित काका ग्रामीण बोली बोलतात, 'मोठा सत्तेवानच लागून गेलाय! काहासाठी सिकवलं ह्याला? आपल्या समाजाच भलं करावं ह्यासाठीच ना? मी गावी असतो तर धा सर्तिफिकट देली असती आनून!' या भाषाशैलीतून वास्तव स्वरूप समजून येते. 'वाटा—पळवाटा' या नाटकातील भाषा दर्जेदार आहे. अर्जुनच्या संवादातही उत्तम भाषाशैलीचा प्रत्यय येतो. 'गरिबांच्या सहनशक्तीलाही मर्यादा असतात. शेवंताला जाळणारे हेच आणि हेच माझ्यावर खुनाचा आरोप करणार? संघर्शाशिवाय चळवळीला पर्याय नाही. अर्जुनाला लहान भावाप्रमाणे समजावून सांगणारी सतीशची भाषाशैली उत्तम आहे. 'अर्जुन, तू कायदा जुमानायला तयार नाहीस. लोकांच्या सहानुभूतीची पर्वा करायला तयार नाहीस. संख्येच्या बळावर होते ती न्यायाची लढाई नसते. तिथ सुरू होत असते ती झुंडशाही आणि झुंडशाहीत बळी पडतो तो गरिब माणूस'. सोनलला लहान बहिणीप्रमाणे समज

देताना सुस्वभावी हेमा म्हणते, 'गर्दी असलेल्या डब्यात आपण एखाद्या अपंगाला वागवतो ना आपुलकीने, बस! तसंच असतं हे प्रसंगिक.' या वास्तवतेच्या भाषाशैलीतून व्यक्तीमत्त्वाची ओळख करून देणारी लेखकांची शैली उत्तम दर्जाची आहे. शेवटया प्रसंगात सतीश जेव्हा स्वत: विचार करतो आणि स्वत:च स्वत:शी बोलतो, त्यातील भाषाशैली नाटकाची परिणामकारकता निश्चित वाढवते. उदा. 'हेमा चुकतंय! कुठ तरी चुकतंय – काय चुकतंय? मी फक्त विचारच करत राहिलो. वांझ विचार. त्या अकुरालाच जपावं लागेल. चल, मी जामीन घेईल अर्जुनची.' हेमा यावेळी सतीशला सावरून घेते व आधार देते. वास्तव भाषाशैली नाटकाला एक वेगळी उंची प्राप्त करून देते.

## ३) जीवनाचा सत्याभास :

नाटक म्हणजे जिवनाचा सत्याभास निर्माण करणारा कलात्मक दृश्य अविष्कार आहे असे म्हटले जाते. त्या दृष्टीने 'वाटा–पळवाटा' हे नाटक अभ्यासण्यासारखे आहे. या नाटकातील पात्र, प्रसंग, कथानक यात सत्याभास जाणवतो. आपल्या कुटुंबावर प्रेम करणारा सतीश अतिशय प्रेमळ आणि साधा माणूस आहे. पूरग्रस्तांच्या न्यायाकरिता स्वत:ला झोकून देणारा अर्जुन; सुस्वभावी, गृहदक्ष, पतीचे मनोधैर्य वाढविणारी हेमा ही पात्रे सात्विक प्रवृत्तीची आहेत. दास गुरूजी स्वातंत्र्य सैनिक असूनही पारंपारिक, स्वार्थी प्रवृत्तीची व्यक्ती असते. पूरग्रस्तांना रहायला घरे नसल्यामुळे पावसाळयात त्यांची अत्यंत दैन्यवस्था होते. याची जाणीव अर्जुनला असल्यामुळे तो त्यांच्याकरीता न्यायाची लढाई लढत असतो. सतीश, अर्जुन वाचकांची निश्चितपणे सहानुभूती मिळवणारी पात्रे आहेत. ही सर्व पात्रे आपल्या जवळची, परिचयाची वाटतात. वास्तव चित्रण व सत्याभास निर्माण करण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत. नाटकात पूरग्रस्तांचा मोर्चा, जातीयतेची दंगल चित्रित करण्यात दत्ता भगतचे कसब वाखाणण्यासारखे आहे.

## ४) स्वभावचित्रणातला उठावदारपणा :

'वाट–पळवाटा' नाटकातील प्रमुख पात्रांचे स्वभावचित्रण अतिशय उठावदार झाले आहे. विशेषत: काका, सतीश, अर्जुन या पात्रांची व्यक्तिरेखा अतिशय उठावदार झाली आहे. सत्यवचनी सतीश, न्यायाची लढाई लढणारा अर्जुन व स्वार्थ साधुन कार्य करणारे दास गुरूजी अशी परस्परविरोधी पात्रे 'वाट–पळवाटा' मध्ये आहेत. हेमाची व्यक्तिरेखा अतिशय वास्तव वाटते. ती कधी अर्जुनची बाजू घेते, कधी नवऱ्याची बाजू घेते. हेमाची शालीनता, गृहदक्षता व अर्जुनची न्यायाची लढाई रेखाटताना दत्ता भगत यांनी आपले कौशल्य पणास लावले आहे. पात्रांच्या बोलण्याची लकब, विशेषता काकांची शैली सुंदर साधली आहे. स्वभावचित्रणात कृत्रिमपणा वाटत नाही. पात्रांच्या मनाची घडण, त्यांच्या दृष्टीकोन, त्यांचा स्वभाव प्रा. दत्ता भगत सहजपणे रेखाटतात.

## ५) संवादातील विशेष :

संवाद हा नाटकाचा प्राण असतो असे म्हटले जाते. 'वाटा–पळवाटा' या नाटकातील संवाद लक्षणीय आहेत. प्रसंगानुरूप संवादात चढ–उतार आहेत. संवादात भारदस्तपणा जाणवतो. सतीश, अर्जुनचे काही संवाद दीर्घ आहेत. एरव्ही नाटकातील संवाद लघुच आहेत. छोटया–छोटया संवादातही लेखकांनी हवा तो आशय पेरल्यामुळे प्रसंगाची परिणामकारकता वाढत जाते. काही संवाद पाहण्यासाारखे आहेत.

उदा.

१. ''बाबासायबाच्या नावावर एकदा का आम्ही घराभाइर पडलो म्हणजी परतायला काळ न्हाई की वखुत.'' (पृ.५)

२. ''माझे वडील जज आहेत. सुधारकांचं घराण आहे माझं. सुरूवातीपासुन स्वातंत्र्याच्या चळवळीत होते माझे वडील.'' (पृ.२९)

३. ''अनुभवातून उमजलेले वास्तव सांगीतलं मी. मी सुखीच आहे. स्वत:चे निर्णय स्वात:च पण जबाबदारीने घ्यावे लागतात.'' (पृ.३०)

४. ''झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्या मागण्या काय असणार? स्वातंत्र्य सैनिकांचं राज्य चालू आहे देशात, तेव्हा दलितांना घरं मिळाली काय, न मिळाली काय! त्याचं त्यांना काय सोयरसुतक?'' (पृ. ३२)

५. ‘‘त्या गोडघाटयाच्या आर्शीवादानं फार शेफारलास का? त्यान कुठून बाई आणली कोणास ठाऊक आणि इंथ येऊन मारे तोंड वर करून म्हणतो,माझी बायको बामन.’’ (पृ. ३४)

६. ‘‘गायरानाची जागा पडीक जागा गोरगरीबायला मिळॉव म्हणून. हजारो गोरगरीब गेल्ते जेलत. लाठया खाल्ल्या, ताह्यच्या लेकराबाळाचीही उपासमार झाली.’’ (पृ.३७)

७. ‘‘अधिक खोट बोलू नका. तुम्ही दिसता एवढे सरळ नाहीत. पत्र सोनलचं वाचलंत आणि शिव्या अर्जुनला दिल्या तुम्ही? का?’ (पृ.४६)

८. ‘‘लेकरबाळं घेऊनशान कडीकपारीत लपलो, देशोधडीला लागलो. तरोठ्याचा पाला खाल्ला. आन काहीच नाही मिळाल तं घटघट पानी पिऊनश्यानं पोटाची गार थंड केली.’’ (पृ.६३)

९. ‘‘जाळपोळ करणारे सहीसलामत सुटताहेत हा सर्वनाश नाही? चळवळीत उतरायंच तर किंमत मोजावी लागते. एवढच सोयीचा अर्थ लावत आलात तुम्ही, तुमच्या आवडत्या तत्त्वाचा!’’ (पृ.७६)

१०. ‘‘त्या अंकुरालाच जपावं लागेल. असं काठावर राहून नाही. त्याच्यासोबत राहून मी जामीन घेईन अर्जुनची.’’ (पृ.७६)

अशी कितीतरी वाक्ये या नाटकाच्या यशात भर टाकतात.

## (६) माणसांच्या विविध प्रवृत्तींचे दर्शन :

‘वाटा—पळवाटा’ या नाटकात अनेक पात्रे येतात. प्रत्येक पात्राच्या मनोवृत्तींचे, त्यांच्या वागण्या—बोलण्या—जगण्याचे दर्शनया नाटकात घडते. नाटकाच्या प्रारंभापसूनच माणसाच्या विविध प्रवृत्तींचे दर्शन घडते. डॉ. आंबेडकरांविषयीची श्रद्धा, दलितांना स्वाभिमानाचे स्थान मिळवून देणारे काका, सत्यवचना—सदा सत्याचे पालन करणारा सतीश, आंतरजातीय विवाह करून सतीशला दु:खाच्या वेळी आत्मविश्वास वाढविणारी सुस्वभावी, प्रेमळ हेमा, गरीब शेवंताला नवरा मेल्यावर आधार देणारा प्रेमळ काकांचे वर्तनअनुकरणीय आहे. डी. एड्. करून शेवंताने मास्तरकीची नोकरी करावीअसे काकांना वाटत असते.पुरग्रस्तांना मदत करून त्यांना घरे मिळवून देण्याकरीता अर्जुनने केलेला संघर्ष महत्त्वाचा वाटतो.दलितांच्या उद्धाराकरीता व पुरग्रस्तांच्या रास्त मागण्या मान्य करण्याकरीता, प्रसंगी तुरूंगवास पत्करणारा अर्जुन तरूण पिढीला मार्गदर्शक ठरावा असे वाटते. चळवळींच्याद्वारे संघर्ष करून न्यायाची लढाई लढण्याचे कार्य अर्जुन करीत असतो. पवार साहेब कॉन्ट्रॅक्टर असल्यामुळे व सतीशच्या कॉलेजचे अध्यक्ष असल्यामुळे अर्जुनचा सुड घेण्याकरीता सतीशवर दबाव आणतो. स्वत:च्या स्वार्थाकरिताअर्जुनला कॉलेजमधुन डिसमिस करण्याची योजना पवारसाहेब आखत असतो. दास गुरूजीही स्वत:च्या स्वार्थाकरिता सतीश सोबत गोड—गोड बोलतात पण दलित असल्यामुळे किरायाने घर देण्याचे नकारतात. अर्जुनवर खोटा आरोप करून दास गुरूजी आपल्या मुलीचा विवह अर्जुनसोबत करीत नाही. पण अर्जुनाने सोनलला दंगलीतुन वाचविल्यावर स्वार्थाकरिता त्याची माफी मागतात. सोनलला अर्जुनासोबत आंतरजातीय विवाह करावा असे मनातून वाटत असते. ती अर्जुनवर मनापासुन प्रेम करीत असते. पण वडील दास गुरूजींना अर्जुन गरीब व दलित असल्यामुळे ‘जावई’ म्हणून आवडत नाही. नाटकात इन्सपेक्टरची भूमिका लहान आहे. ‘वाटा—पळवाटा’ या नाटकातील पात्रांच्या दर्शनातुन दत्ता भगत यांनी समाजातील वास्तवतेचे दर्शन घडविले आहे. पूरग्रस्तांची व्यथा, वेदना व मनुष्य स्वभावाचे दर्शन हे ‘वाटा—पळवाटा’ या नाटकाचे वेशिष्ट्य आहे मानवी समाजातील ज्वलंत समस्या, अगतिकता दत्ता भगतांनी अतिशय सुरेखपणे रेखाटली आहे.

## (७) नाटकाचा अकृत्रिम शेवट :

‘वाट—पळवाटा’ या नाटकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या नाटकाचा अकृत्रिम शेवट हे होय. ‘वाटा—पळवाटा’ हे नाटक समस्याप्रधान आहे. पूरग्रस्तांची समस्या या नाटकात दत्ता भगत यांनी मांडली आहे. प्रा. दत्ता भगत हे दलित साहित्यिक असून दलित नाट्य चळवळीतील झुंझार कार्यकर्ते आहेत. अर्जुनच्या माध्यमातुन परंपराग्रस्त समाजात नवे नेतृत्व व नव्या विचारांची निर्मिती लेखकांनी दाखीविली आहे. एका न्याय संग्रामाची सुरूवात अर्जुन करतो. पहिली फेरी त्यांच्या विरूद्ध जाते पण एक प्रक्रिया सुरू झालेली असते. एक नवी जाणीव निर्माण झालेली असते. सतीश—हेमा दोघेही अर्जुनला संघर्ष करण्यापासुन रोखतात पण अर्जुन कोणाचेही न ऐकता पूरग्रस्तांच्या न्याय मागण्यांकरिताशेवटच्या श्वासापर्यंत लढण्याचे धाडस दाखविते. समाजातील न्यायव्यवस्थाही दोषी असल्याचे प्रसंग नाटककारांनी दाखवीण्याचे धाडस केले आहे. कारण लाळपोळ

करणारी व दंगल घडवून आणणारी माणसे सहीसलामत सुटतात व अर्जुनासारख्या तरूणाला न्याची लढाई लढण्याकरीता तुरूंगात जावे लागते. याचे वास्तववादी भेदक चित्रण दत्ता भगतांनी अधिक जीवंतपणे केल्यामुळे नाटकाची उंची वाढली आहे. समाजातील दलितांना मानाचे स्थान प्राप्त झाले पाहिजे, पुरग्रस्तांना त्यांच्या हक्काची घरं–दारे मिळाली पाहिजे. जातीय स्पृश्य, अस्पृश्य वाद संपला पाहिजे. परिस्थिती अनुकुल झाली पाहिजे, बळ वाढवले पाहिजे हा नाटकाचा संदेश ह्या नाटकाच्या बांधणीतून निष्पन्न होतो. दत्ता भगत यांचे 'वाटा–पळवाटा' हे नाटक प्रचारकी नाटक वाटत नाही तर ते कलात्मकच वाटते. आशयघनता, वास्तविकता आणि शिस्तबद्ध, प्रमाणशीर मांडणीमुळ नाटकाचे सामर्थ्य निश्चित वाढले आहे.

'वाटा–पळवाटा' हे नाटक विविध वैशिष्टयांनी नटले असून त्या नाटकाचे सामर्थ्य वाचकांच्या लक्षात राहते. नाटकातील प्रत्येक प्रसंग वास्तवतेने परिपूर्ण असुन, मानवी समाजातील मूलभूत विसंगतीवर दत्ता भगत यांनी बोट ठेवले आहे. दत्ता भगत यांनी बोट ठेवले आहे. दत्ता भगत यांची वरकरणी सोपी, बाळबोध वाटणारी शैली अनेक सुप्त विरोधात्मक परिस्थितीचे सुचन करीत असते. एक यशस्वी नाटक म्हणून 'वाट–पळवाटा'चा उल्लेख करावा लागतो. आपल्या वेगळया विषयाच्या नाविन्याने हे नाटक मराठी नाटकात स्मरणीय राहील यात शंका नाही.

## संदर्भ ग्रंथसूची

१) दत्त भगत यांचे नाटयविश्व : रमेश जनबंधू
२) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास : गोडबोले बापट
३) नॉवेलिस्ट ॲन्ड नॉव्हेल : जेम्स हेंद्री

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 2 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 66

# लोकसंस्कृतीच्या उपासकांची ग्रामदैवतगीते

डॉ. अनिल गर्जे
मराठी विभाग प्रमुख
एस.के. गांधी महाविद्यालय, कडा
ता. आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र (India)
garjeanil1971@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१३४०९१५

## प्रास्ताविक

ग्रामदैवते ही समाजाची प्रकृती आहे. संस्कृतीच्या प्रारंभकाळी अवशेषांच्या खुणा या ग्रामदैवतांमध्ये आढळून येतात. त्यामुळे केवळ हिदू धर्मातच नाही तर इतर धर्मामध्येही ग्रामदैवतांची सत्ता अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या संदर्भात रमेश वरखेडे म्हणतात, ''वैश्विक संस्कृतीतील समान धागा लोकदैवतांच्या तौलनिक अध्ययनातून सापडू शकतो. जन्माला आलेल्या बालकाची ललाटरेषा रेखाटणारी देवता इजिप्तमध्ये 'शेशेट' या नावाने तर महाराष्ट्रात ती 'सटवाई' या नावाने ओळखली जाते. चांगप्याच्या देवाचे वारे अंगात येउन 'दिन–दिन' ओरडणरे बाखलदेव यातील साम्यस्थळे लक्षणीय आहेत.''[१] डॉ. रमेश वरखेडे यांचे मत अगदी रास्त वाटते कारण दैवतगीतांच्या अभ्यासातून वैश्विक पातळीवरचे समान असणारे दुवे शोधणे सहजच शक्य होईल. तसेच लोकदैवतांच्या विधी, उपासना व उत्सवातून संस्कृतीच्या पाऊलखुणा शोधता येतील.

ग्रामदैवतांची संख्या मोठया प्रमाणात असते. त्यांची रुपे ओबडधोबड आणि उपासना पध्दती कडक असते. त्यामुळे ही लोकदैवते अंधश्रध्देची केंद्रे आहेत असे काही सुधारणवाद्यांना वाटते. ज्ञानेश्वरांनी या दैवतांना 'शूद्र' म्हटले तर तुकारामांनी 'हेंदरीसेंदरी' म्हटले, पण तरीही या ग्रामदैवतांचा अभ्यास म्हणजे अंधश्रध्देला खतपाणी घालणे नव्हे तर, लोकजीवनाचा इतिहास तपासून बघणे होय. लोकजीवनाचा इतिहास ग्रामदैवतांच्या परिघात सापडतो. ही दैवते लोकमानस भयमुक्त करतात असा लोकविश्वास आजही समाजात आढळून येतो. ग्रामदैवतांची दैवतगीते ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने चालत आलेली आहेत. लोकजीवनातील आविष्कृत होणारे आचार – विचार, विधी–विधाने, नवस–सायास या सर्वांचा उल्लेख दैवतगीतांमधून होतो. तसेच एकत्रित समग्र लोकजीवनाचे प्रतिबिंब दैवतगीतांमधून प्रकट होताना दिसून येते. त्याचप्रमाणे दैवतगीतांच्या परंपरेतून एकजिनसीपणा, सामाजिक व लोकसमूह अनुबंध प्रकट होताना दिसतो.

लोकसंस्कृतीचे विविध उपासक किंवा कलावंत उदा. गोंधळी, पोतराज, वाघ्या–मुरळी, शाहीर, आराधी, भुत्या, वासुदेव, पिंगळा अशा अनेक प्रकारचे कलावंत देवदेवतांवर गीते गाऊन आपल्या सांस्कृतिक वारसाची उपासना करतात. या दैवतांची उपासना ब्राम्हणी उपासना पध्दतीपेक्षा वेगळी आहे. सामान्यत: ग्रामदैवतांचे पुजारी ब्राम्हण नसतात. या दैवतांना कोंबडे, बकरे, अंडे इत्यादीचा नेवैद्य चालतो. हळदी कुंकू, गंडे दोरे, खण नारळ, वाहिले जातात. शेतातून नव्याने आलेले कडधान्ये, भाजीपाला, फुले, फळे, दूध, दही इत्यादी पदार्थ ग्रामदैवतांना अर्पण करण्याची पारंपरिक प्रथा आजही ग्रामीण भागातून दिसून येते. या संदर्भात शामसुंदर दुबे म्हणतात, ''लोकचित स्वभावानुकूल अपने देवता को भी संरचित करता है और उसके स्वरुप में उसके अनुभव में स्वयं अपने होने की प्रतिष्ठा करता है! छेवता का लौकिकरण सहज मानवीय संवेदनाओ का संप्रसारीकरण है! मानवीय संवेदनाओं के संरक्षण, पोषण और अनुरंजन के लिए देवता को नाना रुपों और नाना विधानों अवतरित होना पडता है!''[२] शामसुंदरजीचे मतानुसार माणसांनी दैवतांचे लौकिकरण केलेले आहे. आपल्या सुख–दु:खाचे निवारण गावाचे दैवते करतात हा लोक विश्वास आजही दिसून येतो. त्यामुळेच दैवतगीतांना ग्रामीण संस्कृतीच्या आदर्श जीवनातील सभ्यतेचे 'वेद' म्हणून गौरविण्यात येते. ग्रामीण जीवन, संस्कृती व रितीरिवाजांचे जीवंत चित्र उमटविणारा अगदी स्वच्छ आरसा म्हणजे ही दैवतगीते होत. सामुदायिक भावनेचा उत्कट आविष्कार या दैवतगीतांतून दिसून येतो. त्यामुळेच ना.रा. शेंडे म्हणतात, ''दैवतगीते ही आत्मपिंडातून स्त्रवणारे विविध भावनिर्झर आणि त्यांची लकाकी मनुष्य मात्राच्या जीवनप्रणालीचे व प्रकृती आणि प्रवृत्तीचे प्रभावी द्योतक ठरतात.''[३] ना.रा. शेंडे म्हणतात ते अगदीच योग्य ठरते कारण दैवतगीतांतून मानवी मनाच्या सहजप्रेरणा व भावना खळखळत्या झऱ्याप्रमाणे त्यातून प्रकट होताना दिसतात.

- ## पोतराजाची दैवतगीते :

पोतराज हा महाराष्ट्रातील 'मरीआई' या ग्रामीण देवतेचा एक उपासक. मरी आईचा भगत म्हणून त्याचे मराठी लोकजीवनात वेगळे स्थान आहे. पोतराज हा पुरुष असून स्त्रीवेषात तो राहतो. पोतराजाच्या कमरेभोवती हिरव्या खणचा घागरा व घुंगराची माळ बांधलेली असते. कपाळावर हळद आणि कुंकवाचा मळवट भरलेला असतो. हातात लक्ष्मीआईचा कोरडा आणि हलगी असते. कडकलक्ष्मी ही सुध्दा मरीआई ग्रामदेवतेचा उपासक आहे. मरीआईचा उपासक दरवर्षी आषाढ महिन्यात खेडयापाडयात जातो. त्याच्याबरोबर त्याची बायकोही असते. तिच्या डोक्यावर मरीआईचा देव्हारा असतो. गावात प्रवेश केल्यानंतर तो देव्हारा मंदिरासमोरच्या पटांगणात ठेवतात व मरी आईचा गावात देव्हारा आल्याची दवंडी लोकांना देतात. मरीआईचा मुखवटा देव्हाऱ्यात ठेवलेला असतो. हिरवा खण, हिरव्या बांगडया इ. साहित्य देव्हाऱ्यात असते. मुखवटयावर हळद—कुंकू वाहिलेले असते.

देव्हारा चौकात उतरल्यावर पोतराज फटाफट कोरडयाचे फटके अंगावर ओढतो. मरीआईची गर्जना करतो. डोक्यावरचे केस मोकळे सोडतो. त्याची पत्नी ढोलकी वाजवून त्याला साथ देते. पायातील वाळे व घुंगरु यांचा आवाज करीत दोन्हीकडे डोलत नृत्य करत पोतराज अंगात आल्यासारखे हावभाव करतो. स्वत:च्या मनगटाचा चावा घेणे, लिंब कापणे, दंडावर अथवा शरीराच्या इतर भागावर जखमा करुन घेणे इत्यादी अघोरी कृत्य पोतराज लोकांना दाखवून शक्तिदेवीच्या वैभवाचे प्रदर्शन करतो. मरीआई प्रसन्न व्हावी म्हणून तो आत्मक्लेश करतो. मरीआईची शक्ती फार मोठी असते. प्रसंगी ती लोकांचा जीव घेते. तिच्या कोपाने पटकी, देवी असे साथीचे रोग गावात येतात असा लोकसमज आहे. मरीआईची दरवर्षी प्रत्येक गावात आषाढ महिन्यातील मंगळवारी किंवा शुक्रवारी यात्रा भरविली जाते. तिला प्रसन्न करण्यासाठी लिंबा—नारळाने ओटी भरतात. या संदर्भात डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, ''मरीआई किंवा लक्ष्मीआईची उपासना व्यक्तिगत पातळीवर त्याचप्रमाणे गावपातळीवरही केली जाते. धार फिरविणे, मरीआईची यात्रा काढणे, मरीआईचा गाडा काढणे, मरीआईला बोण वाहणे यासारख्या उपासना गावपातळीवर सामूहिकरित्या केल्या जातात. या गावातील सर्वच जातीचे लोक असतात. त्यामुळे विशिष्ट जातीचे हे दैवत आहे असे म्हणता येत नाही. पण मरीआईचे भगत मात्र मांग किंवा महार जातीचेच असतात''[४] या विधानासी मी सहमत आहे कारण आजही मरीआईची गावातून मिरवणूक काढतात. मरीआईची यात्रा काढल्याने गावावर रोगराईचे संकट येत नाही अशी लोकश्रध्दा आजही आहे.

मरीआईच्या विषयी लोकमाणसात असलेल्या धारणाचा वाहक म्हणून पोतराजाला लोकजीवनात मानाचे स्थान प्राप्त झालेले पहावयास मिळते. परंतु सध्याच्या विज्ञानयुगात पोतराजाचे महत्त्व कमी होताना दिसते. पोतराजाच्या गाण्याचे मरीआई, लक्ष्मीआई, तुळजापूरची आई भवानी, कोल्हापूरची अंबाबाई, पंढरपूरचा पांडुरंग, राजा हरिश्चंद्र, श्रावणबाळ, चांगुणा, सीतेचा वनवास इत्यादी विषय असतात. या विषयावर ते गाणी गातात. पोतराजाच्या सर्व गीतातून आईचे महात्म्य वर्णन केलेले असते. त्यांची बहुतेक गीते स्त्री गीतातील ओवीरचनेसारखी असतात. आशयाचाही तोचतोचपण त्यात असतो. गीतात लय, सूर आणि पोतराजाचे गीतसादरीकरण मात्र वेगळे असते. पोतराज गावात आल्यानंतर हलगी वाजवून मरीआईच्या आगमनाची वर्दी देतो.

''आलीया मरीआई
तिनं गाडयाला केला साज
हाती कोरडा त्याला बाका !
आली मरीआई
तिला मळेना अनुभऊ
भल्या भल्यांचा घेती जीवू!
निघाली मरीआई
संग पोतराज नटल्यात
शिंग वाक्या हालग्यात
दार गजर उठल्यात''[५]

मरीआई गावात आल्याची वर्दी पोतराज देतो. गावातील स्त्रिया मरीआईला हळद—कुंकू वाहतात. रोगराईने गावात, आपल्या घरात प्रवेश करु नये म्हणून लिंबू नारळ वाहतात. लोकविधी संबंधीच्या लोकधारण यातून व्यक्त होतात. मानसिक समाधान असे काहीसे स्वरुप लोकधारणांचे असते.

पोतराज लक्ष्मीआईची आणि मरीआईची स्तुतिपर गाणी गाताना साध्यासोप्या शब्दात गातो. लक्ष्मीआईचे पोतराजाने रेखाटलेले चित्र असे,

''लक्ष्मीबाई, तुज लेणं काई
पांढरं पातळे, हिरवी चोळी
लिंबाचे नेसणं, देवंत बसणं''[६]

मरीआई आणि लक्ष्मीआई ही पोतराजाची कुलदैवत आहेत. लक्ष्मीआई पांढरं पातळ आणि हिरवी चोळी नेसलेली आहे. तसेच मरीआईचे चित्र रेखाटताना हंसराज गायकवाड यांचे गीत पुढीलप्रमाणे,

''आली आली मरीआई
आली कोणाच्या पायी
आली गुलमेंढयाच्या पायी
आईची तऱ्हा मोठी
करा निवद बोण
तिचं रगत खाणं, रगत पिणं
आलीया मरीआई
तिच्या सुटला वारा
दुनिया काप थरथरा
रेड्यावर पाणी मारा''[७]

मरीआईची एकूण प्रकृती रौद्र आहे. त्यामुळे गीतातून मरीआईची भीषणता प्रत्ययास येते. याप्रमाणे पोतराज लोकमाणसाचे दर्शन आपल्या गीतांतून घडवितो. मरीआईविषयीच्या लोकश्रध्दा, लोकसमजुती त्याच्या गीतातून व्यक्त होतात. पोतराजाच्या गीतांना वहया म्हणतात. याचा अर्थ 'ओवी' असाच होतो. पोतराजाच्या गीताची रचना 'ओवी' सदृश्य असते. त्याच्या या वहयाना 'धुपारती', 'धुपात्री' असेही शब्द रुढ आहेत. यातून मरीआईचा महिमा गायिलेला असतो. विषयाची विविधता गीतात असते. त्यांची सर्व गीतरचना स्त्री गीतातील ओवी रचना सारखीच असतात. 'गणबा मोगरा' हे अतिशय गाजलेले असे लोकगीत आहे. हे गीत मात्र आशय व रचनेच्या दृष्टीने थोडेसे वेगळेपणा दर्शविणारे वाटते.

- ## गोंधळ्याची गाणी:

लोकजीवनात 'गोंधळी' आणि त्याच्या 'गोंधळा'ला एक विशेष स्थान प्राप्त झालेले आहे. घराण्याचा कुलाचार, देवीच्या उपासनेचा एक भाग म्हणून गोंधळ घालण्याची प्रथा प्राचीन काळापासून ते आजतागायत प्रचलित आहे. धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्टया गोंधळाला गर्भगिरीच्या लोकजीवनात आगळेवेगळे महत्त्व आहे. 'लोकधर्माचा पुरोहित' म्हणून 'गोंधळया' चे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. देवीची स्तुती व पूजा हा एक प्रकार महाराष्ट्रातील कित्येक कुळातला कुळधर्म, घरात मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल भवानी, रेणुका, अंबाबाई यासारख्या कुलदेवीच्या उपकार स्मरणचा हा एक विधी असतो. नृत्य, नाटय, संगीत आणि गीत इत्यादीमुळे गोंधळयांची गाणी विविधतापूर्ण असतात. गोंधळी हे रेणुका आणि तुळजाभवानीचे उपासक आहेत. गोंधळयांचा चार ते सहा जणंचा एक समूह असतो. त्यांच्यात एक मुख्य व्यक्तीस नाईक म्हणतात. अंगात घोळदार पायघोळ अंगरखा, डोक्यावर कंगणीदार पगडी, कमरेला शेला, गळयात कवडयांची माळ असा त्यांचा पोशाख असतो. संबळ आणि कडी ही वाद्ये त्यांच्याजवळ असतात. गोंधळात देवीचा पूजाविधी केंद्रस्थानी असतो. पूजाविधीत चौक भरण्याला विशेष महत्त्व आहे. गोंधळात पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग असतात. पूजाविधीनंतर प्रत्यक्ष गोंधळाला सुरुवात होते. गोंधळी संबळ, तुणतुणे, झांज, डमरु, कडी या वाद्यांच्या संगीतसाथीसह गोंधळाला आरंभ करतो. गोंधळालातील गीतांचा प्रारंभ 'गणा'ने केला जातो, ते असा,

''मोरेश्वरा गणराया, गोंधळाये
वाईच्या गणपती, गोंधळाये
तेहतीस कोटी देवा, गोंधळाये
माहुरची भवानी, गोंधळाये
पहिले आम्ही गण, निर्मिला

होय गौरीचा सण, गणपती
जोडोनिया कर तुजला, गणराया गणराया
संकटसमयी धावून येई
घेई हृदयाशी बालकाला''[८]

गोंधळाचा विधी निर्विघ्न पार पाडावा म्हणून गणात गणपतीचे स्तवन केले जाते. गण गायनानंतर गोंधळी जगदंबेची स्तुती करुन गणपतीबरोबरच इतर देवदेवतांना गोंधळा येण्याचे आवाहन करतो.

मोरेश्वरा गणराया, गोंधळा यावे
तुळजापूरचे भवानी मो गोंधळा यावे
माहुरवाशिणी रेणुकामाते गोंधळा यावे
अनसूया दत्तात्रया गोंधळा यावे
औंढयाच्या नागनाथा गोंधळा यावे
परळीच्या वैजनाथ गोंधळा यावे
वाईच्या गणपती गोंधळा यावे
कोल्हापूरची लक्ष्मी गोंधळा यावे
नवलाख तारांगण गोंधळा यावे
भक्तांच्या गणा गोंधळा यावे''[९]

यांप्रमाणे गोंधळी विविध देवदेवतांना गोंधळाला येण्याचे मनोभावे आवाहन करतो. त्याच्या या प्रत्यक्ष आवाहनातून या देवदेवता प्रत्यक्ष गोंधळाच्या ठिकाणी अवतरतात अशी लोकश्रध्दा आहे. त्यांच्या साक्षीने गोंधळाचा प्रयोग होतो असा भक्तिभाव येथे निर्माण होतो. त्यामुळे गोंधळाच्या ठिकाणी एक प्रकारचे श्रध्देचे वलय निर्माण होते.

- **आराधी गीते :**

या गोंधळात दिवटीऐवजी पोत तेवत असतो. गोंधळाच्या अंगात देवीचा संचार होतो. आराध्याच्या गोंधळात एकूण वातावरण भारावलेले असते. नवरात्रात देवीच्यासमोर स्त्रीपुरुष एकत्रित ही गाणी गातात. मोहटादेवी हे आई जगदंबेचे रुप आहे. नवरात्रात मोठी यात्रा भरते. महाराष्ट्रात कानाकोपऱ्यातून अनेक देवीचे भक्त येतात. दर्शन घेवून मनाची तृप्ती होते. नवसायास फेडतात. अभय शिंदे या आराध्याने गायिलेले गीत उत्सवकालीन कृती आणि उक्तीचे निदर्शक ठरते ते गीत खालीलप्रमाणे,

''अंबाबाई, मोहटादेवी माझे आई गं
आवडीने धरितो तुझे पाय गं ।।धृ।।
तुझ्यासाठी सोडली शेतीवाडी,
उदो नामाची तुझ्या लागली गोडी ।
तुझ्यासाठी जीव माझा दमला,
हात जोडोनी नमस्कार केला।
येते सांगून माझ्या मोहटाआईला
फूल दारात आलं होत जाईला।
त्या फुलाचा हार
वाहतो मी मोहटाआईला ।।''[१०]

कृषी संस्कृतीतील दररोजची कामे करताना आपल्या कुलदेवेची भाविक मनोभावे आराधना करतो. कृषीकर्म करताना आईची मनात आठवण ठेवतो. आपल्या शेतातील रानमेवा तो देवीला भक्तिभावाने अर्पण करतो. भक्ताला देवीदर्शनाची सतत मनात ओढ असते. शेतीकामातून उसंत मिळाल्यानंतर तो देवीच्या दर्शनाला जातो. भक्तीची ओढ भक्ताच्या मनात कशी दाटून येते हे आराधी संजय शिंदे यांच्या गीतात प्रत्यय येतो तो असा,

''मोहट्याला जाईन, हळद कुंकू घेईन, माझ्या अंबालावाहीन
चोळी पातळ वाहीन, डोळयानं देवीला पाहीन

मला याड आई अंबाचं, मोहटागडाला जायाचं
लिंब नारळ वाहीन, देवीला डोळयानं पाहीन
अंबाचं दर्शन घेईन, देवीच्या रावळात खेळीन
माझी गं अंबा, मला प्रसन्न होईन.''[११]

देवीचे भक्त मोहट्याला जातात. देवीचे दर्शन घेऊन मनातील श्रध्दाभाव दाटून येतो. लिंब नारळ देवीपुढे वाहून नवस पूर्ण करतात. भक्ताच्या भक्तीला देवी प्रसन्न होते.

- ## वाघ्यामुरळींची गाणी :

जेजुरीचा 'खंडोबा' ही महाराष्ट्रातील लोकजीवनात, मराठी लोकधर्मात या लोकदेवतेला एक आगळे वेगळे स्थान आहे. लोकमाणसात खंडोबाविषयी श्रध्दायुक्त आपलेपणाचा भाव आजही दिसून येतो. क्षेत्रपाल देवता म्हणून गर्भगिरी परिसरात या देवतेला अधिक महत्त्वाचे स्थान आहे. या लोकदेवतेचे उपासक 'वाघ्या मुरळी'यांना मराठी लोकसंस्कृतीत मोलाचे स्थान आहे. खंडोबा ज्या ज्या घराण्यातील कुलदैवत आहे अशा अनेक कुटुंबात खंडोबाचे 'जागरण' घातले जाते. देवाला मूल वाहण्याच्या प्रथेतून वाघ्या—मुरळीची परंपरा प्रचलित झालेली आहे असे म्हणता येते. वाघ्या – मुरळयांचा समूह तुणतुणे, घोळ, खंजिरी या वाद्यांच्या साथीने 'खंडोबाची गाणी' गाण्याचा कार्यक्रम करतात. जागरणात नृत्य, गीत आणि संगीतवाद्ये यांच्या साथीने गाणी गातात. जागरणात रात्रभर ही गाणे गाण्याची प्रथा प्रचलित आहे. खेडयातील सर्व लोक ही गाणे मोठी श्रध्दापूर्वक ऐकतात. त्यातून मनोरंजनही होते. जागरणाच्या प्रारंभी सदानंदाचा येळकोट होऊन प्रथम 'गण' गायिला जातो. गर्भगिरी परिसरात वाघे गणपती बरोबरच खंडोबालाही गणात नमन करतात ते असे,

''अंगणी यावे गणराया
मज प्रार्थु तुमच्या पाया
पायी पैंजण, पायी पैंजण
ऐका भक्त हो माझा गण
पायी पैंजण, घागऱ्या वाजती
नाचत नाचत गणराया येती
संग देव मल्हार—म्हाळसापती
वाघ्या मुरळी हो गुण गाती''[१२]

गण गाताना मुरळी नसते. गणानंतर मुरळीचा प्रवेश होतो. गणानंतर 'आवतण' होते. आवतण म्हणजे इतर सर्व देवदेवतांना जागरणासाठी येण्याचे आवाहन वाघ्यामुरळी करतात ते असे,

''जागरण मांडिले देवा, मल्हारी जागरणाला या या...
सोबत म्हाळसा—बाणू आणावे
जेजुरीच्या खंडेराया, जागरणाला या या....
सातारच्या खंडोबा जागरणाला या या...
वाईच्या तू गणराया, जागरणाला या या...
पडसरणीच्या बहिरीदेवा, जागरणाला या या...
शिंगणापूरच्या महादेवा, जागरणाला या या....
सकलिक देवा, जागरणाला या या.....''[१३]

अशा प्रकारे खंडोबाबरोबर इतर देवदेवतांना जागरणाला येण्याचे आवाहन वाघ्यामुरळी गीत गायनातून करतात. जागरणाला आवतण दिल्यानंतर खंडोबाची लीला वर्णन करणारी गाणी गायिली जातात. जागरणात खंडोबा, म्हाळसा, बाणू, खंडोबाचे रुपवर्णन, जेजूरगडाची महती, खंडोबारायाचे अवतारकार्य, खंडोबाचे लगीन अशा अनेक गीतातून खंडेरायाच्या भावविश्वाचे दर्शन घडविले जाते.

- ## भराड्यांची गाणी :

भैरव मराठी लोकधर्मातील एक प्रमुख देवता आहे. भराडी हे या देवतेचे उपासक आहेत. ते नाथपंथी आहेत. त्यांना 'जोगी' किंवा 'डवरेगोसावी' असेही म्हणतात. भैरवनाथाची उपासना करणे आणि देवाच्या नावाने

भिक्षा मागणे हा त्यांचा धर्म आहे. ग्रामीण भागात 'भगत' म्हणून त्यांची ओळख आहे. भराडयाची गीते पौराणिक आहेत. डमरू हे त्यांचे वाद्य आहे. या वाद्याच्या सहाय्याने भराडी विविध गाणी गातो. बाबासाहेब इंगळे यांचे पुढील गीत —

''ज्योतिबाचे राज हो आहे डोंगरावरी
किर्त त्याची की कैलासावरी
ज्योतिबा नांदतो डोंगरावरी
भक्ताचा की हो कैवारी
सर्पाची की हो शोभे गळी सरी
ज्योतिबाचं राज की हो डोंगरावरी''[१४]

भैरव एक ग्रामदैवत आहे. क्षेत्रपाळ देवता म्हणून मराठी लोकसंस्कृतीत भैरवाला आगळेवेगळे स्थान आहे. गावाचे रक्षणकर्ता असे हे ग्रामदैवताचे वर्णन करताना भराडी नामदेव चव्हाण म्हणतात,

''आगडगावच्या टेकडीवर, टेकडीवर
तप करितो, करितो भैरोबा
गावाची राखण राखण
करितो संकटाचा भैरोबा
अंगा खांद्यावर लोळं त्याच्या साप
कपाळा इभूती, हरितो ताप''[१५]

भैरवनाथ हा क्षेत्रपाल असून तो गावचे रक्षण करतो. भराडी यांची गीते साधी, सोपी असून लोकभाषाचा वापर गीतात पहावयास मिळतो. गाण्यातील आशय तोच तो असल्यामुळे ही गीते काहीशी कंटाळवाणी वाटतात. पारंपरिक लोकजीवनदर्शन, लोकजीवनातील कल्पनाबंध, समूहमनाचा आविष्कार ही काही वैशिष्ट्ये त्यांच्या गीताची सांगता येतील.

- धनगरांची गाणी :

बिरोबा हे धनगर समाजाचे लोकदैवत आहे. बिरोबा म्हणजे पराक्रमी किंवा वीर, बिरोबा या यक्षकुळातील वीरदेव आहे. बिरोबांची मंदिरे डोंगरमाथ्यावर, डोंगरकपारीत किंवा माळरानावर आहेत. बिरोबाच्या पूजेत फुले आणि वाद्य यांना महत्त्व असते. चाफयांची किंवा तरवडाच्या फुलाने पूजा केली जाते. ढोलवाद्यांच्या साथीने पूजा केली जाते. धनगरांच्या 'सुंबरान' आणि 'हुईका' त ढोलाच्या साथीने नाचगाणे करण्याची प्रथा आजही प्रचलित आहे. बिरोबा हा शंकराचा अवतार अशी श्रध्दा धनगरांच्या लोकमाणसांत रुजलेली आहे. बिरोबा धनगर समाजाचे रोगराईपासून संरक्षण करणारी लोकदेवता आहे.

बिरोबाच्या उत्सवाला गुढीपाडव्यापासून सुरुवात होते. यामध्ये बिरोबाच्या काठीची मिरवणूक काढली जाते. यावेळी नवससायास केले जातात. जुने नवस फेडण्याची प्रथा प्रचलित आहे. ओवीसदृश्य रचना हे लोकगीतांचे विशेष आहे. मारुती गावडे पुढील गीतातून श्रध्दाभाव व्यक्त करतात तो असा,

''आठा दिसाच्या ऐतवारी
छेवा फुलल्या चारीवाटा
सावरगावीच्या माळावरी
देव बिरुबा वैद मोठा !!
सावरगावीच्या माळावरी,
ढवाळ खैताळ वाजत्याती
बिराजी देवा माझे
धनी गादीला शोभत्याती!!''[१६]

धनगर समाजात बिरोबाला अत्यंत श्रध्देचे स्थान आहे. बिरोबाचे रुपवर्णन मोठे बोलके आहे. हे वर्णन यक्षकुळाचे विशेष दर्शविणारे आहे.

रात्रीच्या वेळी 'सुंबरानं मांडिलं' हा धनगरी पुरुषांचा ओव्यांचा कार्यक्रम सादर केला जातो. सुंबरान म्हणजे देवादिकांचे, आपल्या कुलदैवतांचे, लोकोत्तर पुरुषांचे स्मरण, आठवण. मांडिलं म्हणजे मांडण, सांगणं,

सुंबरानं गीताची सुरुवात गणाने किंवा नमनाने होते. शेंडगेवाडी येथील धनगर रावसाहेब शेंडगे व इतर मंडळी गण गाताना म्हणतात तो असा –

''सुंबरानं मांडलं !तवाच्या त्या वेळेला ।।धृ।।
पहिले नमन माझे गणपती देवाला ।
सुंबरानं मांडलं पहिलं माझं
नमन माझे गुरुला ! थोर माझ्या संताला
सुंबरानं धरतीमातेला सुंबरानं मांडलं ।
धरतीमातेला मेघराया पित्याला ।
मेघराया पित्याला चंद्रसूर्य दोघाला ।
चंद्रसूर्य दोघाला, हो ईश्वर पार्वतीला ।।''[१७]

या सुंबरानात देवदेवता, पृथ्वी, आकाश, नदी, सूर्य, चंद्र, संत आणि गुरु यांचे गुणवर्णन केले जाते.

## ● डहाकांची गीते :

मुंजाबा हा गावाचा क्षेत्रपाल देवता म्हणून मानली जाते. गावाचे संरक्षण आणि गावाला रोगराईपसून दूर ठेवण्याचे कार्य ही देवता करते. गर्भगिरी परिसरातील प्रत्येक गावपातळीवर या ग्रामदैवताची पूजा केली जाते. मुंजोबाचे स्थान पिंपळाच्या झाडाजवळ असते. जे लोक रोज या झाडाची पूजा करुन त्यास प्रदक्षिणा घालतात त्यास बाधा होत नाही असे म्हणतात. पिंपळाची म्हणजेच मुंजोबाची पूजा शनिवारी पहाटे करतात. त्यामुळे कुटुंबावर संकटे येत नाहीत असा लोकमाणसात लोकविश्वास आहे.

डहाकाच्या गीतात मुंजोबाचे वर्णन आत्यंतिक श्रध्दाभावाने केलेले असते. मुंजोबाचे वर्णन करणरे एक डहाक गीत असे –

''पिंपळ सळसळणरे सळसळला
मुंडया बाह, बाळा माझा येल्हाळा
बाळ माझा येल्हाळा, बाळ माझा येल्हाळा
गूळ पोळी खायाला, गूळ पोळी खायाला
पिंपळाचा पार खेळायला, पार खेळायला''[१८]

मुंजोबाला गूळपोळीचा नैवेद्य आवडतो. लोक सणावाराला गूळपोळीचा नैवेद्य मुंजोबाला वाटतात. घरात मुंग्या निघाल्या तर मुंजोबाला गूळ किंवा साखरेचा नैवेद्य देवापुढे ठेवतात. त्यामुळे घरातील मुंग्या नाहीशा होतात अशी लोकसमजूत आजही प्रचलित आहे. मुंजोबा हा क्षेत्रपाल दैवत आहे. सर्व गावाचे रक्षण तो करतो.

## ● ठळक निष्कर्ष :

१. दैवतगीतांमध्ये विविध भावभावनांचा, श्रध्देचा नेमका परिपोष झालेला आढळतो. त्यातील कारुण्य विलक्षण ताकदीचे आहे.
२. लवचिकता हा दैवतगीतांचा मूलधर्म आहे.
३. समूहजीवनाचा आनंद आणि मनावरील ताण हलका करणे, भावनिक देवाण – घेवाण करणे असा भाव या दैवतगीतांतून स्पष्ट होतो.
४. वाङ्.मयीनदृष्टया दैवतगीते सौंदर्यपूर्ण असून इंद्रियगोचर आहेत.
५. समाजाला एकसमान भावसूत्रात बांधण्याचे काम ग्रामदैवते करतात.
६. म्हसोबा, खंडोबा, बिरोबा, मारुती, पीर, वेताळ, जलदेवता या ग्रामदेवतांशी समाजाचे भावनात्मक नाते असते.
७. भयमुक्तीची इच्छा आणि चांगली कृपादृष्टी आपणांवर असावी अशी लोकभावना दैवतगीतांतून प्रतिबिंबीत झालेली दिसून येते.
८. दैवतांच्या उत्सवातून लोकमाणसं एकसमान भावसूत्रात गुंफले जाते.
९. दैवतगीते ही लोकमनाच्या सामूहिक जाणिवेचे व नेणिवेचे प्रतिनिधित्व करतात.

- संदर्भ आणि टीपा :

१. वरखेडे रमेश, प्रस्तावना, खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते, का.स.वाणी मराठी संस्था, धुळे, प्रथमावृत्ती, १९९२.
२. श्यामसुंदर दुबे, प्रस्तावना, छत्तीसगड लोकगीतों का परिचय.
३. शेंडे ना.रा., लोकसाहित्य संपदा.
४. व्यवहारे शरद, लोकवाङ्.मय रुप—स्वरुप, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९१.
५. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९१.
६. तत्रैव, पृ.९८.
७. तत्रैव, पृ.९९.
८. व्यवहारे शरद, लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९९९.
९. तत्रैव, पृ.१०१.
१०. संजय शिंदे, संकलित आराधी गीत.
११. माणिक साखरे, संकलित आराधी गीत.
१२. महादेव वाघमारे, संकलित दैवतगीत, जागरण — गोंधळ.
१३. रामभाऊ गुंजाळ, संकलित दैवतगीत, जागरण — गोंधळ.
१४. बाबासाहेब इंगळे, संकलित भराडी गीत.
१५. नामदेव चव्हाण, संकलित भराडी गीत.
१६. व्यवहारे शरद, लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९९९.
१७. रावसाहेब शेंडगे, संकलित दैवतगीत
१८. व्यवहारे शरद, लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९९९.


❖❖❖

# मराठी नाटक आणि त्याचे स्वरूप

डॉ. दीपाली प्र. गावंडे
सहा. प्राध्यापक
कला महाविद्यालय, मलकापूर
अकोला, जि. अकोला, महाराष्ट्र (India)
dipali.nagpure1976@gmail.com भ्रमणध्वनी 9028645297

## सारांश

माणूस मूलत: लौकिक विश्वापेक्षा अलौकीक सृष्टीत रमतो. दैनंदिन जीवनव्यवहारातील अशक्य व अतृप्त जाणिवांचा ईच्छेचा पाठपुरावा तो आपल्या अंर्त:मनात करत असतो त्यातूनच विविध कलाप्रकार अस्तित्वात आले. त्यापैकी नाटक ही एक होय. नाटक इतर साहित्यप्रकारापेक्षा निराळा सामुहिक कलाविष्कार, वाड्.मयप्रकार आहे. नाटक हा कलाप्रकार असल्याने इतर साहित्य प्रकारांपेक्षा लोकप्रिय वाड्.मय प्रकार आहे. नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारे व्यक्त होणारा संघर्षमय कलात्मक अनुभव होय. सुरवातीला लोकरंजन करण्याच्या हेतूने निर्माण झालेले नाटक हळूहळू मनोरंजनासोबतच लोकप्रबोधनही करू लागले. नाटकाच्या वाड्.मयमूल्याबरोबरच त्याच्या प्रयोमूल्यालाही तेवढेच महत्व असल्याने त्यामध्ये कथानक, पात्रे, प्रसंग, संवाद या भाषिक घटकांसोबतच नैपथ्य, प्रेक्षक, प्रकाशयोजना, संगीत या घटकांचाही समावेश होतो. नाटकाचा उगम सर्व जगात एक धार्मिक कृत्य म्हणून झाला असे अनेकांचे मत असले तरी आज जगभरात काळाच्या ओघात नाट्यकलेची वाढ विकास विविध दिशांनी झालेली दिसते. मराठीत संस्कृत व इंग्रजी वाड्मय यांच्या प्रभावातून इ.स. १८४३ मध्ये सांगली येथे मराठी नाटयकला (सिता–स्वयंवर) विष्णूदास भावे यांच्या प्रयत्नाने उदयास येऊन पुढे अधिकाधिक समृध्द होत गेली. अनेक मान्यवर नाटककारांनी तिच्यात मोलाची भर घालून तिला योग्य ते आयाम देण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

## प्रस्तावना

माणूस स्वभावत: कल्पनासक्त असल्याने त्याला कृत्रिम निर्मिती भावते, त्यातूनच विविध कला प्रकार अस्तित्वात आलेत. त्यापैकी एक नाटक हा होय. नाटक सामुहिक कलाविष्कार आहे. कथा, कादंबरी, काव्य, निबंध याप्रमाणे हा स्वतंत्र वाड्मय प्रकार आहे. मात्र इतर वाड्.मय प्रकाराच्या तुलनेत नाटक हा प्रकार अधिक लोकप्रिय आहे. कारण नाटकाला वाड्.मयीन रूपाबरोबरच प्रायोगिक अंगही आहे. नाटकाला प्रायोगिक रूपही असल्याने नाटकाचा प्रयोग ज्या प्रेक्षकासमोर होणार ते प्रेक्षकही नाटकाच्या यशस्वितेच्या संदर्भात नाटकाराइतकांच एक महत्वाचा घटक असतो. नाटक ही सांस्कृतिकदृष्टया प्रभावी व परिणामकारक असलेली अभिव्यक्ती आहे. नाटक हा मानवी मनाचा सांस्कृतिक उद्‌गार आहे. नाटक ज्या समाजात तयार होते. तेथील संस्कृतीचे अंग घेऊनच ते अविष्कृत होते. नाटक हे मूलत: लोकरंजनार्थ निर्माण होत असले तरी मनोरंजना इतकेच समाजाला प्रबोधन देण्याची कला आहे. ते समाजातील दोषांचा आविष्कार करू शकते किंवा मानवी दोषांवर प्रकाशही टाकते.

## विवेचन

प्राचीन ऋषीमुनींनी नाटकास 'यज्ञ' म्हटले आहे तर ब्रह्मदेवाने नाटकाला 'पाचवा वेद' म्हटले आहे. नाटक ही अतिशय प्राचीन कला आहे. नाटक या शब्दाचा मूळ अर्थ अभिनय करणे असा आहे. नट हा मुळात प्राकृतातील असून तो नर्त या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन प्राकृतात आला आहे. मूळ अर्थाप्रमाणे बघितले तर नाटक या शब्दाचा अर्थ नाचणे असा आहे. नट म्हणजे अभिनय करणारा. सोंग करणारा व नाटक म्हणजे नाटयरूपाने सोंगाच्या रूपाने दाखविणे वा सादर करणे असा अर्थ रूढ झाला. नाट्य म्हणजे नटाची अभियनकला या अर्थाची फोड भरताने नाट्यशास्त्रात अधिक सविस्तर केली आहे. तो म्हणतो "त्रैलोक्यस्यास्य सर्वस्य नाट्यं भावानु"[१]

भरत मुनींनी नाट्यकलेचा जन्म कसा झाला? याविषयी विवेचन केले आहे. त्या विवेचनावरून नाटकाच्या स्वरूपांवर प्रकाश पडतो. "ऋग्वेदातून 'पाठ्य', यजुर्वेदातुन 'अभिनय', सामवेदातून 'गीत' व अथर्ववेदातून 'विविध रस' असे अंश घेऊन नाट्यवेद निर्माण झाला असे भरताने विवेचन केलेले आहे."[२] भरताच्या या विवेचनावरून संवाद, अभिनय, संगीत आणि रस हे नाटकाचे चार अंग आपल्या लक्षात येतात.

भरताच्या मते नाटक आकार घेतांना संवाद, संगीत, अभिनय व रस याचा आधार घेते. पुढे नाटकला 'क्रीडानायक'(खेळ) म्हणून निर्देशितांना ते 'दृश्य' आणि 'श्राव्य' काव्य असेही भरतमुनी सुचवितो. मानवी जीवनातील काही प्रसंगांना संगीत, नृत्य इ. कलांची जोड देऊन भावनाविष्कार घडवणे हे नाट्यकलेचे पूर्वापार चालत आलेले स्वरूप आहे. असे कोणतेही शिल्प, विद्या, ज्ञान, कर्ता, कर्म व योग नाही की जे या नाट्यात प्रदर्शित करता येत नाही असे भरतमुनींनी म्हटले आहे. धनंजयाने आपल्या दशरूपकात नाटकाची व्याख्या दिली आहे. तो म्हणतो,

"अवस्थानुकृतिनाट्याम"[३]

मानवी अवस्थांचे अनुकरण म्हणजे नाट्य असा त्याच्या व्याख्येचा अर्थ आहे. कालिदासाने सुध्दा आपल्या मालविकाग्निमित्रात नाटयाचे वर्णन केले आहे तो म्हणतो –

"त्रेगुण्योद्‌भवमात्र लोकचरितं नानारसमं दृश्यते।
नाटयं भिन्नरूचेर्जनस्य बहुधटयेक्रं समराधनम्।"[४]

अर्थ – नाट्यात सत्य, रज, तम या तीन गुणांतुन उद्‌भवणारे आणि नाना रसांनी युक्त असे लोकव्यवहार दिसतात, आणि त्यामुळे नाटय हे वेगवेगळ्या आवडी असणाऱ्या लोकांचे एकमेव मनोरंजनाचे साधन ठरते. नाटकाच्या माध्यमाने माणसाच्या मनातील विकार, सत्व, रज, तम यांचे दर्शन कलात्मक पध्दतीने घडविले जाते. वरील धनंजयाने व कालीदासने केलेल्या व्याख्या या भरताच्या मताला अनुसरून केल्याच्या दिसतात. कालिदासाने आपल्या वरील व्याखेत नाटकाच्या महत्वाच्या वैशिष्टयांचा विचार केलेला आहे. त्याच्या मते, आनंद घेणे हा नाटकाच्या महत्वाच्या वैशिष्टयांचा विचार केलेला आहे. आनंद घेणे हा नाटकाचा प्राथमिक गुण असून त्यात कलेचे सौंदर्य व काव्य असले पाहिजे. त्रिगुणात्मक लोकजीवन नाटकांत रंगवायचे असल्याने नाटकांत व्यक्तिदर्शनाला महत्व येते. तो नाटकाचा गाभाच आहे.

इंग्रजी दृष्टीने नाटक संकल्पना बघितली असता इंग्रजीतील 'ड्रामा' (drama) हा शब्द मूळ ग्रीक 'ड्रॅन' (dran) या शब्दावरून आलेला असून याचा अर्थ कृती करणे (To Do) असा आहे. डॉमेनॉन म्हणजे केलेली कृती व मायथॉस म्हणजे सांगितलेली कृती असा फरक प्राचीन ग्रीसमध्ये केला जाई. नाट्यशास्त्राचे मूळ विवेचन करतांना ॲरिस्टाटलने 'अनुकृती' हे तत्व प्रधान मानले व त्या अनुषंगाने नाटकाच्या सर्व अंगाचा उहापोह केला. ॲरिस्टॉटलने आपल्या नाटकांचे विवेचन शोकांतिकेच्या अनुषंगाने केले आहे.

"स्वभाव हे मनुष्याचे गुण ठरवितो पण ती मनुष्ये सुस्वभावी असणे हे त्याच्या कृतीवरून ठरते. म्हणून नाट्यात्मक कृतीमागील हेतू स्वभावदर्शन हा नसतो. स्वभावाचा प्रवेश कृतीचा सहाय्यकारी म्हणून होतो"[५] मानवी स्वभावदर्शन व व्यक्तिदर्शन हेच नाटकाचे प्रधान अंग आहे. असा आशय व्यक्त करणारी त्याची व्याख्या दिसते. नाटक भावात्मक पध्दतीने स्वभाव दर्शन घडविते. प्रा. भा.ल. फडके यांनी मराठी विश्वकोष खंड १२ मध्ये नाटकाची व्याख्या करतांना म्हटले आहे की, "नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद याच्या द्वारे व्यक्त होणारा संघर्षमय कथात्मक अनुभव असे किंवा नाटक म्हणजे माणसाच्या अंतर्बाह्य (क्रिया प्रतिक्रियांचे) दर्शन घडविणारा आकृतीबंध होय. नाटक निर्माण करते ती दंदात्मक जाणीव."[६] या व्याख्येतून नाटकाचा जास्तीत जास्त गुणधर्मांचा अंतर्भाव झालेला दिसतो.

नाटकात रंजनाचे फार मोठे सामर्थ्य असते. विष्णूदासी नाटकाची निर्मिती या रंजन करण्याचा हेतुतुनच झाली होती. म्हणूनच स्वत: विष्णूदास भवे आपल्या सादरीकरणास 'खेळ' असे म्हणतात. १८५० पर्यंत नाटक हा शब्द प्रचारात आला नव्हता, खेळ हाच शब्दप्रयोग वापरला जात असे. "नाटक हा शब्दच त्यावेळी (म्हणजे १८५० च्या सुमारास) संस्कृत तज्ञ अथवा मॅक्लॉव्ह साहेबांचे सरोजांतील अथवा मावशास्त्री कोल्हटकरांसारखे बडे लेखक व रंगेल वक्ते यांच्यासारख्या थोड्या काहींना माहीत असेल तेवढाच, बाकीच्यांस हा शब्द माहीतही नव्हता."[७] असे कृष्णाजी आबाजी गुरुजी म्हणतात नंतर हळूहळू खेळ या शब्दांऐवजी नाटक हा शब्द प्रचलित झाला.

वसंत कानेटकर यांनी आपल्या केलेल्या नाटकाच्या व्याख्येतून संघर्षात्मक आशय स्पष्ट केला आहे तो "नाटकाचा संघर्ष म्हणजे अनुभवातील संघर्ष बिजाची कलावंताला येणारी जाग ती केव्हा कोठे कशी येईल सांगता

येत नाही. श्रेष्ठ नाटक हे एकाच वेळी जीवनदर्शन ही असते व जीवनावरील भाष्य ही असते."[८] मानवी जीवनच कसे संघर्षमय आहे. आपल्या जीवनातील संघर्ष नाटक दाखवते त्यामुळे ते रंजकही ठरते. जार्ज बनार्ड शॉ या प्रसिद्ध नाटककाराने संघर्षाचे चित्रण हे नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण मानले आहे. माणसाच्या संघर्षाला व्यक्तिसापेक्ष मर्यादा असतात. पण आपल्या मनातील संघर्ष नाटकात अभिव्यक्त होतो तेव्हा तो समाजसापेक्ष असतो.

'वाङ्.मयीन संज्ञा संकल्पना' या कोशात नाटक या शब्दाचा अर्थ सांगतांना "नाटकांचे प्रयोग रूपाने सादरीकरण हे नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण मानले आहे. त्यामुळे नाट्यकलेचा विचार अनेक पातळ्यांवर करावा लागतो असे म्हणतांना ते म्हणतात कथानक, पात्रे, प्रसंग, संवाद हे भाषिक घटक नाटकाच्या शब्दसंहितेशी संबध्द असतात, तर नेपथ्य, प्रकाश योजना व संगीत हे अभाषिक घटक प्रयोगनिष्ठ असतात. म्हणजेच नाट्यकला हा एक साहित्य प्रकारही आणि कलाप्रकारही आहे. त्यामुळे तिला द्विविश्व स्वरूपाचे अस्तित्व प्राप्त होते आणि तिच्या यशापयशात ही या दोन्ही प्रकारच्या घटकांचा लक्षणीय वाटा असतो."[९] नाटक ही प्रयोगनिष्ठ कलाकृती आहे. त्यामुळे त्यात नैपथ्याचा, संवाद, अभिनय, पात्र, प्रसंग, संगीत यांचा कलात्मक समन्वय प्रस्थापित करावा लागतो.

नाटकाची व्याख्या करतांना प्रा. भालबा केळकर म्हणतात, "नाटक म्हणजे मनुष्य जीवनाच्या विविध पैलूंचा सत्याभास निर्माण करणारे माध्यम ते जीविताचा कलात्मक आविष्कार करून समुहाला एका सुत्रात गोवते, एकमानस बनविते. एकच प्रक्रिया करायला लावते व बहुतांशी एकच कलात्मक आनंद उपभोगावास लावते. हे दृश्यकाव्य असल्याने साहित्यमूल्याइतकेच त्याचे प्रयोगमूल्य ही महत्वाचे आहे. नाटक हा उच्च प्रतिचा सर्वकष कलाविष्कार आहे"[१०] नाटकात दोन मूल्ये असतात एक साहित्यिक मूल्य व दुसरे प्रयोगात्मक मूल्य, नाटकांचा प्रभाव निर्माण करण्यासाठी प्रयोगमूल्य अधिक जास्त असावे लागते. वरील दोन्ही मतांमध्ये नाटकांच्या वाङ्.मयमूल्या बरोबरच प्रयोगमूल्यालाही वाङ्मयरूपाइतकेच महत्व दिलेले दिसते. अलरडाइस निकल, "संवाद ऐकावयास व रंगभूमीवर घडणाऱ्या नाट्यपूर्ण घटना पाहावयास बसलेल्या प्रेक्षकांसमोर नटांना प्रत्यक्षत: वटवून दाखवता येतील व त्यापासून प्रेक्षकांचे रंजन होऊ शकेल अशा प्रकारे जीवनासंबंधीच्या कल्पना ज्यात व्यक्त केल्या जातात ते नाटक."[११] या मतामध्येही निकल यांनी नाटकाच्या प्रयोगमूल्याला महत्व दिलेले दिसते. सोबतच नाटकाने रंजन सुध्दा केले पाहिजे असेही ते सुचवितात.

वरील निरनिराळ्या तज्ञाच्या नाट्याविषयीच्या मतांचा आढावा घेतला असता लक्षात येते की, नाटक हे दृश्य श्राव्य असल्याने त्याचे वाङ्.मयमूल्याबरोबरच प्रायोगिक मूल्यही लक्षात घेतले पाहिजे. तसेच नाटकांतून मानवी जीवनाचा कलात्मक आविष्कार होत असतो व तो द्वंद्वात्मक असतो. तसेच नाटकाने लोकप्रबोधन व रंजनही केले पाहिजे असेही बरेच जण सुचवितात. जनमानसाची सहज रितीने पकड घेणारा एक अत्यंत प्रभावी असा वाङ्.मय प्रकार नाटक हा आहे. ज्याचे स्वभावदर्शन, पात्रे, संवाद, प्रसंग हे प्रमुख अंग मानता येईल.

नाटकांचे वाङ्.मयीन व प्रयोगिक हे दोन्ही अंग सारख्येच महत्वाचे आहे. त्यामुळे नाटकाचा अभ्यास करतांना तो प्रायोगिक व वाङ्.मयीन दृष्ट्या रसिक वाचकांसाठी असावे की रंगभूमीसाठी असावे या विषयीची परस्पर विरोधीमते मराठी अभ्यासकामध्ये दिसून येतात. काहीजण या दोन्ही मूल्यांच्या पलिकडे जाऊन केवळ एकच एक नाटयमूल्य मानतांना दिसतात. उदा. न.चि.केळकर या संदर्भात म्हणतात "रंगभूमीवर फार दिवस आले व फार दिवस टिकले तरच ते नाटक, असे कोणी म्हणोत, पण नाटक हे स्वतंत्र रीतीने वाङ्.मय आहे म्हणून ते रंगभूमीवर असेल, अगर नसेल तरी वाङ्.मयीनदृष्ट्या त्याची किंमत अबाधितच राहते."[१२] असे विधान न.चि.केळकर करतात. मात्र प्रा. ना.सि.फडके यांना ही कल्पना पूर्णपणे मान्य होत नाही, "रंगभूमीवर नटाकडून अभिनयाच्या व भाषणाच्या द्वारे लोकसमुदायास सांगितली जाणारी कथा म्हणजे नाटक "[१३] अशी नाटकाची व्याख्या करून नटनटीचे गुणावगुण लक्षात घेऊनच निर्माण केलेली पात्रे रंगोत्कर्षाला कारणीभूत होतात असे म्हणून उदाहरणा दाखल ते शेक्सपियरच्या हॅम्लेटचे (रिचर्ड र्सब्बुरबॉज नट) (गंधर्व नाटक मंडळी) डोळयांसमोर ठेवून व किर्लोस्कर सभोवतालच्या परिवारातील नटसंच लक्षात घेऊन नाट्यलेखन करतात असे मुद्दे समोर आणतात. म्हणजेच नाट्यलेखनात रंगभूमीचा, नटाच्या अभिनयाचा व लोकसमुदायाचा विचार व्हावा असे त्यांना वाटते. या दोन्ही मताच्या पलिकडेच आणखी एक तिसरे मतही आपल्याला या संदर्भात अभ्यासकांमध्ये दिसते, "वाङ्.मयीन मूल्य विरूध्द प्रायोगिक मूल्य असा एक खोटा झगडा आज आपल्याकडे उभा राहिला आहे. वस्तुत: ही दोन्ही मूल्य नाट्यापुरती स्वतंत्रपणे अगदी खोटी आहे. बांडगुळवजा आहे. खर मूल्य एक नाट्यमूल्य. शब्दांचं अवजड जू भिरकावून नाटक ज्या दिवशी किंवा रात्री स्वतंत्र स्वयंभू कलामाध्यम म्हणून प्रतिभाशाली

कलाकारांकरवी जिवंत आणि उत्स्फूर्त स्वरूपात आमच्या रंगमंचावर रंगू लागेल, तेव्हा ते एकच मूल्य, एकच निकष शब्दातीत असा नवप्रत्यय हा त्याचा हेतू कोणत्याही अवांतर मदतीविना ते प्रकट होईल, तिथून निघून कसल्याही आडकाठीविना, पाहणाऱ्याच्या अगदी काळजालां भिडेल."[१४] असे आजचे नाटककार म्हणून ओळखले जाणारे विजय तेंडुलकर आपली भूमिका मांडतात.

नाटक ही साहित्याच्या अंगाने फुलत जाणारी प्रायोगिक कला आहे. ती एक प्रयोगजीवी कला असल्याने तिचे स्वरूप सांघिक असते. नाटक हा एक सामुहिक कला आविष्कार आहे. नट, दिग्दर्शक, प्रेक्षक पडद्यामागील कलाकार, लेखक या सर्वांचाच सहभाग असतो. नाट्यप्रयोग हा रमणीय अनुभव देतो म्हणूनच नाटकाला संस्कृतमध्ये 'काव्येषु नाटकं रम्यम्' असं म्हटलं जाते. नाटक हा दृकश्राव्य असा करमणूक करणारा वाङ्.मय प्रकार आहे. नाटकाचे अत्यंत महत्वाचा असे हे दृकश्राव्य स्वरूप आहे. नाटकाप्रमाणे अन्य वाङ्.मय प्रकारात हे वैशिष्ट्य आढळत नाही. नाटक प्रत्यक्ष प्रेक्षकांसमोर घडत असते. त्यातील पात्रांचा अभिनय तो प्रत्यक्ष पाहत असतो. व्यक्तीचे राग, लोभ, त्यांच्या भाव—भावना अभिनयाद्वारे आविष्कृत होत असतात. त्यांचे नाट्यसंवाद कानांवर पडत असतात. हया सर्व घटना डोळ्याने पाहिल्या जात असल्यामुळे त्यांचा मनावर खोलवर परिणाम होतो. चालती बोलती माणसे ते नाट्य दाखवतात, ऐकवतात, म्हणूनच दृकश्राव्य स्वरूप हे नाटकांचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट आहे. नाटकाचे हे दृकश्राव्य मूल्य लक्षात घेतले तर नाटक ऐकण्यासाठी, पाहण्यासाठी प्रेक्षक सुध्दा केवळ प्रेक्षक असून चालणार नाही तर तो बहुश्रुत, प्रगल्भ असायला हवा. म्हणूनच भरताने आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात प्रेक्षकाविषयी विवेचन केले आहे की, प्रेक्षकांची इंद्रिये तिक्ष्ण असावीत. नटांच्या सुख, दु:खाचा त्याच्यावर परिणाम व्हायला हवा. त्यांच्या ठिकाणी नाटकांचे गुणदोष विवेचन करण्याची पात्रता असावी. वक्त्याला जसा समोर श्रोता हवाच असतो त्याचप्रमाणे नाटकाला प्रेक्षक हा घटक महत्वाचा ठरतो. म्हणजेच प्रेक्षकांशिवाय प्रयोग संभवत नाही व नाट्य प्रयोगाशिवाय नाटकाच्या वाङ्.मयीन रूपाला पूर्णत्व येत नाही. म्हणून नाटक या वाङ्.मय प्रकाराच्या बाबतीत प्रेक्षक हा महत्वाचा घटक ठरतो.

नाटकाचा उगम सर्व जगात एक धार्मिक कृत्य म्हणून झाला असे अनेक विद्वानांचे मत आहे. तर काहींच्या मने नाटकाचा उगम ऋतुपरिवर्तन किंवा वर्षबदल या प्रसंगी आदिम मानवांच्या कडून केल्या जाणाऱ्या धार्मिक नृत्यगीतांतून झाला. देवी भगवतीच्या संतोषासाठी तिच्या वार्षिक उत्सवात नाटक करून दाखवित. दक्षिणेत अजुनही अनेक ठिकाणी ही चाल अस्तित्वात आहे. ग्रीक रंगभूमीचा उदय आपल्याला धार्मिक उत्सहाच्या निमित्ताने झालेला दिसतो. निसर्ग आणि देवदेवता यांच्यावर अधिराज्य गाजविणाऱ्या नियतीला धार्मिक उत्साहाच्या निमित्ताने उदयास आलेल्या ग्रीक नाटकात महत्व आहे. गावोगाव भटकून नाटके सादर करणारा येस्पिस हा ग्रीक नाटकाचा जनक असल्याचे लक्षात येते तर रोमन नाटकही उत्साहातून निर्माण झाले असून ग्रीक नाटकांची लॅटिनमध्ये भाषांतरे करणारा गुलाम अॅडोनिकस हा रोमन नाटकांचा जनक असल्याचे दिसून येते. संस्कृत नाटकाच्या परंपरेहून आपल्या लक्षात येईल की भरतमुनी हा संस्कृत नाट्यशास्त्राचा प्रणेता होय. सर्वसामान्य जनांना धर्मतत्वाचे आकलन सोपेपणाने व्हावे म्हणून शब्दांना नृत्य व संगिताची जोड देवून त्याने नाटक सादर केले. इ.स. च्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकांपर्यंत भारतात संस्कृत नाटक ही संस्था स्थिर झालेली दिसते. संस्कृत नाटके व रंगभूमी यांचा विकास प्रामुख्याने राजाश्रयाच्या आधारानेच झालेला दिसतो. संस्कृत नाटकाचे प्रयोग बहुतांशी राज प्रसादातच होत असत. त्यामुळे सामान्य लोकांपर्यंत त्या वेळचे नाटक पोहचूच शकले नाही. राजांची प्रेम प्रकरणे आणि त्यांचे पराक्रम हेंच बहुधा नाटकाचे विषय असत आणि श्रृंगार व वीर रसांचा त्यातून प्रामुख्याने परिपोष होत असे.

काळाच्या ओघात नाट्यकलेची वाढ व विकास विविध दिशांनी होत गेली. शेक्सपिअर, इब्सेन, बनार्ड शॉ. बेकेट इ. नाटयकर्त्यांनी नाटक या कलेला अनेक नवीन परिमाणे प्राप्त करून दिली. संस्कृत व इंग्रजी यांच्या प्रभावातुन इ.स. १८४३ मध्ये मराठी नाटयकला उदय पाहू लागली. परंपरेने चालत आलेल्या लोकवाङ्.मयातही मराठी नाटकाची बिजे आपल्याला दिसतात. पोवाडा, यक्षगान नाटय, भागवतमेळा, भारूड, लळिते, दशावतारी खेळ, कळसुत्री बाहुल्या, तमाशा, गोंधळ या लोकवाङ्.मय प्रकारात आपल्याला नाटकांची बिजे दिसुन येतात. परंतु मराठी नाटकाला सुरूवात करण्याचा मान सांगली संस्थानाधिपती कै. श्री आप्पासाहेब यांच्याकडे आहे. इ.स. १८४९ मध्ये सांगलीत उत्तर कानडा प्रांतातील एक भागवत नावाची मंडळी आली होती व तिचे काही खेळ श्री आप्पासाहेब पटवर्धन यांनी पाहिले. या प्रकारचे खेळ मराठीत झाले तर चांगले होईल असे श्रीमंत पटवर्धनांना वाटले. त्यामुळे हे काम करण्याचे त्यांनी आपले आश्रित विष्णुदास भावे यांच्याकडे सोपविले. विष्णूदासांनी बरीच खटपट करून हे काम पुर्णत्वास नेण्यासाठी इ.स. १८४३ मध्ये नाटकाचा पहिला खेळ करून

दाखविला. या नाटकांचे नाव होते 'सीतास्वयंवर' आणि येथूनच मराठी नाटकाला सुरूवात झालेली दिसते, येथे मराठी नाटयकलेची मुहुर्तमेढ रोवली गेली. रंगभूमी आणि नाटक यांचा उत्कृष्ट मेळ जमून त्यातून महाराष्ट्राची नाट्यकला जन्माला आली. सांगली हे दक्षिण महाराष्ट्रातील एक लहानसे संस्थान, मराठी इतिहासाच्या नकाशात नाटयकलेचे माहेर घर म्हणून नोंदले गेले येथुन पुढे बरीच नाटके मराठीत आली. परंतु ती साहित्याच्या दृष्टीने महत्वाची नव्हती.

इ.स. १८४३ साल मराठी नाटक अस्तित्वात येण्यास उजेडाव लागले. वास्तविक संस्कृत नाटक व इतर भाषेतील नाटक बरीच आधी उदयास आली होती. त्या मानाने मराठी नाटक बरेच उशिरा सुरू झाले. मराठी नाटक उशिरा सुरू होण्यामागील मानसिकता किंवा कारण आपल्याला समाजातच दिसते. प्राचीन मराठी वाङ्.मयाचे प्रामुख्याने दोन प्रयोजन आपल्याला दिसतात ते म्हणजे ईशस्तवन व इश्वरी संतोष यासारखी अलौकिक स्वरूपाची होती. मनोरंजन, विनोद, आनंद या प्रयोजनांचा निषेधच या काळातील वाङ्.मयातून आपल्याला दिसून येतो. तुकोबांनी 'पोटाचे ते नट। पाहो नये छंद। विषयाचे भेद। विषयरूप' म्हणून वेशधारी नटाची अवहेलना केलेली दिसून येते. त्यामुळे शक्य तिथे नाटकी प्रवृत्तीचा, स्त्री वेषधाऱ्याचा निषेध नोंदविलेला दिसतो. अध्यात्म, परमार्थ रूढीग्रस्त धर्म यांचे प्राबल्य समाजात असल्याने नाटक व ते करून दाखविणारे नट यांचीही अवहेलना होत होती नाटक उशिरा सुरू होण्याबद्दलचे श्री.ना. बनहट्टी यांचे काही विचार मौलिक स्वरूपाचे आहे ते म्हणतात, "समाज जीवनातूनच नाट्यसृष्टीला तिचे पोषक रस मिळत असतात अर्थात समाज जितके भव्य, वैचित्र्यपूर्ण व रसोत्कट तितकेच त्याचे नाटयही भव्य, वैचित्र्यपूर्ण व रसोत्कट असे निपजत असते."[१५]

## समारोप

१८४३ पासुन सुरू झालेली मराठी नाट्यकला भाव्यापासुन पुढे–पुढे अधिकाधिक समृद्ध होत गेली. अनेक दिशांनी तिच्यावर संस्कार होत ती पुढे चालत होती व आजपर्यंत ती चालतच आहे. या परंपरा विष्णूदास भाव्यापासून चालू होऊन त्यामध्ये किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, कोल्हटकर, गडकरी, वरेकर, अत्रे, पु.ल. देशपांडे, कानेटकर, दारव्हेकर, शिरवाडकर, दळवी, तेंडुलकर, खानोलकर, अनिल बर्वे, एलकुंचवार, आळेकर इ. नाटककारांनी त्यामध्ये मोलाची भर घालून तीला योग्य परिमाणे प्राप्त करून देण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

वरील विवेचनावरून आपल्या हाताशी काही निष्कर्ष लागतात ते पुढीलप्रमाणे :

१. नाटक हा जनमानसाची सहज रितीने पकड घेणारा एक अत्यंत प्रभावी असा दृकश्राव्य वाङ्.मय प्रकार आहे.

२. नाटक ही दृकश्राव्य प्रयोगजिवी कला असल्याने तो एक सामुहिक कलाविष्कार आहे. दिग्दर्शक, प्रेक्षक, पडद्यामागील कलाकार व लेखक या सर्वांचाच त्यामध्ये सहभाग व समन्वय असतो.

३. नाटक या संकल्पनेचा अर्थ सांगतांना नाटकाच्या स्वभावदर्शन, संघर्ष,पात्रे,संवाद इ. प्रमुख अंगाचा उल्लेख केलला आहे.

४. नाटक ही भाषिक कलाकृती बरोबरच प्रयोगनिष्ठ कलाकृती आहे. त्यामुळे त्यात नैपथ्याचा, संवाद, अभिनय, पात्र, प्रसंग संगीत यांचा कलात्मक समन्वय प्रस्थापित केलेला असतो.

५. नाटकाच्या वाङ्.मयीन मूल्याबरोबरच प्रयोगमूल्यही तेवढेच महत्वाचे आहे. नाटयमूल्य हे नाटकाचे प्राणतत्व आहे.

६. नाटकाचा जन्म मुलत: लोकरंजन करण्याच्या हेतूने झालेला दिसतो. मात्र हळूहळू लोकरंजनाबरोबरच लोकप्रबोधन या उद्देशाने नाटकाची निर्मिती झालेली आहे.

७. मराठी रंगभूमी अनेक लोककला प्रकारातील कलांचा संस्कार स्वीकारत १८४३ मध्ये सांगली येथे उदयास आली.

८. विष्णूदास भावे निर्मित 'सितास्वयंवर' हा मराठीतील पहिला नाटयप्रयोग होय, तो सांगली येथे करून दाखविण्यात आला होता.

९. प्रेक्षकांशिवाय प्रयोग संभवत नाही व नाट्य प्रयोगाशिवाय नाटकाच्या वाङ्.मयीन रूपाला पूर्णत्व येत नाही म्हणून नाटक या साहित्य प्रकाराच्या बाबतीत प्रेक्षक हा महत्वाचा घटक ठरतो.

१०. बदलत्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीसोबत नाटक, त्यांचे तंत्र व सादरीकरण यातही बदल होत गेलले दिसतात.

## संदर्भसूची

१. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, 'भारतीय संस्कृती कोश खंड ४', पृ.क्र. ७५८
२. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश खंड ८', मुंबई १९९५ पृ. क्र४५१
३. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, 'भारतीय संस्कृती कोश खंड ४', पृ. क्र. ७५९
४. तगैव, पृ.क्र. ७५९
५. सुनिता सहस्त्रबुध्दे, मराठी नाटकातील संवाद, पुणे पृ.क्र ८
६. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश खंड ८', पृ.क्र ४५१
७. श्री कृष्णाजी आबाजी गुरूजी 'नाटकाची स्थित्यंतर, समाविष्ट रंगभूमी मासिक', अंक ११—१२
८. सुनिता सहस्त्रबुध्दे, उनि, पृ.क्र. १२
९. प्रभा गणोरकर वसंत आबाजी डाहाके इ. 'वाङ्.मयीन संज्ञा संकल्पना कोश', मुंबई २००१, पृ. क. २४८
१०. सुनिता सहस्त्रबुध्दे, उनि, पृ. क्र. ६
११. सुनिता सहस्त्रबुध्दे, उनि, पृ. क्र. १७
१२. न. चि. केळकर, 'कोल्हटकर लेखनसंग्रह', पृ. क्र ४०
१३. ना. सि. फडके, 'प्रतिभा साधन' पुणे पृ.क्र. १६०
१४. विजय तेंडूलकर, 'मराठी नाटक आणि मी' ठाणे, एप्रिल १९९७, पृ. क्र ३८
१५. श्री. ना बनहट्टी, 'मराठी नाटयकला व नाटयवाङ्.मय', पृ. क्र. ४९,
१६. श्री. ना. बनहट्टी, उनि. पृ.क्र. २७

❖❖❖

# मराठी लोकसाहित्यातील 'हुमान' लोकवाङ्मयाचे स्वरूप विशेष

डॉ. अमर कांबळे
मराठी विभाग
मा.श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले
जि. कोल्हापूर, महाराष्ट्र (India) ४१६ १०९ भ्रमणध्वनी ९९२३६४६७५१, ८८८८७५२२४४

## सारांश :—

मराठी लोकसंस्कृतीत मौखिक साहित्याचे महत्व असाधारण आहे. यामध्ये उखाणा हा लोकवाङ्म प्रकार वैशिष्टपूर्ण शैलीने नटलेला दिसून येतो. उखाणे दोन प्रकारचे असतात १. प्रश्नविरहित उखाणे —जे विवाहकार्य, शुभ किंवा मंगलकार्याप्रसंगी घेतले जातात. २. प्रश्नोत्तराचे उखाणे — या प्रकारच्या उखाणे भारतात विविध भागात वेगवेगळया नावांनी ओळखली जातात. उदा. हुमान, उमान, प्रहेलिका, कोडे, कुट प्रश्न, ब्रम्होद, विवाद प्रतियोगिता, पहेली अशा विविध नावाने ओळखले जातात.ग्रामीण भागात हुमान किंवा कोंडी कुटप्रश्न मनोरंजनात्मक क्रीडाप्रकार म्हणून ओळखला जातो .याला प्राचीन परंपरा असून आजही हा लोकवाङ्मय प्रकार प्रचलित असलेला दिसून येतो. रंजन, मनोरंजन हा महत्वाचा भाग असला तरी त्यामध्ये बौध्दिक क्षमतेला ,व्यवहारिक कौशल्याला महत्व आहे. भाषिक अंगाने अतिशय छोटा प्रश्न आणि त्या प्रश्नांची उकल करणारा उत्तर देणारा एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींचा समूह. मौखिक स्वरूपातील निर्मितीचे अंतरंग शोधणे महत्वाचे ठरेल. हुमान या लोकवाङ्मायाचे अंतरंगही तसेच आहे.

बीजशब्द :— उखाणा, हुमान, उमान, प्रहेलिका, कोडे, कुट प्रश्न, ब्रम्होद, विवाद, प्रतियोगिता, पहेली

## प्रस्तावना :—

मराठी लोकसंस्कृतीत मौखिक साहित्याचे महत्व असाधारण आहे . हे मौखिक वाङ्मय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे , दुसऱ्याकडून तिसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेले आहे. मौखिक लोकवाङ्मयात लोगगीत,लोककथा, लोककला ,लोकनृत्य,लोकरूढी ,म्हणी ,उखाणे,वाक्प्रचार यांच्याप्रमाणेच हुमान हाही वाङ्मय प्रकार प्रचलित असलेला दिसतो. हुमान म्हणजेच कोडे. रंजन मनोरजंन आणि व्यवहार ज्ञान वाढविणारा हा वाङ्मय प्रकार फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. राजे रजवाडयांच्या काळात, पुराण काळात, रामायण, महाभारत यामध्येही हुमाण किंवा कोडे घालण्याचे, त्याची उत्तरे जाणून घेण्याची उत्सुकता होती . प्राचीन काळापासून चालत आलेला हा वाङ्मय प्रकार आज लोप होत असलेला दिसून येतो. कोणती साधने नसताना दळण वळणाच्या सोयी नसताना अवती भवतीच्या निसर्गातील, समाज जीवनातील घटना प्रसंग आणि विविध साधनांना प्रश्नात बांधून त्याचे उत्तर शोधणे हा एक मनोरंजनाचा ,व्यवहार ज्ञान वाढविणारा ज्ञानवृध्दीचा एक खेळच होता. आजही त्याचे स्वरूप पारंपरिक असून आधुनिक काळाची जोड देणारे काही हुमान किंवा कोडी घालण्याची पध्दत असलेली दिसुन येते.

मौखिक परंपरेचा एक महत्वाचा भाग असाणारा क्रीडा खेळ प्रकार म्हणून हुमान या लोकवाङ्मायकडे पाहता येईल. रंजन, मनोरंजन हा महत्वाचा भाग असला तरी त्यामध्ये बौध्दिक क्षमतेला ,व्यवहारिक कौशल्याला महत्व आहे. भाषिक अंगाने अतिशय छोटा प्रश्न आणि त्या प्रश्नांची उकल करणारा उत्तर देणारा एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींचा समुह मौखिक स्वरूपातील निर्मितीचे अंतरंग शोधणे महत्वाचे ठरेल. हुमान या लोकवाङ्मायाचे अंतरंगही तसेच आहे. त्याची जडणघडण त्यातील घटक,उपघटक यांची विभागणी आणि त्यातील अंतर्नाद तपासणे महत्वाचे ठरते.

## लोकवाङ्मयातील हुमान :—

लोकसाहित्यात प्राचीन संस्कृती समाजजीवनाचे प्रतिबिंब विविध माध्यमातून प्रकटलेले आहेत. या मौखिक परंपरेत महाराष्ट्रात हुमान कोडी किंवा कुटपश्न या नावाने प्रचलित असणारा एक मौखिक लोकवाङ्मायाचा भाग आहे. बौध्दिक कौशल्यावर आधारलेला असली तरी मराठी लोकसाहित्यामध्ये हुमान हा

लोकवाङ्मय प्रकार फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे. हुमान वेगवेगळया नावांनी विविध भागात,प्रदेशात ओळखले जाते. मराठी बरोबर इतरही भाषेत हा वाङ्मय प्रकार प्रचलित आहे.मराठीतही हा वाङ्मय प्रकार अतिशय लोकप्रिय असून रंजन, मनोरंजन, ज्ञानवृध्दी तथा व्यवहार ज्ञान वाढणे, वाढविणे, जाणून घेणे, माहिती देणे यासाठी प्रचलित आहे.

## लोकवाङ्मयातील हुमान पर्यायी शब्द :—

उखाणा हा लाकेवाङ्मयप्रकारातील प्रश्नोत्तराचा क्रीडाप्रकार म्हणून हुमान लोकवाङ्मय प्रकार ओळखला जातो. भारतात विविध भागात वेगवेगळया नावांनी संबोधले जाते त्याचे नामाभिदान वेगवेगळे असलेले पहायला मिळतात. उखाणा, प्रहेलिका, हुमान उमान, आयना ,कोडे, कुट प्रश्न ब्रम्होद, आमधा, गुडा, आडी, प्रतियोगिता, पहेली, औगुणू (कानडी), विडीकपाई (तामिळ तेलगू) तसेच प्राचीन काळात ब्रम्होद, विवाद महाराष्ट्रात प्रामुख्याने कुटप्रश्न, कोडी, हुमान, उमान असेही नावे या प्रश्नोत्तर उखाण्यांची आढळतात.

## हुमानाची परंपरा :—

हुमानाची परंपरा ही फारच प्राचीन आहे. वेदकाळापासून ते अगदी रामायण, महाभारतामध्येही याचे संदर्भ पहावायास भेटतात. महाभारत काळात , वेदकाळात पारंपरिक ब्रम्होद्य म्हणजेच प्रश्नोत्तर विचारण्याची प्रथा होती याचे उल्लेख सापडतात .यज्ञ तथा इतर धार्मिक उपक्रमामध्ये पुरोहित किंवा पंडित एकमेकांना उखाणे घालीत रामायण, महाभारत काळातही विवाद किंवा विविद याचे स्वरूप उखाणा हुमान याप्रमाणेच असलेले दिसते. खेळात किंवा क्रीडेत चतुरपणे मनोरंजनासाठी लोकांनी विव्दानांनी एकत्र येवुन केलेला संवाद म्हणूनही याकडे पाहता येईल . प्रहेलिका ,प्रव्हेलिका याचाच अपभ्रंश हिंदीत पहेली असा झालेला दिसून येतो मुळातला अर्थ लपवून सादृश्यजन्य अर्थनिर्मितीची पदरचना वैशिष्टपुर्ण शाब्दयोजना करून मुळ अर्थापर्यत येणे ही कसोटी प्रहेलिका मध्ये पहायला मिळते. काळानुरूप त्याचे स्वरूप आणि त्याचा वापर करण्याची पध्दती ही बदलत गेलेली दिसते त्यातील धार्मिकता किंवा रूढीप्रधानता कमी झाली असून मनोरंजन किंवा क्रीडानंद यासाठी या लोकवाङ्मयाचा वापर केला जात असलेल्याचे दिसते.

## हुमान लोकवाङ्मय प्रकाराचे स्वरूप :—

हुमान हा लोकवाङ्मय प्रकार प्राचीन काळापासमन चालत आलेला प्रकार असला तरी आजच्या आधुनिक काळातातही त्याचे सारदरीकरण केले जाते. रंजनात्मक,मनोरंजन ,बौध्दिककडे त्याचा प्रावास आहे. यामध्ये प्रश्न कर्ता आणि उत्तर देणारा अशी दोन किंवा त्यापेक्षा आधिक लोकांचा समुह अत्यावश्यक असतो. प्रश्नांच्यामध्ये उत्तरांचा अंश दडलेला असतो. तो सादृश्यजन्य असतो तो उत्तराची साम्यस्थळे दाखवत असतो. प्रश्नांना गेयता काही ठिकाणी यमक जूळवलेले असते विशेषत: शब्दांच्या किंवा वाक्याचा शेवटच्या अक्षराचे यमक म्हणजेच अंत्ययमक जूळवलेले असते.शब्दिक योजना आकर्षक असते.गुढ केलेले असते. त्यामध्ये उत्तराचे साम्यस्थळ मात्र दडलेले असते.लपलेल्या उत्तराचा शोध घेणे, त्याचा आत्मानंद अनुभवणे यातील महत्वपूर्ण घटक आहे.समाधान,तृप्ती तसेच बौध्दिक क्षमता सिध्द करणारा हा खेळ प्रकार आहे. यामध्ये प्रश्नोत्तरे आहेत. पण यामध्ये कोणाची अवेहलना नाही किंवा शिक्षाही नाही. ज्ञान तपासणे, सिध्द करणे, हे याचे प्राथमिक स्वरूप आहे. काळानुरूप यात खुप बदल झालेले दिसून येतात. प्रश्नांची गुंफन गोपनिय अशा उत्तराच्या मुख्यार्थाला प्रश्नांच्या लक्षार्थ्याच्या अंतरंगात लपवण्याची सचोटीमूळे लोकवाङ्मयाला वेगळे स्वरूप मिळते. गोपन हा वाङ्मयाचा प्राण आहे.प्रश्नाची उत्तर उकलण्यासाठी त्या प्रश्नाभोवती एक मृगजाळ अभासी दुनया तयार केली जाते. .प्रश्नातून ते उकलण्याचे कौशल्य आत्मसिध्दी, कुशाग्र बुध्दीची प्रचिती देते . सर्वात महत्वाचे म्हणजे क्रीडांनंद प्रश्न विचारणारा आणि उत्तर देणारा यांना मिळत असतो.वास्तविक कुशल नीरीक्षण ,बुध्दीचातुर्याची प्रचिती तसेच बुध्दिला अव्हान देणारी प्रश्नांची मांडणी येथे केलेली दिसून येते. ती भाषिक अंगाने लयबध्द पध्दतीने प्रकटते यमक जुळवलेले काही ठिकाणी पहायाला मिळते .सादृश्यजन्य भाषिक योजना सर्व सामान्यातही लोकप्रियता मिळवण्यासाठी महत्वाची ठरलेली आहे . कुटात्मक उखाणे ,हुमान बुध्दीला आणि विचांराना चालना देतात .स्पर्धात्मक इर्षा किंवा कुरघोडी गमंत म्हणूनही या प्रकाराकडे पाहता येते. तालेबाजपणा वैशिष्टपूर्ण प्रश्नांची योजना आणि मांडणी या ठिकाणी केलेली दिसते.लोकस्मृतीचे वाहक म्हणून लोककथा, लोकगीतांकडे पाहिले जाते तसेच हुमान या लोकवाङ्मय प्रकाराकडेही पाहिले जाते. हुमाण हा खेळ वाङ्मय

प्रकार असून दोन किंवा दोनपेक्षा अधिक लोक एकत्र येवून हा खेळ खेळतात. उखाणा हा लग्नात किंवा मंगलप्रसंगी घेतला जात असला तरी त्यातील स्वरूपावरून आणि स्थानिक पातळीवरील त्याच्या वापरावरून त्याचे वर्गीकरण करणे सोईचे होते.

## हुमानाचे वर्गीकरण :—

हुमान हा उखाण्याचाच एक भाग असला तरी त्यांच्या क्रीडामूल्यांमुळे मनोरंजनासोबतच बौध्दिकौशल्याचाही कस याठिकाणी लागताना दिसते . या हुमानाचे वर्गीकरण त्याच्या विषय घटकावरून करता येईल.

मनोरजंनाचे हुमाण नातेसंबधावरील हुमान फळ फुले यांच्यावरील हुमान, खान्यापिन्याच्या किंवा कौटुंबीक पातळीवरील हुमान, पशु पक्षी यांच्यावरील हुमाण उदाहरणादाखल चुलीतून आली ,गरवार राहिली ( भाकरी) , एवढीसी टिटवी सगळे तळे आटवी (दिव्याची वात) ,बत्तीस चिरे त्यात नागीन फिरे (जीभ), सुख्या विहिरीत पाखरे फडफडती (लाहया),वाजते पण ऐकु येत नाही (थंडी) ,बारा माणसे जेवायला तीन माणसे वाढायला (घडयाळ) सात समुद्राच्या पलिकड अंबू—जंबूची बेट नार हिंडती पेठ—पेठ (आई आणि बाबा) अशा काही हुमानांकडे पाहता येईल .

## हुमानाचे वाङ्मयीन विशेष :—

मौखिक लोकवाङ्मयामध्ये क्रीडानंद देणारा हुमान हा लोकवाङ्मय प्रकार होय. विविध भागात उखाणा म्हणून ओळखला जात असला तरी ग्रामीण भागात हुमान म्हणजे प्रश्नोत्तराची गोपन असनणारा लोकवाङ्मय प्रकार असेच त्याची ओळख असलेली दिसते. भाषिक योजना ही लक्षयार्थामध्ये आणि मुख्यार्थाचा गाभा अंतर्भुत असलेला किंवा सादृश्यजन्य असलेला दिसतो. वैशिष्टपुर्ण रचना,शाब्दयोजना, पदरचना आकर्षक शैली, गेयताप्रधान गुढउकलण्याची उत्कंठा निर्माण करण्याची क्षमता या रचनेत दिसून येते. प्रश्नांचा रोख उत्तराच्या आंतरभवाकडे नेणारा असलेला दिसतो. गोपन हे महत्वाची बाब यामध्ये दिसते. व्यक्तिची किंवा समुहाची चतुराई, कुशाग्रता, बौध्दिक कौशल्य आणि चिंतन करण्यास, विचार करण्यास प्रवृत्त करणारी रचना यामध्ये दिसून येते. मनोरंजन हा मुख्य हेतू असला तरी क्रीडानंद यामध्ये अंतर्भूत असलेला दिसतो. भिषिक रूपे पारंपरिक अर्थाने आणि प्रचलित समाजव्यवस्थेच्या बोली रूपाने बध्द असलेली दिसतात. स्थान किंवा ठिकाणाचे महत्व, त्याचे विशेष विचारात घेऊन हुमानाची रचना केलेली दिसते. कलगीतुरा,सवालजबाब प्रतीपक्षाशी वादविवाद, कुटकथात्म रचना, रूपके, प्रतिमा, प्रतिके तसेच सभोवतालच्या जीवन संचिताला कवेत घेऊन ती निरिक्षणे लयबध्द किंवा गोपनबध्द पध्दतीने रचून ह्या लोकवाङ्मायाचा आंनद घेतला जातो. गहन, कोड्यात टाकणारी विचारप्रवृत्त करणारी गुढ रचना रहस्य उलगडणारा आनंद मोजक्या , थोडक्या शब्दात बोलीरूपात एक अर्थ रहस्य विचार किंवा उत्तर लपविण्याचे सामर्थ्य यामध्ये दिसून येते .सुटसुटीत, साधी, आकाराने लहान तथा एका गूढ रचनेचा गेय अविष्कार म्हणूनही हुमान या लोकवाङ्मय प्रकाराकडे पाहता येईल. सामान्य लोकांची निर्मिती त्यांचे कौशल्य, बुध्दीवैभव वैविधता, कल्पकता आणि कलात्मकता तसेच सभोवतालच्या वातावरणातील, जीवनव्यवहारातील वैशिष्टयांची विशेष निरिक्षणे या लोकवाङ्मायात सामावलेली दिसतात. काहितरी नवीन जाणून घेण्याची औत्सुक्याची मांडणी या ठिकाणी दिसून येते.

उखाणा या लोकवाङ्मायातील हुमान हा खेळप्रकार प्रश्नोत्तराच्या माध्यमातून बौद्धिक कौशल्य, बुद्धीचातुर्य, तत्परता स्मरणशक्ती याचा प्रत्यय या लोकवाङ्मय प्रकारात पहावयास मिळतो. याचे स्वरूप जरी पारंपरिक असले तरी नवनिर्मितीचा,नवतेचा स्वीकारही काळानुरूप या क्षेत्रात झालेला दिसून येतो.

## संदर्भ :—

१. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा
२. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप
३. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत:प्रवाह
४. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य मिमांसा
५. कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन

❖❖❖

# स्त्री विषयक बदलते सामाजिक संदर्भ

प्रा. तुकाराम विठ्ठलराव कांबळे
(मराठी विभाग प्रमुख)
श्रीमती सविताबाई उ. देशमुख महाविद्यालय
दिग्रस, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India), भ्रमणध्वनी ८४२१८१२६४२

## प्रस्तावना :—

प्राचीन काळापासून आज पर्यंतच्या काळातील स्त्रीजीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर बदलत्या काळानुसार समाजाचा स्त्रीकडे पाहण्यांचा दृष्टिकोन बदलत गेला समाजातील स्त्रियांच्या स्थानामध्ये वारंवार बदल होत गेले असे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक समाजघटक जागृत झाले आणि आपल्या प्रश्नांसाठी चळवळी सुरु केल्या. ह्या उपेक्षित घटकांनी चळवळी बरोबर आपले प्रश्न आपल्या साहित्यातुन मांडले, साहित्य केवळ मनोरंजनाचे साधन व राहता ते सामाजिक प्रश्नांचे व्यासपीठ बनले पाहिजे ह्या भूमिकेतुन लेखन केले गेले.

स्त्रियांनीही आपल्य व्यथा वेदना साहित्याव्दारे व्यक्त केलेल्या दिसतील सुरुवातीच्या काळात लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखनावर पुरुषसत्ताक मुल्यवस्थेचा पगडा असलेला जाणवतो. काही लेखीकांच्या लेखनातुन आपले शरीर आणि सौंदर्य हे पुरुषासाठीच आहे अशा भावना काही लेखिकांनी आपल्या कथा, कवितांतून मांडलेल्या आहेत. त्यामुळे सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या लेखनात जाणवणारी समन्वयवादी दृष्टिमागे पडली आणि स्त्रियाही आपल्या होणारे शोषण आणि समाजातील तिचे दुय्यमस्थान ह्याविषयी समाजात हालचाल सुरु झाली. देवता, सती, पतिव्रता, माता, अंबला अर्धांगी सौभाग्यवती अशा तथा कथित रुपांना तडे जावू लागले. जोडीदार, मैत्रीन, सहकारी आणि कार्यकर्ता अशा नव्या रुपात जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्री अग्रसर होऊ लागली.

## कुटुंब व्यवस्था :—

आदिमानव जोपर्यन्त कंदमुळे आणि शिकारीवर जगत होता तोपर्यन्त मातृसत्ताक कुटुंबपध्दती अस्तित्वात होती त्याकाळी मुक्त लैगिक संबंधामुळे पिता हे नाते नव्हतेच गणाच्या प्रमुख जेव्हा माता अर्थात स्त्रियाच असत यातुन पुढे पितृसत्ताक कुटुंब पध्दती कशी उदयास आली.

पितृसत्ताक कुटुंबपध्दतीत जमीनदारी उदयाला आल्यावर मोठ्या इस्टेटीला वारस म्हणुन पुरुषाला स्वत:चे मुल ओखळता येण्याकरीता विवाह संस्था उदयास आली विवाह करणाऱ्या आणि अविवाहीत राहुन मुक्त लैंगीक संबंध स्त्रिया असे समाजात स्त्रियांचे दोन गट निर्माण झाले मात्र अविवाहीत मातृकुटुंब समाजात त्यावेळी तिरस्कारणीय मानली जात नव्हती. कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी कोणतातरी करीता होत्या मात्र विवाहसंस्था समाजात दृढमुल होताच या अविवाहीत मातांचा समाजात कुलटा, पापीणी, व्यधिचारीणी या शब्दांत निषेध केला जाऊ लागला. मातृसंत्ताक कुटुंबांना समाजातुन बहिष्कृत करण्यात येऊ लागेल अविवाहीत मातांना समाजातले इतर उद्योगधंदे करण्यास मनाई करण्यात आली, त्यामुळे जगण्यासाठी त्यांचे समोर देहविक्रीशिवाय दुसरा पर्याय राहला नाव्हता.

## स्त्रियांची अवस्था :—

प्रत्येक महिन्यातील स्त्रियांचा ऋतुप्राप्तीचा मुळ गरोदरपणातील अवघड अवस्था बाळतपणातील अडचणीची अवस्था दुसऱ्या टोळ्यांकडुन होणारे आक्रमण, नैसर्गीक आपत्ती असुरक्षितता आणि लैगिंक हिंसाचार ह्यामुळे स्त्रिला पुरुषांच्या मदतीची गरज भासू लागली.

वैदिक काळात स्त्रियांनी पुरुषाप्रमाणे आपले शिक्षण पुर्ण होई पर्यन्त ब्रम्हचार्य पाळावे तसेच आश्रमात राहुन शिक्षण पुर्ण करावे आणि नंतर वैवाहिक जिवनाचा अवलंब करावा असा विचार अर्थ वेदात माडण्यात आला. वेदकाळातील स्त्रि—शिक्षणाचा आढावा घेताना डॉ.सरोजिनी बाबर लिहीतात — मृद्रलाची पत्नी ही युध्दाच्या वेळी आपल्या पतीचे सारथ्य करुन शत्रुचा पाठलाग करीत त्यास पिटाळुन लावीत असल्याचा उल्लेख ऋग्वेदात आला आहे.

महाभारत या महाकाब्यांमध्येही सुशिक्षीत स्त्रियांचे उल्लेख येतात रामायणाच्या आदिकांडामध्ये अयोध्या नगरीच्या स्त्रियांना साजेशे शिक्षण दशरथ राजा आपल्या भिखेला अनुसरुन देत तसचे रावणाच्या घरी सिता सहा महिने राहिल्यामुळे तिच्या पावित्र्याविषयी लोकापवाद टाळण्यासाठी सितेचा त्याग करणारे प्रभु रामचंद्र सितेच्या भावनाचा फारसा विचार करताना दिसत नाही.

## वेदात्तकालीन स्त्रीजीवन :—

स्मृतिकालात स्त्री विषयक दृष्टिकोन पार बदललेला आढळतो स्त्रियांवर कडक निर्बध घातलेले जाणवतात. योनीशुचिते च्या कल्पनेतुन बालविवाहाची प्रथा रुढ झाली त्यामुळे प्रत्येकांचा कल हा बालवधु निवडण्याकडे झुकला अगदी वृध्दही आपल्या लग्नासाठी बालवधुची निवड करु लागला त्यामुळे जरठ कुमारी विवाहाची प्रथा पडली. पतीबरोबर पत्नीने एकनिष्ठ राहावे म्हणुन तिच्या प्रतिवृत्या आणि शिलाची स्तुती करण्यात आली. आपण पुरुषापेक्षा कमी प्रतीच्या आहोत. या न्युनगंडाने त्यांना पछाडले. वडिलोपार्जीत संपत्तीतील स्त्रीचा हक्क नाहिसा झाला. पतीनिधनानंतर सती जाण्यास तिला उत्तेजन मिळु लागले या सती प्रथेच्या संदर्भात शरयु अनंतराव व उमा वंडसे अनुवादित भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान या ग्रंथात भारतात स्त्रियांच्या आत्महत्यांना सती जाण्याच्या प्रथेच्या स्वरुपात सर्वप्रथम मान्यता मिळाली. विधवेचे केशवपन करुन तिला विद्रुप करण्याची पध्दत. सुरु झाली. मुलीला लग्नासाठी हुंडा द्यावा लागु लागला, विवाह संस्थेमुळे अनेक स्त्रियांची दुर्दशा झाली. जगाच्या पाठीवर पुरुषाच्या तुलनेत स्त्रीचे जीवन हे उपेक्षित आहे.

## स्त्री स्वातंत्र्याचा अस्त :—

मुसलमानी राजवटीत स्त्री स्वातंत्र्याची पुर्णत: गळचेपी झाली. रानटी टोळ्याच्या आक्रमनामुळे स्त्रियांना पळवुन नेण्यामुळे स्त्रियांना समाजात मुक्त वावर अशक्य झाला. स्त्रियांना शिक्षणाची फारशी गरज नाही या विचाराशी मुस्लीम राज्यकर्ते सहमत असल्यामुळे स्त्रियांना फक्त घरापुरतेच शिक्षण दिले जाऊ लागले परिणामत: घराबाहेरचे जग आणि उंबरठ्यापलीकडील ज्ञान स्त्रियांना मिळणे कठीण झाले. मुस्लीम समाजाच्या स्त्रीविषयक संकुचित दृष्टीकोणाचा स्वीकार हिंदु समाजानेही केला.

## इंग्रजी राजवट :—

इंग्रजी राजवटीच्या काळात समाजसुधारनेची चळवळ मुळ धरु लागली. इंग्रजी विद्येच्या प्रसाराने अनेक नव्या विचार प्रवाहांचा इथल्या शिक्षितांना परिचय झाला इंग्रजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहनच दिले. १८५१ मध्ये महात्मा फुले यांनी पुण्यात मुलीची पहिली शाळा उघडली सावित्रीबाई यांना स्त्री शिक्षीका म्हणुन नेमले परंतु स्त्री शिक्षणाला लोकांनी विरोध केला. सावित्रीबाईच्या अंगावर लोक थुंकले, मुंबईत आनंदीबाईना शिव्या बरोबर दगडही मारण्यात आले. लोकांच्या या वर्तनामागे स्त्री शिक्षणाविषयी त्यांच्या मनात वसत असलेल्या गैरसमजुती कारणीभुत होत्या मुली जर शिकल्या तर त्या कोणाचाही हात धरुन पळुन जातील त्यांच्यातील शालीनता कमी होईल अशी एक भिती समाजात घर करुन होती.

स्त्रीमुक्तीच्या दिशेने पावले टाकणाऱ्या नवविचारांच्या समाजसुधारकांचा समाजाने छळ केला, फुले, आगरकर यांनी अथक परिश्रम घेतले तर म.गांधीजींनी स्त्रीयांना मोठ्याप्रमाणावर घराबाहेर काढले. राजकारणात भाग घ्यायचे आव्हान केले, स्त्रिचा शोशीक पणा, स्वार्थ त्यागी वृत्ती, वात्सल्य या गुणांमुळे ती पुरुषांपेक्षा सार्वजनिक काम करण्यास समर्थ आहे.

स्त्री आणि पुरुष यांच्या बाबतीत भिन्न भिन्न नियम करुन विधवावर अन्याय करणाऱ्या पुरुष संस्कृतीवर ताराबाई शिंदे यांनी आपल्या स्त्री पुरुष तुलना मध्ये सडकून टिका करतांना म्हणतात जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रीयांना आपली तोड अगदी बंद करुन ठेवावी लागतात. पुरुषांना एक बायको मेली की दहाव्या दिवशीच दुसरी करुन आणतात. स्त्रियांची समाजातील दु:स्थिती पालटुन त्याचा विकास व्हावा असे म.गांधी सारख्या थोर नेत्यांनाही प्रकर्षाने वाटत होते. एकंदरीत स्त्रियांच्या विविध समस्यांवर विचार मंथन होऊन इंग्रजी राजवटीत स्त्रियांच्या विकासाला बरेच पोषक वातावरण निर्माण झाले असे दिसते.

## स्त्री शिक्षणातील समस्या :—

स़्त्री शिक्षणाविषयी प्रतिकुल मानसिकता असलेल्या समाजामध्ये शिकलेली स़्त्री ही धिट आहे असे दिसुन येते. समाज सुधारकाच्या बरोबरीनेच त्या काळात मराठी लेखकांनी स्थियांच्या प्रश्नांवर लेखन केलेले आहे. शाळा महाविद्यालयातुन मुली पुर्वीपेक्षा अधिक प्रमाणात शिक्षण घेत आहे. आणि म्हणुन मुलगी अधिक शिकलीतर तिच्या लग्नाच्याा वेळी अपेक्षा वाढेल तिच्या योग्यतेच्या तिला शोभणारे स्थळ मिळणे कठीण जाईल. म्हणून १० वी नंतर मुलींचे शिक्षण बंद करणारे आजही काही पालक आहेत.

उच्च शिक्षण घेतांना मुलीचे वय वाढते त्यामुळे लग्न जुळवितांना तिच्या वाढलेल्या वयाची अडचण येईल. आज इंजिनीयरींग, मेडीकल या शाखांचे शिक्षण अत्यंत महागडे झाले त्यामुळे सामान्य परिस्थितीचा पालक स्वत:च्या मुलीला शिक्षणाकरीता लागणारा खर्च करु शकत नाही. पण आज उच्च शिक्षण घेऊन नौकरी मिळणे कठीण झाले आहे. एकंदरीत मुलीकडे परक्याचे धन म्हणून पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोण फारसा बदलेला दिसत नाही. घरकामात मदत करणारे पती गौरी देशपांडेच्या कथेत भेटतात.

## नववधूंना होणारा सासुरवास :—

हुंड्याच्या प्रथेमुळे नवविवाहीत मुलीला पतिचा त्रास आणि सासुचा त्रास किंवा टोचुन बोलने ऐकावे लागते. लग्नानंतर आईचे घर तिला परके होते. सासरी गेल्यावर ताकावरही सत्ता राहत नाही. सासरी मोटाला बांधलेल्या बैला सारखे सतत कामाला जुंपने, दिवसाची सुरुवात भल्या पहाटे उठुन दळण कांडणाने ते झाले की, सडा सारवण, विहीरीवरुन पाणी आणने, न्याहरीच्या भाकरी, उष्टी खरकटी धुनी भांडी, शेतीची कामे हे सर्व करतांना तिचा दिवस संपायचा नाही. मरमर काम करुन कोणाचेही सहानुभुतीचे दोन शब्द कानी पडत नसत. त्यात पोटी पुत्र नसेल तर तिच्या हालाला सिमाच नसेल सासुचा सासुरवास हे सुनेच्या जीवनातील छळवावी पर्व होते. संत मुक्ताबाईच्या अभंगातून चांगदेव मुक्ताबाई एकांतात निर्णय सुध्दा होते. हुंड्याच्या कुप्रथेतुन सुनेला जाळुन मारण्याच्या घटनांमध्ये घट झाल्याचे दिसत नाही. हुंड्याच्या या वाईट प्रथेने आज अनेक तरुणीचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे, हुंड्याची प्रथा नष्ठ व्हावी. अशी सर्वीकडे ओरड ऐकायला येते.

## नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न :—

स्त्रिया घराबाहेर पडुन नौकरी करु लागल्यामुळे त्या कमावत्या झाल्या आहेत. सहाजीकच त्या मिळवत असलेल्या पैश्यामुळे कुटुंबातील त्यांचे स्थान उंचावले आहे. मात्र त्यांना अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. ऑफीसची कामे करुनही घरच्या जबाबदाऱ्या त्यांना टाळता येत नाही. ऑफीसच्या कामानिमीत्य वेळोवेळी तिने घराबाहेर असण्याला तिला बरेचदा घरचा विरोध आणि कधी नवऱ्याचा संक्षयही सहन करावा लागतो.

नौकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रश्न सुमिती जाफळे यांच्या तिढा व गौरी देशपांडे यांच्या परेतु सुस्थीचे ह्या कथामध्येही व्यक्त झालेले दिसतील नव—यापेक्षा बायको अधिक पगार कमावत असले तर अश्या वेळी तिच्या नवऱ्याचा पुरुषी अहंकार दुखावला जातो ऑफीसातही स्त्रि अधिकाऱ्याच्या हाताखाली काम करण्यास बरेचदा पुरुष कर्मचाऱ्यांना कमीपणा वाटतो. कामाच्या व्यापामुळे या स्त्रिया आपल्या मुला बाळांकडे लक्ष पुरवु शकत नाही त्यामुळे त्यांची मुले बिघडतात असे भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान या ग्रंथात नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीतील विधान आढळुन येते.

## स्त्रियांची दु:स्थिती :—

नवरा बायकोचे संसारात पटेनासे झाले की, त्याची परिणती घटस्फोटात होते, पण घटस्फोट झालेल्या पुरुषाचे फारसे बिघडत नाही. तो दुसरा विवाह करुन नव्या संसाराला लागतो. स्त्रि च्या बाबतीत अनेक अडचणी उभ्या राहतात. मुल असली तर मुलांसह दुसरे कोणी स्विकारण्यास तयार नसतात त्यामुळे मुलाला सोडुन नवा संसार थाटण्याची तिची मानसिकता नसते.

आजच्या घडीला चांगली कमाई असलेल्या घटस्फोटीत पुरुषाला कुमारीका देण्यास लोक तयार असतात. त्यामुळे घटस्फोटीत स्त्रियांना दुसरा नवरा चांगला कर्तबगार मिळेलच अशी अपेक्षा नसते. परित्यक्ता स्त्रियांकडे समाजातील लोक वासनेच्या नजरेने पाहतात. विधवा स्त्रियांची स्थिती याहुन वेगळी नाही. ती कमावती

नसेल, मुल बाळ असतील तर तिचे हाल होतात. पुर्वी एकत्रकुटुंब पध्दती असल्या कारणाने विधवांना आश्रय मिळत असे. आज कालच्या विधक्त कुटुंबामध्ये विधवांना आश्रय मिळत नाही. त्याला महत्त्वाचे कारण वाढती महागाई कारणीभूत आहे.

## चरितार्थ चालविण्यासाठी वाम मार्गाचा अवलंब :—

इतर सर्व मार्ग खुंटतात तेव्हा स्त्रियांसमोर शरीरविक्रयाशिवाय दुसरा पर्याय नसतो. वेश्या व्यवसायात गुंतलेल्या बहुतेक स्त्रिया दारिद्र्य व सामाजिक अन्याय याला बळी पडतात. त्यासाठी शरीरविक्रय करुन येणाऱ्या कमाईवर कुटुंबाची गुजरान करतात. त्यामुळे अनेक स्त्रिया असाद्य रोगाने मृत्यमुखी पडतात.

## समारोप :—

स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा जाणिवपुर्वक प्रयत्न केला म्हणुन स्त्रिला तिचे हक्क अधिकार मिळाले पाहीजे अशी भावना व्यक्त होतांना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीचा प्रचार आणि प्रसार झाल्यामुळे स्त्रिया शिक्षीत झाल्या संघटीत झाल्या आणि संघर्ष करु लागल्या आज स्त्रिया वैद्यकिय, इंजिनीयरींग, शिक्षण वगैरे सर्वच क्षेत्रात काम करीत असलेल्या दिसतात. अनेक क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी ही बजावलेली आढळते. राजकारण, समाजकारण, प्रसारमाध्यमे, चित्रपटसृष्टी या क्षेत्रात स्त्रियांनी चांगले स्थान प्राप्त केलेले दिसते.

स्त्रियांच्या बाजुनी झालेले कायदे यामुळे स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होऊ लागला. ठिक ठिकाणी झालेली वासणा कांडे उघडकिस आली. विवाहित स्त्रियांना जाळुन मारणा—या घटना, सामुहिक बलात्काराची प्रकारणे, वाढत्या हत्या, यामुळे स्त्रियांचे आज प्रश्न सुटतांना दिसत आहे. एकंदरीत बदलत्या काळाबरोबर स्त्रिजीवन बदलत गेल्याचे दिसते. काही कालखंडात बदल तर काही कालखंडात स्त्रि स्वातंत्र्याचा संकोच झाला त्यामुळे आज स्त्रियांचा विकास झालेला दिसुन येतो.

## संदर्भग्रंथ :—

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यपीठ नाशिक — ग्रामीण दलित व स्त्रीवादी साहित्य, पृष्ठ क्र. ९५,९७
२) डॉ. नीला कोंडोलीकर —स्त्रियांच्या आत्मचारित्रातील सामाजिक संदर्भ पृष्ठ क्र. ९७
३) ताराबाई शिंदे — स्त्री पुरुष तुलना, पृष्ठ क्र. १७
४) छाया दातार — हुंडा गुरगुरणारा कुत्रा, पुर्णायाम भाग—१, पृष्ठ क्र.१८
५) डॉ. रविकिरण पंडित — समीक्षेच्या सहवासात, पृष्ठ क्र.१०३, १०७
६) वि.का. राजवाडे — भारतीय विवाह संस्थेचा इतिहास, पृष्ठ क्र.९६

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 2 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 87

# महानुभावकालीन साहित्यिक स्त्रियांचे दर्शन

डॉ. निशा सु. जोशी
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
ता. तिवसा, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
joshinsh123@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२०३६९३१, ९१७२३९३३६६

प्रस्तावना:—

महानुभावकालीन स्त्रियांचे साहित्य व स्थिती अभ्यासण्यापूर्वी त्याआधी तिचे समाजातील स्थान काय होते हे पहावे लागेल. वैदिक काळात स्त्रीला समाजात व धर्मसाधनेत महत्वाचे स्थान होते. तरी सामान्य स्त्री मात्र कमालीची उपेक्षित होती. १२ व्या शतकामध्ये महानुभाव पंथाची स्थापना झाली. या काळातील स्त्रियांची स्थिती कशी होती याकडे दृष्टीक्षेप टाकला तर चित्र असे दिसते की, शुद्राबरोबरच स्त्रीवर्गाची गणना होत होती. तिला भक्तीचा अधिकार नाकारला गेला होता. धर्मसाधनेतील तिचे स्थान दुर्लक्षिले गेले, उपेक्षिले गेले, एवढेच नाही तर तिच्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टी बदलली होती. श्रीचक्रधरांचा स्त्री परिवार मोठा होता. त्यामध्ये अनेक स्तरातील अधिकारी स्त्रिया दिसून येतात. असे असले तरी ते स्त्रियांबाबत फार सावध होते. ''भिक्षा मागायला गेलेल्या केशिराजबासांचे सौंदर्य पाहून एका व्यापा—याची कन्या त्यांच्यावर भाळली होती.''[१] म्हणून आचरत्या पुरुषाकरिता श्रीचक्रधरांनी अनेक नियम घालून दिले आहे. चक्रधरांनी आपल्या परिवारातील स्त्रियांना आध्यात्मिक क्षेत्रात अधिकार दिला. एवढेच नाही तर आचरणात आणला. स्त्रियांना समान अधिकार देणारा महाराष्ट्रातील हा पहिलाच संप्रदाय आहे.

महानुभावकालीन स्त्रियांची स्थितीचे दर्शन आपल्याला लीळाचरित्रात घडते. या काळातील स्त्रिया वैधव्यामुळे व सामाजिक परंपरेमुळे उध्वस्त झालेल्या होत्या. यादवकाळात स्त्रीचे अगतिक, असहाय जीवनदर्शन विविधांगी आहे. अशा स्त्रियांना श्रीचक्रधरांनी स्थापन केलेल्या पंथात आदराचे स्थान व प्रतिष्ठा मिळाली. संन्यास मार्ग त्यांच्याकरिता खुला झाला. श्रीचक्रधरांकडे वेधवंत, बोधवंत, दर्शनीय स्त्रिया येत असत. त्यांनी आचारधर्माचे तत्वज्ञान केवळ पंथातील स्त्रियांसाठी सांगितले नाही तर समाजातील इतर स्त्रियांनाही मार्गदर्शन केले. इतकेच नव्हे तर त्यांच्याच प्रेरणेने काही स्त्रियांनी लेखनही केले. महदाइसा सारख्या कवयित्रीने पहिल्या कवयित्रीचा मान पटकसविला. त्यांच्याद्वारे निर्माण झालेल्या वाड्मयाने मराठी साहित्य समृद्ध केले. त्यातील काही स्त्रियांच्या साहित्याचा परिचय पुढीलप्रमाणे—

## कवयित्री महदंबा :—

श्रीगोविंदप्रभुच्या आज्ञेवरुन महदंबेने काव्यरचना केल्या, धवळे गायिले. ''महदंबेच्या या धवळयांचा विषय रुक्मिणी स्वयंवर कथा असून हे धवळे श्री ज्ञानेश्वरीपूर्वी किमान चार वर्ष आधी म्हणजे शके १२०८ पूर्वी झाले. ''[२] हे धवळे सयमक असून त्यातील प्रत्येक कडव्यात चार चरण असतात. धवळे ही मराठीतील पहिली आख्यान कविता असून त्यामुळे महदंबा ही मराठीत रुक्मिणीस्वयंवर कथा रचणारी आद्य कवयित्री ठरते. महदंबेच्या धवळयांची रचना अत्यंत साधीसुधी, प्रासादिक व कृष्ण भकतीने ओतप्रोत आहे. धवळयात ठिकठिकाणी महदंबेच्या अंत:करणरूपी जलाशयात तिच्या कृष्णभक्तीचे ठळक प्रतिबिंब उमटलेले आहे. या धवळयाच्या प्रारंभीच ती धवळ गाण्याचा हेतू ''पाविजे परमागती भक्ती आइकता कृष्णचरित्र''[३] असा सांगते. यात उपमा, उत्प्रेक्षा इ. अलंकाराचा जल्लोश पाहायास मिळत नाही. त्याऐवजी निर्मळ कृष्णभक्तीची गंगा वाहतांना दिसते. धवळयासारखे साधेसुधे, लहान, प्रासादिक काव्य मराठीत आढळत नाही. भक्तीमय व ओजस्वी रचना आहे. धवळयाव्यतीरिक्त महदंबेची रुक्मिणीस्वयंवर नावाची अभंग छंदात रचलेली काव्यरचना आहे. या स्वयंवरात कडव्यातील आद्याक्षरात मातृका आणल्या आहेत. हे काव्य धवळयांपेक्षा काव्यदृष्टया सरस असून त्याच्या रचनेतील शिथिलतेमुळे काव्यात कृत्रिमता आली आहे. धवळयांत आलेली रुक्मिणीस्वयंवर कथा येथेही आली आहे.''[४] यावरुन दोन्ही रुक्मिणीस्वयंवर कथा हया त्यांच्याच असून त्यांची बांधणी मात्र वेगवेगळी आहे असे यावरुन म्हणता येईल.

महदंबेच्या धवळ्यांमध्ये कथानकाबरोबर अनेक रंगचित्र रेखाटलेले आढळतात. त्यामुळे त्यांना यादवकालीन रंगचित्राचे स्वरुप आले आहे. ही यमुनाधारासुध्दा स्वतंत्ररित्या अवतीर्ण झालेली आहे. ही कृष्णकथा दोन धारांनी प्रवाहीत झालेली असून तिचा पहिला प्रवाह हा एखाद्या अवरुद्ध निर्झरासारखा वाहतो तर महानुभावीय कृष्णकथा मात्र संथ वाहणाऱ्या नदीच्या परिपुष्ट पात्राप्रमाणे प्रवाहीत होत असल्याचे दृश्य दिसते. महदंबा ही महानुभावीय कृष्णकथेची आद्य प्रवर्तक तर संत नामदेव हे कृष्णकथा गाणाऱ्या प्राकृत कवीचे पहिले प्रतिनिधी.''[५] महदंबेचे काव्य प्रथम पद्यकाव्य आहे हे यावरुन सिद्ध होते. धवळयांचा आस्वाद घेतांना त्यातील अकृत्रिमपणा आपले लक्ष वेधून घेतो. साधेपणा हा या काव्याचा आत्मा असून प्रसाद आणि माधूर्य या दोन गुणांची जोड लाभली असल्यामुळे महदंबेचे धवळे मनमोहक बनले आहे.''ही कवयित्री जनसामान्य स्तरातून वर आलेली असल्यामुळे तिच्या काव्यामधून प्रकाण्ड पांडित्याचा दिसत असलेला अभाव लक्ष वेधून घेतो.''[६]

रुकमिया म्हणे ताता ऐसे केवि कीजे:
गौळया घरी रुक्मिणी कैसेनि दीजे:
सकळ सुकळ कुमरी रुपे चातुर्ये इए नाही सीमा:
इएप्रति गोपाळु ऐसे केवि आले तुमचेया मना:

या शब्दचित्रामधून जबाबदारी ओळखणा—या भावाची प्रतिमा महद्रंबेने अतिशय सुरेख देखाटली आहे.

## नागांबा :—

कविश्वरबासाचे वडीलबंधू दिवाकर यांची नागांबा ही कन्या होती. नागांबिकेने कवीश्वरांकडे दीक्षाविधी स्वीकारला आणि ती कवीश्वराची शिष्या झाली म्हणून सर्व परमार्ग तिला आचार्यांची नात म्हणत असे. ती अखंड आचार्यांच्या सान्निध्यात राहिली. शिवाय भटोबासाकडून नागांबिकेस बोधही झाला होता. पुढे ती सकल शास्त्रात ज्ञानसंपन्न झाली. आणि अखेरपर्यंत आचार्यांची तिने सेवा केली. नागांबा ही सकल शास्त्र जाणत असल्यामुळे पंडिता स्त्री म्हणून तिचा उल्लेख केला जातो.

कविश्वरबासांच्या मृत्यूनंतर नागांबा दु:खाने व्याकुळ झाली. त्यावेळी तिने ज्या ओव्या गायिल्या त्या वियोग ओव्या म्हणून प्रसिद्ध आहे. त्या विराणी वा विरहिणी प्रकारात मोडल्या जातात. ''या वियोगी ओव्या भाषा दृष्टया सुबोध, प्रासादिक, भावोत्कट, कल्पनाचातुर्याने परिपूर्ण आहे. आंतरिक तीव्रता स्पष्ट करणारी मनीचे आर्त साधणारी एक सुंदर शब्दकळा आहे.''[६] कवीश्वरांवर नागांबिकेची आत्यंतिक श्रद्धा होती. पिता, गुरु म्हणून ज्या कवीश्वरांनी नागांबेचे लालन—पालन केले. त्या गुरुच्या निधनाने नागांबा अस्वस्थ झाली, दु:खी झाली. कवीश्वरांचा मृत्यू म्हणजे अस्तास गेलेला सूर्य असे ती म्हणते —

अस्तागत भानु: जाला पै आंबरी
आनंदसागरी लाण जाला...........
मुंगीचीया घरी: आग लागयली
तैसी पर केली: मज तुम्ही.....

अस्तास गेलेला सूर्य आणि कवीश्वरांचा मृत्यू म्हणजे सारखाच. मुंगीचा जीव लहानसा व तिच्या घराला आग लागल्यामुळे तिची अवस्था तशी व्हावी तशीच माझी अवस्था झालेली आहे. तुम्ही गेल्यामुळे मी पोरकी झाले आहे. गुरुमाउलीला ती जननी असे संबोधते आहे. माझे गूरुवर्य ईश्वरप्राप्तीच्या हेतुने गेले आहेत. इश्वर प्रवाहामध्ये ते एकरुप झाले. शेवटी चक्रधरांना उद्देशुन म्हणते——

आहा श्रीचक्रधरा: का बा ऐसे केले
रक्षण ठेवीले: कोण मज

नागांबेच्या काव्यामध्ये आर्तता, विरहव्याकुळता आहे. गुरुभक्तीतून निर्माण झालेल्या या काव्यात भावोत्कटता प्रकर्षाने जाणवते. साधी, प्रासादिक रचना मनातील भावविव्हळता प्रकट करणारी आहे.

## धानाइसा :—

धानाइसाचे 'हंसाबा' हे स्वयंवर प्रसिद्ध आहे. महानुभाव पंथाच्या इतिहासात दोन धानाइसा प्रसिद्ध आहेत. एक उपाध्ये आम्नायातील मयंकराजाची गुरुबहीन असून दुसरी त्याच आम्नायातील सारंगधर बासाची शिष्या आहे. त्या दोघी सतराव्या शतकातील असून त्यापैकी एकीने हे काव्य लिहिले आहे. हंसाबा हे सतराव्या

शतकातील काव्य श्रीचक्रधरांच्या विवाहासंबंधीत आहे. हंसाबा आणि श्रीचक्रधर यांच्या विवाहप्रसंगावर गुंफलेले हे काव्य उत्कृष्ट असे साधले आहे. या ''स्वयंवरकथेचे वैशिष्ट म्हणजे तिचा विषय प्रत्यक्ष श्रीचक्रधरांचा वरंगळ येथे हंसाबिकेशी झालेला विवाह हा आहे. काव्य सुमारे सव्वाशे ओव्याचे असून ते गोड आहे.''[८]

माझीये घरी: एक कन्यारत्न असे
ते तुवा परेसे: स्वीकारावो: २२
आइकोनि विनवणी: बोले जगन्नाथु
जातकुळ एथ: नाही दोन्ही २६

हे काव्य सुमारे सव्वाशे ओव्याचे असून गोड आहे. गेयतेमुळे काव्यात सुरसता आली आहे. काव्यरचनेचा विषय जरी हंसाबा स्वयंवर असला तरी काव्यातील माधुर्य स्त्रीसुलभतेला साजेसे असे आहे. काव्यरचना जरी छोटेखाणी वाटत असली तरी स्वयंवर काव्याचा घाट मात्र रेखीव आहे. हेडाउ कन्येचे सौंदर्य, श्रीचक्रधरांचे सौंदर्यवर्णन, आईच्या मनातील विचार, चार दिवसांचा विवाह सोहळा, वस्त्र वर्णन, मर्दना मादने इ. अतिशय अनुपम असा हा विवाह सोहळा होत होता.

## देमाइसा :–

श्रीचक्रधरांनी देमाइसास 'तुम्ही अटण करण्यासाठी जा' असे म्हटल्यावर देमाइसेने उत्तरादाखल काव्यरचना केली.

पाउले म्हणितल न करीति हरी:कवणी परी जाओ आम्ही
तुझा श्रीचरणी वीसाळले मन: काइसेया कान्हा पाठवीसी।
तुझेनि वेधे असो सभ्रमीते: नीर्वीकारा जोगीयाचे कैसे निष्ठरु चित्त
पाउले म्हणीतले न करीति आता: काइसेया कान्हा पाठवीसी।।[१०]

देमाइसेने आपल्या मनातील भाव काव्यातून स्पष्ट केला. माझी पाउले तुझापासून दूर जायला तयार नाहीत. तसे पाहिले तर आम्ही कुठे जायचे. तुझ्या चरणाच्या ठायी माझे मन रमलेले असून, हे कान्हा तू मला का बर दूर पाठवित आहेस. तुझ्या रुपाचा वेध लागून मला काही सुचेनासे झाले आहे. माझी पाउले परमेश्वरास सोडून दूर जाऊ इच्छित नाहीत. तेव्हा हे परमेश्वरा मला तू तुझ्यापासून दूर का बरे पाठवित आहेस. परमेश्वराच्या प्रति दृढ भक्ती असलेली देमाइसा काव्यामधून आपल्या मनाची व्यथा स्पष्ट करते.

यर्वज्ञे म्हणीतले देमती: आता आपुलीया स्वइच्छा राहावे: आपुलीया स्वइच्छा जावे:[११]

देमाइसेने गायिलेले हे काव्य आंतरिक भक्तीचा आविष्कार असून स्वत:ला काय वाटते त्या विषयीचे भाव देमाइसेने केवळ चार ओळी मधून व्यक्त केले आहे. तिचे अंतर्मन स्पष्टपणे उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य तिच्या काव्यात आहे. मनातील भावोत्कटता, आर्त स्पंदने काव्याच्या रुपाने प्रतीत झाली असून त्यामध्ये तिच्या मनातील विचार अतिशय आवेगाने वेदना, दु:ख व्यक्त करतात.

## नागाइसा :–

नागाइसा ही नागदेवाचार्य यांची नात असून ती मोठी तपस्वी व ब्रम्हविद्येत पारंगत होती. इतरत्र तिचा उल्लेख नात नागाइसा असाच आढळतो. या तोडयात नागदेवाचार्यानी सांगितलेली माहिती तिने श्री आनेराज पंडित व श्री कवीश्वर बास यांना सांगितली आहे. श्री दत्त चरणांकित सैहयाद्रीची परिसीमा, मातापूरची परिसीमा, सैहयाद्रीला जाण्याचा मार्ग व 'एकविरे प्रतिष्ठा: एकविरे भोग कथन:' या आदिच्या सहयांद्रीच्या लीळेतील मास, सुरा, भोग या शब्दाचा गुढ आशय याबाबतची माहिती सैहयाद्रीच्या तोडयाच्या आधारे उपलब्ध होते. या तोडयाचा बाबत रचनेच्या कर्त्याचे नाव आढळत नाही पण पंडित आनेराजबास व श्री भास्करभट बोरीकर यांनी आचार्याकडून जी माहिती उपलब्ध झाली त्या आधारे नागाइसाने आनेराज व भास्कर भट यांच्याशी चर्चा केली''[१२] यावरुन नागाइसा ही विद्वान, वादविवादपटू, चर्चक असल्याचे लक्षात येते. कवीश्वरबास व श्री आनेराज पंडित यांच्या प्रत्येक प्रश्नातून नागाइसेची तल्लख बुद्धिमत्ता, कुशाग्र प्रश्नोत्तर शैली, स्पष्टवक्तेपणा, समय सूचकता इ. वैशिष्ट्यांचा परिचय होतो.

### उमाइसा :—

उमाइसा ही नागदेवाचार्यांची धाकटी बहिन हिने पैठन येथे गाइलेली एक चौपदरी आढळते. एकदा उमाइसा हळू आवाजात गात होती तेव्हा स्वामींनी विचारले 'बाई: मासउपवासिये गाताती' महदाइसेने तिला गाण्याविषयी सूचविले असता ती म्हणाली,'मी काइ गावो जाणतीये' तेव्हा स्वामी म्हणाले, तू गायिली तर मी सुद्धा एक चौपदी गाईल. तेव्हा महदाइसा, बाइसा यांच्या आग्रहावरुन उमाइसेने ओवी गायिली ती चौपदरी प्रसिद्ध आहे. ती अशी—

नगरद्वारहो भिच्छा करोहो बापुरे मोरी अवस्था लो
जिहा जाओ तिहा आपपरिसा कोइ नकरी मोरी चिंता लो।।
हाट चौहाटा पडरहू मांगू पंचघर भिच्छा
बापुड लोक मोरी अवस्था कोइ नकरी मोरी चिंता लो।।[१३]

उमाइसेने चौपदी गायल्यानंतर श्रीचक्रधरांनी चौपदी गायिली. उमाइसेच्या चौपदी पैकी पहिली हिंदीमिश्रीत रचना असून दुसरी चौपदी हिंदीमिश्रीत गुजराथी आहे. उमाइसेने गायिलेली हिंदी काव्यरचना ही हिंदीतील पहिली काव्यरचना होय. उमाइसेने तिच्या रचनेबाबत श्रीचक्रधरच चिंता करणारे असल्याचे म्हटले आहे. तिने आपल्या अवस्थेचे वर्णन करुन परमेश्वराशिवाय जीवन निरर्थक असल्याचे विषद केले. त्यामधून चक्रधरांविषयी निष्ठाच प्रतीत होते.

पद्यवाड्मयाचा प्रारंभ महानुभावीय कवयित्रींनी केला. प्रारंभालाच निर्माण झालेली त्यांची रचना असूनही सरस उतरली आहे. स्त्री साहित्यिकांच्या या रचनांमधून त्यांची कवित्ववृत्ती, प्रतिभाशैलीची सहजता, प्रासादिकता व परमेश्वर भक्तीतील उत्कटता जाणवते.

## संदर्भ

१. डॉ. आवलगावकर अविनाश: महानुभावाची मात् संकल्पना, ज्ञानमोचक— त्रैमासिक, पृ. २९, संपादक रमेश आवलगावकर
२. डॉ. देशपांडे वा. ना. :आद्य मराठी कवयित्री प्रस्तावना, पृ. ११ते१३
३. धवळे पूर्वाध ओ. १
४. डॉ. देशपांडे वा. ना. :आद्य मराठी कवयित्री प्रस्तावना, पृ. ११ते१३
५. प्रा. डॉ. पारवे व. वि. : महानुभाव कृष्ण कथेचा विकास प्रारंभ— धवळे, एप्रिल—मे, १९७६, अंक १व२ नारद भक्तीसूत्रे, संपा. ल. रा. पांगारकर, ५वी आ. पृ १०७
६. डॉ. वा. ना. देशपांडे, महदंबा: आद्य मराठी कवयित्री, प्र. आ.,१९८५, पृ.२१
७. प्रा. कन्हैया कुंदप: नागांबाच्या वियोग ओव्या, महानुभाव नोव्हे.—डिसें. १९७७,पृ.४७
८. चिपळुणकर प्रा. अलका नारायण: महानुभावीय श्रीकृष्णकथाकार, ऑ. १९७९ पृ १३, संपा.योगिराज शास्त्री
९. अंकुळनेरकर नरेंद्रमुनी: लीळाचरित्र, उत्तरार्ध ली.४५३, पृ.५७७
१०. डॉ. कोलते वि. भि. : लीळाचरित्र उत्त., ली. ४३४, पृ २६४
११. डॉ. कोलते वि. भि. : लीळाचरित्र उत्त., ली. ४३४, पृ २६४
१२. शास्त्री दर्यापूरकर वसंतराव: परमार्ग, श्रीदत्तत्रयप्रभु विशेषांक, ऑक्टो. जाने. पृ ४५
१३. तुळपुळे शं. गो.: लीळाचरित्र उत्त. भाग २, ली. ३१० पृ. ५२

❖❖❖

# महिलांचे अस्तित्व आणि सबलीकरण

डॉ. माधुरी व्ही. भटकर
मराठी विभाग
संत गाडगे महाराज महाविद्यालय, वलगांव, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
madhuri.bhatkar1972@gmail.com भ्रमणध्वनी ७७९८०५८७६०

## प्रस्तावना —

भारतीय संस्कृतीत मातृशक्तीला अत्यंत मानाचे स्थान आहे. महिलांचा आदर आणि तिच्याविषयीची कृतज्ञता प्राचीन काळापासून आपण अनुभवत आहे. प्राचीन धर्मग्रंथातील याचा प्रत्यय येतो. निसर्गाची सुंदर रचना स्त्री आहे. मानवी जीवनचक्र चालण्यासाठी स्त्रियांचा खुप मोठा वाटा आहे. भारतात पुरूषप्रधान संस्कृती असूनही स्त्रियांना योग्य त्या मानसन्माने वागविले जाते. मग ती ग्रामीण स्त्री असो वा शहरी. परंतु गत काही काळापासून असे जाणवते आहे की, स्त्री ही सबल, सुशिक्षित असली तरी तिची मानसिकता ही परावलंबी असलेली दिसते. यामागे तिची सहनशिलता असेल किंवा अजून काही हे कळायला मार्ग नाही.

## उद्देश —

१. महिलांची मानसिकता बदलविणे,
२. आर्थिक, सामाजिक मानसिक क्षमता विकसीत करणे
३. महिला शिक्षण व सत्ताकारणातील सहभाग वाढविणे
४. आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण करणे.
५. धार्मिक न्यूनगंडातून बाहेर काढणे.
६. आरोग्य आणि स्वातंत्र्य याचे महत्व समजून सांगणे.

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत महिला इतकी सक्षम आहे काय हा चिंतनाचा विषय आहे. सनातन संस्कृतीपासून स्त्रियांना देवता स्वरुप मानले गेले पण तिच्यावर अत्याचार होतच गेले. खऱ्या अर्थाने इंग्रज भारतात आल्यावरच तिची स्थिती सुधारत गेली. महात्मा गांधींनी म्हटले की, 'एक पुरुष किंवा मुलगा शिकला तर तो व्यक्तीगत विकास करतो पण स्त्री शिकली तर ती पूर्ण कुटुंबाला समोर नेते'. आज जरी आपण स्त्री—पुरुष समानतेच्या गोष्टी करतो पण स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण अजूनही अबला म्हणूनच आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरण काळाची गरज आहे.

१९५७ साली युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करून १९७५ ते १९८५ हे महिला दशक साजरे केले. प्रत्यक्षात या गोष्टीने ती प्रकाशझोतात आली पण सक्षम झाली नाही. तिची आर्थिक सुबत्ता हा एक भाग विचारात घेतला तरीही ती कुटुंबासाठी दुय्यम स्त्रोत ठरते, पुरुष हा कर्ता ठरतो. त्यामुळे तिचे मानसिक खच्चीकरण होते. कामाच्या ठिकाणी तिची अवहेलना केली जाते. स्त्रियांना चाकोरीबाहेरचे काही कळत नाही हीच धारणा सगळीकडे दिसते. कुटुंबाचा जर विचार केला तर भ्रुणहत्येसारखे प्रकार, हुंडा, तिचे आरोग्य यामुळे ती घरातूनही दुर्लक्षीतच राहते. राजकारणासारखा विषय तर हाताळायला पाहतच नाही. नोकरी पेशात अतिशय जबाबदारीच्या पेशावर स्त्रिया ह्या कमी असते यामागे असमानता हाही एक मुद्दा येतो.

स्त्री ही बालपणी मातापित्याच्या संरक्षणात असते. प्रौढ झाल्यावर पतीच्या बंधनात आणि म्हातारपणी मुलांच्या हाताखालचे खेळणे बनते. एकूण ती स्वतंत्र कधी होत नाही. जय शंकर प्रसाद यांची एक रचना इथे उधृत करावीशी वाटते.

"नारी तुम केवल श्रद्धा हो। विश्वास रजन नग पग तल मे।
पियुष स्त्रोतसी बहा करो जीवन के सुंदर समतल में।"

महिला शिक्षणाचा जर आपण विचार केला तर याची भयावहता ग्रामीण भागात जास्त जाणवते. कारण मुलींची लवकर लग्न करायच्या सवयीमुळे त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. आणि मानसिकदृष्टया परिपक्व

नसल्यामुळे त्या निर्णय क्षमतेत अंधातरी राहतात आणि चुकीच्या पावलावर पाऊल ठेवतात. शहरी भागातही शिक्षणाची गंगा वाहत असली तरी त्याचा अतिरेक होतो. मुली अविचार करतांना दिसतात. यामुळे त्यांचे सुरक्षितपण धोक्यात आले आहे आणि स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याचा दृष्टिकोण बळावत चालला आहे. त्यामुळे लहान मुलींवर, महाविद्यालयीन तरुणींवर वाढत चाललेले अत्याचार याचेच द्योतक आहेत.

राजकीय व्यवस्थेमध्ये पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही सहभागी होण्याचा समान अधिकार घटनेने दिला आहे. परंतु स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थांअंतर्गत राखीव जागा ठेवून राजकीय व्यवस्थेत सहभागी घ्यावे लागते. आपल्यातील क्षमतेनुसार अनेक स्त्रिया राजकीय व्यवस्थेमध्ये उच्च पदावर गेलेल्या आहेत पण तो सहभाग सिमित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा सहभाग राखीव जागांमुळे आहे पण त्यांच्या कार्यक्षमतेचा प्रभाव पाहिजे तेवढा दिसत नाही. स्त्रियांनी पुरुषांचा आधार न घेता स्वत:च्या क्षमता विकसीत करून आपल्यातील नेतृत्व गुणांचा पुरेपूर उपयोग केला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने राजकीय सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल.

आरोग्याकडे बघण्याचा स्त्रियांचा दृष्टीकोणही वेगळा आहे. सहनशिलतेमुळे किंवा संकुचितपणामुळे आपल्या आरोग्यविषयी ती सतर्क राहत नही. त्यामुळे आजार बळावत जातात. ती मानसिकदृष्ट्या खचून जाते. घर, नोकरी, कुटुंब व्यवस्था, आदरातिथ्य यामुळे तिची जी घुसमट होते त्याचा तिच्या आरोग्यावर परिणाम होतो.

## धार्मिक दृष्टिकोण –

भारतीय संस्कृतीला प्राचीन परंपरा आहे त्यामुळे धार्मिक पुजाविधी, व्रतवैकल्य, उपवास यामध्ये स्त्रियांचा सहभाग पुरुषांच्या तुलनेत अधिक असतो. सुशिक्षित असो वा निरक्षर व्रतवैकल्यातून ती बाहेर पडू पाहत नाही. पण स्त्रियांनी सुद्धा सजग राहून त्यामागचा वैज्ञानिक दृष्टीकोन, सामाजिक, आर्थिक दृष्टीकोन, सण साजरा करण्यामागची पार्श्वभूमी याचा विचार करायला हवा, जेणेकरून संस्कृती व विचार यांची सांगड घालता येईल.

## निष्कर्ष –

८ मार्चला आपण आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा करतो. शासनाने स्त्री सक्षमीकरणासाठी अनेक योजना आखल्या आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ, स्वंयसिद्धा योजना, स्वशक्ती योजना, किशोरी बालिका योजना, महिला समृद्धी योजना, ग्रामीण महिला विकास परियोजना या व शैक्षणिक क्षेत्रातील स्त्रियांना आरक्षण मिळाले आहे त्याचा फायदा घेऊन स्त्रियांनी स्वत:ला सिद्ध केले पाहिजे. तिने उंच भरारी घेण्याची गरज आहे. पंख तर तिलाच फुटले आहे. सक्षमीकरणाची हवाही भरली आहे. फक्त तिला आकाश कवेत घ्यायचे आहे. किती भरारी घ्यायची हे तिचे तिने ठरवायचे आहे.

'कोमल है कमजोर नही शक्ती का नाम ही नारी है।'

## संदर्भसूची –

१. मराठी विश्वकोश
२. ग्रामगीता, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
३. भारतीय स्त्री जीवन, लीला पाटील

❖❖❖

# महात्मा फुले यांचा गुलामगिरी व शेतकऱ्यांचा असूड एक दृष्टिक्षेप

डॉ. विनोद यू. भालेराव
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर, महाराष्ट्र (India), भ्रमणध्वनी ७६७६५७६६०

म. फुले यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ इ. स. १८७३ मध्ये प्रकाशित झाला. गुलामगिरी, मग ती धार्मिक, सामाजिक आर्थिक किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची असो. तिच्याबद्दल जोतीराव फुलेंच्या मनात स्वभावत:च अत्यंत तिटकारा होता. त्यामुळे गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यासाठी अमेरिकेत जे यादवी युद्ध झाले. त्याचे महत्त्व त्यांना मनोमन पटले. युनायटेड स्टेटस्‌मधील सदाचारी लोकांनी गुलामांस दास्यत्वपासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता व परोपकारी बुद्धी दाखविली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ महात्मा फुले यांनी आपला हा ग्रंथ त्यांना अर्पण केला आहे. पुढे या अर्पणपत्रिकेत त्यांनी आपले देशबांधव हे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून आपल्या समाजातील शूद्रबांधवाची ब्राह्मण लोकांच्या गुलामगिरीतून मुक्तता करतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या ग्रंथात जोतीरावांनी मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, परशुराम यांच्यासंबंधीच्या पौराणिक छानणी करून येथे आर्य आणि मूळ क्षेत्रपत्ती यांच्यात कसा दीर्घकाळ संघर्ष चालू होता आणि तो किती अटीतटीचा व भीषण स्वरूपाचा होता हे परखड शब्दांत स्पष्ट केले आहे. परशुरामाने तर आपल्या मातेचा शिरच्छेद करतानाही मागेपुढे पाहिले नाही शिवाय नि:क्षत्रिय पृथ्वी करण्याच्या भरात त्यांनी येथील क्षेत्रपतीच्या बायकामुलांवर जे अनन्वित अत्याचार केले, ते ऐकून कोणत्याही पाषाणहृदयी माणसाच्या अंगावरदेखील शहारे आल्याखेरीज राहणार नाहीत. आर्यांच्या धर्मग्रंथांनी यांना साक्षात आदिनारायणाचे, भगवान विष्णूचे अवतार म्हणून गौरविले आहे. परंतु सर्वशक्तिमान व परमदयाळू अशा ईश्वराच्या उदात्तकल्पनेचा हा केवढा विपर्यास आहे बरं! आर्यांचा विजय झाल्यावर त्यांनी तेथील लोकांना तुच्छ लेखून आपल्या सुखस्वास्थ्यासयाठी त्यांना गुलामाप्रमाणे रात्रंदिवस कष्टांची कामे करण्यास भाग पाडले ते त्यांच्याशी त्वेषाने लढले. त्या महारांना अस्पृश्य ठरवून त्यांच्यावर माणुसकीला हरताळ असणारे असे कितीतरी कडक, हिनत्वदर्शक निर्बंध लादले. त्यांना विद्येचे दरवाजे कायमचे बंद करून टाकले. ज्ञानार्जनाचा अधिकार नसल्याने धर्मग्रंथाचा मतलब ईश्वरप्रणीत आहेत. अशी या अज्ञानी शूद्रातीशूद्रांची त्यांनी समजूत करून दिली आणि त्यसातील मंत्रसामर्थ्याविषयी त्यांच्या मनात दहशत करून ठेवली. ब्राह्मण हे स्वत:च भूदेव बनले आणि त्यांची अवज्ञा करणे, यासारखे दुसरे महत्पाप नाही. हा शास्त्रप्रणीत संस्कार जनमानसात खोलवर रुजला. ही स्थिती पेशवाई अखेरपर्यंत बहुतांशी कायम होती.

इंग्रजांच्या राजवटीतही तिच्यात फारसा बदल झाला नाही. राजकीय स्थित्यंतरामुळे शुद्रांतिशुद्रांचे कायिक दास्य संपुष्टात आले पण मानसिक दास्याचे काही दूर झाले नाही. विद्येची परंपरा पाठीशी असल्याने ब्राह्मण व तत्सम जातीनीच आधुनिक शिक्षणाचा लाभ तत्परतेने घेतला आणि नव्या शासनयंत्रणेतील लहानमोठी अधिकारपदे हस्तगत केली. इतर सामाजिक क्षेत्रातही त्यांचेच वर्चस्व होते. न्यायाधीश, वकील,फौजदार, बेलीफ, सावकार, मामलेदार, कुलकर्णी, डॉक्टर, इंजिनियर, शिक्षणाधिकारी, शिक्षक, पत्रकार, पंडित, पुरोहीत, यासारख्या सामाजिक जीवनातील बहुतेक सर्व मोक्याच्या जागा त्यांच्याच ताब्यात होत्या. वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकारही कमी झाला नव्हता. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या इथल्या परिस्थितीची बारीकसारीक माहिती नसे. त्यामुळे आपल्याहाताखालच्या मुख्य उच्चवर्णीच अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार निर्णय करण्याचा त्यांचा परिपाठ असे तेव्हा सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने ब्राह्मण हेच खरे सत्ताधारी होते. शिवाय वेगवेगळ्या खात्यातील हे अधिकारी वेळप्रसंगी एकमेकांना सांभाळून घेण्याच्या कामी नेहमीच दक्ष असत. अशा स्थितीत खेड्यातील अशिक्षित शेतकऱ्यांवर कितीही अन्याय झाला, तरी त्याबाबतीत वरपर्यंत जाऊन दाद लावून घेणे त्याला सहसा शक्य होत नसे. पक्षपात, जुलूम, लुबाडणूक असहाय्यतेने सहन करण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हते. तेव्हा सरकारनेच बहुजनसमाजास झपाट्याने शिक्षणप्रसार करूनत्यातील लोकांना शासनयंत्रणेत मोठ्या प्रमाणात सामावून घेतल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणार नाही. आता जोतीरावांच्या या पुस्तकातील विवेचनांचा मतितार्थ आहे. पुस्तकांच्या शेवटी भट कामगार इंजिनियरींग खात्यात कसब, भटांचे कसब आणि शूद्रांचा देवभोळेपणा अशी चार छोटीशी पद्यात्मक प्रकरणे जोडली आहेत.

जोतीरावांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ इ. स. १८८३, मध्ये लिहून हातावेगळा केला. पण त्यांच्या हयातीत तो प्रसिद्ध होऊ शकला नाही. मात्र या ग्रंथाचे लेखन पूर्ण झाल्यावर त्यांनी त्यांची एक प्रत गव्हर्नर जनरल आणि दुसरी प्रत सयाजीराव गायकवाड यांच्याकडे विचारार्थ धाडली होती. त्यांनी स्वत: हा ग्रंथ अनेक इंग्लिश, संस्कृत व प्राकृत ग्रंथ व हल्लीचे शूद्रादी अतिशूद्रांच्या, दीनवाण्या स्थितीवरून रचिला आहे असे म्हटले आहे. तरीसुद्धा त्यांच्या प्रतिपादनाला मुख्य आधार येथील शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन हाच आहे. शिवाय ग्रंथाचे लेखन चालू असताना पुणे, मुंबई, ठाणे, जुन्नर, ओतून, इत्यादी वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या आपल्या माहितगार शूद्र मित्रांना देखील त्यातील मजकूर वेळोवेळी वाचून दाखवून त्यांच्या खरेपणाची जोतीराव यांनी खात्री करून घेतली होती. हा ग्रंथ इ. स. १९६७ मध्ये मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मराठी संशोधन मंडळाने प्रथम प्रकाशित केला. त्याचे संपादक डॉ. स. ग. मालशे व धनंजय कीर यांनी केले आहे. या ग्रंथात जोतीरावांनी सर्व बाजूंनी नाडलेल्या महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांच्या ओढग्रस्त व केविलवाण्या जीवनक्रमाचे चित्रण केले आहे. हा ग्रंथ बराचसा वर्णनात्मक आहे आणि त्यातील जोतीरावांची वर्णनशैली तिखट व धारदार व प्रत्येयकारी अशी आहे तसे पाहिले तर हा ग्रंथ शेतकीविषयक प्रश्नांना वाहिलेला आहे. त्यात शूद्र समाजातील बडे बडे राजेरजवाडे,  संस्थानिक, जहागीरदार, इनामदार, तसेच अत्यंत लाजिरवाण्या स्थितीत कसे तरी दिवस कंठणारे आपले आयुष्य बांधव यांची विशेष दखल घेतलेली नाही. कारण, आपल्या पोकळ वैभवामुळे व दुसरे आपल्या दुर्दैवामुळे शुद्र शेतकऱ्यापासून (ते) दुरावले आहेत. म्हणून मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांना धरूनच त्यांनी या ग्रंथातील एकंदर विवेचन केले आहे. आपल्या या प्रदेशातील शेतकऱ्यांची इतकी दुर्दशा कशामुळे झाली, त्याला जबाबदार कोण आहेत? त्यात त्याचा स्वत:चा दोष किती? इत्यादी प्रश्नांची साकल्याने व न्याय निष्ठूरतेने छाननी करून ही स्थिती सुधारण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजे. त्याचेही त्यांनी शेवटी दिग्दर्शन केले आहे. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची जी अनेकविध कारणे आहेत. ती प्राय: धर्म व राज्य या दोन संस्थांशी निगडीत आहेत. धर्म ही दैवी शासनाचा प्रांत आणि राज्य ही सकृतदर्शनी लौकिक शासनाचा प्रांत या दोन्ही प्रांतातील भल्याबुऱ्या प्रकृतीची चर्चाचिकित्सा करण्याची कुवत आपल्या निरिक्षर शेतकऱ्यांच्या अंगी कुठून असणार? ब्राह्मण सांगतील तो धर्म आणि इंग्रज करतील ते कायदे? एवढेच काय ते बिचाऱ्याला ठाऊक होते. शिवाय ब्राह्मण हे भूदेव व राजा हा ईश्वराचा अंश अशी पक्की धारणा असल्याने ह्या दोन्ही बाबतीत आपल्यावर काही अन्याय होण्याचा संभव आहे. ही कल्पनाच मुळी त्याच्या मनाला कधी शिवली नसेल. त्यामुळे साहजिकच ब्राह्मण व सरकारी अधिकारी यांच्याकडून कितीही जाच वा जुलूम झाला. तरी तो आपल्या नशिबाचा भाग म्हणून निमूटपणे सहन करण्याची त्याला सवय जडली होती. धार्मिक व राजकीय अशा दोन्ही क्षेत्रात त्यांचा सर्वत्र कोंडमारा होत होता. पद्धतशीर लुबाडणूक चालू होती.

तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी त्याची अवस्था झाली होती. शेतकऱ्यांच्या या अगतिकतेचे मूळ जोतीरावांच्या मतानुसार त्यांच्या अज्ञानात, अशिक्षितपणात होते ही गोष्ट त्यांनी आपल्या इतर ग्रंथातूनही वारंवार सांगितली आहे. ह्या ग्रंथाच्या प्रारंभी “विद्येविना मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली गती विना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले” असे म्हटले आहे. सामाजिक जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये न होणाऱ्या आर्थिक शोषणाकडे या ग्रंथाच्या द्वारे जोतीरावांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या या आसुडाचे फडके, प्रस्थापिकांच्या हस्तकांच्या वर्मी घालावेत असे आहेत. इथल्या परिस्थितीचे तुटपुंजे ज्ञान असलेले ब्राह्मणधार्जिने व ऐषआरामी वृत्तीचे गोरे साहेब, लाचखाऊ पण लब्धनिष्ठित उच्चवर्णीय अधिकारी, ब्राह्मणकामगारांच्या ओंजळीत पाणी पिणारे देशमुख पाटील यांच्यासारखे वतनदार, द्रव्यलोभी सावकार आणि धर्मकृत्यांचा बाजार मांडणारे पुराणिक, पुरोहित या सर्वांचीच शोषणात भागिदारी होती.

एकंदरीत या सर्व शोषण व्यवस्थेचा जोतीरावांनी अभ्यास केला आणि शेतकऱ्यांना जाणीव करून दिली असे संशोधना अंती दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची :–

१) कीर धनंजय, “महात्मा जोतीराव फुले”, पॉप्युलर प्रकाशन,  मुंबई, १९९८.
२) पवार ना. म., “भारतीय समाजक्रांतीचे जनक : महात्मा जोतीराव फुले”, पुणे, २००५
३) रानडे मा. गो., “महात्मा जोतीबा फुले”, नागपूर, १९९१
४) उगले गि. ए., “महात्मा फुले – एक मुक्त चिंतन”  कौशल प्रकाशन, औरंगाबाद–२०००.
५) लांडगे राम,  “महात्मा जोतीबा फुले – व्यक्ती व कार्य” राजश्री प्रकाशन, पुणे, २००४
६) नरडे श्रीहरी, “महात्मा फुले यांची सामाजिक चळवळ व साहित्य ”

❖❖❖

# उ.रा. गिरींच्या कवितेतील सामाजिक जाणीव

डॉ. रा.तु. आदे
सहयोगी प्राध्यापक,
इंदिरा महाविद्यालय, कळंब
जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
rajuade2512@gmail.com भ्रमणध्वनी 9422608715

## सारांश :—

उ.रा. गिरी यांनी निसर्गवर्णनपर व प्रेमविषयक कविता अधिक प्रमाणात लिहिल्या असल्या तरी त्यांच्या सामाजिक कवितांचे विषयही उल्लेखनीय व समाजसन्मुख राहिले आहेत. समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचे भान या कवीने आपल्या कवितेतून अचूक टिपले आहे. आहेरे आणि नाहीरे यांच्यातील जगण्याचा संघर्ष ते अधोरेखीत करतात. मानवतेची उसवत चाललेली वीण त्यांच्या हळव्या मनाला जखमी करून जाते. मुखवटयामागची स्वार्थी, ढोंगी, संधीसाधू माणसे हा जसा त्यांच्या कवितेचा चिंतनाचा विषय आहे त्याचबरोबर खोटी प्रतिष्ठा बाळगणारी, दुतोंडी सत्ताधारी, कर्तव्यशून्य माणसे हेही त्यांच्या कवितांचे विषय आहेत. रंगभेदाविषयी प्रखर मत व्यक्त करतानाच .पीडित—शोषितांविषयी त्यांची वाणी परिवर्तनाची शक्यता वर्तविते. उपहासगर्भ, विडंबनपर कविता लिहितानाच माणसातील माणुसकीवर असलेली त्यांची श्रद्धा आशावादी असल्याचे जाणवते.त्यांची कविता सामाजिक जाणिवांविषयीही सजग असल्याचे दिसते. त्यामुळे सामाजिक जाणिवा त्यांच्या कवितेत दिसत नाही, असे म्हणणे धारिष्टयाचे ठरते.

## प्रस्तावना :—

उद्धवगीरी रामगीरबुवा गिरी हे आधुनिक मराठी कवितेतील एक प्रतिभावंत कवी. अकोला जिल्हयाच्या मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरीसारख्या छोटयाशा गावात १० ऑक्टो. १९२९ साली जन्माला आलेले ते गुणवान,कलासक्त,प्रतिभासंपन्न साहित्यिक!'' इ.स. १९४९ साली ७ व्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर या कवीने अखेरपर्यंत प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली. पुढे मित्रांच्या आग्रहाखातर त्यांनी १९६८ ला मॅट्रीकची परीक्षा दिली व त्यात ते उत्तीर्णही झाले. मात्र,कमालीच्या गरिबीमुळे आयुष्याच्या परीक्षेत ते अयशस्वी ठरले आणि शिक्षक दिनाच्या दिवशी या संवेदनशील मनाच्या कर्तव्यदक्ष शिक्षकाच्या जीवनाची अखेर दि. ५ सप्टेंबर १९८६ झाली.''[१] मालकंस आळवितानाच वीणेचे स्वर अबोल झाले. चंद्र—चांदण्यांची चंदेरी दुनिया भकास आणि कळाहीन झाली. आयुष्यभर चैतन्याची, प्रकाशाची गीते आळविणा—या या कवीने चिरनिद्रा घेतली.

अल्प आयुष्य वाट्याला येऊनही गिरींनी काव्यप्रांतात स्वकर्तृत्त्वाने जो ठसा उमटविला तो अमीट आहे. भाराभर ग्रंथ लिहूनही समाजाच्या कौतुकास अपात्र ठरणा—या साहित्यिकाच्या तुलनेत अल्प,अगदी हाताच्या बोटावर मोजता येईल एवढे अत्यल्प लेखन करूनही त्यांच्या कवितेची नोंद अनेक मान्यवरांना घ्यावीशी वाटली,समीक्षकांना त्यांच्या कवितेचा परामर्ष घ्यावासा वाटावा, यातच त्यांच्या कवितेचे महत्त्व अधोरेखीत झाले आहे. सुरूवातीला निसर्ग वर्णनात रमलेल्या या कवीला प्रेमविषयाचेही वावडे नव्हते. गुरूंचे (कवी पुंडलिक) लाभलेले अचूक मार्गदर्शन, घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे अनुभवातून आलेले शहाणपण व सभोवतीच्या निसर्गामध्ये रूंजी घालणारे मन यातूनच त्यांच्या काव्यप्रतिभेला धुमारे फुटले, व त्यांची कविता बहरू लागली. वृत्तपत्रे,मासिके यासारख्या प्रसारमाध्यमातून तिला प्रसिद्धी मिळाल्यामुळे रसिकांची दाद व जाणकारांकडून कौतुकाची थाप मिळाली. पुढे तिच्यातील सुरुवातीचा नवखेपणा जाऊन ती परिपक्व,चिंतनशील व समाजमनस्क बनली. कलावंत हा इतरांपुढे स्वत:चे दु:ख व्यक्त न करता इतरांचे दु:ख वा समस्या समजून घेण्यात व त्या शब्दांकित करण्यात नेहमीच तत्पर राहतो, उ.रा.गिरी यांच्यातील कलावंतानेही हेच कार्य केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक जाणिवांनी काव्यलेखन करणारे कवी म्हणून केशवसुत, अनिल, कुसुमाग्रज, मुक्तिबोध व मर्ढेकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. या कवींनी समाजातील अनेक प्रश्न कवितेतून मांडले व सामाजिक समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच मळलेल्या वाटेने प्रवास करत

वैदर्भीय कवी उ.रा.गिरी यांनी समाजाला भेडसावणा—या अनेक समस्यांचे उद्घाटन आपल्या कवितेतून केले. गिरींच्या कवितेविषयी समीक्षक डॉ.रू.पां.पाजणकर म्हणतात,'' १९५० पासून त्या काळी अग्रेसर असलेल्या 'अभिरूची'मधून वा 'सत्यकथे'मधून कवी अनिल यासारखी मोठी आणि वेगळी पीढी सोडली तर वैदर्भीय कवितेने या प्रतिष्ठित मासिकात स्थान पटकावले याचे श्रेय उ.रा.गिरींच्या कवितेकडे जाते.''[२] ही त्यांची प्रतिक्रिया गिरींच्या कवितेचे स्थान विषद करणारी आहे. प्रेमविषय व निसर्गवर्णनानंतर अनुभवाच्या संपन्नतेबरोबर हा कवी समाजमन बोलू लागला. समाजवास्तवाचे बदलते संदर्भ त्यांनी आपल्या कवितेतून नोंदविले आहेत. समाजचित्र रेखाटताना हा कवी चिंतनशील,भावनिक व हळवा होताना दिसतो. अतिशय डोळसपणे समाजाकडे पाहण्याची दृष्टी त्यांना लाभली असल्यामुळे अतिशय बारीक—सारीक गोष्टीही त्यांच्या निरीक्षणातून सुटत नाही. त्यामुळेच त्यांची कविता वेगळी वाटते.

सामाजिक जाणिवेची कविता ही मानवी मनातील आद्य प्रेरणेशी किंवा सहजप्रवृत्तीशी संबंधित असते. सामाजिक पर्यावरणाचा माणसाच्या घडणीवर प्रभाव पडत असतो. अनुभवास आलेले भलेबुरे प्रसंग,घटना,परिस्थिती यातून सामाजिक जाण स्पष्ट होत जाते. यातूनच कलावंत मन आपले अनुभवकोष विणत जातो. समाजाशिवाय कलावंत आणि कलाकृती यांचे सर्जन अशक्य असते. त्यामुळेच कलावंताला सामाजिक जीवनाचे,त्यातील जाणिवांचे भान ठेवणे क्रमप्राप्त ठरते. गिरींची निसर्गासक्ती जितकी तीव्र तितकीच त्यांची सामाजिक जाणीवही तीव्र आहे. म्हणूनच ग्रीष्मातील ऐन दुपारी ' वाढा बाई भाकर ' म्हणणारी अनवानी पायाची म्हातारी त्यांच्या दृष्टीतून सुटत नाही. तिच्या घशाला पडलेली कोरड, त्राण गेलेले शरीर,नि:शब्द झालेली वाणी आणि लेकरांची भूक भागविता यावी यासाठी तिने केलेला केविलवाणा प्रयत्न हे सर्व प्रसंग दु:खाची तीव्रता व्यक्त करतात. त्यांना त्या बाईच्या ठिकाणी स्वत:ची आई दिसायला लागते, आणि त्याहीपुढे त्यांचे दु:खाचे कढ अधिक तीव्र होताना आक्रंदन करत म्हणतात, —

ही का नुसती माझीच आई ?
ही तर माझी, तुमची अवघ्या विश्वाची आई।।[३] (मी एकटा निघालो — वाढा भाकर बाई, पृ. २६)

एका सामान्य स्त्रीकडे पाहत असताना विश्वाचे आर्त प्रकट करणा—या माऊलीचे प्रतिबिंब त्यात उमटावे, ही निश्चितच कवीच्या प्रतिभासंपन्न व्यक्तित्वाची ओळख देणारी बाब आहे. त्यामुळे कविता किती लिहिल्या त्यापेक्षा त्या कवितेतून काय आणि कसे मांडले हे जास्त महत्त्वाचे असते. या दृष्टीने विचार करता गिरींची कविता ही अल्पाक्षरबव्हार्थक स्वरूपाची आहे, हे जाणवते. मूर्तिमंत प्रसंग उभे करण्याचे कौशल्य त्यांच्या कवितेमध्ये दिसते. समाजात ढोंग पांघरुन स्वत:चे स्वार्थ साध्य करणारी माणसे दिसली, की त्यांच्यातील कवी जागा होतो. आणि ती चीड व्यक्त करताना उद्गारतो,

''हे देवाघरूनच घेऊन येतात,
पोटात एक, ओठावर दुसरे,
चेह—यावर तिसरेच''[४] (मी एकटा निघालो — 'मुत्सद्दी', पृ. ४४) समाजातील मुखवटे घालून जगणारी माणसेही त्यांच्या चिंतेचा विषय होतो, त्याविषयी काहीशी तिरकस प्रतिक्रिया देताना ते म्हणतात , —

''हे देवाघरुनच घेऊन येतात पोटात एक,
ओठावर दुसरे, चेह—यावर तिसरेच,
मुत्सद्दीपणाचे मंदील जरतारी
शहाजोगपणाचे संगीन शिरपेच.''[५] (मी एकटा निघालो — 'मुत्सद्दी', पृ. ४४)

खरा चेहरा लोकांपुढे येऊ न देता दिशाभूल करणा—यांविषयी कवीला अत्यंत संताप येतो, खोटया माणसांपुढे ख—याची दुनिया दुबळी होऊन जाते आणि मुखवटयामागील सत्य उशीरा कळते.

''दुखवटयासही येथे मुखवटे, मरण हे फक्त 'सभेचा विषय'
मरणामागे घरी तशी दारी अशी हलकट हेलकावे लय'' [६]

(मी एकटा निघालो — किती, पृ. ४५ ) अशा दुतोंडी माणसाविषयीचा संताप स्वाभाविकच ठरतो. स्वत:च्या स्वार्थापलीकडे न पाहणारी माणसे समाजात राहूनही समाजापासून विन्मुख राहतात,त्यांच्याविषयीही कवीची प्रतिक्रिया बोलकी आहे.

''नच वाचवे तयांना
गाथा कफल्लकाची

माझ्याही अक्षरांना
मरता कधी न आले''[७] (मी एकटा निघालो–कधी न आले,पृ. ४५) दु:खाकडे, जखमेकडे पाहण्यासाठी वेदनेचे कढ सोसले असले पाहिजे तरच खपली उघडल्यानंतर रक्तस्त्राव होताना जखमेला किती वेदना होतात, हे लक्षात येते. त्यासाठी संवेदनशीलता अधिक महत्त्वाची ठरते. अर्थात ढोंगीपणाचे आयुष्य अल्प पण शब्दाचे सामर्थ्य अफाट असल्याची जाणीव कवीला आहे. आजच्या समाज वास्तवाचे यथार्थ चित्रण कवीने केले आहे. सत्तेचे गुलाम,प्रतिष्ठित श्रीमंत, गरीबांचे शोषण करूनच मोठे होतात. त्याविषयीची कडवट प्रतिक्रिया देताना कवी म्हणतात,

'' तोऱ्यात चाललेला
तांडा प्रतिष्ठितांचा ...
गोळा करावयाला
तपशील फाटक्यांचा ...
तांडा तसा तपस्वी
उस्ताद उत्तरांचा
पुसताच प्रश्न करतो
वर्षाव आकडयांचा''[८] (मी एकटा निघालो – तांडा, पृ. ८५) सत्तापिपासू माणसांची सामान्यांविषयीची संवेदनाशून्य जाणीव येथे प्रखरतेने प्रकट होते. राजकीय आणि सामाजिक व्यंगावर देखील गिरींनी सडेतोड लेखन केले आहे. उपहास,उपरोध,विडंबन या आयुधांचा वापर करत कवीनी अनेक सामाजिक समस्येवर अचूक बोट ठेवले आहे.

समाजातील बेबंदशाही, स्वार्थी, हेकेखोर प्रवृत्ती, हेवेदावे यांनी बरवटलेली समाजव्यवस्था यामुळे व्यथित झालेले कवीमन माणसातील माणुसकीवर, मानवतेवर विश्वास बाळगून आहे. अजूनही सारे काही सुरळित होईल असा आशावाद हा कवी आळविताना दिसतो. म्हणूनच –

'' जरी सत्याचे गगन ग्रासिले,
अजस्त्र काळया क्रूर ढगांनी
वसुंधरेला स्वार तमाचे अन्
चिरडित चालले इमानी
अधुन मधुन तरी उजेड उधळित
वीजही वत्सल उजळत आहे ।
अजून माणूस ' माणूस ' आहे ''[९]
(मी एकटा निघालो – अजून माणूस 'माणूस' आहे, पृ. ५५)

माणुसकीविषयी असलेली श्रद्धाच कवीला जगण्याचे बळ देते,ती त्याला पराभूत होऊ देत नाही. माणुसकी जगली तरच माणूसही जगेल,नाही तर नि:ष्प्राण झालेल्या कलेवरासारखी अवस्था होईल. मानवता,माणुसकी हेच जीवनातील अंतिम सत्य आहे. कितीही विवंचना आल्या,विविध संकटांनी आपले अजस्त्र बाहू पसरले, सृष्टीच्या नियमाप्रमाणे परिवर्तन घडेलच । उद्याचा दिवस आजच्याहून उत्साहवर्धक व गतिमान असेल हा आशावाद बोलका आहे. प्रस्थापितांची निरंकुश सत्ता उलथून पडेल व शोषित–पीडितांच्या जीवनाला नवीन आकार मिळेल.जीर्ण झालेले मोडून पडते तिथेच नवनिर्माणाला प्रारंभ होतो.

'' सा–याच चौकटी हया
आल्या तुटावयाला
सारेच फोड आता
आले फुटावयाला''[१०] (मी एकटा निघालो – चौकटी आहे, पृ. ८७)

मानवाच्या आयुष्यातील अंधार संपेल व नव्या युगाला प्रारंभ होईल, हा आशावादच त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे.

'' वस्तीत सज्जनांच्या
मी एकटा मवाली
पुसतात चंद्र–तारे

माझीच पण खुशाली''[११] (मी एकटा निघालो – माझ्या युगात येत्या पृ. ७३) समाजात परिवर्तनाचा ध्यास ज्यांनी घेतला त्याला लोक 'वेडा'च म्हणतात.पण त्याचे हे वेडही पुढीलांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. उपहासात्मक, झपाटून टाकणारी अभिव्यक्ती,काव्यात्म शैली हा गिरींच्या कवितेचा वृत्तिविशेष म्हणावा लागेल. गिरींच्या कवितेचे अभ्यासक,डॉ. श्रीकांत तिडके म्हणतात, '' गिरींच्या कवितेजवळ पाहण्याचा उत्स्फूर्त दृष्टिकोण नाही'' हे त्यांचे मत मान्य करण्यास जड जाते. 'आग' या कवितेतील भावना व्यक्त करताना विडंबनात्मक पद्धतीचा गिरींनी वापर केला आहे.

'' उरा पोटातील जागवावी आग
मग अग्निराग उगारावं ''

हे उल्लेखनीय असले आणि गिरींना उद्याच्या समाजाचे स्वप्नचित्रही सुंदरतेने रेखाटता येत असले तरी गिरींची कविता सामाजिक वास्तवाचे भान ठेवणारी आहे, असे म्हणता येत नाही. हे टीकाकारांचे मत गिरींच्या सामाजिक आशयाच्या कविता पाहिल्यानंतर स्वीकारणे जड जाते. गिरींची कविता डंका,तुतारी सारखी जरी प्रभावी आणि परिणामकारक नसली तरी समाजातील दु:ख, दारिद्रय आणि अनेक पडझडींनी अस्वस्थ होणारी, सभोवतालच्या दु:खाने गदगदणारी गिरींची कविता आहे.

गिरींच्या कवितेला समाज वास्तवाचे भान नाही, असा आरोप त्यांच्या कवितेवर नेहमी केला जातो. पण तो बरोबर नाही. त्याचे कारण त्यांची कविता ऊर्ज्वस्वरात समाजस्थितीवर भाष्य करीत नसली, विद्रोहाची भाषा बोलत नसली तरी उद्याचा आशावाद व्यक्त करणारी आहे. किंबहुना, स्वातंत्र्योत्तर काळातील गिरींची कविता सामाजिक निरभ्रतेचे भान जपणारी कविता आहे,असे निश्चितच म्हणता येते. गिरींच्या कवितेने समाजमनस्कतेचे दर्शन घडविले आहे. परंतु या व्यापारातून कवीला क्रांतीचा झेंडा किंवा निशाण मात्र फडकविण्याचा इरादा नाही. गिरींनी कवितेचे माध्यम या व्यापारासाठी कधीही वापरले नाही. तांबे,बोरकर,पाडगावकर,बालकवी या कवींप्रमाणेच गिरीची कविता आगळी–वेगळी दिसून येते. कारण सफलता हे गिरींच्या कवितेचे ध्येय नसून, आर्त हृदय स्पंदनाची ती कविता आहे. म्हणूनच ' 'मी एकटा निघालो'गिरींच्या पहिल्या कवितासंग्रहाला पुरस्कार लिहिताना शिरीष पै म्हणतात,''... प्रतिकूल परिस्थितीच्या 'पियानोवर'त्यांनी छेडलेली ही 'जीवनाची जयजयवंती'रसिकांच्या जिव्हारी जाऊन बसलेली ... निखळ भावकवितेबरोबरच सामाजिक जाणिवांचेहि निरभ्र भान त्यांच्या कवितेला आहेच.''[१२] ही त्यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. गिरींच्या कवितेतील सामाजिक आशय त्यांच्या तांडा, यादी, चौकटी, कधी न आले, माझी फुले विचारी, चंद्रगीत , दुरावे, यादी, दोन कविता, आयुष्य इ. अनेक कवितांमधून अतिशय प्रभावीपणे अभिव्यक्त झाला आहे. गिरींच्या काव्यात सामाजिक जाणीवा ओढून ताणून येत नाही तर अंत:करणाच्या उमाळयातून त्या सहज उतरतात. म्हणूनच गिरींची सामाजिक कविता वास्तविकता आणि यथार्थता यांचे चित्रण करणारी कविता ठरते.

## निष्कर्ष :

१. गिरींची कविता वास्तवतेशी नाते सांगत समाजमन अभिव्यक्त करते.

२. त्यांची सामाजिक कविता संख्यात्मक दृष्टया अल्प असली तरी प्रभावी शैलीमुळे रसिकमान्य ठरली आहे.

३. गिरींच्या कवितेने विद्रोहाची,बंडखोरीची भाषा केली नसली तरी सात्त्विक संतापाने विरोधी सूर आळविला आहे.

४. प्रथितयश कवींच्या कवितेचे अनुकरण न करता स्वतंत्र बाण्याची कविता हे तिचे वैशिष्ट्य आहे.

५. मर्ढेकरी युगाच्या झंझावातातही या कवितेने आपले वेगळेपण जपले, हा तिचा उल्लेखनीय विशेष मानावा लागेल.

## संदर्भसूची :

१. लोकमत, श्रीकांत तिडके, 'मराठी कवितेतील चंद्रकंस : उ.रा.गिरी', साहित्यजत्रा, रविवारची पुरवणी, ५/९/१९९७

२. मी एकटा निघालो, सर्वांगीण विवेचन व अभ्यास, वैभव प्रकाशन, महाल नागपूर १९९१ पृ. ४

३. उ.रा. गिरी, मी एकटा निघालो, अंशुल पब्लिकेशन्स्, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९०, प्रकाशिका – सौ. शशिकला मोहाडीकर पृ. २६

४. तत्रैव, मुत्सद्दी, पृ. ४४

५. तत्रैव, मुत्सद्दी, पृ. ४४
६. तत्रैव, किती, पृ. ४५
७. तत्रैव, कधी न आले पृ. ४५
८. तत्रैव, तांडा पृ. ८५
९. तत्रैव, अजून माणूस माणूस आहे पृ. ५५
१०. तत्रैव, चौकटी पृ. ८७
११. तत्रैव, माझ्या युगात येत्या पृ. ७३
१२. उ.रा. गिरी, मी एकटा निघालो, अंशुल पब्लिकेशन्स्, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९०, प्रकाशिका, सौ. शशिकला मोहाडीकर मलपृष्ठावरील पुस्कार – शिरीष पै

❖❖❖

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील 'स्त्री' जाणीव एक शोध

डॉ. मिलिंद कांबळे
विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर, जि. वर्धा, महाराष्ट्र (India) ४४२ ३०५
भ्रमणध्वनी ९७६५७६८८३२

## प्रस्ताविक :—

अण्णाभाऊ साठे यांचे नाव आज साहित्य वर्तुळात मोठ्या दिमाखाने घेतले जाते. पण एक काळ असा होता की, अण्णा भाऊ साठे यांचे नाव घेताच पांढरपेशी समाजातील माणसांच्या नकळत भुवया उंचवायच्या, त्यांना शिसारी येत. कारण ते मातंग या उपेक्षित जातीत जन्मल्यामुळे त्यांचे मानवी मूल्य असणारे, स्त्री जाणीव असणारे साहित्य बराच काळ सामान्य वाचकापर्यंत पोहचण्यास वेळ लागला. अर्ध्या हळकुडांने पिवळे झालेल्या समीक्षकांनी त्यांचे साहित्य नाकारले. परंतु त्यांच्या तमाम महाराष्ट्रातील वाचकांनी त्यांना आणि त्यांच्या साहित्याला वाचले नव्हे तर मनाच्या गाभाऱ्यात बंदिस्त केले. केवळ त्यांच्या ठायी असणाऱ्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वामुळे त्यांचे साहित्य महाराष्ट्राच्या प्रत्येक घरात पोहचले. अण्णाभाऊ साठे यांनी समतोलपणे कथा, कांदबरी आणि काव्यातुन स्त्री प्रश्न मांडले. स्त्रीमनाचा शोध त्यांनी जीवनाशी बांधील होऊन घेतला साहित्यातून स्त्री दु:ख जगाला दाखवले, मांडले.

लोकलेखक अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ मराठी माङमय विश्वाचा भाग नाही तर ते संस्कृतीच्या संचिताचा भाग अभिन्न बनले. लेखकाला समाजाबद्दल मूलभूत आस्था असायला पाहिजे, लेखकांचे समाजावर प्रेम असायला हवे तरच या समाजातील विसंगती त्याला व्यथित करते. विसंगती, शोषण, दु:ख दुर करण्याच्या विचाराने तो प्रेरित होत असतो. समाज बदलला पाहिजे या भावना त्याच्या मनात उत्पन्न होत असतात. अण्णभाऊ साठे यांच्यातला लेखक असाच जन्माला आला.

अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाची सुरुवात १९४२ सालापासून झाली. खरे पहाता मराठी सारस्वतांना जी पात्रे वाचतांना अंगावर शिसारी येत अशी पात्रे त्यांनी आपल्या साहित्यातून उभी केली आणि साहित्य जगताला वास्तवाची जाणीव करुन देण्याचे काम केले. 'भाकरीचा संघर्ष आमच्या पाचवीला पूजला आहे, परंतु त्यासाठी मानवी मूल्याचा बळी देणार नाही' अशी ठाम भूमिका अण्णाभाऊंनी घेतली. त्यांच्या साहित्याला वास्तवाचा स्पर्श आहे. स्त्री प्रश्नाचा टाहो त्यांनी आपल्या साहित्यातून मांडला. साहित्याच्या वास्तवा संदर्भात साठे लिहितात, मी जे जीवन जगले, अनुभवले तेच मी लिहिले, मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्याबाबतीत मी स्वत:ला बेडुक समजतो' असा वास्तवदर्शी विचार मांडणारा लेखकच 'स्त्री' प्रश्न मांडू शकतो.

अण्णाभाऊ साठे अष्टपैलू लेखक होते. त्यांनी बरबाद्या कंजारी, निखारा, नवती, आबी, फरारी, भानामती, लाडी कृष्णकाठच्या कथा, खुंळवाडी, गजाआड, गुऱ्हाळ इत्यादी कथासंग्रह तसेच फकिरा, आग आघात, अहंकार, कुरुप, चित्रा, वारणेच्या खोऱ्यात, संघर्ष, चंदन, मूर्ती, मास्तर, वैर, चिखलातील कमळ, माकडीचा माळ, वैजयंता, वरणेचा वाघ इतयादी जिवंत कांदबऱ्या लिहिल्या या शिवाय तीन नाटके, एक शाहीरी, चौदा लोकनाटय, दहा पावाडे आणि एक प्रवासवर्णन इत्यादी साहित्यातून त्यांनी स्त्री जाणिवा व्यक्त केल्या. अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यातून जितक्या जास्त प्रमाणात पुरुष नायकांना साहित्यांचे केंद्र बनवले तितक्याच प्रमाणात त्यांनी स्त्री नायकांना प्रकाशात आणले. त्यांना माणूस म्हणून मराठी साहित्य प्रांतात उभे केले. स्त्रीच्या वाटयाला येणारे दु:ख परंपरेने दिलेल्या वर्तुळात आपल्या कुटुंबाला सांभाळणे. पुरुषी जाचात होणारी कुचंबणा, स्त्रीचे निसर्गाने बहाल केलेले बाईपण साठेंनी साहित्यातून मांडले. त्यांनी त्यांच्या कादंबऱ्यातून बाणेदार, कणखर आणि चरिज्यसंपन्न स्त्री नायकांना उभे केले. चित्रा, फकिरा, वैजयंता वारणेच्या खोऱ्यात, माकडीचा माळ, रुपा, चिखलातील कमळ या कादबऱ्यातील स्त्री व्यक्तीरेखा दमदारपणे उभ्या केल्या.

'चित्रा' कांदबरीतील नायका चित्रा अथवा सोना असो, फकिरातील राधा अथवा राठीबाई असो त्यांच्यावर आपल्या पुरुषप्रधान समाजाने केलेला जीवघेणा अन्याय, अत्याचार त्यांनी हसतमुखाने पचवला. अण्णाभाऊच्या साहित्यातल्या स्त्रीया मरणयातना सहन करुनही त्यांच्या मनात प्रेम,दया, करुणा, नम्रपणा आढळतो. त्यांचा स्वाभिमानीपणा जणू बोलका वाटतो. त्यांनी स्त्रियांना साहित्यातून कधीही नागडे केले नाही.

बाइचे बाईपण त्यांनी सौदर्यावाण बनवले. 'चिखलातील कमळ' कांदबरीद्वारे त्यांनी उपेक्षित स्त्री उभी केली. स्त्रीला वासणी, चवचाल, हडळ, पुरुषांना भुलवणारी रांड म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. अण्णा भाऊंच्या काही कांदबऱ्या नायिकाप्रधान आहेत. त्यात चंदन, फुलपाखरु, चित्रा रत्ना, वैजयंता, चिखलातील कमळ टिळा लाविते मी रक्ताचा, आवडी हया कादंबऱ्यामधील नायिका स्त्रियांचे प्रश्न उपस्थित करतात. अलगुज, अहंकार, राणगंगा, संघर्ष या कादंबऱ्यातील नायिका पवित्र प्रमाचे दर्शन घडवतात. कामगार, दलित, शेतमजुर, कष्टकरी, झोपडीतील उपेक्षित नायका अण्णाभाऊने साकारल्या आहेत. निल्ली, रंभा,आंबी, मंगला बिलवरीसारख्या नायिकांना अण्णाभाऊने साहित्यातून अजरामर करुन सोडले.

'चिखलातील कमळ' मधील सीता बाणेदारणे आई आणि लव्हाजी वघ्याला सवाल करत म्हणते, 'ज्या देवाचं आईशी लग्न होतं. त्याच देवाचं तिच्या मुलाशी हाऊ शकतं का? एकदा देवाशी लग्न लावलं म्हणजे तिला माणसांशी लग्न करता येत नाही का? मग तिनं काय करायचं ? जर ती देवाची हक्काची बायको ठरते तर मग तिच्या मनाची तृप्ती कशी होणार'? असे माणसाच्या मनाला हादरुन सोडणारे, विचार करायला लावणारे प्रश्न सीता उपस्थित करते. अण्णाभाऊनी लेखनाच्या ओघात स्त्री वर्गाला केव्हाच झुकते माप दिले नाही. स्त्री वर्गाबद्दल त्यांच्या अंत:करणात. असलेली अपार कणव, तिच्या अंतर्मनातील अतिसंवेदनशील दु:ख त्यांच्या मनात कोरले जाते. स्त्रिच्या वेदना, ते शब्दात पकडतात आणि शब्दाला जिवंत करतात. वेश्या स्त्रीचे प्रश्न तोल न जाऊ देता करतात. त्यांच्या कांदबऱ्यातील नायका आपले स्वत्व जपण्यासाठी कसल्याही प्रकारची तडजोड करतांना दिसत नाही. तिला तिचे चारिव्य जिवापेक्षाही प्रिय वाटते. त्यासाठी प्राण गेला हरकत नाही. पण चारिव्याला डाग लागता कामा नये. स्त्रीचे अनेक रुप , अनेक पद त्यांनी साहित्यातून उभे केले.

## निष्कर्ष :—

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेली स्त्री जाणीव शोधता आली. समकालीन साहित्यांच्या तुलनेत अणाभाऊ साठेंच्या साहित्यांच्या वेगळेपणाचा मांडता आला अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवी मूल्य जाणिवांचा अभ्यास करणे, साठेच्या समग्र साहित्यातुन उमटणारी स्त्री जाणीव स्पष्ट झाली. अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातील संघर्षशील, स्वाभिमानी, लढाउवृत्तीच्या नायिकांचा शोध घेता आला. भूक आणि स्त्री प्रश्न यांचा मागोवा घेता आला. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील संघर्षशील स्त्री, समता, न्याय, स्वातव्य, बंधुत्व मानणाऱ्या स्त्रीयांचा आढावा घेतला. इत्यादी विषयाला अनुसरुन निष्कर्ष काढता येतील, असे मला वाटते आहे.

## संदर्भसूची

१. अण्णभाऊ साठे निवडक वाङ्मय, महाराष्ट्र शासन मुंबई.
२. डॉ. संदा कऱ्हाडे, अण्णाभाऊंचे कथाविश्व, प्रगत साहित्य सभा, मुंबई १९७०
३. डॉ. नागोराव कुंभार (संपा) शाहीर अण्णाभाऊ साठे, प्रबोधन प्रकाशन, लातूर
४. नानासाहेब कठाळे, अण्णाभाऊ साठे: जीवन आणि साहित्य, समता प्रकाशन, १९९६
५. आसाराम गायकवाड (संपा) लोशाहीर तथा लोक लेखक अण्णाभाऊ साठे, झोप प्रकाशन १९९६
६. बापुराव गुरव, अण्णाभाऊ :समाजविचार आणि साहित्य विवेचन, लोक वाङमय ग्रह. मुबई १९९१
७. प्रा. कांबळे मिलिंद, अण्णाभाऊ साठे साहित्य आणि समीक्षा, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०११
८. मा. ह. लांडगे, अण्णाभाऊ साठे, निर्मल प्रकाशन, नांदेड
९. किशोर जाधव, निळ्या आकाशातील लाल तारा: कॉम्रेड अण्णाभाऊ साठे : साहित्य आणि राजकारण, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, १९९५
१०. शंकरभाऊ साठे, माझा भाऊ अण्णाभाऊ, सुगावा प्रकाशन पुणे

❖❖❖

# पंडित नेहरू आणि महात्मा गांधी : स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय भूमिका

डॉ. कविता राजेंद्र तातेड
इतिहास विभाग प्रमुख
लो.ना. बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ, महाराष्ट्र (India) ४४५ ००१
भ्रमणध्वनी ९४२२६५३३९०

## प्रस्तावना —

''शौर्याच्या तुलनेत त्याला कोणाचीही तोड नाही
त्याच्या राष्ट्रप्रमाची बरोबरी कोण करू शकेल ?
तो एक स्फटिक आहे, पुरता शुद्ध व शुभ्र
त्याचे सत्याचरण तर पूर्णपणे संशय रहित आहे
भारताचे भवितव्य तर त्याच्या हातात सुरक्षित आहे !''

भारताचे प्रथम प्रधानमंत्री आणि आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून सुपरिचित पंडित जवाहरलाल नेहरू विषयी महात्मा गांधी यांनी व्यक्त केलेले हे मत आहे. पं. नेहरू व गांधीजींची पहिली भेट १९१६ च्या लाहोर अधिवेशनात झाली. भारतीय राजकारणात ही जोडी गुरूशिष्य म्हणून ओळखली जात असली तरी शासन व्यवस्थेच्या बाबतीत दोघांच्याही मतांमध्ये अंतर होते. ज्ञानयुगाच्या तसेच प्रबाधनाच्या प्रेरणेतून नेहरूंची जडणघडण झाली होती. बुद्धिवाद, मानवता, व्यक्तिविषयी आदर, स्वातंत्र्य व धर्मनिरप्रेक्षता, या तत्वांशी त्यांची बांधिलकी होती. लोकशाहीचा समाजवादाशी मेळ घालतांना नेहरूजींनी स्वातंत्र्य आंदोलनात जहाल—मवाळ व क्रांतीकारी विचारांमध्ये समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या अर्थाने पंडित जवाहरलाल नेहरू प्रखर राष्ट्रवादी, स्थिर शासन व्यवस्थेचे समर्थक आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करणारे विचारक असल्याचे जाणवते.

## उदारवादी आंदोलन व नेहरू —

दि. २४ डिसेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे संपन्न घराण्यात जन्मलेल्या जवाहरलाल यांना ब्रिटीश शिक्षण पद्धतीतील उत्तामोत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न पं. मोतीलाल नेहरू यांनी केला. उच्च शिक्षण घेऊन भारतात परत आल्यावर अलाहाबाद मधील मध्यमवर्गीय जीवनपद्धतीत ते सहजपणे मिसळून गेले. वडिलांच्या कचेरीत ते बसू लागले, पण वकिली व्यवसायाबाबत त्यांनी खूप उत्सुकता दर्शविली नाही. इ.स.१९१९ मध्ये पं. मोतीलाल यांनी काढलेले वर्तमानपत्र 'द इंडिपेंडेन्ट' चालविण्याला त्यांनी हातभार लावला. मात्र आपल्या मानसिक व भावनिक समाधानासाठी जवाहरलाल यांनी म. गांधींच्या हाकेला राजकीयच नव्हे तर मानवीय पातळीवरही प्रतिसाद दिला. म्हणूनच अनेक वर्षानंतर आपल्या कार्याचे सिहांवलोकन करतांना त्यांनी म्हटले की, 'गांधीच्या नेतृत्वाचा स्वीकार त्या पाठोपाठ सविनय कायदेभंग व तुरूंगवास यांनी मला माणूस बनविले.'[१]
विद्यार्थी दशेपासूनच आपली ओढ समाजवादाकडे असलचे नेहरूंनी आत्मचरित्रात म्हटले आहे. परंतु नेहरूंचा समाजवाद गांधीजींच्या नैतिक, अध्यात्मिक संकल्पनेपेक्षा वेगळा असून तो अधिक फलीतवादी व शास्त्रीय स्वरूपाचा होता. त्यांच्यामते 'लोकशाही आणि समाजवाद या दोन्हींचा उद्देश विषमता नष्ट करून सामाजिक न्याय सुलभ करणे हा असल्याने त्या दोहोत अंतर्विरोध असण्याचे काहीच कारण नाही.' अशा प्रकारे सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात व्यक्तिची प्रतिष्ठा व देशाचा आत्माभिमान स्थापित करण्याचा नेहरूंचा दृष्टिकोन आधुनिक भारतीय राजकीय व्यवस्थेला आकार देणारा ठरला.

सुरुवातीच्या काळात जहालांना राष्ट्रीय सभेत प्रवेश न मिळाल्याने टिळक व ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेल्या होमरूल लीगचे महत्व लक्षात घेऊन जवाहरलाल यांनी संपयुक्त प्रांतात होमरूल लीगचे सरकार्यवाह पद भूषविले. त्यावेळी भूमिका स्पष्ट करतांना त्यांनी म्हटले की, 'नुसत्या विरोधी सभा व शिष्टमंडळ म्हणजे स्वप्नाळू आदर्शवाद होईल. आता गरज आहे ती सरकार आपली चुक सुधारेपर्यंत त्यांच्यांशी असहकार करण्याची'[२] या आदेशावरून असे दिसते की, ते कृतीसाठी आतूर झालेले होते. खरे म्हणजे दुसरे काही सूचन नसल्यामुळे त्यांचे

मन मवाळांच्या चाकोरीत फिरत राहिले असले तरी होमरूलचे समर्थन करायला इंग्लडला निघालेल्या शिष्टमंडळांना सरकारने परवानगी नाकारल्यावर जवाहरलालांनी त्याला आक्षेप घेऊन उउदाखादी धोरण बदलण्याचा पवित्रा घेतला.''[३]

## ब्रिटीश दडपशाहीचा विरोध –

जालियानवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी कॉंग्रेसच्या चौकशी समितीला मदत म्हणून अमृतसर व पंजाबमध्ये फिरून जबान्या घेतल्या. प्रत्यक्ष गोळीबार, लष्करी कायद्याच्या आधारे केलेले अत्याचार व इंग्रज सैनिकांचे एकूण गैरवर्तन या विषयी माहिती गोळा केली व पिडीतांना सहाय्य करण्याच्या कामातही मदत केली. अलाहाबाद सेवा समितीच्या माध्यमाने दु:ख निवारण्याचे काम संघटित करण्यासाठी आपल्या बरोबर त्यांनी काही स्वयंसेवकांना पंजाब मध्ये नेले.[४] हा दृष्टिकोण नेहरूंजीच्या जहालवादी विचारांना समर्थन देणारा होता.

गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार चळवळीला पूरक भूमिका स्वीकारून जवाहरलाल यांनी संयुक्त प्रांतामध्ये स्थानिक संघटना व स्वयंसेवकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न ही सुरू केला. इटा जिल्हा राष्ट्रभाषेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी भाषण करतांना प्रांतातील शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोत्रडून त्यांनी खेड्यखेड्यतून किसानसभा स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. जवाहरलालांना वस्तुत: किसानांचा असंतोष राष्ट्रीय राजकारणाशी जोडता येण्याची आशा वाटू लागली होती. म्हणूनच १९२० मध्ये त्यांची शक्ती असहकाराच्या चळवळीशी जोडण्याचे जवाहरालालांचे प्रयत्न सुरूच राहिले.[५] ''जवाहरलाला यांनी कॉंग्रेस व खिलाफत चळवळ भक्कम करण्यासाठी सुयुक्त प्रांतातील जिल्ह्यात दौरे काढले''[६] या कालावधीत जवाहरलाल स्वदेशीचे व परदेशी कापडावरील बहिष्काराचे कट्टर पुरस्कर्ते बनले होते. ऑक्टोंबर १९२१ च्या संयुक्त प्रांताच्या राजकीय परिषदेत त्यांनी स्वदेशी बद्दलचा ठराव मांडला. स्वराज्य मिळविण्यासाठी व ते टिकविण्यासाठी ते स्वदेशी कापडाचा वापर योग्य मानीत होते.''[७] स्वदेशी चळवळीचा प्रसार करीत असतांना शिकारपूर येथील भाषणात सरकारविरूद्ध वक्तव्य दिल्याने सरकारने त्यांना तंबी दिली असतांना आपल्या उत्तरात जवाहरलालांनी पोलीसांच्या अहवालाच्या अचूकपणाबद्दल शंका व्यक्त केली व दिलगिरी प्रकट करण्याचे व कोणतेही बंधन घालून घेण्याचे नाकारले. 'आपण जर काहीही असत्य अथवा अतिरंजित विधान केले असेल तर आपण माफी मागू ती जनतेची' असे मत त्यांनी व्यक्त केल्याने संयुक्त प्रांत स्वयंसेवक समितीचे नियंत्रक म्हणून ५ डिसेंबर १९२१ मध्ये त्यांना अटक करण्यात आली''[८]

इ.स. १९२२ मध्ये असहकार चळवळ स्थगित झाल्यावर गांधीजीवर अहमदाबाद येथे खटला भरला गेला असतांना जवाहरलाल तेथे हजर राहिले. यानंतर त्यांनी संयुक्त प्रांतात सुतकताई बहिष्कार आणि निरोधनाची कामे संगठीतपणे केली. पण हे प्रचारकार्य सरकारच्या लक्षात आल्याने जवाहरलाल यांना वैयक्तिक कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची आवश्यकता भासू लागली.[९] सरकारकडून झडतीचे सत्र सुरू असतांनाच जवाहरलालांनी कॉंग्रेस समित्यांना उद्देशून एक परिपत्रक काढले. त्यांच्या एका आठवड्यनंतर भाषणे व लेखांच्या माध्यमातून निरोधनाचा (पिकेटींग) प्रचार केल्याबद्दल त्यांना १२ मे १९२२ रोजी अटक झाली. मात्र आपली बाजू मांडायला, साक्षीदारांची उलटतपाणी घ्यायला किंवा कुठलाही बचाव करायला त्यांनी असहाकराच्या भूमिकेतून स्पष्टपणे नकार दिला. यावेळी त्यांनी केलेले निवेदन सुशिक्षित भारतीय युवकांचा जाहिरनामा बनले. ''आमच्या साधुतूल्य व लाडक्या नेत्याला तुरूंगात टाकल्यापासून तुरूंग हा खरे म्हणजे आम्हाला स्वर्ग होऊन बसला आहे, यात्रेचे एक पवित्र स्थान बनला आहे. आपल्या ध्येयासाठी किंवा उज्वल स्वप्नाच्या पूर्तीसाठी हालअपेष्टा सहन करणे किंवा मरण येणे याहून कुठले मोठे भाग्य भारतीयाला लाभण्याजोगे आहे ?'' ब्रिटीशांच्या अन्यायकारी धोरणाला विरोध करणारे जवाहरलाल स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय असल्याचे दिसते.

## प्रशासकीय दृष्टिकोण –

एप्रिल १९२३ ते एप्रिल १९२५ पर्यंत अलाहाबाद नगरपरिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत असतांना स्थानिक कामाच्या हाताळणीत जवाहरलाल यांची विधायक दृष्टी व कार्यक्षमता सिद्ध झाली. अध्यक्ष म्हणून ते आपल्या सहकाऱ्यांना आपल्या सोबत खूप काम करण्यास भाग पाडीत. काही सभासदांच्या आळशीपणा बद्दल कानउघाडणी करणारे एक जाहीर निवेदनही त्यांनी काढले.[१०] त्यांच्या प्रभावाचे रहस्य त्यांच्या सहज प्रतीत होणाऱ्या प्रामाणिकपणात होते. म्हणूनच संयुक्त प्रांतामधील इतर दहा नगर पालिका मंडळाच्या अध्यक्षाशी

विचारांची यंत्रणा कायम ठेवून त्यांनी स्थानिक विकासात मोलाचे योगदान दिले. डिसेंबर १९२४ मध्ये अलीगढ येथील नगर पालिका परिषदेचे ते अध्यक्ष म्हणून निवडल्या गेले. राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय कार्याची सुरूवात नगरपालिकेच्या स्तरावरून होऊ शकेल हा दृष्टीकोन त्यांनी मांडला म्हणूनच आयुक्तांनीही व संप्रा सरकारनेही नगर पालिका सुधारणेचे श्रेय नेहरूजींना दिले.[११]

इ.स. १९२७ मध्ये ब्रुसेल्स येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झाल्यानंतर जवाहरलाल भारतात आले तेव्हा क्रांतिकारक परिवर्तनाचा निर्धार त्यांनी केला होता व संपूर्ण स्वातंत्र्य हे साध्य ठरवून त्यासाठी मोहीम सुरू केली. सर्वपक्षीय परिषदेतून तयार झालेली घटना समिती समोर वसाहतीच्या स्वराज्याच्या ठरावाच्या स्विकाराविरूद्ध जवाहरलाल यांनी आपला विरोध वारंवार नोंदविला. आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी त्यांनी 'इंडिपेडन्स फॉर इंडिया लीग' ही संघटना उभारली. या संघटनेचा उद्देश राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती बरोबर प्रजासत्ताक व समाजवादी शासनाची स्थापना करने हा होता.[१२]

इ.स. १९२७ च्या सायमन कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नसल्याने त्या विरोधात बहिष्काराचे तंत्र प्रभावी करण्यात राष्ट्रसभेचे सेक्रेटरी जनरल म्हणून त्यांची भूमिका लक्षणीय ठरली.[१३] २९ डिसेंबरला लखनऊ येथील मिरवणुकीत त्यांच्यावर लाठीहल्ला झाल्याने दुखापत झाली व भारतभर क्रोधाचा डोंब उसळला. सायमन कमीशनच्या घटनेतील नेहरूजींचा दृष्टिकोण त्यांच्या राष्ट्रीय हिताच्या प्रयत्नांची साक्ष देतो.

इ.स. १९२९ च्या लाहोर अधिवेशनात जवाहरलालांच्या अध्यक्षतेखाली २६ जानेवारी हा स्वातंत्र्य दिन म्हणून भारतभर साजरा करण्याची योजना तयार करण्यात आली. महात्मा गांधी व जवाहरलाल यांनी तयार केलेल्या मुसद्याप्रमाणे प्रत्येकाने स्वातंत्र्याची शपथ घ्यावी असे आवाहन करण्यात आले. णहात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत जवाहरलाल यांनी सक्रिय सहभाग घेतल्याने दि. ११ एप्रिल १९३० रोजी त्यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली तेव्हा नैनी तुरूंगातील बंदिवासात पत्ररूपाने जगाचा इहिास लिहिला. ही पत्रे 'ग्लिम्पसेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री' या स्वरूपात प्रकाशिथ झाली. तत्पूर्वी त्यांनी जाहिर केले होते की, 'जिल्हा व शहर राष्ट्रसभा समित्या शेतसारा, खंड व आयकर न भरण्याची कारवाई संघठीतपणे करतील.' राजद्रोह व मीठ तयार करण्याचा व करबंदीला चिथावणी देणे या आरोपाखाली त्यांच्यावर खटला झाला व सक्तमजुरीची शिक्षा झाली.[१४] विविध आंदोलनातील त्यांचा सहभाग राष्ट्रीय नेतृत्व असण्याची क्षमता सिद्ध करतात.

## गांधीवादी विचारांचे समर्थन —

गांधी विचार दर्शन आत्मसात करूनही विचारांची भिन्नता म्हणून महात्मा गांधी इर्विन वाटाघाटीबाबत जवाहरलाल असमाधानी असून त्यांना ती अकारण पत्करलेली शरणागती वाटली. हिंसाचाराचा आरोप नसलेल्या लोकांनाच शिक्षेतून माफी व अन्य अटीच्या मोबदल्यात सविनय कायदेभंग थांबविण्यास गांधीजी कबूल झाले. पण सर्व राजकैद्यांची मुक्तता, गोलमेज परिषदेत सहभागी होण्यापूर्वी होणे गरजेचे होते असे त्यांचे मत होते.[१५] तरीही कराची अधिवेशनात मुलभूत अधिकारा बाबतचा ठराव जवाहरलालांनी मांडला. या ठरावातून शेतकरी आणि कामगार यांच्या हिताचे लक्षणीय कार्यक्रम साध्य करता आले नसल्याची जाणीव त्यांना झाली असली तरीही आर्थिक धोरणाची निकड मान्य करणारे ठराव या दृष्टीने जवाहरलालांनी त्याचा पुरस्कार केला.

अशा प्रकारे राजकीय तडजोडीतून जी चार पावले माघार पत्करावी लागली तिची भरपाई केवळ मूलभूत हक्काविषयीच्या ठरावाने होणार नाही. याची जाणीव त्यांना होती. स्वातंत्र्याचा लढा हा वस्तुत: स्वातंत्र्य मिळविण्यानेच संपणार आहे हे या लढ्यचे तर्कशास्त्र जाणून जनतेची राष्ट्रीय वृत्ती कायम टिकविणे व पक्षाची एकजूट अभंग राखणे व महात्मा गांधीच्या नेतृत्वानुसार वागणे हे या इ.स. १९२० ते १९३१ या काळातील जवाहरलाल यांचे कर्तव्य असल्याचे दिसून येते.[१६] इ. स. १९३२ मध्ये जातीय निवाडा घोषित होताच गांधीजींनी उपोषणास प्रारंभ केला. तेव्हा काही काल जवाहरलाल अस्वस्थ झाले. मात्र गांधीजींनी त्यांना तार पाठवून त्यांच्या मनाचा तोल सावरण्यास मदत केली. इ.स. १९३३ मध्ये गांधीजींनी आत्मशुद्धीसाठी उपोषण आरंभ केले असतांना जवाहरलालांनी त्यांना संदेश पाठविला. तुमचा महान व साहसी प्रवास सुरू झालेला आहे मला निसंदिग्धपणे वाटत आहे की, काहीही घडले तरी यश तुमचच असेल. यावरून गांधीजीबद्दल त्यांच्या मनातील आदर प्रेम यांची साक्ष पटते. नेहरूंच्या राष्ट्रवादाचे एक भव्य व उदात्त वैशिष्ट्य म्हणजे स्वातंत्र्य हे त्यांचे ध्येय होते. वसाहतीच्या स्वरूपाचे स्वराज्य त्यांना नको होते. त्यांचा राष्ट्रवाद हा धर्मातीत होता. राष्ट्रवाद म्हणजे जगात सामुदायिक जीवन शक्य करणारे एक साधन म्हणून त्यांनी राष्ट्रवादाकडे पाहिले [१७] म्हणूनच नेहरू म्हणत असत कि 'धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्महीनता नव्हे तर सर्व धर्माप्रती समान आदरभाव राखणे व प्रत्येकाला समानसंधी प्राप्त

करून देणे होय.' मूलभूत अधिकारासाठी गठीत झालेल्या समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाची जोपासणा करण्याचे प्रयत्न केले. कदाचित समाजसुधारणा करण्यासाठी त्यांनी फारसे प्रयत्न केले नसले तरी पुराणमतवादाचा त्यांनी विरोध केला. लोकांबरोबर आपल्या विचारांची देवाण– घेवाण करण्यासाठी नेहरूंनी नियमित देशभर दौरे केले. १९२७ पासून त्यांच्याकडे आंतरराष्ट्रीय नामवंत लोकांच्या भेटी घेऊन त्यांचे समर्थन मिळविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. त्या दृष्टीने १९३८ च्या हरीपूर अधिवेशनात स्पेनच्या गृहयुद्धाच्या संदर्भात पंडित नेहरूंनी ठराव मांडला. यावरून त्यांच्या आंतरराष्ट्रीय संदर्भातील भूमिकेची माहिती मिळते.[१८]

## निष्कर्ष –

### १) वैचारिक भिन्नता परंतू कार्यात्मक समानता :–

इ.स. १९१९ ते १९३१ या कालावधीत राष्ट्रसभेच्या माध्यमाने जवाहरलाल राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात असहकार, सविनय कायदे भंग चळवळीत सहभागी झाले असले तरी जवाहरलाल व महात्मा गांधी यांच्या सार्वजनिक पावित्र्यामध्ये समान भूमिका नसल्याचे दिसून येते. त्यांच्या मते राष्ट्रीय सभेतून राजकीय , आर्थिक व जागतिक परिस्थितीला अनुसरून असलेल्या मुलभूत स्वरूपाच्या परिवर्तनाची गरज आहे. त्यासाठी ब्रिटीश साम्राज्यवादी सत्ता संपुष्टात आणायला हवी. भारतातील शेती व उद्योगधंद्यात आमुलाग्र बदल हवे पण हे विचार गांधीजींच्या दृष्टिकोनातून अगदीच वेगळे होते. इ.स. १९१९ ते १९३३ या काळात महात्मा गांधी ब्रिटीशांशी सलोख्याची बोलणी पुन्हा सुरू करायला बघत होते आणि आपल्या देशबांधवांचे वर्तन उपवासाच्या मार्गाने सुधारण्याचा प्रयत्न करीत होते. ज्याला वादविवादाची किंवा युक्तीवादाची गरज पडत नाही असे गांधीचे अंर्तज्ञानाचे राजकारण होते तर जवाहरलाल इतिहासाचे व परिवर्तनाचे नियम लावून बुद्धीचा मार्ग अनुसरूत होते. परंतू ब्रिटीशांशी लढा देतांना महात्मा गांधी आणि राष्ट्रसभा हे सर्वात प्रबळ असल्याची जाणीव जवाहरलालांना होती. म्हणूनच दोघांची भेट झाली असतांना महात्मा गांधीचे नेतृत्व स्वीकार करीत असल्याचे जवाहरलालांनी जाहीरपणे मान्य केले.

### २) समाजवादी विचारांचे पालन :–

गांधी व राष्ट्रसभा यांच्यापासून दूर न जाण्याचे ठरविल्यानंतर, अंतर्गत विद्रोहाचे त्यांनी कधीही कृत्य केले नाही. आपले मतभेद त्यांनी शब्दातून व्यक्त केले असले तरी राष्ट्रसभेचे धोरण व निर्णय स्वीकारून त्यानुसार कृती करावी हे त्यांनी ठरविले होते. समाजवादी विचारप्रणालीने प्रभावित असलेल्या जवाहरलालांच्या मनाचा कल मतप्रणालीला चिकटून राहण्यापेक्षा उदारमतवादी राहून समाजपद्धतीच्या मुळाशी भिडणारे जास्तीत जास्त बदल घडवून आणण्याकडे होतो. स्वतंत्र भारताच्या अंतर्गत क्षेत्रात प्रधानमंत्री या नात्याने त्यांनी मिश्र समाजवाद स्वीकारला.

जवाहरलालांना आलेला 'इंडिपेडन्स फार इंडिया लीग'चा अनुभव फारसा समाधानकारक नव्हता, तरीही १९३५ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून भाषण करतांना समाजवादी ध्येयाशी असलेली स्वत:ची भौतिक व भावनात्मक बांधिलकी स्पष्ट केल्याने राजकीय लढ्यतील प्रश्न आणि जनतेची भूमिका दृढ बनवायला मदत झाली होती. एकूण जवाहरलालांच्या विचारधारेने प्रभावित झालेला भारतीय समुदाय भारतभर होते. त्यांना आपल्या दृष्टिकोनाचे प्रतिनिधी मानीत होती. शिवाय जवाहरलाल हे त्या काळातील एक अशी व्यक्ती होती की, ज्यांना आंतरराष्ट्रीय वाचक व श्रोते लाभलेले होते. त्यांनी आपल्या संघटनेला जागतिक व्यासपीठ वरून मान्यता मिळवून दिलेली होती.

### ३) राष्ट्रवाद आणि स्वतंत्र भारत :–

भारताबाहेरच्या घडामोडीसंबंधात जवाहरलाल संपूर्णपणे एकरूप होऊ शकत असल्याने त्यांनी भारताची समस्या आंतरराष्ट्रीय संदर्भात ही मांडली. त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरीतून साध्य होणारा मार्ग एकच होता तो म्हणजे 'जागतिक सहकार्य व समान राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय समूह याकडे घेऊन जाणारा स्वातंत्र्यांचा, ब्रिटीश वर्चस्वापासून सर्वस्वी मुक्ततेचा मार्ग'. स्वातंत्र्याच्या उष:कालाचे स्वागत करण्यासाठी १४ ऑगस्टच्या मध्यरात्री घटना समितीच्या बैठकीच्या प्रसंगी त्यांनी घेतलेली शपथ म्हणजे भारतीय इतिहासातील स्वर्णक्षरांनी नोंद

झालेले सोनेरी पान आहे.'

''मानवी जीवनात असा एक क्षण येतो की, जेव्हा आपण जुन्यातून नव्यात प्रवेश करतो आणि असा क्षण इतिहासात क्वचितच येतो की, जेव्हा एका युगाचा अन्त होतो, आणि जेव्हा दीर्घ काळ दडपल्या गेलेल्या एका राष्ट्राच्या आत्म्याला अविष्काराचा वाव सापडतो. या पवित्र क्षणी भारताच्या सेवेप्रित्यर्थ व त्यांच्या जनतेसाठी आणि त्याहून विशाल अशा मानवतेसाठी स्वत:ला वाहून घेण्याची आपण शपथ घेणे उचित होईल.' या विधानावरून म. गांधींचा अहिंसात्मक लढ्यचा, शांततेचा व सदाचाराच्या मार्गाचे पं. नेहरूंनी ही समर्थन करीत असल्याचे स्पष्ट होते. गांधी युगातील पं. जवाहरलाल नेहरूंचे योगदान ऐतिहासिक संदर्भातून उल्लेखनीय असून त्यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे.

## संदर्भ :—

१) देव नरेंद्र— फेवरीट ऑफ फॉरच्यून नेहरू अभिनंदन ग्रंष दिल्ली १९४९, पृ. १०८
२) द लिडर, ३ एप्रिल १९१९, संपादकास पत्र, दि. २० जून १९१७
३) सं.प्रा. राजकीय परिषदेत जवाहरलालांनी मांडलेला ठराव, द लिडर, दि. १६ ऑक्टोबर. १९१८.
४) होम डिर्पाटमेंट पोलिटीकल डिपॉझिट, ऑक्टो. १९१९, प्रोसीडिंग ५९— पंजाबातील राजकीय व आर्थिक परिस्थिती विषयीचा पंधरवाड्यचा अहवाल, सं.प्र. (हल्लीचा उ.प्र.) फौजदारी तपासखात्याचे टिपण, दि. १८ डिसेंबर १९१९, होम डिर्पामेंट, पोलिटिकल डिपॉझीट, १९२१, प्रोसिडींग, पृ. २४८—६२.
५) हेले यांचे लीन यांना पत्र, दि. २७ नोव्हें. १९२०, रेव्हेन्यु डिपार्ट, फाईल ७५३ (१९२०)
६) जवाहलालांचा द इंडिपेडन्ट मधील लेख, दि. २५ मे १९२१, भाई परमानंद यांना जवाहरलालांचे पत्र २६ नोव्हें. १९२१
७) द लीडर, २६ ऑक्टोबर १९२१.
८) जवाहरलालांचे सं.प्रा. च्या मुख्य सचिवांना पत्र, दि. ४ जुलै १९२१, एच. डी. क्रेक यांची टिपणे, १३ जुलै १९२१, होम डिपार्ट पॉली, १९२२, फाईल ११२, पृ.क्र.१—८.
९) सं.प्रा. काँग्रेस समितीला पाठविलेले परिपत्रक, ता. २५ एप्रिल १९२२, मुख्य सचिव सं.प्रा. यांचे गृहसचिवांना पत्र, ता. ३ मे १९२२, होम डिपार्टपॉलि १९२२, फा. १८.
१०) द लिडर, १६ जून १९२३.
११) द. ट्रिब्यून, २४ ऑगस्ट १९२४, मार्च १९२५ च्या उत्तरार्धाबद्दलचा सं.प्रातील राजकीय परिस्थिती विषयीचा पाक्षिक अहवाल, होम डिर्पाट, पॉलि, १९२५, फा. ११२.
१२) जवाहरलालांचे जी. एस. विद्यार्थी यांना पत्र २० ऑक्टोबर १९२८, अलाहाबाद येथील भाषण १० जानेवारी, द लिडर १२ जाने. १९२८, त्यांचे संपादकास पत्र दि. ३ फेब्रुवारी १९२८, द लिडर दि. ६ फेब्रु. १९२८, राष्ट्रसभेच्या सभासदांना पाठविलेले परिपत्रक दि. ५ एप्रिल १९२८, सि.व. खं. ३ पृ. १८४.
१३) जवाहरलालांची वृत्तपत्रांना निवेदन दि. ३० नोव्हेंबर १९२८.
१४) लखनौ येथील भाषण दि. १८ ऑक्टो. १९३०, द ट्रिब्युन दि. २१ ऑक्टो.१९३०.धनगोपाल मुखर्जी यांना पत्र दि. १७ ऑक्टोबर १९३०.
१५) जवाहरलाल १९३१ मधील बिनतारखेची नोंद अ.भा. रा. स. फाईल जी. ६ (के. डब्ल्यू.) (१९३१)
१६) नंदा बी, नेहरू : मोतीलाल, जवाहरलाल, पूणे १९८७, पृ. ३०४.
१७) पाटील वा, भारतीय राजकीय विचारवंत, नागपूर, १९९८, पृ. १६२
१८) बाचल वि, म. भारताचे परराष्ट्रीय धोरण, काँटीनेंटल प्रकाशन, पुणे, १९७८, पृ. ४०

❖❖❖

# कृषिविधी : जागर कृतज्ञतेचा

डॉ. अलका गायकवाड–लुंगे
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, अमरावती, महाराष्ट्र (India)
alkagaikwad134@gmail.com भ्रमणध्वनी ९९२२६२६२९७

## सारांश :

मनुष्य जीवन हे भावभावनांनी समृद्ध होत असते. भावभावनांची संपन्नताच जीवनाचे सार्थक करते. 'कृतज्ञता' ही अशीच एक उदात्त, उन्नत भावना आहे. कृतज्ञतेचे स्त्रोत आणि स्तोत्र प्राचीन काळापासून अव्याहतपणे प्रकट होत आलेले आहे. प्राचीन अशा कृषिसंस्कृतीतील कृषिविधींचे उपयोजन केवळ प्रतिकुलतेच्या भयातून किंवा प्राचीन धारणांच्या संस्मरणातून केले जात नाही तर; अनेक कृषिविधींच्या केंद्रस्थानी कृतज्ञतेची भावना आहे. ज्या भावनेमुळे मानसिक समृद्धीचं, समाधानाचं जगणं लोकमाणसाला लाभलं. आज ही कृतज्ञतेची भावना मानवी जीवनातून हद्दपार होताना दिसते. त्यामुळे भौतिक सुखाची रेलचेल असूनही एक प्रकारचं रितेपण, भकासपण, मानवी मनाला घेरून आहे. कृतज्ञतेचा जागर ही आजच्या काळाचीही गरज आहे.

बीजशब्द : लोकसंस्कृती, लोकमानस, कृषिसंस्कृती, कृषिविधी, कृतज्ञता

## प्रस्तावना :

'कृतज्ञता' हा लोकसंस्कृतीचा धर्मच आहे. लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये कृषिजीवनाचा व निसर्गाचा फार मोठा सहयोग आढळतो. ''लोकसंस्कृतीलाच कृषिसंस्कृती म्हणावे इतके एकरूपत्व यामध्ये दिसून येते.''[१] लोकसंस्कृतीशी एकरूपत्व असणारी संबंध कृषिसंस्कृती ही कृतज्ञता भावावर आधारलेली संस्कृती आहे. कृषिसंस्कृतीतील लोकमानस हे केवळ दैववादी, प्रारब्धवादी नाही; तर आपल्या जीवनात उपयोगी पडणाऱ्या गोष्टींची, घटकांची, भक्तिभावाने नोंद घेणारे आहे. त्यांच्या मनात उपकारकर्त्या घटकांविषयी जबरदस्त भान असल्यामुळे वेळोवेळी त्यांनी सजीव–निर्जीव वस्तुंची, घटकांची कृतज्ञतापूर्वक पूजा केली. आप, तेज, वायू, पृथ्वी आणि आकाश या पंचमहाभूतांचा तर तो आराधक आहेच पण; वृक्ष, पशू, धान्य यांची देखील तो कृतज्ञता भावाने पूजा करताना दिसतो. अनेक कृषिविधींचे लोकोपयोजन या कृतज्ञताभावनेतून झाले आहे.

## भूमीबद्दलची कृतज्ञता :

कृषिविधींमध्ये सर्वप्रथम आढळते ती काळया आईबद्दलची कृतज्ञता. भूमी म्हणजे काळी आई आणि मानव म्हणजे तिचा पुत्र हा आदिमबंध आहे. मातेने आपल्या लेकराला निस्वार्थ भावनेने, ममतेने भरभरून द्यावे त्याचप्रमाणे ही काळी भूमी माणसाला भरभरून देते, म्हणून ती त्याच्या लेखी माता ठरली, आई ठरली. या काळया आईची जवळून सेवा करता करता, तिची विविधांगी उपयोगिता माणूस अनुभवीत होता. त्यामुळे मातीशी एक विलक्षण भावबंध त्याने जोडला. स्वत:ला भूमीचा पुत्र मानल्यामुळे त्याच्या रक्तातच मातीची अनावर ओढ आहे. प्रत्येक प्रसंगी तिच्या पूजेचा जो घाट घातला जातो तो यामुळेच. तिचे अनंत उपकार आपल्यावरती आहेत, आपण तिच्या ऋणातून तर उतराई होवू शकणार नाही म्हणून मग त्याने तिचे कृतज्ञतापूर्वक पूजन केले. 'वाडा भरणे', 'इनामाय', 'सीतादही', 'खळंपूजन', 'रासपूजन', 'वाफधावणी' अशा जवळवजवळ सर्वच विधींमध्ये पाच किंवा सात लक्ष्म्यांचे पूजन केले जाते. हे पूजन म्हणजे मातीच्या सृजनरूपाचेच पूजन आहे. कृतज्ञतेच्या भावनेची पूर्ती करण्यासाठी हे पूजन केले जाते. भूमीला अर्पण केलेला नैवद्य, म्हणजे तिने जे धनधान्य मानवाच्या पदरात टाकले ते तिलाच प्रथम अर्पण करणे, या कृतज्ञता भावनेची परिपूर्तीच होय. या कृतज्ञता भावनातून श्रध्दा आणि विश्वासाचा जन्म झाला; पर्यायाने विधींचा जन्म झालेला आढळतो.

## पशुधनाबद्दलची कृतज्ञता :

कृषी इतकीच कृषकांच्या मनामध्ये पशुधनाविषयीची कृतज्ञता ओतप्रोत भरलेली आढळते. एखाद्या घटकाविषयीची माणसाच्या मनातील कृतज्ञता याचा अर्थच आहे; त्या घटकांविषयी मानवी मनाचा कोपरानकोपरा

जिव्हाळयाने, प्रेमाने भरलेला असणे, त्या घटकाशी जीवन पूर्णपणे निगडित असणे. 'पोळा', 'मांडवस' हे कृषिविधी पशुधनासंदर्भातील कृतज्ञता व्यक्त करणारे विधी आहेत. पशुधनाच्या संरक्षणासाठी कृषकाने तयार केलेला गोठा त्याला तो 'मांडव' म्हणतो व 'मांडवसपुजा' करतो. मांडवाला आंब्याची पाने, पेरकंडाची फुलं लावून त्याची कृतज्ञतापूर्वक पूजा करतो. पशुधनाची राखण करणारा मांडव त्यांना पूजनीय वाटतो.

'पोळा' या सणाच्या दिवशी बैलांची आंघोळ करण्यापासून ते त्याला अख्ख्या पुरणपोळीचा नैवद्य दाखविण्यापर्यंत कृषक बैलांसाठी जे करतो यामागे, बैलांच्या श्रमाने आलेल्या समृद्धीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा भाव असतो. बैलांच्याशिवाय शेतकऱ्यांचे पान हालत नाही. शेतीची मशागत करण्यापासून ते धान्य घरात आणून टाकेपर्यंत तो राबराब राबतो. या श्रमाची देखील दखल घेत लोकमानसाने मनोभावे कृतज्ञतेने त्याचे पूजन केले.

## वृक्षांबद्दलची कृतज्ञता :

वृक्षांमध्ये देवतांचे वास्तव्य असते असे भारतीय संस्कृतीची दृढ धारणा आहे. पण या धारणेपेक्षाही उपयुक्त अशा वृक्षांविषयी निसर्ग पूजक असणाऱ्या या मानवाच्या मनात कृतज्ञता भरून राहिलेली आहे. अनेक विधींमध्ये वृक्षांचे कृतज्ञतापूर्वक पूजन होताना दिसते. 'पाटलापूजा' या कृषिविधीत पूजेसाठी सागाचा पाट लागतो. हा पाट तयार करण्यासाठी जंगलात जाऊन सागाचे लाकूड आणावे लागते. हे लाकूड आणण्यापूर्वी सागाच्या झाडाची विधीवत पूजा केली जाते. पोळयाच्या दिवशी पळसाच्या मेढीची पूजा केली जाते. खळंपूजनाच्या वेळी मेढ बनवितात ती सौंदडच्या झाडाची. सौंदड हा उपयुक्त वृक्ष, म्हणून मेढीला सौंदडीच्या झाडाच्या फांद्या बांधून त्यांची पूजा ही त्या झाडाच्या उपयुक्ततेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच. पोळयाच्या विधीत पळसाच्या मेढीची पूजा केली जाते. कारण पळसाच्या मुळांपासून निघालेल्या तागानी शेतीसाठी वर्षभर उपयोगात येणारे कासरे, वेसन, दोऱ्या बनविण्यात येतात.

## बलुतेदारांबद्दलची कृतज्ञता :

'वाफधावणी' विधीचा एक भाग म्हणून खरीप हंगातातील पेरणीनंतर शेतकरी मांगाला आमंत्रण देतो व तिफणीला घरी नेतो. मांगाला धान्याच्या रूपात मोबदला देतो व मांगीणीची खणा–नारळ ओटीने भरतो. या संदर्भात डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात त्याप्रमाणे,

''मांग जमातीतील लोकांचा पूर्वापार सुफलीकरण विधींशी संबंध होता आणि अजूनही तो टिकून आहे. मांग जमातीतील लोक, व्यक्ती, कुटुंब आणि गाव यावरील इडा–पिडा टाळणारे आणि त्यांची पापे धूऊन नेऊन त्यातून त्यांना मुक्त करणारे पापवाहक म्हणून निरनिराळया विधींत भमिका बजावतात''[२] ही भावना तर आहेच; पण त्या सोबतच आहे त्यांच्या सहकार्याबद्दलच्या कृतज्ञतेची भावना. कारण शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी महत्त्वाची अवजारं, साधनं पुरविण्याचं काम महार, मांग, सुतार ही मंडळी निष्ठेने करीत असतात. त्यांच्या सहकार्याशिवाय कृषिकार्य पार पाडणे अवघड आहे याची कृतज्ञतापूर्वक जाणीव कृषकांनी बाळगलेली दिसते. कृषीशी निगडित अनेक विधीत मांग, सुतारांना विशेष महत्त्व आहे, सन्मानाचे स्थान आहे.

'शेतात नेली कुरी आडवा आला मांग,
सावळया बंधुराया त्याले हरीचा दे मान'

या ओवीतून हे स्पष्ट होते. तिफण घडवायला ज्या सुताराकडे टाकली जाते. त्याचे पहिल्यांदा पूजन केले जाते त्यामागे हीच भावना दिसते.

## अवजारांविषयीची कृतज्ञता :

कृषिसंस्कृतीला उपकारकर्त्या घटकाचे विस्मरण होत नाही, हे तिचे एक वैशिष्टयच म्हणावे लागेल. त्यामुळे सजीव–निर्जीव अशा वस्तूंचे पूजन विधींमध्ये कृतज्ञतापूर्वक केलेले दिसून येते. किंबहूना कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच विधींचे लोकमानसात उपयोजन झालेले दिसून येते. 'वाफ धावणी' विधीच्या वेळी तिफणीची विधीवत पूजा केली जाते, आरती म्हटली जाते, तिची खणा–नारळाने ओटी भरली जाते; मनाचा पेरा अत्यंत कुशलतेने करणाऱ्या या तिफणीचे लोकमानसाला खूप कौतूक वाटते. पेरणीमध्ये जिचा महत्त्वपूर्ण असा सहभाग असतो अशा या तिफणीबद्दल विधीत कृतज्ञता व्यक्त झालेली दिसते.

आश्चर्य वाटते ते कृषकांनी म्हटलेल्या तिफणीच्या आरतींचे! पूर्वी तिफण या अवजाराने पेरणी केली जायची. पेरणी आटपेल्यावर तिफणीची शोभायात्रा काढली जायची, विधीवत तिची पूजा केली जायची, खणा—नारळाने ओटी भरून चक्क तिची आरती म्हटली जायची. तिचे पेरणीतील अनन्यसाधारण महत्त्व लक्षात आल्यामुळे लोकमानसाने तिला वेगळया रूपात पाहिले. कुशलतेने पेरणी करण्याच्या तिच्या अलौकिक सामर्थ्याचा प्रत्यय आल्यामुळेच त्याने तिची आरती म्हटली. कारण 'आरती' मागील संकल्पना अशी असते की, उपकारकर्त्याचे ऋण सहजासहजी फेडणे जेव्हा अशक्य कोटीतले असते, तेव्हा त्याच्या विषयीची कृतज्ञतेने मन काठोकाठ भरून येते आणि ती भावना सहजपणे आरतीच्या स्वरांमधून स्त्रवायला लागते. भरभराटीचे स्वप्न तिफणीशिवाय साकार होऊ शकत नाही या जाणीवेनेच त्याने तिची आरती गायिली. कृषिसंस्कृतीतील लोकमानस उपकारकर्त्या घटकाला विसरूच शकत नाही. वस्तू निर्जीव का असेना तिला काम झाल्यावर लगेच टाकून देणे त्याच्या सुसंस्कृत मनाला पटण्यासारखे नाही.

अशाप्रकारे कृषिविधींच्या उपयोजनेमागे लोकमानसाची कृतज्ञता ही भावना आहे. खरे तर कृतज्ञता ही एक महान जाणीव आहे. चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी समज म्हणजे कृतज्ञता ! ही उदात्त, उच्चतम अशी कृतज्ञेची भावना व्यक्त करण्यासाठी विधी साजरे केले जातात. ही पवित्र भावना व्यक्त करणारी लोकसंस्कृती उच्चतम अशीच म्हणावी लागेल. लोकमानसाची संवेदनानुभूती सदैव तलेजदार होती हेच या कृतज्ञता भावनेनी पार पाडणाऱ्या विधींमधून स्पष्ट होते.

लोकमानसाची कृतज्ञताबुद्धी पाहिली की वाटतं, हा भाव त्याच्या मनात निसर्गाच्या सान्निध्याने आणि सामुहिक जीवनशैलीमुळे जागा झाला असावा. हा माणूस निसर्गाशी, मातीशी जुळलेला, एकरूप झालेला आहे. निसर्गानेच त्याला मातीची म्हणजे अंत:करणाची काळजाची भाषा शिकविली, म्हणूनच भूमीच्या पोटात एक दाणा टाकला की, कणीसभर दाण्यांनी परतफेड करणाऱ्या भूमीकडे त्याने श्रध्देने, कृतज्ञतेने पाहिले.

कृषिकार्य हे एकटयादुकटयाने कार्य नसते. तिथे सामुहिकतेला आवाहन असते. त्यामुळे लोकमानसाने कृतज्ञतेतून ''सहनाववतु सहनौभुनक्तु'' अशी सोबतीची जाणीव व्यक्त केली. आपल्या जीवनाशी निगडित असलेल्या वस्तु, व्यक्ती परिस्थितीबद्दल त्याने कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. परस्परांच्या सहकार्यानेच आपले जीवन समृद्ध होते ही जाणीवच तो यातून व्यक्त करीत होता. कृतज्ञता ही त्याला या जाणिवेशी जोडत होती. जीवनाचं जे सर्वांगीण रूप आहे याचे भान त्याच्या मनामध्ये जागे ठेवीत होती. लोकसंस्कृतीची ही महती सांगतांना द. ता. भोसले म्हणतात, ''लोकसंस्कृती मुक्तपणाला, स्वाभाविकतेला, निसर्गसहजीवनाला अधिक महत्त्वाचे स्थान देणारी आहे. भूमी, नदी, डोंगर, दरी, वृक्ष, पिके आणि पशुपक्षी हयांच्या अंगाखांदयावरच बसून चैतन्याचे नि तृप्तीचे गीत गाण्यात धन्यता आणणारी अशी आहे. पशुपक्षी, वृक्षांमध्ये, पाण्यांमध्ये परमेश्वर पाहणारी; भूमीला आदिशक्तीच्या रूपात बघून पूजणारी, कृतज्ञता हा जीवनाचा एक मोलाचा घटक मानणारी ही लोकसंस्कृती सगळीच्या सगळी पूर्णपणे वाळून गेलेल्या पाचोळयासारखी टाकावू कशी असेल? म्हणून तिच्यातले शाश्वत स्वरूपाचे पाथेय आजही आपण स्वीकारले पाहिजे.''[३]

परंतु एकेकाळी संस्कृतीचा आत्मा असलेली कृतज्ञतेची भावना आज मात्र एकाएकी नष्ट व्हायला लागली आहे. भौतिक सुखाच्या हव्यासापोटी संस्कृतीतील उच्चतम, सकस, श्रेयस, शाश्वत ते माणूस गमावून बसला आहे. माणसाच्या भावजीवनाचे संगोपन आणि संवर्धन करणारे अनेक चांगले घटक संस्कृतीमध्ये निश्चितपणे असतात. हा धागा तुटू न देणे गरजेचे असते. झपाट्याने बदलणाऱ्या आजच्या वातावरणात तो टिकवून ठेवता आला तरच मानसिक रितेपण टाळता येणे शक्य आहे. हे धागे कसे जुळवून ठेवायचे हे नेमकेपणाने सांगता येणार नाही. प्रत्येक प्रश्नांची 'रेडीमेड' उत्तरे नसतात. आपल्या जगण्यात आणि जाणिवांमध्ये त्या प्रश्नांचे भान असणे महत्त्वाचे ठरते. मार्ग प्रत्येकाने आपआपल्यापरिने शोधायचे असतात, पण ते शोधणे ही आपली अनिवार्य गरज आहे. भावभावनांच्या जाणिवाचं एक छोटसं स्फुलींगही बरेच काही करू शकते. लोकमानसाने तिफणीची पूजा केली तसे आजच्या ''गरज सरो वैद्य मरो'' किंवा ''वापरा आणि फेका'' या जमान्यात कितपत साधेल हे सांगता येणार नाही. एखाद्या वस्तूला ठोकर लागली, झाडूला पाय लागला की लोकमानसाला अपराधी वाटायचे. आजही अशा निर्जीव वस्तुबद्दल त्याच संवेदना पाळल्या जाव्यात असा अट्टाहास नाही, पण भावना संवेदनाच मरता कामा नये. मग माणसांचा जिथे संबंध येईल तिथे आपण उणे पडणार नाही. वस्तुला ठेच लागली तरी चालेल; पण माणसाला ठेच लागता कामा नये. माणुसकी पायदळी तुडविली जाता कामा नये हे महत्त्वाचे! कारण चांगल्या भावनांच्या मागे उन्नयन करणारा एक सशक्त विचार असतो.

कृषिसंस्कृतीतील लोकमानस या संदर्भात 'सुसंस्कृतच' म्हटले पाहिजे. त्याने उपकारकर्त्या घटकाशी श्रद्धेचे नाते जोडले, ही श्रद्धाच त्याला आत्मबळ आणि जीवनरस पुरवित होती. त्यामुळे परंपरेमध्ये निर्माण झालेले विधी, आरत्या आज कर्मकांडामध्ये मोडत असल्या तरी त्याचा अर्थ थेट मानवाच्या हृदयातील भावभावनांच्या जागृतीसाठी होता. त्याचे आवाहन बाह्यरूपाने अवजारांशी व बाह्यवस्तुंशी निगडित दिसत असले तरी त्याचा मूळचा अर्थ आत्मजागरणाशीच होता. त्यातही 'कृतज्ञता' ही भावना या अंत:संवेदनाच्या मुळाशी होती. म्हणून सरसकट सबंध संस्कृतीच जुनाट, बुरसटलेली ठरवून तिची संभावना करणे योग्य नाही. संस्कृतीतील कृतज्ञतेसारखी भावना मनात जागती ठेवली तर आजच्या भौतिक युगात जी मूळच उखडून गेल्याची हताश भावना मनामध्ये घर करून राहते आहे यातून बाहेर पडता येईल.

## निष्कर्ष :

१. कृषिव्यवहार हा विधिसंपन्न व्यवहार आहे.
२. कृषिसंस्कृतीतील लोकमानस केवळ दैववादी, प्रारब्धवादी नाही.
३. कृतज्ञतेचा जागर करणारी कृषिसंस्कृती कृषिविधींमधून अभिव्यक्त होते.
४. सजीव–निर्जीव अशा दोनही घटकांबद्दलची कृतज्ञतेची भावना कृषिविधींमधून प्रकटते.
५. कृतज्ञतेसारखी जीवनाला उदात्त, उन्नत करणारी भावना बाळगून कृषिविधी करणारे लोकमानस खऱ्या अर्थाने सुसंस्कृत म्हणावे लागेल.
६. आजच्या भौतिक युगातही कृतज्ञतेसारखी भावना मनात जागती ठेवणे गरजेचे आहे.

## संदर्भ सूची :

१. 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००१, पृ.१७.
२. 'गावगाड्याबाहेर', प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९३. पृ.१३
३. 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००१, पृ.२५.

## संदर्भ ग्रंथ :

१. 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००१.
२. 'लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष', डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००४.
३. 'भूमी आणि स्त्री', डॉ. शैला लोहिया, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०००.
४. 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००८.
५. 'मौखिक वाङ्मयाची परंपरा, स्वरूप आणि भवितव्य', प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २०१०.
६. 'गावगाड्याबाहेर', प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९३.

❖❖❖

# स्त्री संत मुक्ताबाई यांचे साहित्यिक योगदान

डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ७०५७०६२२६७

या सृष्टीतील विधात्याचा सुंदर आविष्कार म्हणजे स्त्री तिचे भावविश्व विविध भावभावनांनी नटलेले असून या सर्वांचा व मनोज्ञ संगम तिच्या ठायी विधात्याने ओतला आहे, संस्कृतीचा केंद्रबिंदूच नव्हे तर ती संस्कृतीच्या अग्रभागी लिहीलेला श्रीकार होय. स्त्रीच्या सामाजिक दर्जावरून संस्कृतीच्या अंतरंगाची ओळख होते. स्त्रीपणात सृजनाच्या नवनविन दिशा आहेत. त्यातुन स्त्रीत्व तावून, सुलाखून निघाल्याशिवाय कस सिध्द होणार. सृजनाच्या ध्यासात क्षणोक्षणी मराव लागत म्हणुनच 'स्त्रीजन्म म्हणवूनि न व्हावे उदास' असं स्त्रीजातीला संत जनाबाई समजवतात. तीला मुक्तीची कवाडे मोकळी करून. भक्तीचं स्वातंत्र्य देऊन, विकासाची, आनंदाची वाट दाखवली. अनाथला आधार, समाजमनाला माणुसकीचा धर्म शिकवला. असा स्त्रीजीवनाला अर्थपूर्ण सुर देणाऱ्या संतस्त्रिया दीपस्तंभ ठरतात. मी कोण? व स्वचा शोध घेऊन जन्म सार्थकी लावण्याची हाक कानी पडते. त्यांचे लिखाण नवी जाग व भान देते. माणुसकीचं अजरामर सत्य मनात रूजू लागतं. अहंकार गळतो, मन शांत, सौज्वळ, निर्मळ, पवित्र होतं. व स्वीशक्तीचा गजर करू लागतं.

महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर दीपस्तंभ ठरणाऱ्या स्त्रीसंत स्त्रीया म्हणजे शैव, वैष्णवी अन शाक्त प्रभावांनी समृध्द व संपन्न असलेली भक्तीची गंगोत्री स्त्री संतांनी समृध्द केली.

संत अधैयार, कारइक्काल अम्माइयार, रंगनायकी आदाळ, लल्लेश्वरी उर्फ लालदीदी, गौरीबाई, चड्क्रोतअम्मा, नंगापेन्नु, चंद्रावती, मीरा या दक्षिणेतील स्त्री संत तर महाराष्ट्रातील आद्य कवयित्री महदंबा, ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताबाई, जनाबाई, नागरी उर्फ नागी नामदेवांच्या भवाची मुलगी, कान्होपात्रा, बहिणाबाई, नामदेव परिवारातील सोयराबाई, निर्मळा, विठाबाई रामदासी संप्रदायातील — वेणाबाई, गोदामाई कीर्तने, लक्ष्मीबाई अक्कासाहेब महाराज या संतांनी आपापल्या लेखनातून तत्कालीन परंपरेने नाकारलेली धार्मिक प्रतिष्ठा सर्वच उपेक्षितांना मिळावी व त्यांचे जीवन चैतन्याने फुलावीत, त्यातून आत्मकल्याण साधावे व स्वहित व्हावे त्याबरोबरच व तत्कालीन समाजाची बंधने झुगारून, लौकिक वास्तव जीवनातील अनुभवातून अलौकिकाकडे जाण्याचा मार्ग सांगितला.

## संतश्रेष्ठा सौदामिनी मुक्ताबाई

आपेगावच्या कुळकर्णी कुटूंबात विठ्ठलपंताच्या रूपानं मूर्तिमंत वैराग्याच्या जन्म झाला. तीर्थाटन करताकरता आळंदीला शिदोपंतांकडे मुक्काम केला व त्याचं तेजस्वी रूप शिदोपंतांना आवडले. व रात्री पंढरीनाथांचे दृष्टांत झाला या विठ्ठल ब्राम्हणाला तू सालंकृत कन्यादान कर त्याचवेळी विठ्ठलपंतांनासुध्दा हाच दृष्टांत झाला.

'मूर्तिमंत चारी जन्म इच्या उदरी
म्हणौनि स्वीकारी — आज्ञा माझी'

विवाह झाला, पण विठ्ठलपंताच मन संसारात रमत नव्हतं ते तीर्थाटनात गुंतले होते. पत्नीची परवानगी घेवून ते तिर्थाटनाला निघाले. काशिला त्यसांनी श्रीपाद स्वामीकडून संन्याशाची दीक्षा घेतली. व संन्याशी 'चैतन्याश्रम' या नावाने वावरायला लागले. इकडे रूक्मीणिला अस्वस्थ वाटू लागले, पश्चाताप झाला. व पतीपरत यावा म्हणून 'अश्वस्थ' वृक्षाची सेवा करू लागल्या. एकदा श्रीपादस्वामी आळंदीला आले रूक्मीणीचा सेवाभाव पाहून प्रसन्न झाले, 'पुत्रवती हो' असा आशीर्वाद दिला. नंतर रूक्मीणीने सांगीतले. व आपला आशीर्वाद खरा कसा होणार? कारण आपल्या पतीने संन्यास घेतला असे म्हणाली. व आपला आशीर्वाद खोटा ठरला व तर गाठीचं पुण्य व्यर्थ जाणार म्हणून ते तडक काशिला गेले. चैतन्याने सारी कबुली दिली. स्वामीकडून अभय मिळाले. व विठ्ठलपंत गृहस्थाश्रमी परतले व गुरूआज्ञेने प्रपंच सुरू झाला बारा वर्षात निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई या चार अपत्यांचा जन्म झाला.

'शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी' यानुसार चारही भावंडे म्हणजे बुध्दिमान, कांतिमान, तेजस्वी, विरक्त, निरिच्छ वृत्तीची होती. त्यांच्या नावातचं त्यांचे महत्त्व विशद होत.

शके ११९५ ''शिव तो निवृत्ती । विष्णु ज्ञानदेव पाही – ११९७
११९९ – सोपान तो ब्रम्हा । मूळमाया मुक्ताबाई ।'' १२०१

अश्विन शुध्द प्रतिप्रदेला आदिशक्ती रूपी मुक्ताई जन्मली, जीवनातील सर्वश्रेष्ठ सुख–शांतीची अवस्था म्हणजे मुक्ती म्हणजेच मोक्ष – आई – वडिलांनी प्रयागक्षेत्री त्रिवेणी संगमात देहविसर्जित केला. पण या चार वर्षात अतिगहन संकटांचा सामना, समाजाची अवहेलना, छळ या कुटूंबाला सहन करावा लागला त्यामुळे साहजिकच या खडतर अशा चार वर्षात मुक्ताई जन्मदात्यांच्या वात्सल्याला मुकली असणार. अलौकिक दामप्त्याच्या पोटी जन्माला आलेली ही अलौकिक भावंड यांनाही छळण्यास तत्कालीन समाजश्रेष्ठांनी कुठेच कसर केलेली दिसत नाही. ज्ञानियांचा राजा असणाऱ्या ज्ञानदेवांना हाती झोळी घेवून दारोदारी भीक मागण्यास भाग पाडले व संन्यासाची मुलं म्हणून निर्भात्सना केली. वाळित टाकले, समाज बहिष्कृत केले. मुलांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून विठ्ठल व रूक्मीणीबाईनी देहांत प्रायश्चित सहजपणे स्वीकारले, पण समाजाला याचा विसर पडला व प्रतिक्षणी या भावंडांचा छळ सुरूच राहिला.

बहिष्कृत कुटुंबातील हे चार जीव प्रेमाने व ज्ञानाने एकमेकांचे आधार बनले. निवृत्तीनाथांनी मुक्ताबाईला गुरूपदेश केला. जन्मदात्री माऊलीच्या मायेची उणीव गुरूमाऊलीच्या रूपाने तिचे अध्यात्मिक भरणपोषण करून भरून काढली या चारही भावंडांना अपमान अवहेलना, पोरकेपणा, भविष्याची अनिश्चितता या अनेक संकटांना सतत तोंड द्यावे लागले. अपमानाचे असंख्य घाव झेलणाऱ्या जगाकडे पाठ फिरविण्याचा भाव सहजपणे उन्मलून आला असणार. एका प्रसंगी अपमान सहन न झाल्यामुळे ज्ञानदेव सिध्दबेटावरील त्यांच्या घरात जाऊन बसले व ताटी बंद करून स्वत:ला कोंडून घेतले तेव्हा 'ताटीच्या अभंगाची' निर्मिती झाली. मुक्ताईकडुन ज्ञानदेवांना समजावण्याचा प्रेमाची फुंकर घालण्याचं कामं ही चिमुकली मुक्ताई करते. विवेकाला जागं करण्याच, भाऊरायाला विवेकानी हलविते. ताटी उघडून बाहेर येण्याची लाडिक विनवणी करते.
बालपणापासून एखाद्या प्रौढांसारखी ती भावंडांना त्यांची आई होऊन सांभाळत आली होती. व मुक्ताईचा पारमार्थिक अधिकारही मोठा होता. 'विश्व झाले बम्ही । संत सुखे व्हावे पाणी ।।' असा प्रेमळ पण कणखरपणे उपदेश करते. तर आपले कार्य काय? याची आठवण करून देते.

''संत जेणे व्हावे। जग बोलणे साहावे।।
जया अंगी थोरपण। तया नाही अभिमान।।
थोरपण जैसे बसे। तेथे भूतदया असो।।
रागे भरावे कवणासी। आपण ब्रम्हण सर्व देशी।।
ऐसी समदृष्टी करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।''

भूतदया, क्षमा, शांती हे संतांचे भांडवल आहे. निंदास्तुती याच्या पलीकडे संतत्वाला जायला हवं हे जग व आपण वेगळे नाहीत आपण 'अहम् ब्रम्हास्मी' या अद्वैत बुध्दीने शांतीधर्माच्या वाटेने जायला हवे.

''योगी पावन मनाचा साहे अपराध जनाचा।
विश्वरागे झालो वन्ही संत सुखे व्हावे पाणी।।
शब्दशास्त्र झाले क्लेष, संत मानावा उपदेश।
विश्वपट ब्रम्ह दोरा ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।''

ज्ञानाच्या सूर्याला तेज देतांना मुक्ताईचं तेज वाढतांना दिसते तिचे अलौकिक उंची गाठलेली दिसते ती ज्ञानाच्या मनाची बंदिस्त ताटी उघडतांना, सर्व स्त्रीदेवतांच सहज दर्शन मुक्ताईत घडत. ज्ञानाची ताटी बंदिस्त राहीली तर साऱ्या विश्वाचं नुकसान आहे. हे जाणून

'तुम्ही तरोनि विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा....'

म्हणून जागं करते. चौदाशे वर्ष जगुनही कोराच राहिलेल्या चांगदेवांना तिन्ही भावंडांनी मुक्ताबाईच्या हाती सोपवले.

'मुक्ताई चांगया दिधले जीवन। निर्गुणी साधले घर कैसे' चौदाशे वर्षाच्या योगिराज चांगदेवांची गुरू झाली अशी ही अलौकिक गुरू – शिष्याची जगावेगळी अद्‌भुत जोडी होती.

''चांगदेव म्हणजे आजिची जन्मलो। गुरूपुत्र झालो मुक्ताईचा।
मागील चौदाशे झाली जन्मातरे। आजी जन्म खरे सार्थकाचे।।''

या गुरूमाऊलीने आपल्या लेकरासाठी पाळणा म्हटला, यांच्या विलक्षण नात्यामुळे अंगाईगीते अर्थपूर्ण वाटतात. मातृभाव आध्यात्मिक पातळीवरचा आहे. या नात्यातून पुढे–पुढे अभंगानी नवे वळण घेतले. मुक्ताई चांगदेवांशी यौगिक साक्षात्कारासंबंधी अध्यात्मिक, अनुभवासंबंधी संवाद साधते.
प्रश्न विचारते,

''टेकावरी टेक त्यावरी टेकली। तेथे एक बाळी विस्मो करी।।
तिचे नाव काय, त्याचे नाव काय। विचारोनि पाहे मनामाजी।।
डोळ्यातील बाहुली जालीसे गुरूवारू। तिशी सुईण मेळावा अरूवारू।।
सुईचे अणिवर वसचले पाठार। मुक्ताई म्हणे चांगया सांग विचार।।''

मुक्ताबाईना अलौकिक आत्मानुभवाचा जो साक्षात्कार झाला तो अभंगातून व्यक्त केला तो म्हणजे

''मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्यासी।।
थोर नवलाह जाहला। वांझे पुत्र प्रसवला।।
विंचु पाताळाशी जाय। शेष माथा वंदी पाय।।
माशी व्याली घार झाली। देखोन मुक्ताई हासली।।''

मुंगीचं उडणं समजतं पण तिचे सूर्याला मिळणं समजत नाही. ते समजण्यासाठी तर्काचा उपयोग होण अशक्य आहे. तो अनुभव मुक्ताई स्वत: घेते.

विठूमय होऊन गेलेल्या भक्तराजाचं गर्वहरण करणाऱ्या मुक्ताबाईला नामदेवांनी 'लहानशी मुक्ताई नैसी सणकांडी' म्हटले आहे. आपल्या भावाच्या थोरपणाला वंदन न करणाऱ्या नामदेवाचा अहंकार तिला आवडला नाही.

''म्हणे मुक्ताबाई चंदनाचे झाड। अहंता सर्व वेढे गुडाळिले।।
अखंड जयाला देवाचा शेजार। कारे अहंकार गेला नाही।।
परब्रम्ह सवे नित्य तुझाा खेळ। आंधळ्याचे डोहाळे का बा झाले?
घरी कामधेनु ताक मागू जाय। ऐसा द्वाड आहे जगामाजी।।''

आंधळा, द्वाड अशा परखड शब्दात अहंकारी नामदेवांची कानउघाडणी केली. तर 'अंतरीचा कोरा गुरूवीण' अस ठणकावून सांगणाऱ्या मुक्ताबाईचा अधिकार मोठा आहे. नामदेवांच्या परिक्षेसाठी गोराकुंभार या अनुभवी संतांची निवड केली. आपण 'रात्रं–दिवस' विठूच्या सहवासात राहून कोरे कसे? ते संतापले व विठूरायाला प्रश्न विचारला. पण मुक्ताईचचे रूप बघत हादरले. मुक्ताईने त्यांच्या उध्दाराचा ध्यास घेतला व नामदेवांचा उध्दार करायला अधिकार गोरोबा काकांचा असल्याने

''धडा बोलावणे गोरोबाला। म्हणे मुक्ताई भाजले की कोरे
काकांचे उत्तर सत्य मानू ...''

आत्मज्ञानानंतर नामदेवांचा मुक्ताबाईविषयी भाव बदलला व आदर निर्माण झाला. त्याच बरोबर योगमार्गावरील ओव्यातून मुक्ताईची यौगिक उंची समजण्यास मदत होते या चारही भावंडात मुक्ताईची अध्यात्मिक उंची अधिक व अधिकार श्रेष्ठ आहे.

ज्ञानदेवांच्या समाधीनंतर ती उदासीन झाली तिची जगण्याची इच्छा नष्ट झाली तिने अन्न–पाणी व्यर्ज केले. 'माणेगाव' येथे एकांतात निवृत्ती नाथांनी गंगाधारेजवळ मुक्ताईला तिच्या ब्रम्हभावाचे स्मरण करून दिले.

''अंतर बाहेर स्वामींचे स्वरूप। स्वये नंदादीप उजळला।।
निवृत्ती म्हणे आता पंढरीनाथा। मुक्ताईला जमा अवघेजण।।
वेधली चित्तवृत्ती स्वरूपी निमग्न। नाही देहभान मुक्ताईला।।''

मुक्ताईचे प्राण तिच्या देहातून मुक्त झाले। नामदेव हया प्रसंगाचे वर्णन करतात.....

'कडाडली वीज निरंजनी जेव्हा। मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली।'

शके १२१९ वैशाख वद्य द्वादशी मुक्ताबाई डोळ्यांना न दिसताच एकाएकी गुप्त झाली. सर्व संतमंडळींना दु:ख झाले.

होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई। संत ठायी ठायी स्फुंदताती।।

सर्वांना चटका लावून मुक्ताई नाईशी झाली पण अभंगरूपाने अजरामर झाली. माऊली, संत या पदव्या अवघ्या १८ वर्षात भूषविणारी ती खरचं सौदामिनी होती.

## निष्कर्ष :—

प्रपंचविकारांपासून मुक्त असणे, उपाधी सोडणे हीच साधुची खरी समाधी हे तिचे मुख्य सूत्र आहे.

१. मुक्ताबाईची अध्यात्मिक उंची इतर संतांपेक्षा अधिक श्रेष्ठ व अधिकार मोठा आहे.
२. अतिलहान वयातच यौगिक श्रेष्ठतव मिळविले.
३. मुक्ताबाई ही आदीमायाशक्ती रूपाचा अवतार आहे.
४. चांगदेव व नामदेवांसारख्या श्रेष्ठ व जेष्ठ असणाऱ्या संतांचीही अती परखड शब्दात कान उघाडणी केली.
५. मराठी वाङ्मयात अतिलहान असणारी अध्यात्मिक प्रौष्ढा म्हणजे मुक्ताबाई होय.
६. माऊली, संत या कमी वयात पदव्या भूषविणारी ती सौदामिनी आहे.
७. मुक्ताबाई ही जन्मजात योग ज्ञानाने परिपूर्ण स्त्री आहे.
८. मुक्ताईचा अंभगात मुक्ततेचा, अंतिम ज्ञानाचा तात्विक विचार पुनः पुन्हा येतो.

## उपसंहार

बाराव्या शतकात स्थापन झझलेल्या भागवत धर्मात स्त्रीसंत मुक्ताबाई यांनी मराठी वाङ्ःमयात आपल्या यौगिक, गुढ व अध्यात्मिक रचनेची भर घालून ते संपन्न केले. अतिलहान वयात पोरकी झालेली ही मुक्ताई भावंडांची आई बनते. कधी ज्ञानेश्वरांची समजूत काढते. ताटी उघडण्यास प्रेमळ सलगी करते त्यामध्ये विश्वाचं कल्याण आहे याची जाणीव तीला पूर्णपणे असल्यामुळे 'ताटीचे अभंग' रचते तर कधी गुरूबंधू निवृत्तीनाथांचा मांडे खाण्याची इच्छा पुर्ण करण्यासाठी ज्ञानेश्वरांच्या योगाने तप्त झालेल्या पाठीवर मांडे भाजते. तर कधी चांगदेवांची गुरू होते व त्यांना बोध देते त्यांची माऊली बनून पाळण्याची गुढ रचना करते. नामदेवांची परखडपणे कान उघाडणी अभंगाद्वारे करून त्यांचे गर्वहरण करून विसोबा खेचरांकडून उपदेश करविते. अशी ही योगीनी ज्ञानदेव बहिनी 'अहो मुक्ताबाई तू ब्रम्हीचे अंजन। तुझेचि प्रसादे सद्गुरूनिधान' अशी मुक्ताई सर्वांना चटका लावून १२१९ ला न दिसताच एकाएकी गुप्त झाली.

''होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई।
संत ठायी ठायी स्फूंदताती।।''

## संदर्भ :—

१. डॉ. सुहासिनी इर्लेकर — प्राचीन मराठी संत कवयित्रीचे वाङ्.मयीन कार्य.
२. वि. ल. भावे — महाराष्ट्र सारस्वत.
३. रा. चि. ढेरे — सकल संत गाथा खंड २.
४. डॉ. तारा भवाळकर — स्त्री मुक्तीचा आत्मस्वर.
५. डॉ. आरती दातार — महाराष्ट्रातील संत कवयित्री.

❖❖❖

# 'छावणी' आणि प्रेमानंद गज्वी यांची नाट्यसृष्टी

डॉ. मथु सुरेश सावंत
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड
निवास: 'मथुरेश', शाहूनगर, नांदेड 431602
भ्रमणध्वनी 9422170689, 8806388535

गेली 40 वर्षे मराठी साहित्यविश्वावर आणि विशेषत: नाट्यक्षेत्रावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी हे मुळात एक सामाजिक चिंतक आहेत. प्रेमानंद गज्वी यांचा जन्म दि. 15 जून 1947 रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील पिंपळगाव या आजोळगावी झाला. त्यांचे मूळ गाव नागपूर जिल्ह्यातील कारगाव. तेथेच त्यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण झाले. 'पिंपळ'गावी जन्मलेल्या प्रेमानंदाच्या मनात 'बोधी'बद्दलची ज्ञानलालसा निर्माण झाली नसती, तरच नवल! पुढील शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने त्यांनी मायानगरी मुंबईत प्रवेश केला आणि त्यांचे जीवनच बदलून गेले. प्रेमानंद गज्वी यांनी जी नाटकं लिहिली ती रंजनप्रधान नाहीत, तर सामाजिक-राजकीय प्रश्न मांडणारी आणि त्याद्वारे आपलं असं काही एक मतप्रदर्शन करणारी अशी आहेत. गज्वी हे अखिल भारतीय स्तरावरचे महत्त्वाचे नाटककार आहेत.

प्रेमानंद गज्वी यांच्या कुटुंबातच लोककलेचा वारसा होता. दंडार, खडी गंमत हे कलाप्रकार त्यांच्या वाडवडिलांपासून चालत आलेले होते. घरातच कलेचे संस्कार झाल्यामुळे ते गाण्याकडे ओढले गेले. शाळेत असताना 'गड आला पण सिंह गेला', 'उमाजी नाईक' यासारख्या नाटकांतून त्यांना काम करण्याची संधी मिळाली आणि त्यांच्यावर नाटकाचे संस्कार होत गेले.

प्रेमानंद गज्वी यांचे देवदासी प्रथा आणि समस्येचा नाट्यात्मक वेध घेणारे 'देवनवरी' हे पहिले नाटक 1981 साली प्रकाशित झाले. ग्रामीण जीवन, जातीय गुंता आणि राजकारण यांचा वेध घेणारे त्यांचे 'वांझ माती' हे नाटक 1984 साली आले. वेठबिगार मजुरांचा मुक्तिसंघर्ष मांडणारे त्यांचे 'तन-माजोरी' हे नाटक लंडन येथे प्रकाशित झाले. समर्थ रामदास, त्यांचे तत्त्वज्ञान आणि आजचे समाजवास्तव यांचा कलात्मक शोध घेणारे 'जय जय रघुवीर समर्थ' हे नाटक त्यांनी लिहिले. त्यासाठी त्यांनी सज्जनगडावर जाऊन समर्थांचे समग्र वाङ्मय अभ्यासले. अनेकांशी चर्चा केली. प्रेमानंद गज्वी यांनी जरी 14 नाटके आणि 6 एकांकिकासंग्रह लिहिले असले, तरी महाराष्ट्र त्यांना 'किरवंतकार गज्वी' म्हणूनच ओळखतो. 'किरवंत' या नाटकात त्यांनी स्मशानकर्म करणाऱ्या ब्राह्मणवर्गाच्या जीवनाचा समाजशास्त्रीय अंगाने वेध घेतला आहे. 'पांढरा बुधवार' या नाटकात त्यांनी विधवा स्त्रियांचं जीवन आणि जीवनसंघर्ष चित्रित केला आहे.

प्रेमानंद गज्वी यांनी आधी समाजाच्या मनीमानसी भिनलेल्या रूढी, प्रथा, परंपरा नीट समजून घेतल्या आणि नंतर अभ्यासपूर्ण पद्धतीने त्या कालबाह्य पथा-परंपरांना ठामपणे नकार दिला. त्यांनी तळागाळातील शोषितांचे प्रश्न नीटपणे समजून घेतले आणि ते प्रश्न आपल्या नाटक-एकांकिकांमधून धीटपणे मांडले. त्यांनी शोषितांच्या स्थितिप्रिय मानसिकतेचाही समाचार घेतला आहे. अंधश्रद्धा, वेठबिगारी, दडपशाही, सर्व प्रकारची दमनशाही, वंचितता, विषमता, मतलबी राजकारण, स्त्रीदास्य, वर्गवर्चस्व, तत्त्वभ्रष्टता, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, पुनरूज्जीवनवाद या सगळ्यांविरूद्ध गज्वींच्या लेखणीने बंड केले.

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला. मग ही दोन महान व्यक्तिमत्त्वं एकत्र का आली नाहीत, असा प्रश्न

प्रेमानंद गज्वी यांना सतावत होता. यासाठी त्यांनी अनेक संदर्भग्रंथ वाचले. या प्रश्नाच्या खोलात जाऊन त्यांनी 'गांधी-आंबेडकर' हे नाटक लिहिले. या नाटकात गज्वी यांनी गांधीजींची बाजू घेतली नाही किंवा आंबेडकरांचीही बाजू घेतली नाही. एक लेखक म्हणून ते या नाटकात मूळ प्रश्नाच्या बाजूने उभे आहेत, असे दिसते. नाटक या प्रभावी माध्यमाचा उपयोग त्यांनी लोकानुरंजनासाठी न करता लोकप्रबोधनासाठी केला.

मराठी रंगभूमीच्या स्थितीगतीचं नाट्यात्मक विश्लेषण करणारं 'रंगयात्री' हे नाटक त्यांनी लिहिलं. कला आणि कलावंत यांच्यातील आदिबंधाची चिकित्सा करण्यासाठी त्यांनी 'नूर मोहम्मद साठे' हे नाटक लिहिले. 'शुद्ध बीजापोटी' या नाटकात त्यांनी प्रियकर-प्रेयसी, आई-बाप आणि समाजमनाच्या स्थितिगतीचे फार सुंदर विश्लेषण केले आहे. प्रेमानंद गज्वी यांचे 'व्याकरण' हे नाटक असेच गाजले. त्याचे आधीचे नाव 'डॅम इट अनु गोरे' असे होते. मेधा पाटकर यांच्या आंदोलनाची त्यात त्यांनी खिल्ली उडवली आहे, असा आक्षेप काहींनी या नाटकावर घेतला. तथापि पाणी, माणूस, देश, आंदोलन असा एक आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा गुंता सोडविण्याचा प्रयत्न प्रेमानंद गज्वी यांनी या नाटकातून केला आहे. कोयना धरणातील विस्थापितांचा प्रश्न त्यांच्या नजरेसमोर होता. धरण बांधणारे, त्यासाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्था, त्यातलं राजकारण, विरोध करणाऱ्या आंदोलकांची भूमिका, पाण्याचं आणि त्यातून मिळणाऱ्या लाभाचं राजकारण, धरण बांधकामातील भ्रष्टाचार असा सगळा व्यापक पट गज्वी यांनी या नाटकात उभा केला आहे. ते नेहमी स्वत:च्या भूमिकेशी आणि संशोधनाशी, त्यातील तथ्यांशी प्रामाणिक राहून लेखन करतात.

'अभिजात जंतू' या नाटकात त्यांनी दोन राजकीय मित्रांची राजकीय गोष्ट रंगमंचावर आणली आहेत. 'द बुद्धा' या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी महात्मा गौतम बुद्ध आणि यशोधरा यांच्यातील, मानवी नातेसंबंधातील वादसंवाद हळुवारपणे टिपले आहेत. मानवी मनाची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय छळछावणी करणाऱ्या व्यवस्थेचे खरे रूप त्यांनी 'छावणी' या नाटकातून पुढे आणले आहे. या नाटकावर सेन्सॉर बोर्डाने घटनाविरोधी आणि देशद्रोही असा ठपका ठेवून या नाटकाची मान्यता दीर्घकाळ रेंगाळत ठेवली होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा मांडत प्रेमानंद गज्वी यांनी प्रसारमाध्यमांतून या प्रश्नाला वाचा फोडली आणि सेन्सॉर बोर्डाला अखेर मान्यता द्यावी लागली. प्रेमानंद गज्वी यांचा नाट्यलेखनाचा प्रवास हा असा खडतर आणि संघर्षपूर्ण आहे. कितीही विरोध झाला तरी ते आपल्या भूमिकेवर ठाम असतात, कारण ते नाटक लिहिण्यापूर्वी त्यांनी त्या नाटकासाठी लागणारे मूलद्रव्य मोठ्या कष्टाने गोळा केलेले असते. त्यासाठी त्यांच्या हाताशी ढीगभर पुरावे असतात. ते अभ्यासात हयगय करत नाहीत, म्हणून ते आपल्या भूमिकेवर ठाम असतात.

प्रेमानंद गज्वी यांचे व्यामिश्र प्रश्नांचे आकलन अतिशय प्रगल्भ आणि परिपक्व आहे. 'घोटभर पाणी' ह्या एकांकिकेत 'मातीच मातीला मिळू देत नाहीय, घोटभर पाणी' अशा शब्दांत ही लेखणी वंचिततेवर नेमकेपणी भाष्य करते. 'धोत्रा वस्ती' आणि 'केळीच्या कमनीय बागा' अशी परस्परविरोधी प्रतीके वापरून त्यांनी समाजातील विषमता अधोरेखित केली आहे.

'बलात्कारातही पावित्र्य असते, असे सांगणारी ही संस्कृती, फोरास रोडच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ कशी म्हणायची?' असा प्रश्न ते विचारतात. अशा विषम परंपरांचे सातत्य त्यांना अस्वस्थ करते. 'कृष्णविवर' ह्या एकांकिकेत त्यांनी स्त्रीदास्याचे दशावतार रेखाटले आहेत.

प्रेमानंद गज्वी यांची प्रत्येक साहित्यकृती म्हणजे त्यांच्या सखोल चिंतनाची फलनिष्पत्ती असते. 'घोटभर पाणी', 'बेरीजवजा बाकी', 'कृष्णविवर', 'उतारा', 'निवडक एकांकिका', 'प्रेमानंद गज्वी यांच्या समग्र एकांकिका' असे त्यांचे एकांकिकांचे सहा संग्रह प्रकाशित झाले आहेत. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा' या चळवळीचं अपयश प्रेमानंद गज्वी यांना प्रकर्षाने जाणवलं आणि त्यातून त्यांची 'घोटभर

पाणी' ही एकांकिका जन्माला आली. या एकांकिकेच्या प्रकाशनाला विजय तेंडुलकर आणि राजा ढाले हजर होते. या एकांकिकेचे हजारो प्रयोग झाले. 'देवनवरी' या नाटकाचे बीज त्यांना एका बातमीत सापडले. देवदासीवर झालेल्या बलात्काराची बातमी गज्वी यांच्या वाचनात आली आणि त्यांचं विचारचक्र सुरू झालं. प्रत्यक्ष देवीच्या साक्षीनेच जर तिच्या सेवेकरी तरूणीवर बलात्कार होत असेल, तर मग देव आहे कुठं ? असा प्रश्न त्यांना पडला. या प्रश्नाच्या चिंतनातूनच त्यांचे 'देवनवरी' हे नाटक आकाराला आले.

प्रेमानंद गज्वी सर्व सनातनी परंपरांची विविध अंगांनी डोळस चिकित्सा करतात. गज्वी हे व्यवस्थेला निरूत्तर करणारे प्रश्न विचारणारे नाटककार आहेत. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न पाहा :

'आत्मा जर एकच आणि मुक्त असणे हा जर आत्म्याचा स्थायीभाव, तर मग आमचाच आत्मा बंधनात का?' (घोटभर पाणी)

'जी स्वत:च्या लेकरांचेच रक्त पिते, अशी कशी ही यल्लम्मा आई?' (देवनवरी)

'पाप जर सगळ्या गावाचं, तर केवळ मांगांनीच ते डोक्यावरून का वाहायचं?' (उतारा)

सुरूवातीच्या काळात प्रेमानंद गज्वी यांनी कविताही लिहिल्या. त्यांचा 'एकतारी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांचे 'लागण' आणि 'ढीवर डोंगा' असे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'जागर' आणि 'हवे पंख नवे' या दोन कादंबऱ्याही त्यांच्या नावावर आहेत. मधल्या काळात त्यांनी काही गूढकथाही लिहिल्या. परंतु कथा-कवितेचे अवकाश अभिव्यक्तीसाठी अपुरे वाटल्यामुळे त्यांनी नाटक-एकांकिका या फॉर्मवरच आपले लक्ष केंद्रित केले. त्यांचे 'बोधी कला-संस्कृती', 'सगुण-नगुण' आणि 'आर्ट फॉर नॉलेज' हे तीन वैचारिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'घर' या दूरदर्शनवरील मालिकेसाठी त्यांनी पटकथा, संवाद व गीतलेखन केले आहे. त्यांना त्यांच्या नाट्यलेखनासाठी 7 वेळा महाराष्ट्र शासनाचे वाङ्मय पुरस्कार मिळाले आहेत. याशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषद, अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, दया पवार साहित्य पुरस्कार, अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, शिरवाडकर नाट्यलेखन पुरस्कार, आचार्य अत्रे नाट्यलेखन पुरस्कार, मातुश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मान आणि कल्चरल एकता अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार अशा वीस पुरस्कारांनी प्रेमानंद गज्वी यांचे वाङ्मयीन कर्तृत्व सन्मानित झाले आहे. त्यांच्या अनेक नाटक, एकांकिकांचे हिंदी, इंग्रजी, कन्नड, तेलगू, बंगाली, छत्तीसगढी अशा विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. डॉ. श्रीराम लागू, नाना पाटेकर, विक्रम गोखले, भक्ती बर्वे-इनामदार यांच्यासारख्या कसलेल्या कलावंतांनी प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकांतून भूमिका केल्या आहेत. हा या नाट्यलेखनाचा गौरवच म्हणावा लागेल.

प्रेमानंद गज्वी यांच्या 'तन माजोरी' या नाटकाचा प्रयोग लंडन येथे झाला. 'घोटभर पाणी' या एकांकिकेचे 457 पुरस्कारांसह तीन हजार प्रयोग झाले आहेत. 1988 साली नागपूर येथे संपन्न झालेल्या चौथ्या अ.भा. दलित नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. 1994 साली चंद्रपूर येथे झालेल्या 20व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या 99 व्या अ.भा. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. त्यांच्या 'किरवंत', 'तन-माजोरी', 'निवडक एकांकिका', 'घोटभर पाणी', 'गांधी-आंबेडकर', 'पांढरा बुधवार' इ. कलाकृतींचा देशातील विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत सन्मानपूर्वक समावेश करण्यात आला आहे.

प्रेमानंद गज्वी यांच्या समग्र साहित्यावर संशोधनकार्य पूर्ण करून आजपर्यंत 8 संशोधकांनी डॉक्टरेट ही पदवी संपादन केली आहे. गज्वी यांच्या साहित्यावर 'अंक-एकांक', 'प्रेमानंद गज्वी यांचा नाट्यलेखन प्रवास', 'नाटककार प्रेमानंद गज्वी', 'प्रेमानंद गज्वी यांची नाट्यसृष्टी' असे चार समीक्षाग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यांनी 13 मे 1973 रोजी मुंबई येथे हुंडाविरोधी चळवळीची स्थापना करून या दुष्ट प्रथेच्या विरोधात अनेक ठिकाणी मोर्चे काढले, निदर्शने केली आणि आपल्या सामाजिक दायित्वाची प्रचीती

दिली. यशदाच्या चित्रपट समितीवर त्यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. 2001 ते 2013 या कालखंडात त्यांनी महाराष्ट्र राज्य रंगभूमी प्रयोग परीनिरीक्षण मंडळावर सदस्य म्हणून काम पाहिले. अ.भा. मराठी नाट्यपरिषदेचे ते आजीव सदस्य आहेत. बोधी नाट्यपरिषदेची स्थापना करून त्यांनी नाट्यक्षेत्रातील संघटनकार्यातही योगदान दिले आहे. नाटक-चित्रपट या क्षेत्रांशी संबंधित 100 हून अधिक समित्यांवर त्यांनी तज्ज्ञ परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांनी कला-कार्यशाळांचे आयोजन करून होतकरूंना प्रशिक्षण दिले आहे.

'छावणी' हे प्रेमानंद गज्वी यांचे 2018 मध्ये प्रकाशित झालेले नवे नाटक आहे. 'छावणी' म्हटले की, आपल्या नजरेसमोर लष्कराची छावणी उभी राहते. परंतु या नाटकातील छावणी ही नक्षलवाद्यांची आहे. जरी नाटककाराने तसे कुठेही म्हटले नसले तरी. या नाटकाला नुकताच मराठवाडा साहित्य परिषदेचा कुमार देशमुख नाट्यपुरस्कार मिळाला आहे. या नाटकात मोजकीच म्हणजे फक्त 6 पात्रे आहेत.

1) एम.एम. हे प्रमुख पात्र आहे. ह्या इंग्रजी आद्याक्षरांचा 'मार्क्समावो' असा विस्तार आहे. हा चंद्रपूरच्या जंगलातील छावणीचा प्रमुख आहे. एम.एम.चे वडील कॉम्रेड चारू डांगे हे पूर्वी ह्या छावणीचे प्रमुख होते. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा एम.एम. हा या छावणीचा प्रमुख झाला आहे.

2) सानंद साठे हा मातंग समाजातील तरूण आहे. तो एम.एम.चा कार्यकर्ता आणि उत्तराधिकारी आहे. तोच ह्या छावणीतील कर्नल आहे. त्याला आपल्या कुटुंबियांवर झालेल्या अन्यायाचा बदला चुकता करायचा आहे.

3) विधी ही एम.एम.ची मुलगी आहे आणि ती सानंदची प्रेयसी आहे.

4) गणेश गांगल हा जन्माने गरीब भिक्षुक ब्राह्मण असला, तरी त्याच्यावरही व्यवस्थेने अन्याय केलेला आहे.

5) शंकराचार्यांच्या रूपात वावरणारा स्वामी हा सनातनी परंपरेचे प्रतीक आहे.

6) व्यंजन नागी हा उद्योगपती भांडवलदार असून एम.एम.चा मित्र आहे.

अशा मोजक्याच सहा पात्रांवर ही नाट्यकृती उभी आहे. सेन्सार बोर्डाने ह्या नाटकाची परवानगी दीड वर्ष अडवून ठेवली होती. सेन्सार बोर्डाने दिलेल्या अनेक तकलादू कारणांपैकी 'या नाटकात चायना-पाक बॉर्डर ॲक्टचा उल्लेख आहे. यात राज्यघटनेवर थेट टीका आहे, हे एक कारण सांगितले जात होते. वास्तविक त्यात काही तथ्य नव्हते. प्रेमानंद गज्वी यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीविरूद्ध समाजमाध्यमांतून आवाज उठविल्यामुळे सेन्सार बोर्डाला मान्यता प्रदान करावी लागली.

दिल्ली काबीज करायची हे कॉ. चारू डांगे यांचे स्वप्न होते, पण त्यांच्या हयातीत ते साकार होऊ शकले नाही. वडिलांचे स्वप्न साकार करणे हेच आता एम.एम.चे ध्येय आहे. त्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे. सानंद साठे हा एम.एम.च्या स्वप्नांचा सहोदर आहे. एम.एम. म्हणतो, 'ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे आमचे शत्रू आहेत.' या नाटकात वर्गसंघर्ष आहे आणि जातीअंताची लढाईसुद्धा आहे.

'छावणी' या नाटकात सानंद आणि विधी यांचे आंतरजातीय प्रेमप्रकरण आहे. या प्रेमातही एक द्वंद्व आहे. विधीला वाटते की, सानंदने नोकरी करून आणि लग्न करून सुखी व्हावे. उलट सानंदला एम.एम.च्या स्वप्नपूर्तीचा ध्यास आहे. जसे ह्या दोघांच्या प्रेमात द्वंद्व आहे, तसेच एम.एम.च्या भूमिकेतही द्वंद्व आहे. त्याला श्रमिकांच्या नावावर परंतु भांडवलदारांच्या मदतीने दिल्ली काबीज करायची आहे. त्यासाठी चीन आणि पाकिस्तानचीही मदत घ्यायची त्यांची तयारी आहे. आधी जातीयता नष्ट करायची का वर्गव्यवस्था, हेही एक द्वंद्व या नाट्यकृतीच्या तळाशी आहे.

'छावणी' नाटकात स्वामी नावाच्या शंकराचार्यांचे एका सार्वजनिक कार्यक्रमातून अपहरण करण्यात येते. 'वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था नष्ट करण्यात येत आहे. प्रत्येक जीव हा जन्मताच

पवित्र आहे,' अशी घोषणा शंकराचार्यांनी करावी, अन्यथा त्यांचा शिरच्छेद केला जाईल, असा इशारा देण्यात येतो. शिरच्छेदापूर्वी शंकराचार्यांची चंद्रपूरच्या जंगलातील छावणीत रवानगी करण्यात येते.

'छावणी' ह्या नाट्यसंहितेला अनेक पदर आहेत आणि खूप बारकावे आहेत. या नाट्यसृष्टीत लेखकाचे सखोल चिंतन जाणवते. 'छावणी'चे आशयद्रव्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. 'छावणी' आणि इतर नाटकांमध्ये प्रेमानंद गज्वी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या आधुनिकतेचा पुरस्कार केला आहे. गज्वी यांच्या नाटकांतील पुरोगामी विचारसरणी ही फार महत्त्वाची आहे. त्यांच्या सर्वच नाटकांमध्ये बौद्धिक प्रयोगशीलता आहे. या नाटकांमध्ये स्वप्नांचा संघर्ष आहे.

डॉ. अशोक बाबर यांनी 'छावणी'ला लिहिलेल्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे भारतीय साहित्याचा, नाटकाचा आशय काय असावा, याचे 'छावणी' हे नाटक मॉडेल म्हणून पाहण्यासारखे आहे. प्रेमानंद गज्वी हे रंजनवादी नाटककार नसून महात्मा जोतीराव फुले यांच्या परंपरेतील आधुनिकता अधोरेखित करणारे महत्त्वाचे नाटककार आहेत.

हल्ली 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गातील सुप्त संघर्ष वाढला आहे. जातीयतेने टोकदार रूप धारण केले आहे. गावखेड्यांचे रूपडे बदलले आहे. अशा परिस्थितीत लेखकाने आपला परिवर्तनाचा प्रामाणिक हेतू नाटकातून मांडावा, असे गज्वी यांना वाटते. लेखकाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहायला हवे, अशी आग्रही भूमिका ते नेहमीच घेतात. लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लढा प्राणपणाने लढण्याची भूमिका त्यांनी नेहमीच घेतली आहे. प्रेमानंद गज्वी हे समाजाला विचार देणारे आणि समाजाचा विवेक जागा करणारे नाटककार आहेत.

## निष्कर्ष :

1) प्रेमानंद गज्वी यांनी आपल्या नाटक एकांकिकांमधून कालबाह्य रुढी, परंपरांना ठामपणे नकार दिला आहे.

2) लेखक म्हणून प्रेमानंद गज्वी कुणा व्यक्तीच्या बाजूने किंवा विरोधात नव्हे, तर प्रश्नाच्या बाजूने ठामपणे उभे असतात.

3) प्रेमानंद गज्वी हे स्वत:च्या भूमिकेशी आणि संशोधनाशी, त्यातील तथ्यांशी प्रामाणिक राहून लेखन करतात.

4) प्रेमानंद गज्वी हे सनातनी परंपरेला प्रश्न विचारून निरूत्तर करणारे समाजचिंतक आहेत.

5) प्रेमानंद गज्वी हे महात्मा फुले यांच्या परंपरेतील समाजाला विचार देणारे आणि समाजाचा विवेक जागा करणारे परिवर्तनवादी नाटककार आहेत.

6) प्रेमानंद गज्वी यांनी आपल्या नाट्यलेखनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या आधुनिकतेचा पुरस्कार केला आहे.

## संदर्भ :

1) 'छावणी' : प्रेमानंद गज्वी, विजय प्रकाशन, नागपूर

2) 'साहित्यप्रत्यय' : भा.ल. भोळे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

3) 'साहित्य : ग्रामीण आणि दलित' संपा. डॉ. ईश्वर नंदनपुरे, प्रकाशक : विजय प्रकाशन नागपूर

4) 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' : डॉ. वसंत बिरादार, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद

5) रवींद्र पाथरे यांनी घेतलेली प्रेमानंद गज्वी यांची मुलाखत, दै. लोकसत्ता दि. 17 फेब्रुवारी 2019

6) mr.m.wikipedia.org

❖❖❖

# पश्चिम विदर्भ क्षेत्रातील बेंबळा जलसिंचन प्रकल्पाची भौगोलिक परिस्थिती

संशोधक
[१]कु. सोनाली सुरेंद्रराव दुधाट
द्वारा सुशीलकुमार भोरे
कोठा (वेणी), ता. कळंब, जि. यवतमाळ
Sonalibhore86@gmai.com
भ्रमणध्वनी ९४२०८३३८५२

मार्गदर्शक
[२]डॉ. एस. बी. आखरे
भूगोल विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
ता. तिवसा, जि. अमरावती, महाराष्ट्र
भ्रमणध्वनी ९९७०८५०८१

## १.१ प्रस्तावना

पश्चिम विदर्भ क्षेत्रातील बेंबळा जलसिंचन प्रकल्पाच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आपणाला प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक व पर्यावरण इत्यादी घटाकांच्या प्रारंभिक पार्श्वभूमीचा अभ्यास करावा लागतो. त्याचा परामर्श मागील प्रकरणामध्ये घेतल्यानंतर या प्रकरणामध्ये बेंबळा जलसिंचन प्रकल्पाची निर्मीती, आकार, लांबी, उंची, प्रवाह प्रणाली, सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत क्षेत्र, सिंचन पध्दती, सिंचनाचे प्रकार, प्रकल्पाद्वारे बुडीत क्षेत्र व पुनर्स्थापित वसाहती इत्यादी घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जलसिंचन हा बहुउद्देशीय प्रकल्प असतो. या प्रकल्पापासून जलसिंचन, पाणीपुरवठा, विजनिर्मीती, घरगुती वापरासाठी व औद्योगिक वापरासाठी पाणी पुरवठा, मत्स्य व्यवसाय, वन्य प्राणी तसेच पक्षांचे संवर्धन, पर्यटन स्थळ इत्यादी सोयींमुळे जलसिंचन प्रकल्प बहुउद्देशीय उपयुक्त ठरतात.

वर्तमानकाळात कृषी संस्कृती विश्वस्तरावर विकसित झालेली आहे. पाण्याचा अभाव असलेल्या क्षेत्रामध्ये कृषी कार्य सिंचनाद्वारे केल्या जाते. सिंचनाच्या आधुनिक तंत्राचा विकास वर्तमान झालेला आहे व त्यांच्या वैकासिक प्रवृत्तीचा मूलस्थानी मानवाचे अनुभव महत्वपूर्ण आहेत. मानवाने आपल्या अनुभवाच्या आधारे सिंचनसाधनांचा उद्‌भव करीत त्यास क्रमश: विकसित करीत राहल्याने परिणामस्वरूप आज या साधनास वर्तमान स्वरूप प्राप्त झालेले आहे. सिंचन कलेचा आधुनिक विकास कृषी कार्याकरीता अत्यंत उपयोगी सिध्द झालेला आहे. परिणामत: मानवी संस्कृतीचे तत्व गतिमान होऊन वर्तमान अत्यंत दृढ कठीण खडकांना तोडून कालव्याद्वारे दुर्गम स्थानावर पाणी पोहचविण्याच्या योजना क्रियान्वित होत आहेत. तसेच अनेक वैज्ञानिक सिंचन साधनांचा विकास झालेला आहे.

वैश्विक स्तरावर सिंचीत कृषीक्षेत्र अत्यल्प असून ते संपुर्ण लोकसंख्येचा गरजांची पूर्तता करू शकत नाही. परिणामत: बारामाही वाहणाऱ्या नद्यांमधील जे अतिरिक्त पाणी सागरामध्ये वाहून जाते त्यास प्रतिबंधित करण्यासाठी नदी प्रवाहास अवरूध्द करण्याकरीता नदीपात्रात धरण बांधण्याच्या योजना शासन स्तरावर क्रियान्वित झालेल्या आहेत. जलसिंचनाशिवाय वसाहत–उद्योगाकरीता जलपुरवठा, विद्युत निर्मीती, पर्यटन विकास, मासेमारी इत्यादी उद्दिष्टांची पूर्तता करणारी योजना किंवा नियोजनास योजनांकारांनी किंवा नितीकारांनी प्रकल्प म्हणून संबोधन केलेले आहे.

मानवी समुदायाचा विकास होत असतांना त्याची प्राथमिक गरज म्हणजे अन्न होय. ही गरज कृषी व वन यांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. त्यामुळे मानवाची अनिवार्य अशी मूलभूत गरज म्हणनू संबोधले जाणारे अन्न व ते निर्माण करण्यासाठी सहाय्यक ठरणारे जलसिंचन प्रकल्प मानवी समाजाची सुस्थिरता आणि विकास याकरीता महत्वाचे तसेच गरजेचे आहे. बदलते हवामान, पर्जन्यमान, जमिनीचा वापर, पाण्याची टंचाई, प्रदूषण इत्यादीमुळे कृषी व्यवसायावर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे कृषी उत्पादनात घट होत आहे. पर्यायाने त्याचा लोकांच्या आर्थिक घटकावर काय परिणाम होतो याचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. लोकसंख्या ही काळानुसार वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कृषी, भूमीवर वाढलेला भार, भूमी उपयोजनाचे बदलते स्वरूप अशा परिस्थितीत भविष्यकालीन नियोजनावर अभ्यास क्षेत्रातील कृषीचा आकृतीबंध, त्याची परस्परानुकलता व कृषी वन विषयक भूमी उपयोजनाचे स्वरूप यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

पश्चिम विदर्भातील बेंबळा जलसिंचन प्रकल्पाचा मानवी समुदायाच्या आर्थिक, सामाजिक विकासासाठी कसा उपयोग होतो? याचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. मानवी समुदायाच्या विकासाचे दोन घटक असतात,

पहिला सामाजिक व दुसरा आर्थिक. आर्थिक विकासामध्ये कृषी, कृषीवर आधारीत उद्योगधंदे, वाहतूक, सुविधा, व्यापार व बाजारपेठ इत्यादीचा समावेश होतो. या संपुर्ण घटकावर जलसिंचन प्रकल्पाचा कसा परिणाम झाला त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

काही विशिष्ट उद्दिष्ट ठेवून व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज घेऊन केलेल्या पुनर्नियोजित प्रारूप आराखडा म्हणजे प्रकल्प होय किंवा एखाद्या निश्चित उद्दिष्ट प्राप्तीकरीता संशोधन, नियोजन व त्याच्या क्रियान्वयनाची योजनाबध्द कालीक मांडणी करून तयार केलेला आराखडा म्हणजे प्रकलप होय.

## १.२ उद्देश :—

लोकसंख्येचा विस्फोट, नागरीकरणाचा अमर्याद विस्तार, वाढते औद्योगिकरण, पाश्चिमात्य जीवनशैलीचे अंधानुकरण, पाण्याचा भरमसाठ गैरवापर, तापमान वाढीमुळे हवामानातील होणारे बदल व त्यामुळे पर्जन्यावर झालेला परिणाम, कृषी उत्पदनात घट, भूपृष्ठातील पाण्याचे अतिरिक्त शोषण, पाण्याचा बेसुमार उपसा, पाण्याचे भूपृष्ठीय न होणारे पूनर्भरण, जंगलतोड यामुळे पाणी समस्या उग्र स्वरूप धारण करीत असल्याने अभ्यास क्षेत्रांतर्गत निष्कर्षात्मक स्पष्टीकरणावर भर देऊन जलसंवर्धनाविषयी उपाययोजना सुचविणे हा सदर अध्ययनचा उद्देश आहे.

पश्चिम विदर्भ क्षेत्रातील जलसंसाधनावर बेंबळा जलसिंचन प्रकल्पाचा होणाऱ्या परिणामाच्या अध्ययनाकरीता जिल्ह्यातील उपलब्ध जलस्त्रोत व जल संसाधनाची माहिती महाराष्ट्र शासनाच्या जल व सिंचन विभाग, पाटबंधारे विभाग तर्फे प्रकाशित साहित्य व लेखाचे संकलनातून प्राप्त केली आहे. यवतमाळ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, साख्यकीय कार्यालय, यवतमाळ इत्यादीच्या आधारे बेंबळा सिंचन प्रकल्पाची उपयोगी माहिती प्राप्त केली आहे. याशिवाय महाराष्ट्र सिंचन विकास पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे विविध प्रकाशित माहिती सदर संशोधनाकरीता उपयुक्त माणून यवतमाळ जिल्ह्यातील जल संसाधन व त्यातील समस्या व उपयोजनाचे संवर्धनाचे निष्कर्षत्मक स्पष्टीकरण बिनंबधात्म्क स्वरूपात सादर केले आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये पश्चिम विदर्भ क्षेत्रातील बेंबळा जलसिंचन प्रकल्पाचा लोकसंख्येच्या आर्थिक, सामाजिक विकासावर झालेल्या परिणामाच्या भौगोलिक विश्लेषणाचे स्पष्टीकरण दिले आहे. त्या अंतर्गत जलसिंचन प्रकल्पाचा आकार, लांबी, उंची प्रवाह प्रणाली, उपसा सिंचन, लाभीत क्षेत्र, सिंचन पध्दती, सिंचनाचे प्रकार, जलसिंचन प्रकलपाद्वारे बुडीत क्षेत्र व लाभीत क्षेत्र, वसाहतीचे प्रारूप, पुनर्स्थापित वसाहती इत्यादी घटकांवर झालेल्या परिणामाचे निष्कर्षात्मक स्पष्टीकरण या प्रकरणात करण्यात आले आहे.

## १.३ बेंबळा जलसिंचन प्रकल्प :—

पश्चिम विदर्भातील वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील अजिंठा—डोंगर रांगातुन समुद्र सपज्ञटीपासून साधारणत: ६६०० मी. उंचीवररून जाम गावातून बेंबळा नदी उगम पाऊन वाशिम, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातून वाहत जाते आणि पुढे उत्तरेकडून वाहणाऱ्या वर्धा नदीला जावून मिळते.

बेंबळा जलसिंचन प्रकल्प महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यात बाभूळगाव तालुक्यातील खडक सावंगा गावाजवळ बेंबळा नदीवर बांधकामाधीन मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प बाभूळगावापासून ८ कि.मी. व यवतमाळापासून २८ कि.मी. अंतरावर आहे. बेंबळाजलसिंचन प्रकल्पाचा अक्षवृत्तीचा विस्तार २०°१०'३१" ते २०°४१'२०" उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७७°५५'२४" ते पूर्व ७८°५३'४७" पूर्व आहे.

बेंबळा नदी वर्धा उपखोऱ्यातील वर्धा नदीची प्रमुख उपनदी आहे व प्रमुख खोरे गोदावरी आहे. या प्रकल्प परीक्षेत्रातील पाणलोट क्षेत्र २४९९ चौ.कि.मी. आहे. बेंबळा जलसिंचन प्रकल्पाचे कालव्याद्वारे एकूण समादेश—लाभीत क्षेत्र ५९१५२ हेक्टर असून बुडीत क्षेत्र १०१०० हेक्टर आहे. कृषी लागवडी खालील क्षेत्र ५३५६० हेक्टर असून त्यापैकी सिंचित क्षेत्र ४०१७० हेक्टर आहे.या जलसिंचन प्रकल्पाची सिंचन क्षमता ४७००० हेक्टर आहे.

बेंबळा जलसिंचन प्रकल्पाची महत्तम उंची १९.०६ मी. असून पाण्याचे महत्तम पातळीचे वर मुक्त जागा ४.५६ मी. आहे. नदीच्या तळ पातळीपासून बेंबळा प्रकल्पाची उंची २९.१५ मी. आहे. या प्रकल्पाची लांबी ७६५० मी. आहे. या धरणास २९७ मी. लांबीचा नदीपात्रात जलत्सारणी असून त्यावर १२ मी. उंच व ८ मी. रूंद आकाराचे एकूण २० दरवाज्यांची उभारणी पूर्ण झालेली आहे.

## १.४ बेंबळा—मुख्य कालवा व वितरिका :—

बेंबळा प्रकल्पातून ११३ कि.मी. लांबीचा एक मुख्य कालावा बाभूळगाव, कळंब, राळेगाव, मारेगाव या तालुक्यातून गेला असून या कालव्याद्वारे या क्षेत्रातील एकूण ५३५६० क्षेत्र लागवडी योग्य झाले आहे. सिंचन क्षेत्र ४०१७० हेक्टर असून सिंचन क्षमता ४७००० हेक्टर आहे. मुख्य कालव्यावर ३ उपकालवे (शाखा कालवे) १५ वितरिका, ७९ लघुकालवे व ३३ सरळ विमोचके निर्माण केले आहेत. बाभुळगाव तालुक्यातील ३१ गावाचे ५३८४स हेक्टर क्षेत्र, कळंब तालुक्यातील ४० गावांचे २७७३७ हेक्टर क्षेत्र, राळेगाव तालुक्यातील ७७ गावाचे २७७३७ हेक्टर क्षेत्र व मारेगाव तालुक्यातील २९ गावाचे ४६८४ हेक्टर या प्रमाणे एकूण १७७ गावाचे ४७००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी यवतमाळ व नेर तालुक्यातील काही गांवाकरीता ३२६२८ द.ल.घ.मी पाणी राखून ठेवलेले आहे. तसेच या प्रकल्पाद्वारे १००० कि.वॅट वीज निर्मीती होणार असून प्रकल्पाचा एकूण साठा ३२२.०६ द.ल.घ.मी. आहे.




बेंबळा जलसिंचन प्रकल्प



सारणी क्रं.१.१
बेंबळा सिंचन प्रकल्प — समादेश क्षेत्र

| अ.क्रं. | समादेश क्षेत्र | कालवा हेक्टर | डेहणी उपसा सिंचन (हेक्टर) | एकूण समादेश क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | शेती लागवडी लायक क्षेत्र | ५३५६० | ६९६८ | ६०५२८ |
| २ | सिंचन क्षेत्र | ४०१७० | ६९६८ | ४७१३८ |
| ३ | सिंचन क्षमता | ४७०० | ६९६८ | ५३९६८ |
| | एकूण समादेश क्षेत्र | ५९१५२ | ८६६१ | ६७८१३ |

## १.५ डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत क्षेत्र



बेंबळा प्रकल्पाचा भाग म्हणून डेहणी उपसा ठिंबक सिंचन योजना राबविण्यात आली आहे. या योजने अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यातील ४ गावे डेहणी (३७८.२२), पहूर (४५३.७७), गळव्ही (४४२.४३), दाभा (१४५६.३३) हेक्टर तसेच नेर तालुक्यातील ११ गावे चिखली—कान्होबा (४३६.६६), सरद (१९६.१९), कुऱ्हेगाव (२८०.९८), टेंभी (२३७.४२), मंगरूळ (५१.३७), मांगला देवी (१६५९.२४), माणीकवाडा (४६४.७८), धनज (३७०.२०), मंगरूळ (५१.३७), मांगला देवी (१६५९.२४), माणीकवाडा (४६४. ८७), धनज (३७०.२०), टाकळी (२४४.०४), ब्राह्मणवाडा (१७५.१५), पांझर—मक्रमपूर (१२१.६१) अशा एकूण १५ गावाचे ६९६८.०१ हेक्टर क्षेत्रास ठिंबक सिंचनाचा लाभ होतो आणि एकूण सिंचन क्षमता ५३९६८ हेक्टर आहे.

मा. पंतप्रधान पॅकेजमध्ये समावेश असलेल्या बेंबळा नदीवर मोठा प्रकल्प प्रवाही कालव्याद्वारे ४७००० हेक्टर जमीन व पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याच्या बाभूळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव तालुक्यातील १७७ गावे व डेहणी उपसा सिंचनाद्वारे ६९६८ हेक्टर जमीन बेंबळा जलसिंचन प्रकल्पाखाली आली आहे. डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे बाभूळगाव तालुक्यातील ४ गावे २७३१ हेक्टर व नेर तालुक्यातील ११ गावे ४२३७ हेक्टर जमीन अशा एकूण १५ गावांचे ६९६८ हेक्टश्र क्षेत्रास ठिबक सिंचनाचा लाभ होतो. या प्रकल्पाला फेब्रुवारी २००७ मध्ये सुरूवात होवून जून २०१४ मध्ये पूर्ण झाला आहे. बेंबळा प्रकल्पाच्या जलाशयातून २९.७ द.ल.घ.मी. पाण्याचा उपसाद्वारे ठिंबक सिंचनासाठी वापर करण्यात येतो. डेहणी उपसासिंचन प्रकल्पाचे १२० हेक्टर क्षेत्राचा एक झोन या प्रमाणे ५७ झोनमध्ये विभागून ठिंबक सिचंनाद्वारे ओलित करण्यात येते. या

प्रकल्पाला विद्युत पुरवठा धामणगाव सब–स्टेशन पासून डेहणी व चिखली सब–स्टेशन पर्यंतचे ३३ के.व्ही. विद्युत वाहिनीद्वारा करण्यात येते.

सारणी १.२
डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत गावे

| अ.क्र | तालुका | गाव | सिंचन क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १. | बाभूळगाव | १) डेहणी | ३८७.२२ |
| | | २) पहुर | ४५३.६६ |
| | | ३) गळव्ही | ४४२.४३ |
| | | ४) दाभा | १४५६.३३ |
| २. | नेर | १) चिखली (कान्होबा) | ४३६.६६ |
| | | २) सदर | १९६.१९ |
| | | ३) कुऱ्हेगाव | २८०.६० |
| | | ४) टेंभी | २३७.४२ |
| | | ५) मंगरूळ | ५१.३७ |
| | | ६) मांगला देवी | १६५९.५४ |
| | | ७) माणिकवाडा | ४६४.७८ |
| | | ८) धनज | ३७०.२० |
| | | ९) टाकळी | २४४.०६ |
| | | १०)ब्राह्मणवाडा | १७५.१५ |
| | | ११) पांझर/मक्रमपूर | १२१.६१ |
| | | एकूण | ४२३७.५६ |




आलेख क्र १.१
डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत गावे आणि त्यांचे सिंचित क्षेत्र

## डेहणी उपसा सिंचन प्रकलपाद्वारे लाभीत पिके

डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारा लाभीत पिकांचा अभ्यास करण्याकरीता प्रकल्प क्षेत्रातील नेर व बाभूळगाव तालुक्यातील लाभीत प्रमुख पिकांचा (सारणी क्रं. १.३) अभ्यास करण्यात आला आहे.

सारणी क्रं. १.३
डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत पिके

| अं.क्रं. | पिक | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कापूस | ११५१ | २८ |
| २. | ज्वारी | २२३० | ३२ |
| ३. | सोयाबीन | १११५ | १६ |
| ४. | गहू | ६९७ | १० |
| ५. | मिरची | ६२७ | ९ |
| ६. | भाजीपाला | ५५७ | ८ |
| ७. | मका | ४८९ | ७ |
| ९. | सूर्यफूल | ३४८ | ५ |
| १०. | लिंब | ३४८ | ५ |
| ११. | सीताफळ | ३४८ | ५ |

डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाचा सर्वाधिक लाभ ज्वारी या पिकाच्या ३२टक्के क्षेत्राला तर त्या खालाखाल कापूस २८टक्के क्षेत्राला  तर त्या खालोखाल कापूस २८टक्के क्षेत्राला झाला असल्याचे स्पष्ट होते तर सर्वात कमी सुर्यफूल, लिबू व सीताफळ या पिकाखालील प्रत्येकी ५टक्के क्षेत्राला सिंचनाचा लाभ झाला उर्वरित सोयाबीन १६टक्के, गहू १०टक्के, आवळा १४ टक्के, मिरची ९टक्के, भाजीपाला ८टक्के, मका ७टक्के इत्यादी पिकाखालील क्षेत्राला डेहणी प्रकल्पाचा लाभ झालेला दिसून येतो.




आलेख क्रं. १.२
डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाद्वारे लाभीत पिकांच्या क्षेत्राची टक्केवारी

## निष्कर्ष :–

१) वाढत जाणारी लोकसंख्या, नागरीकरण, अन्नधान्याची कमतरता, वेगवेगळ्या क्षेत्रातील पाण्याची वाढती मागणी इत्यादीमुळे पाण्याची कमरतरता भासत आहे. त्याकरीता पश्चिम विदर्भातील बेबळा सिंचन प्रकल्पाची किती आवश्यकता आहे हे अभ्यास क्षेत्रातील जलसंपदेचे अध्ययन केले असता लघू व मध्यम स्वरूपाचे लघूसिंचन प्रकल्पाचे नियोजन झालेले दिसून येते.

२) बेंबळा प्रकल्पाचा भाग म्हणून डेहणी उपसा ठिंबक सचिंन योजना राबविण्यात आली. डेहणी प्रकल्पांतर्गात यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यातील ४ वसाहती व नेर तालुक्यातील ११ वसाहतींना डेहणी प्रकल्पाच्या ठिबक सिंचनाचा लाभ होतो. या प्रकल्पाची सिंचन क्षमता ५३९६८ हेक्टर आहे.

३) बेंबळा प्रकल्पातून ११३ कि.मी. लांबीचा मुख्य कालवा आहे. या कालव्याद्वारे लागवडीयोग्य क्षेत्र ५३५६० हेक्टर असून सिंचन क्षेत्र ४०१७० हेक्टर व सिंचन क्षमता ४७००० हेक्टर आहे. मुख्य कालव्याचा लाभ बाभूळगाव तालुक्यातील ३१ गावाचे ५३८४ हेक्टर क्षेत्र, कळंब तालुक्यातील ४० गावात, मारेगाव तालुक्यातील २९ गावे व राळेगाव तालुक्यातील ७७ गावांना होणार आहे.

४) बेंबळा जलसिंचन प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन प्रकल्प राबविणे महत्वाचे ओह.

५) बेंबळा जलसिंचन प्रकल्प क्षेत्रात जलसिंचनाखालील जमिनीचे प्रमाण वाढत आहे. येथे जलसिंचनाकरीता मध्यम प्रकल्प, लघू सिंचन प्रकल्प, पाझर तलाव, विहिरी, कुपनलिका या साधनांचा अधिकाधिक उपयोग होताना आढळातो.

६) बेंबळा जलसिंचन प्रकलपाद्वारे लाभित क्षेत्र व ओलित क्षेत्र यामधील सहसबंध गुणक ०.९८ असून तो धनात्मक उच्च दर्जाचा सहसंबंध दर्शवितो.

७) बेंबळा जलसिंचन प्रकलपामुळे बाधित पुनर्स्थापित २५ वसाहती यवतमाळ व अमरावती जिल्यातील २८ ठिकाणी पुनर्वसित झाल्या आहेत.

## संदर्भग्रंथ सूची

१) More K.S. & Mustfa F.R. (1984).
Irrigation Requirement in Maharashtra Transaction Institution, of India Geographers.

२) Pawar C.T. (1989), Impact of Irrigation A regional perspective, Himalaya publishing House, Delhi.

३) महाराष्ट्र सिंचन परिषद, सिंचन क्षेत्रातील समृध्दीच्या दिशा, सिंचन सहयोग सांगलीत्र

४) बेंबळा पाटबंधारे विभाग, यवतमाळ.

५) यवतमाळ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, साख्यकीय कार्यालय, यवतमाळ

६) महाराष्ट्र सिंचन विकास पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

# Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.





Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

## INDIRA MAHAVIDYALAYA

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE







| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR coe | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002